# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-६.७.२०००

इतिवृत्त

## दि.६.७.२००० रोजीच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक ६.७.२००० रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. सभापती श्रीम.ज्योती कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. गजवानी कांता | सदस्या |
| २) | श्री. चौधरी राजेंद्र | सदस्य |
| ३) | श्री.पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ४) | श्री.चव्हाण रमेश | सदस्य |
| ५) | श्री.पंजाबी नारायण | सदस्य |
| ६) | श्री.बहरानी ठाकूरदास | सदस्य |
| ७) | श्री.भांडे भगवान | सदस्य |
| ८) | श्री.ठाले प्रमोद | सदस्य |
| ९) | श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| १०) | श्री. तेजी कैलाश | सदस्य |
| ११) | श्रीम.राजानी भारती | सदस्या |
| १२) | श्री.वनवारी किशोर | सदस्य |
| १३) | श्री.आयलानी कुमार | सदस्य |
| १४) | श्रीम.कुंदनानी लविना | सदस्या |
| १५) | श्रीम.वलेचा पदमा | सदस्य |

मा. सचिव :- विषय क्र.१ वाचून दाखवितात.
मागील सभेचे दिनांक २२.६.२००० रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- दि. २२.६.२००० रोजीच्या सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा.सचिवः- विषय क्र.२ वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजाः- हा प्रस्ताव संमत केला जावा.

मा.सभापती श्रीम.ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय :- सोबत जोडलेल्या चार विविध गोषवा-यात नमुद केलेल्या जागी सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत तसेच पाणी पुरवठा विभागा अंतर्गत करावयाच्या कामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्रः- ६६ दिनांक :- ६.७.२०००

सुचकाचे नाव :- श्री.प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती.कुंदनानी लविना.

ही स्थायी समिती सार्वजनिक बांधकामा विभागा अंतर्गत करावयाच्या पुढे नमुद केलेल्या अनुक्रमांक १व २ वरील कामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देत आहे. तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची असल्याने आयुक्तांना स्टॅन्डर मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निवदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे. तसेच अनुक्रमांक ३ व ४ वर नमुद केलेल्या अत्यंत आवश्यक कामी आयुक्तांनी मजदुर कामगार सहकारी संस्थेशी केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम. ७३(ड) अन्वये इतिवृत्तात नोंद करीत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर ५ येथील प्र.क्र.४८ मध्ये पुर्नवसन केलेल्या लोकांसाठी सी.सी. पायवाटा व नाली व स्लॅब टाकणे. | रू.१,९८,९००/- |
| २. | उल्हासनगर येथील प्र.क्र.४८ मध्ये साईट क्र.१६ येथे पुर्नवसन केलेल्या लोकांसाठी नाली,सी.सी.पायवाटा, जी.आय.जलवाहिनी इत्यादी कामे करणे. | रू.१,९६,५००/- |
| ३. | उल्हासनगर ३ येथील प्र.क्र.५९ मध्ये सिमेंटच्या पायवाटा व नाली बनविणे सिल्वर बिल्डींगच्या मागे व रस्त्या लगतची नाली बॅंक ऑफ इंडिया. (नगरसेवक निधीतून) | रू.१,९९,९००/- |
| ४. | उल्हासनगर३ प्र.क्र.५९ मध्ये सी.सी.रोड एम.२५० गुरूव्दारासमोर व धनलक्ष्मी अपार्टमेंटच्या मागे बनविणे. (नगरसेवक निधीतून) | रू.१,९९,९००/- |

सूचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव:- विषय क्र.३ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- दशोरे साहेब, सांगा तर.....

श्री.दशोरे (उप-अभियंता):- दोन ठिकाणी भुयारी गटार जोडणीचे काम करून घेण्यांत आलेले आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- नगरसेवक निधीतून तर हे काम हाती घेतलेले नाही ना? या कामी तरतुद केलेली रक्कम किती आहे?

श्री. दशोरे (उप-अभियंता):- दोन कामे सर्व साधारण निधीतील आहेत व एक काम नगरसेवक निधीतील आहे तसेच ४ लाख रूपये शिल्लक आहेत.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :- तिसरे काम कोणाच्या प्रभागातील आहे? तिसरे जे काम आहे ते सुध्दा सर्वसाधारण निधीतून केले जावे.

मा.सदस्य श्री किशोर वनवारी :-तिसरे जे काम आहे, ज्या कोणाचे आहे ते सुध्दा मंजुरीस आणले जावे, श्री.पारवानी यांचे म्हणणे आहे कि, ते काम सुध्दा सर्वसाधारण निधीतून केले जावे.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- हया प्रस्तावात नमुद केलेली तिन्ही काम सर्वसाधारण निधीतुन करण्याकामी सवानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :- सोबत जोडलेल्या दोन विविध गोषवा-यात नमुद केलेल्या जागी भुयारी गटार योजने अंतर्गत जोडणी व दुरूस्ती कामीचे तीन प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. ६७ दिनांक :-६.७.२०००

सुचकाचे नाव :- श्री.राम पारवानी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती.भारती राजानी.

हि स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या भुयार गटार योजने अंतर्गत जोडणी व दुरूस्ती कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे असुन आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर- ४ बॅरेक क्रमांक १४८५ प्रभाग क्र. ५४ येथे भुयार गटार योजने अंतर्गत भुयार गटार टाकणे जोडणे आणि दुरूस्तीचे कामे करणे बाबत. | रू.१,०५,८५९/- |

| अ.क्र. | कामाचा तपशिल | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|
| २. | उल्हासनगर४ प्रभाग क्रं७४ ,बॅरेक क्र. १४२७ येथे भुयार गटार योजने अंतर्गत भुयार गटार टाकणे जोडणे आणि दुरूस्तीचे कामे करणे बाबत. | रू.१ ,३६ ,३०९/- |
| ३. | उल्हासनगर भुयार गटार योजने अंतर्गत बॅरेक क्र.१०४८ सेक्शन २४ ,प्रभाग क्र.६९ कॅम्प क्र.३ येथील भुयार गटार पाईप लाईन टाकणे जोडणे आणि दुरूस्तिचे कामी. (नगरसेवक निधितुन) | रू.१ ,७९ ,४२०/- |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.४ वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री.कैलाश तेजी व श्री.रमेश चव्हाण हे सायंकाळी ४.४७ वाजता स्थायी समिती सभागृहातून बाहेर पडले.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- संबंधित प्रभागाच्या नगरसेवकांचे संमती पत्र आहे का?

श्री.सोनावणे (नगररचनाकार):- परवाना नुतनीकरणाचा प्रस्ताव आहे.

म.सदस्य श्री.किशोर वनवारी :- नगर रचनाकार यांचे म्हणणे आहे कि, एस.टी.डी.बुथ परवाना नुतनीकरण करण्यासाठी संबंधित प्रभागाच्या नगरसेवकाच्या संमती पत्राची आवश्यकता नाही? माझ्यामते संबंधित प्रभागाच्या नगरसेवकाचे संमती पत्र घेतले जावे, एका प्रस्तावाबाबत संबंधित प्रभागाच्या नगरसेवकाचे संमती पत्र आहे. दुस-या प्रस्तावाबाबत संबंधित प्रभागाच्या नगरसेवकाचे संमती पत्र घेतले जावे. ठिक आहे संमती करूया.

म.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :- अपंग अर्जदार कुमारी.पठाईत संगिता व श्री.लालचंद हेमराजानी यांना महापालिकेच्या जागेवर सोबत जोडलेल्या दोन गोषवा-यात नमुद केलेल्या जागी एस.टी.डी बुथ चालविणे कामी परवाना नुतनीकरण करणे बाबत.

प्रस्तावना :-

अर्जदार कुमारी.पठाईत संगिता या अपंग मुलीने पी.सी.ओ.बुथ चालविण्यासाठी रूहानी संतसंगच्या बाजुला उल्हासनगर महानगरपालिकेने दिनांक ४.२.९९ रोजी एका वर्षाकरिता परवानगी दिली होती. दिनांक. ३.२.२००० रोजी परवानगी संपत आल्याने अर्जदाराने नुतनीकरणासाठी अर्ज केलेला आहे. पुढील एका वर्षाच्या नुतनीकरण देण्यापुर्वी स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

अर्जदार श्री.लालचंद हेमराजानी या अपंग व्यक्तीस पी.सी.ओ बुथ चालविण्यासाठी कर वसूली आणि साफसफाई ऑफीस जवळ कवरराम पुतळयाचे चौकात उल्हासनगर ३ असलेल्या मोकळया जागेत महानगर पालिकेने दिनांक १४.५.९९ रोजी एका वर्षा करिता परवानगी दीली होती. दिनांक १३.५.९९ रोजी परवानगी संपत आल्याने अर्जदाराने नुतनीकरणासाठी अर्ज केलेला आहे. पुढील एका वर्षाच्या नुतनीकरण देण्यापुर्वी स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

वरील विषय मान्यतेसाठी स्थायी समिती पुढे सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ६८ दिनांक :- ६.७.२०००

सुचकाचे नाव :- श्री.किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने नुसार अपंग अर्जदार पठाईत संगिता व श्री.लालचंद हेमराजानी यांना उपरोक्त महापालिकेच्या जागेवर पुढील एक वर्षासाठी एस.टी.डी.बुथ चालवणे कामी परवाना नुतनीकरण करण्यास मान्यता देत आहे.

तसेच आयुक्तांच्या समाधानकारकतेस अधीन राहून सदरचा परवाना एका वर्षापेक्षा अधिक नसेल एवढया कालावधीसाठी वेळोवेळी नुतनीकरण करण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही /-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

--६--

मा.सचिवः- विषय क्र.७ वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- नगरसेवक निधीतून आहे का?

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी:- धुत साहेब, कोणत्त्या निधीतील काम आहे. नगरसेवक निधीतील आहे का?

श्री.धुत (कार्यकारी अभियंता, पा.पु.वि.):- होय.

मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषयः- सोबत जोडलेल्या चार विविध गोषवा-यात नमुद केलेल्या जागी जल वाहिनी टाकणे कामीचे दहा प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत तसेच आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

स्थायी समिती ठराव कं :-६९ दिनांक :-६.७.२०००.

सुचकाचे नाव :-श्री.ठाकूर बेहरानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. कुमार आयलानी.

ही स्थायी समिती नगरसेवक निधीतून पुढे नमुद केलेल्या जलवाहिनी टाकणे कामी चे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे,तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे असून आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निवीदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| १ | उल्हासनगर-३ येथील प्र.क्र.४१ मध्ये बॅरेक नं.११३२ ते १०९८ पर्यंत ६५ मी.मी. व्यासाची जी.आय.जुनी जलवाहिनी काढणे व नविन जलवाहिनी टाकणे बाबत (नगरसेवक निधीतून) | रू.१२,११७/- |
| २. | उल्हासनगर ३ येथील प्रभाग क्र.६८ मध्ये फर्निचर बाजार ते हरिद्वार अपार्टमेंट पर्यंत ८० मी.मी व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे बाबत. (नगरसेवक निधीतून) | रू.९२,०००/- |
| ३ | उल्हासनगर ३ येथील प्र.क्र.६० मध्ये ब्लॉक सी.३४ ते एम.पी.टॉवर नगरपालिका समोर ५० मी.मी. व्यासाची व ६५ मी.मी. व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणेबाबत. | रू.४५,४११/- |

(नगरसेवक निधीतून)



| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| ४ | उल्हासनगर १ येथील प्र.क्रं३३ मध्ये मेन रोड ते बॅरेक नं४०१ पर्यंत ८० मी.मी.व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे बाबत. (नगरसेवक निधीतुन) | रू.१,०१,७५०/- |
| ५ | उल्हासनगर २ येथील प्र.क्रं६५ मध्ये भारत सोप (झुलेलाल रोड) ते सागर पॅलेस पर्यंत ८० मी.मी.व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे बाबत.(नगरसेवक निधीतून) | रू.७९,१००/- |
| ६ | बॅरेक नं.८८,८९ जवळ ५० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत,उल्हासनगर१ प्र.क्र३५ (नगरसेवक निधीतून) | रू.४८,७१२/- |
| ७ | पाच पांडव कॉलनी स्मशान भूमीजवळच्या परिसराला पाणीपुरवठा करण्याकरिता ५०मी.मी.व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे बाबत,उल्हासनगर४ प्र.क्र४५ (नगरसेवक निधीतुन) | रू.५८,६१७/- |
| ८ | प्र.क्र१८ मधील बॅरेक नं.१९३९ते १९४३ व १९५७ ते १९५८ करिता ५० मी.मी. व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे बाबत उल्हासनगर५ (नगरसेवक निधीतून) | रू.९१,४५०/- |
| ९. | गुरूसंग दरबार ते बॅरेक नं.१६१०सेक्शन २६ येथे ५० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत (नगरसेवक निधीतून) | रू.६८,२५२/- |
| १०. | आंबेडकर चौक ते भरत नगर येथे रस्त्याच्या बाजुस १५० मी.मी. व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे बाबत उल्हासनगर४,प्र क्र१४ (नगरसेवक निधीतून) | रू.१,८९,२००/- |

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :-विषय क्र६ वाचून दाखवितात.

मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय:-सभापती स्थायी समिती व महापौर निधीतून सोबत जोडलेल्या दोन विविध गोषवा-यात नमुद केलेल्या जागी विद्युत दिवा बत्ती लावणे कामी चे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत तसेच आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणेबाबत.

---

स्थायी समिती ठराव क्र.७०　　　　दिनांक :- ६.७.२०००

सुचकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

हि स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे. तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे असून आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर१ येथील प्र.क्र३४ मध्ये रस्त्यावरिल दिवा बत्ती लावणे बाबत (सभापती स्थायी समिती व महापौर फंडातून) | रू.२,००,०००/- |
| २. | उल्हासनगर ३ येथील प्र.क्र ३९ मध्ये रस्त्यावरील दिवाबत्ती लावणे बाबत (महापौर फंडातुन) | रू.१,००,०००/- |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--९--

मा.सचिव :- विषय क्र.७ वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी :- भाडयाच्या किती गाडया लावल्या आहेत? त्यांची सविस्तर माहिती दिली जावी.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :- सविस्तर माहिती दिली जावी, एवढया गाडयाची आवश्यकता आहे का?

श्री. तुकाराम (वाहन विभाग):-भाडयाच्या गाडयाची सविस्तर माहिती देतात.

| | |
|---|---|
| १. आरोग्य विभागासाठी | :- ३ |
| २. पी.डब्लू.डी. साठी | :- ३ |
| ३. अतिक्रमण विभागासाठी | :- २ |
| ४. मालमत्ता विभागसाठी | :- १ |
| ५. लेखा परिक्षण विभागासाठी | :- १ |
| ६. नगररचना विभागसाठी | :- १ |
| ७. पाणीपुरवठा विभागसाठी | :- ५ |
| | ------ |
| इतर सर्व विभागाच्या मिळून एकुण | :- १८ |

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी :- सर्व गाडयांचा भाडयाचा दर सारखाच आहे का? या गाडया कोणत्त्या वर्षाच्या (मॉडेलच्या)असतील.

श्री.तुकाराम (वाहन विभाग):- १९९७च्या (मॉडेलच्या)...

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी :- श्री.नितनवरे यांचेकडे सध्या कोणते पद आहे? त्यांना का गाडी दिली जात आहे, आता ते सरकारकून वगैरे नाहीत तसेच मालमत्ता विभागाचा कार्यभाग उपआयूक्त श्री.पाटणकर यांना देण्यात आलेला असल्याने सध्या ते फक्त अव्वल कारकुन असल्याने त्यांच्याकडून गाडी काढून घ्यावी.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-स्थायी समितीचे मत आहे कि, त्यांना कार्यालयाने पुरविलेली भाडयाची गाडी काढून घ्यावी.

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी :- डुकरे पकडणा-या मोहिमेच्या प्रमुखांना कार्यालयाने जी भाडयाची गाडी दिली होती ती गाडी आता फ्री झाली आहे.

श्री.तुकाराम (वाहन विभाग):- आता ती गाडी दुस-याला दिली आहे.

मा.सदस्य श्री.ठाकूर बहरानी :- ती गाडी अशा माणसाला दिली आहे की, जे कधी कामावर येत नाहीत.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- विभाग प्रमुख किंवा उपायुक्त संवर्गाच्या खाली जी पदे आहेत अशा पदांवरील ज्या लोकांना कार्यालयाने गाडया पुरविल्या आहेत त्या त्यांच्याकडून काढून घेतल्या जाव्यात तसेच श्री नितनवरे यांना जी गाडी दिली आहे, ती काढून घेतली जावी.

मा.श्री.भडकवाड (उपायुक्त) :-जे क्षेत्र अधिकारी आहेत त्यांना गाडया देणे आवश्यक आहे. पाणी पुरवठयाचे जे उप-अभियंता वगैरे आहेत जे फिल्डमध्ये कामे करतात त्यांना गाडी देणे आवश्यक आहे.

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी :- आरोग्य विभागासाठी तीन गाड्या कशासाठी दिल्या आहेत?

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी :-उप-अभियंत्त्यांची पदे आहेत कुठे? सार्वजनिक बांधकाम विभागात कनिष्ठ अभियंता आहेत त्यांची तीस-तीस वर्षे सेवा झाली आहे त्यांना उप-अभियंत्त्यांची पदे दिली जात नाहित.

मा.श्री.भडकवाड (उपआयुक्त):- पाणी पुरवठा विभागाचे जे उप अभियंते आहेत त्यांच्यासाठी गाड्या आवश्यक आहेत यांच्या व्यतिरिक्त आरोग्य विभागासाठी, मुख्य स्वच्छता निरिक्षकांसाठी- १, आरोग्य अधिकारी यांच्यासाठी-१, व आरोग्य निरिक्षक कॅम्प ३. साठी एक जीप गाडी दिलेली आहे.

मा.सदस्य श्री.कैलाश तेजी व श्री.रमेश चव्हाण यांचे स्थायी समिती सभागृहात सायंकाळी ४.५२ वाजता पुन्हा आगमन झाले.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- स्वच्छता निरिक्षकास गाडी? १५ स्वच्छता निरिक्षक आहेत त्यांना १५ गाड्या दया ना?

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी :- एकालाच का दिली?

श्री.तुकाराम (वाहन विभाग):- जास्तीच्या ज्या गाड्या असतील त्या काढून घेतल्या जातील. डुकरे पकडण्याच्या मोहिमेचे जे प्रमुख होते त्यांना एक गाडी व मुख्य स्वच्छता निरीक्षक यांना एक गाडी दिली आहे.

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी :- प्रमुख प्रमुख अधिका-यां व्यतिरिक्त अन्य लोकांना ज्या गाड्या दील्या आहेत त्या काढून घेतल्या जाव्यात.

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी :- मालमत्ता विभागातील श्री.नितनवरे यांना जी गाडी दिली आहे ,ती गाडी काढून घेतली जावी.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- त्याच बरोबर आणखी दोन तीन जणांच्या गाड्या काढून घ्या.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :- उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजासाठी जीप, ॲम्बेसेडर कार (डिझेल)व मारूती व्हॅन पुरविणे कामी मेसर्स अनमोल ट्रान्सपोर्ट सर्व्हिसेस यांची न्यूनतम दराची निविदा स्वीकृती योग्य असून आयुक्तांस संविदेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय कामकाजासाठी जीप (कमीत कमी आठ आसने) ॲम्बेसेडर कार (डिझेल) व मारूती व्हॅन भाडे तत्त्वावर कंत्राटदार पध्दतीने पुरवठा करण्यासाठी विविध वृतपत्रात जाहिर सुचना देऊन मोहरबंद निविदा मागविण्यांत आलेल्या होत्त्या.



वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातीप्रमाणे निविदा सूचने नुसार फक्त एक निविदाकार कोरा निविदा संचाविहित वेळेत घेवून गेले, तदनंतर त्यांनी विहित

बयाणा रक्कम वेळेवर भरून विहीत दिवशी व वेळेत आपली मोहोरबंद निविदा सादर केली. सदरची मोहोरबंद निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांचे अभिप्रायानंतर मा.आयुक्त यांच्या परवानगीने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या उपस्थितीत उघडण्यात आली. सदर निविदेची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे :-

| वाहनाचा तपशिल | पुर्वीचा निविदा दर | सध्याचा निविदा दर |
|---|---|---|
| जीप | रूपये ४३१/-(डिझेल दर रू.१२.३५) | रूपये ४९७/-(डिझेल दर १६.८६) |
| ॲबेसेडर कार | रूपये ४९७/- | रूपये ४९७/- |
| मारूती व्हॅन | रूपये ४९७/- | रूपये ४९७/- |

वाहनाचे दर एका दिवसाला १० तासांसाठी थेट मागविण्यात आलेले आहेत. त्यात एका महिन्यात २,०००/- किलोमीटर मोफत रनिंग आहे. जर वाहन एका दिवसात १० तासांपेक्षा जास्त धावले तर २४/- रूप्ये प्रति तास दर ठरवून दिलेले आहेत. जर महिन्यात २००० कि मी पेक्षा जास्त वाहन धावले तर रूपये ४/- प्रति जादा कि मी चे ठरवून दिलेले आहेत आणि पुरवठादारांना दिनांक ६.१०.९९ च्या पेट्रोल व डिझेलचे भाव वाढले तर महानगरपालिकेने दर्शविलेल्या प्रत्त्येक वाहनाला सरासरीप्रमाणे फार्मुला बनविलेला आहे, त्याप्रमाणे त्यांना दर वाढवून द्यावे लागतील.

वरील दिलेल्या माहितीप्रमाणे मे. अनमोल ट्रान्सपोर्ट सर्विस यांनी दिलेला जीप,ॲबेसेडर कार (डिझेल) साठी रूपये ४९७ प्रति दिवस व मारूती व्हॅन साठी ४९७ प्रति दिन १० तासांसाठी कमी व वाजवी आहे त्यामुळे वरील सर्व मंजुर करणेस शिफारस आहे आणि त्यासाठी २०००-२००१ या वर्षाकरिता लागणा-या खर्चाला प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यासाठी स्थायी समितीपूढे प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव कमांक :- ७१ दिनांक :६.७.२०००

सुचकाचे नांव :- श्री.राजेंद्र चौधरी.

अनुमोदकाचे नांव :- श्रीमती. पद्मा वलेचा.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजासाठी जीप,ॲबेसेडर कार (डिझेल) व मारूती व्हॅन भाडे तत्त्वावर कंत्राट पध्दतीने पुरविणे कामी मेसर्स अनमोल ट्रांन्सपोर्ट सर्विस यांची उपरोक्त न्यूनतम दराची निविदा स्विकृतीयोग्य असुन आयुक्तांस संविदेस व अनुषंगिक खर्चास (प्रशासकीय व वित्तीय)मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही:-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका



मा.सचिवः- विषय क्र.८ वाचुन दाखवितात.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानीः- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :-सोबत जोडलेल्या चार विविध गोषवा-यात नमुद केलेल्या जागी केलेल्या कामी निविदे शिवाय थेट संविदेची माहिती कळविणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. ७२ दिनांक :-६.७.२०००

सुचकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. रमेश चव्हाण.

हि स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या कामी आयुक्तांनी मजदुर कामगार सहकारी संस्थेशी केलेल्या संविदेची कळविलेली माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये इतिवृत्तात नोंद करीत आहे.

| अ.क्र | कामाचा तपशिल | कंत्राटदाराचे नाव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|---|
| १. | स्टॉफ क्वॉटर्स,पटेल नगर रूम नं.२ / १ ते २ / ४ येथे तुटलेले दरवाजे बदलणे,प्लॉस्टरिंग, वीट बांधकाम,कलरचे काम करणे उल्हासनगर ५. | मेसर्स शारदा मजुर कामगार सह.संस्था | रू.१,७६,०४९/- |
| २. | स्टॉफ क्वाटर्स,पटेल नगर रूम नं.१ / १ ते १ / ४ येथे तुटलेले दरवाजे बदलणे,प्लास्टरिंग वीट बांधकाम,कलरचे काम करणे, उल्हासनगर . ५ | मे.शारदा मजुर कामगार सह.संस्था | रू.१,३३,२०६/- |
| ३. | उल्हासनगर ५ येथे विविध ठिकाणी व्हॉलसाठी वीट बांधकाम चेंबर्स बांधणे. | ----"---- | रू. ७०,१८०/- |
| ४. | उल्हासनगर.२ येथील प्र.क्र.६ मध्ये पी.डबलू.डी क्षेत्र क्र.२ जवळ उद्यानात अतिक्रमण विभागासाठी शाखा विभागिय कार्यालय बांधणे. | ----"----- | रू.१,१०,७५०/- |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका



मा.सचिव :- विषय क्र.९ वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी:- कसला प्रस्ताव आहे? संमत करूया.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :- देखभाल व दुरूस्ती अंतर्गत पटेल नगर टाकी जवळ व उपविभागिय कार्यालय उल्हासनगर- ५ जवळ टाकलेल्या जलवाहिनी कामी थेट संविदेस कार्योत्तर मंजुरी देणे बाबत.

प्रस्तावना :-

उपरोक्त विषयांकीत ठिकाणी व्हॉल बसविण्ययाबाबतचे प्राकलन रक्कम रूपये ६० ,१६२/- चे जिल्हादर सूची ९८-९९ च्या अधिन राहुन तयार करण्यात आले आहे.

कॅम्प नं.४ मध्ये पाणिपुरवठा सुधारण्याकरीता जलवाहिनीवर सदर व्हॉल बसविणे जरूरीचे होते त्यामुळे सदर काम जयभवानी मजुर कामगार सहकारी संस्था यांचे तर्फे करून घेण्यात आले आहे.

तरी मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम,७३ क अंतर्गत सदर कामास प्रशासकीय व वित्तिय कार्योत्तर मंजुरी,तसेच कामाचे कार्योत्तर आदेश जयभवानी मजुर कामगार संस्थेस देण्यास प्रस्ताव मंजुरीस स्थायी समिती पुढे सादर.

स्थायी समिती ठराव कं.७३ दिनांक :- ६.७.२०००

सुचकाचे नाव :- श्रीमती. कांता रजवानी.

अनुमोदकाचे नाव:- श्री. किशोर वनवारी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार देखभाल व दुरूस्ती अंतर्गत पटेल नगर टाकीजवळ व उपविभागीय कार्यालय उल्हासनगर-५ अनु.४५० व ३०० मी.मी.व्यासाची व्हॉल बसविणे कामी रू.६० ,१६२/-चे अत्यंत आवश्यक कामाचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे तसेच आयुक्तांनी मेसर्स जयभवानी मजदुर कामगार संस्थेशी केलेल्या निविदा शिवाय थेट संविदेस कार्योत्तर मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापति / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.१० वाचून दाखवितात.
मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :- कोणत्त्या निधीतून?

मा.सचिव :- नगरसेवक निधीतील कामे आहेत तसे गोषवा-यामध्ये लिहिले आहे.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले:- आम्हाला याबाबतचा गोषवारा तर मिळालाच नाही.

मा.सचिव :- गोषवारा नाही, ४३ कामांची यादी दिलेली आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- ४३ कामांची ही जी यादी आहे ती, ४३ प्रभागातील कामाचे संदर्भातील आहे या व्यातिरिक्त हया ४३ प्रभागातील आणखी ३७ कामास लेखा विभाग व लेखा परिक्षण विभागाकडून संमती मिळालेली आहे. स्थायी समिती सभापती व आयुक्त यांच्यामध्ये झालेल्या बैठकीत आयुक्तांनी कबुल केले होते की, आयत्त्या वेळेच्या विषयामध्ये मी ही कामे मंजुरीस आणीन परंतु आजच्या सभेत आयुक्त साहेब उपस्थित नसल्याने ती कामे स्थायी समिती सभेपूढे मंजुरीस आणलेली नाहीत. सदरची कामे अत्त्यंत आवश्यक व तातडीची आहेत, या ४३ प्रभागातील शिल्लक राहीलेल्या३७ कामांच्या प्राकलनांवर आयुक्तांची स्वाक्षरी नसल्याने ती सभेत मंजुरीस आलेली नाही. या कामांचे गोषवारे तयार असुन ती कामे अत्त्यंत तातडीची व निकडीची असल्याने हया प्रस्तावामध्ये त्यांचा समावेश करून मंजुर करण्यात यावी, तसेच सदरच्या कामी निविदेशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करण्यात यावे.

श्री.कमलेश सोनाळे (उपायुक्त):- ४३ प्राकलनांवर आयुक्तांच्या स्वाक्ष-या आहेत. ती ४३ प्राकलने मंजुरीस आणलेली आहेत. मी आणखी प्राकलने मंजुरीस आणू इच्छित नाही,कारण आयुक्तांनी मला तसे अधिकार दिलेले नाहीत याशिवाय आणखी प्राकलनांचा ठरावामध्ये समावेश करू नये. अशी माझी विनंती आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- ४३ प्राकलनांचे गोषवारे सदस्यांनी पाहिले नाहीत, आमच्याकडे गोषवारे नाहीत. आम्हास फक्त यादी दिलेली आहे.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :- ही पहा फक्त यादी आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- ४३ गोषवारे आम्ही पाहिले नाहित.आज पर्यंतच्या कार्यपध्दती नुसार गोषवारे दयावयास पाहिजे होते.

श्री.सोनाळे (उपायुक्त):- माझ्याकडे आयुक्त पदाचा कार्यभार नाही त्यामुळे ४३ प्राकलना व्यतिरिक्त आणखी वाढीव प्राकलने मंजुरीस ठेवण्याचा मी निर्णय घेवू शकत नाही.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- आम्ही ७९ प्राकलनांना मंजुरी देत आहोत.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- नगरसेवक निधीतील आहे. संमत करण्यास हरकत नसावी.

मा.सदस्य श्री.ठाकूर बहरानी :- हा प्रस्ताव संमत केला जावा.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- मी आयुक्त साहेबांशी चर्चा केली होती. जी काही ७९ प्राकलने तयार आहेत ती सभेत ठेवण्यास आयुक्त तयार होते. फक्त त्यांची एकच अट होती की, जर सदरची कामे हाती घेतली तर देयके अदा करण्यात अडचणी येतील जर ठेकेदार उशीरा पेमेंट घेण्यास तयार असतील तर माझी काही हरकत नाही. ही सर्व कामे नगरसेवक निधीतील व तातडीची असून ही कामे सभेच्या मतानुसार स्वअधिकारांन्वये या ठरावात समाविष्ट केली तर आयुक्तांना काही हरकत नसेल व ही कामे अतिआवश्यक असून मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधीकृत करणे योग्य होईल. म्हणून पुढील प्रमाणे ठराव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय -सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत करावयाच्या सोबत जोडलेल्या यादीत नमुद केलेल्या जागी व ४३ कामी चे प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर शहरातील महानगरपालिका हद्दीत येणारे सोबतच्या यादीनुसारची एकूण ४३ प्रभागातील कामे मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.स्थायी समिति सभापती व नगरसेवक निधीतून करणेची मागणी उपरोक्त संबंधितांनी केलेली आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर कामांचे ठिकाणची संबंधित कनिष्ठ अभियंतांनी प्रत्येक्ष पहाणी करून त्यानुसार त्या कामाचे प्राकलने तयार केलेले आहेत. त्यांची अंदाजित रक्कम रूपये १,५१,८७,७५२/- इतकी होत आहे. या कामांच्या खर्चासाठी अंदाजपत्रकाम महानगरपालिका भाग क्रमांक लेखा शिर्ष सी ४(३) (४)पी २ मधुन काम करावयाचे आहे. त्यानुसार सदर एकूण ४३ प्रभागातील प्राकलनांच्या किंमत रूपये १,५१,८७,७५२/- यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेसाठी स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यासाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्रं.७४ दिनांक :-६.७.२०००

सुचकाचे नाव :- श्री.किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री.राजेंद्र चौधरी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावानेनुसार मा.महापौर, मा.उपमहापौर, मा. स्थायी समिती सभापती व नगरसेवक निधीतून पुढे नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्त्यंत तातडीचे असून आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

उल्हासनगर महानगरपालिका

विषय -सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत करावयाच्या सोबत जोडलेल्या यादीत नमुद केलेल्या जागी व ४३ कामी चे प्राकलनास प्रशासकीय वित्तीय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर शहरातील महानगरपालिका हद्दीत येणारे सोबतच्या यादीनुसार एकूण ४३ प्रभागातील कामे नगरसेवक निधीतून करणेची मागणी नगरसेवकांनी केलेली आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर कामांचे ठिकाणची संबंधित कनिष्ठ अभियंतांनी प्रत्येक्ष पहाणी करून त्यानुसार त्या कामाचे प्राकलने तयार केलेले आहेत. त्यांची अंदाजित रक्कम रूपये १,५१,८७,७५२/- इतकी होत आहे. या कामांच्या खर्चासाठी अंदाजपत्रकाम महानगरपालिका भाग क्रमांक लेखा शिर्ष सी ४(३) (४)पी २ मधुन काम करावयाचे आहे. त्यानुसार सदर एकूण ४३ प्रभागातील प्राकलनांच्या किंमत रूपये १,५१,८७,७५२/- यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेसाठी स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यासाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्रं.७४ दिनांक :-६.७.२०००

सुचकाचे नाव :- श्री.किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री.राजेंद्र चौधरी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावानेनुसार नगरसेवक निधीतून पुढे नमुद केलेल्या कामाचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्त्यंत तातडीचे असून आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-२१.७.२०००

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक २१.७.२००० रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योती कालानी ह्या पिठासीन अधिकारी या स्थानी

आसनस्थ होत्त्या. तसेच खालील दर्शाविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.कुमार आयलानी | सदस्य |
| २. | श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| ३. | श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| ४. | श्री. चौधरी राजेंद्र | सदस्य |
| ५. | श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ६. | श्री.पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ७. | श्री. पंजाबी नारायण | सदस्य |
| ८. | श्री. भांडे भगवान | सदस्य |
| ९. | श्री. टाले प्रमोद | सदस्य |
| १०. | श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ११. | श्री.तेजी कैलाश | सदस्य |
| १२. | श्रीमती.भारती रजानी | सदस्या |
| १३. | श्री. किशोर वनवारी | सदस्य |
| १४. | श्रीमती. पदमा वलेचा | सदस्या |

तर
मा.सदस्य.श्री.ठाकुर बेहरानी हे सभेस अनुपस्थितीत होते.

<u>श्री. ढाकरे (उप-आयुक्त)</u> :- हे आयुक्तांच्या आसनावर आसनस्थ झाले.

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र.१ वाचून दाखवितात.

दिनांक ६.७.२००० रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u> :- दि. ६.७.२००० रोजीच्या सभेच्या इतिवृत्तांतील पृष्ठ क्र.४, वर मा.सदस्य श्री.कैलाश तेजी व श्री. रमेश चव्हाण हे सायंकाळी ४.४७ वा. स्थायी समिती सभागृहातून बाहेर पडले अशी नोंद आलेली आहे, एखादा सदस्य सभागृहातून एक-दोन मिनिटासाठी बाहेर जातो तर त्याची इतिवृत्तांत नोंद केली जाते काय? यापूर्वी अशी नोंद केलेली आहे काय?

<u>मा.सचिव</u> :- अशा प्रकारची नोंद केली जाते, यापूर्वी सुध्दा केलेली आहे.

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी</u> :- तसेच यापूढे सुध्दा अशी नोंद येईल?

<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी</u> :- आजच्या सभेची वेळ सायंकाळी ४.३० ची होती. आता सायंकाळचे ४.५० वाजले आहेत. अदयाप सभेचे कामकाज



सुरू झालेले नाही. आम्ही ४.३० वाजल्यापासून पिठासीन अधिका-यांची वाट पहात बसुन आहोत. सभापती महोदया आपण आल्या नसता तर, मी आपल्या आसनावर बसणार होतो.

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी</u> :- भले आपण बसा, मी जाते.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :- सभापती महोदयांचे म्हणणे होते की, सर्व सदस्य आले पाहिजेत.

<u>मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण</u> :- मागच्या सभेच्या ठराव क्र.६७ मध्ये भुयारी गटार जोडणी दुरूस्तीची जी तीन कामे मंजुर केली ती, अर्थसंकल्पांच्या कोणत्त्या शिर्षा अंतर्गतची आहेत.

मा.सचिव :- ठराव पूर्वी, त्याबाबतच्या निर्णयाची नोंद आलेली असून त्यामध्ये स्पष्ट उल्लेख आलेला आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- ती ३ कामे सर्वसाधारण निधी अंतर्गतच्या शिर्षातील आहेत, आपल्याच सदस्यांने घेतलेल्या हरकतीमुळे ही कामे सर्वसाधारण निधी अंर्तगतच्या शिर्षातून करण्यास मंजूरी देण्यांत आलेली आहे, श्री.रामचंद्र पारवानी यांनी या प्रकारची हरकत घेतली होती.

मा.सदस्य श्री रमेश चव्हाण :- असे होता कामा नये, सर्वसाधारण निधीतून कामे करत असाल तर त्याप्रमाणे ती सर्वांच्या प्रभागात झाली पाहिजेत.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- श्री.ठाकुर बेहरानी व श्रीमती कांता गजवानी यांनी आज जी कामे सुचविली आहेत ती सुध्दा सर्वसाधारण निधीतील असून त्यांचापण यामध्ये समावेश करण्यात यावा. तसेच इतिवृत्तातील पृष्टक्रमांक १९ वरील अनू क्र ३४ वरील कामा समोर प्रभाग क्र.४९ अशी नोंद झालेली आहे. त्याऐवजी प्र.क्र.२० अशी नोंद करावयास पाहीजे.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :-दि.६.७.२००० रोजीच्या सभेचे इतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा.सचिव :- विषय क्र.२ वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :- कुणाचा प्रभाग आहे?

मा.सचिव :- यापुर्वी परवाने दिलेले आहेत, आता त्या परवान्यांचे नुतनीकरण करावयाचे आहे.

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी :- परंतु त्या लोकांनी एस.टी.डी.बुथ चालूच केले नाहीत तर, परवान्यांचे नुतनीकरण कसे? या प्रस्तावाबाबत स्पष्टीकरण दयावयास संबंधीत अधिकारी सुध्दा येथे उपस्थित नाहीत म्हणून या प्रस्तावावर चर्चा करण्यास काही फायदा नाही. हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा.
मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा :- कुणाचा प्रस्ताव आहे? नगररचनाकार कुठे आहेत.



मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- स्पष्टीकरण करणारे कुणी आहेत का?

मा.सचिव :- आयुक्त साहेब आहेत ना? अपंग व्यक्तीचा प्रस्ताव आहे.

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी :- संबंधित अधिकारी उपस्थित नाही, तर हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- स्थायी समिती समोर ज्या ज्या विभागाचे प्रस्ताव मंजुरीस येतात, त्या त्या विभागाच्या संबंधित अधिका-यांनी स्पष्टीकरण करण्यासाठी येथे उपस्थित राहीले पाहिजे, त्यानुसार संबंधित अधिकारी येथे उपस्थित आहेत का?

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :- हवे तर मतदान घ्या.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- अपंगाचा प्रस्तावावर सुध्दा मतदान घेणार का?

मा.सदस्य श्री.कुमार आयलानी :- पुढच्या सभेत ठेवा.

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी :- मंजुर करूया.

मा.सचिव :- हा प्रस्ताव पुढे ढकलायचा काय?

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी :- संबंधित अधिकारी स्पष्टीकरण करण्यासाठी उपस्थित नाहीत ते येई पर्यंत हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पूढे ढकलण्यांत येत आहे.

विषय :- अपंग अर्जदार श्री. अशोक जे. वनवारी व श्री. रघुविर सिंग खालसा यांना महानगरपालिकेच्या जागेवर सोबत जोडलेल्या दोन गोषवा-यात नमुद केलेल्या जागी एस.टी.डी. बुथ चालविणे कामी परवाना नुतनीकरण करणे बाबत.

मा.सचिव :- विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- आम्हाला बाहेरून झेरॉक्स कॉपी काढून घ्याव्या लागतात. या मशिनवर नगरसेवकांना झेरॉक्स कॉपीज काढून दिल्या जातील का? किंवा जूनी मशिन नगरसेवकांना देणार काय?

मा.सचिव :-जून्या मशिनची मुदत संपत आलेली आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- जूनी झेरॉक्स मशिन नगरसेवकांना दिली जावी.

मा.सचिव :- हा प्रिन्टर आहे, यावर १००-१००, २००-२०० प्रती काढल्या जातात. एक-एक प्रत झेरॉक्स काढली जात नाही.



मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- नविन गॅस्टनर कॉपी प्रिंटर खरेदीकरणे कामी मा. आयुक्तांना थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेतील सध्या अस्तित्त्वात असलेले गॅस्टनर कॉपी प्रिंटर मॉडेल नंबर५३२३ हे सन १९९७ मध्ये खरेदी केले असून सदर प्रिंटरची कार्यक्षमता जवळ-जवळ संपली आहे.

महासभा, स्थायी समिती सभा, व इतर सभे संबंधी काढाव्या लागणा-या झेरॉक्स प्रतीची संख्या फार मोठ्या प्रमाणात असल्याने सध्या अस्तित्त्वात असलेल्या पिंटर वर त्या काढणे कठिण जात आहे. तसेच या प्रिंटर मध्ये सतत बिघाड होत असल्याने, सचिव कार्यालयाच्या कामामध्ये अडथळे निर्माण होत असतात.

सचिव कार्यालयात मार्फत महासभा, स्थायी समिती सभा, इत्त्यादींचे काम सुरळीत चालण्यासाठी उपरोक्त विषयांकित पिंटरची खरेदी करणे गरजेचे असून खरेदीचा तपशिल खालील प्रमाणे :-

| अनुक्रमांक | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १. | गेस्टनर कॉपी प्रिंटर मॉडेल नं ५३२७ | ४,७२,०००/-रूपये. |
| २. | कलर ड्रम | + ०,४५,०००/- रूपये. |
| | | ५,१७,०००/-रूपये. |
| ३. | विक्रीकर ९.८ टक्के. | + ५०,६६६/- रूपये. |
| | | = ५,६७,६६६/- रूपये. |
| ४. | जकात कर ४ टक्के. | + २२,७०७/-रूपये |
| | एकूण :- ५,९०,३७३/-रूपये | |

खरेदी करीता येणारा खर्च रूपये ५,९०,३७३/-यास प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेस्तव स्थायी समिती समोर प्रस्तावित.

गेस्टनर कॉपी प्रिंटरचे कोणीही वितरक नसल्याने तसेच या खरेदी कामी निविदा मागविल्यास निविदाकार त्यावर आपल्या कमीशनसह जादा बिल आकारेल म्हणून सदर गेस्टनर कॉपी प्रिंटरची कंपनी कडून निविदेशिवाय कंपनीच्या अधिकृत दराप्रमाणे थेट खरेदी करण्यास आयुक्तांना प्राधीकृत करण्यास प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ७५</u> <u>दिनांक</u>:-२१.७.२०००

सुचकाचे नाव :- श्रीमती. कांता गजवानी.

अनुमोदकाचे नाव :- श्री.राजेंद्र चौधरी.

--५--

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार नविन गेस्टनर कॉपी प्रिंटर मॉडेल क्र.५३२७ खरेदी करणे कामी अंदाजित रक्कम रूपये ५,९०,३७३/-यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच गेस्टनर कंपनी कडून अधिकृत दराप्रमाणे निविदाशिवाय थेट खरेदी करण्याच्या संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र.४ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. कुमार आयलानी</u> :- हा प्रस्ताव संमत केला जावा.

<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी</u> :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>विषय</u> :- सोबत जोडलेल्या दोन गोषवा-यात नमुद केलेल्या जागी मा. महापौर निधीतून व नगरसेवक निधीतून जलवाहिनी टाकणे कामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता <u>देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर-१ येथील प्रभाग क्र.६६, मधील गार्डन क्र. ४४४ ते कला पॅलेस पर्यंत ८० मी.मी. व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे बाबतचे काम मा. महापौर श्री.हरदास माखीजा यांच्या महापौर निधी मधुन करावयाचे कामाकरिता रक्कम रू.१,४०,०००/- चे प्राकलन तयार करण्यात आले आहे.सदर कामाकरिता मा.महापौर श्री.हरदास माखीजा यांनी त्याचा निधी उपलब्ध करून दिला आहे व त्यास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.सदर काम तीतडीचे असल्याने मे. ज्योती कालानी मजूर कामगार सहकारी संस्था यांचेतर्फे करून घेण्यात आले आहे.त्याकरिता सदर प्राकलनास कार्योत्तर, पशासकिय व वित्तिय मंजुरी करिता स्थायी समिती पुढे सादर.

उल्हासनगर २ येथे संतज्ञानेश्वर नगर मध्ये, प्र.क्र.८ या ठिकाणी श्री. रामदास र. उमाप यांच्या नगरसेवक निधीतून जलवाहिनी टाकणेच्या प्रस्ताव रक्कम रू.७१,०००/- करिता जिल्हा दर सूची १९९८-९९ च्या अधीन



तयार करण्यात आलेला आहे. सदर कामाकरिता नगरसेवक श्री.रामदास र. उमाप यांनी आपली निधी उपलब्ध करून दिली आहे व त्यास मा.आयुक्त यांना मान्यता दिली आहे.तरी सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजूरी करिता व काम मजूर कामगार सहकारी संस्थे तर्फे करून घेण्यास, मान्यतेस्तव स्थायी समिती पुढे ठेवण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.७६</u> <u>दिनांक</u>:-२१.७.२०००

सुचकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :- श्री.कुमार आयलानी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार महापौर निधीतून व नगरसेवक निधीतून उपरोक्त जागी जलवाहिनी टाकणे कामीचे प्राकलनास

प्रशासकीय व वित्तिय मान्यता देवून आयुक्तांस मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.५ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- मला या प्रस्तावावर चर्चा करावयाची आहे, कधी आपणास प्रस्ताव पुढे ढकलायचा असला तर, म्हणता पुढे ढकलला, संमत करायचा असला तर संमत करा म्हणतात, हा प्रस्ताव पुढे ढकलायचा होता तर मंजुरीस आणलाच कशाला? आपल्या पसंतीच्या लोकांचे असेल म्हणून हा प्रस्ताव मंजुरीस आणला असावा हे चुकीचे आहे, यांच्या मनामध्ये आले मंजुर करायचे तर म्हणतात मंजुर करा तर कधी पुढे ढकला. हा प्रस्ताव पुढे ढकलायचा झाला तर त्यास काही कारणे असली पाहिजेत. काय कारणे आहेत?

मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी :- ढाकरे साहेब, प्रस्ताव पुढे ढकलण्याचे कारण सांगा.



श्री.ढाकरे (उपायुक्त) :-त्याबाबत निविदा मागवण्यात आल्या होत्त्या. याकामी शासनाने मान्यता दिलेला पाठयक्रम शिकविणा-या काही संस्थांनी निविदा भरल्या होत्त्या त्यात त्यांनी शासनमान्य दर लिहिलेले होते.

परंतु आता शासनाने अशा संस्थांची मान्यता काढून घेतली असल्याने हा प्रस्ताव रदद करावा लागत आहे.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते कार्यसूची वरून वगळण्यात येत आहे.

विषय :- महापालिका अधिकारी / कर्मचारी यांना संगणकाचे प्रशिक्षण देणे कामी मेसर्स ऐरोली ॲडव्हान्स कॉम्प्यूटर सेंटर यांची न्यूनतम दराची निविदा स्विकृत होत असून संविदेस मान्यता देणे बाबत.

मा.सचिव :- विषय क्र. ६ वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी :- नगरसेवक निधीतील काम आहे का?

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- याबाबतची आणखी दोन प्राकलने तयार असून ती या प्रस्तावाबरोबर आणलेली नाहीत. म्हणुन अशी जेवढी काही प्राकलने तयार असतील ती मंजुरीस आणली जावीत.

__श्री. दशोरे ( उप-अभियंता):-__ हे प्राकलन लेखा विभाग, लेखा परिक्षण विभाग व मा.आयुक्त साहेबांकडून मान्य होऊन आलेले आहे. दुसरी प्राकलने तयार केली आहेत परंतु ती लेखा विभाग, लेखा परिक्षण विभाग व आयुक्त साहेबांकडून मान्य होऊन आलेली नाहीत.

__मा.सदस्य श्री.किशोर वनवारी__ :- श्रीमती कांता गजवानी व श्री.रामचंद पारवानी यांच्या प्रभागातील भुयारी गटार जोडणी / दुरूस्ती बाबतची प्राकलने तयार आहेत. तसेच ही कामे नगरसेवक निधीतील असून ती प्राकलने सुध्दा मंजुरीस आणली जावीत, या बाबतची सर्व फॉर्मेलीटी पूर्ण केलेली आहे.

__मा.सचिव__ :- कृपया सर्व सदस्यांनी या बाबी कडे लक्ष दयावे. विषय सूचीवर जो विषय आहे. त्याअन्वये फक्त दोन प्राकलने मंजुरीस आणलेली आहेत. या प्रस्तावातील ठरावात कार्यसूची व्यतिरिक्त ची प्राकलने समाविष्ट करता येणार नाहीत. यासाठी आयुक्तांच्या संमतीने वेगळा विषय आणावा लागेल.

__मा.सदस्य श्री.किशोर वनवारी__ :- तर मग आयत्त्यावेळेच्या विषयामध्ये ही प्राकलने मंजुरीस घेतली जावीत.

__मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी__ :- सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

--८--

__विषय__ :- उल्हासनगर भुयार गटार योजने अंतर्गत सोबत जोडलेल्या गोषवा-यात नमुद केलेल्या जाग्री प्र.क्र. ६९ मध्ये भुयारी गटार लाईन टाकणे, जोडणी व दुरूस्ती कामीचे प्राकलनास __प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.__

__प्रस्तावना__

उपरोक्त ठिकाणी गटार वारंवार चोकप होत असते याबाबत महाराष्ट्र प्रदुषण विद्युत मंडळ यांनी वारंवार पत्र देऊन भुयार गटार दुरूस्ती आणि नविन कनेक्शन भुयारी गटार मार्गे शुध्दीकरण केंद्र पूर्ण क्षमतेला लिहिलेले आहे तरी या भूयारी गटाराची दुरूस्ती व लाईन टाकणे जाडणीची आवश्यकता या करीता खालीलप्रमाणे प्राकलने तयार केलेली आहे.

| अनु कमांक | कामाचे नाव | अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १. | बॅरेक क्र.१०३९ /४० प्र.क्र.६९ | १,९९,८३१/-रूपये |
| २. | बॅरेक क्र.१०४१ आणि वेगवेगळे ठिकाणी प्र. क्र.६९. | १,३६,४८३/-रूपये |

वरील प्राकलने जिल्हा दरसूची ९८-९९ च्या अधिन राहून तयार करण्यात आलेले आहेत.

त्या भागातील नगरसेवक श्री.गोप बहरानी यांनी आपल्या नगरसेवक निधीतून त्या कामासाठी निधी उपलब्ध करून दिलेला आहे. सदर प्रस्तावास माननीय आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता तसेच काम मजुर कामगार सहकारी संस्थेमार्फत करून घेण्यास स्थायी समिती कडून मंजुरी मिळावी.

स्थायी समिती ठराव क्र.   ७७   दिनांक :- २१.७.२०००

सुचकाचे नाव :- श्री. भगवान भांडे.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती.लविना कुंदनानी.

ही स्थायी समिती नगरसेवक निधीतून वर नमुद केलेल्या जागी भुयारी गटार योजने अंतर्गत भुयार गटार लाईन टाकणे, जोडणे व दुरूस्तीकामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

--९--

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.७ वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :- प्र.क्र.१६ मध्ये पी.व्ही.सी टाक्या बसविणेबाबत उपमहापौरांनी आपल्या निधीतून निधी उपलब्ध करून दिला आहे परंतु तेथे खरच या कामाची आवश्यकता आहे किंवा नाही? या निधीचा योग्य असा वापर होतो आहे किंवा नाही? हे पाहिले जावे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- हा प्रस्ताव माझ्या प्रभागाबाबतचा नाही. श्रीमती बगाडे यांच्या प्रभागातील आहे. या कामांची ज्यांच्या प्रभागामध्ये जरूरत आहे त्यांना हा निधी उपलब्ध करून दीला जावा.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- श्रीमती सुनिता बगाडे यांच्या प्रभागात आता आवश्यक एवढे पाणी येत असल्याचे पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी सांगतात.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- प्र.क्र.१६ मध्ये आता या कामाची आवश्यकता आहे का? नसेल तर मग हा निधी वाया जाईल.

श्री.दशोरे (उप अभियंता):- तिथे आवश्यक तेवढे पाणी पोहचत नाही म्हणून..

म.सदस्य श्री.किशोर वनवारी :- तेथे पी.व्ही.सी टाक्या बसविण्याची आवश्यकता आहे का?

श्री.दशोरे (उप अभियंता):- होय.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- नगरसेविका श्रीमती सुनिता बगाडे यांच्या प्रभागात पी.व्ही.सी टाक्या बसविण्यासाठी उपमहापौरांनी आपल्या निधीतून निधी उपलब्ध करून दिलेला आहे तर त्याबाबत आपण का बोलत आहात? नगरसेवकास त्यामध्ये बदल करायचा असेल तर तो त्यांचा मुददा आहे. परंतु मा.उपमहापौरांचा मान ठेऊन आम्ही हा प्रस्ताव पारीत करतो.



मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :- जरूरत आहे की, नाही हे पाहिले जावे.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- जनतेची मागणी होती म्हणून उपमहापौरांनी श्रीमती सुनिता बगाडे यांना त्यांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा :- तेथील नागरिकांची तशी मागणी असेल म्हणुन तर हा प्रस्ताव आणला असेल ना?

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- जरूरत नसेल तर नंतर रदद केला जावा.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- आवश्यकता भासली नाही तर, याकामी खर्च केला जाणार नाही. सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :- उप-महापौर निधीतून उल्हासनगर-४ प्र.क्र.१६ मध्ये दोन विविध ठिकाणी ५००० लीटर क्षमतेच्या पी.व्ही सी. टाक्या बसविणे कामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

उपरोक्त विषयांकित ठिकाणी मा.उप महापौर यांच्या निधीतून पी.व्ही.सी च्या (५००० लि.क्षमतेच्या)टाक्या बसविण्याचा प्रस्ताव रक्कम रूपये ८३,१७५/- करिता तयार करण्यात आला आहे.

सदर कामा करिता मा. उप महापौर यांनी आपला फंड उपलब्ध करून दिला आहे व त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

तरी सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी करिता व काम मजुर कामगार सरकारी संस्थेतर्फे करून घेण्यास मान्यतेस्तव स्थायी समिती पूढे ठेवण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र.७८ दिनांक :-२१.७.२०००

सुचकाचे नाव :- श्री.राजेंद्र चौधरी.

अनुमोदकाचे नाव :- श्री.राम पारवानी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उपमहापौर निधीतून प्रभाग क्र. १६ मध्ये दोन विविध ठिकाणी ५००० लीटर क्षमतेच्या पी.व्ही.सी.टाक्या बसविणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे. पाणी टंचाई मुळे सदरचे काम अत्यंत आवश्यक आणि तातडीचे असल्याने

--११--

आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संथेशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.८ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा / श्री.कुमार आयलानी :- हा प्रस्ताव संमत करूया.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-रस्त्यामध्ये एम.एस.ई.बी चे पोल आहेत त्यांचे काय होईल? ते कधी हटविले जातील ते हटविले जावेत.

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता, विद्युत):- एम.एस.ई.बी.ला आम्ही लेखी दिलेले आहे व कार्यवाही चालू आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- नगरसेवक निधीतील कामे आहेत,संमत केली जावीत.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :-सोबत जोडलेल्या दोन गोषवा-यात नमुद केलेल्या जागी नगरसेवक निधीतून व सभापती स्थायी समिती निधीतून प्र. क्र.५४ व ६ मध्ये रस्त्यावरील दिवा बत्ती लावणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र.७९ दिनांक :-२१.७.२०००

सुचकाचे नाव :-श्री.नारायण पंजाबी.

अनुमोदकाचे नाव :- श्री.किशोर वनवारी.

--१२--

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार नगरसेवक निधीतून व सभापती स्थायी समिती निधीतून वर नमुद केलेल्या जागी अनुक्रमे. प्र.क्र ५४ व प्र.क्र ६ प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे असून या कामी मजुर कामगार सहकारी संस्थेशी थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

| अनु क्रमांक | कामाचा तपशिल | प्राकलनीय किंमत |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर २ येथील प्र.क्र ६ मध्ये रस्त्यावरील दिवाबत्ती लावणे बाबत (सभापती स्थायी समिती निधीतून) | २,००,०००/-रूपये. |
| २. | उल्हासनगर ४ येथील प्र.क्र ५४ मध्ये रस्त्यावरील दिवाबत्ती लावणेबाबत (नगरसेवक निधीतून) | ८४,०००/- रूपये. |

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.९ वाचून दाखवितात.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :- एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र.१ अंतर्गत सोबत जोडलेल्या गोषवा-यात नमुद केलेल्या रस्त्यावरील जागी केबल टाकणे व लहान दिवाबत्तीचे कार्य करणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

महानगरपालिकेने महासभेच्या ठराव क्र.१२ दिनांक ११.११.९९ अन्वये अंतर्गत ३३ रस्त्यांचे रूंदीकरणाचे व बनविण्याचे कार्य हाती घेतले आहे. त्यातून काही रस्ते दिवाबत्ती लावण्यासाठी तयार होते त्यांचे प्राकलन



स्थायी समिती पूढे ठेवून मंजुरी घेतली जाते. त्या अन्वये खाली दर्शविलेल्या तीन रोड वर दिवाबत्तीचे पूर्वीचे केलेले काम थोडे फार फेरबदल करून व खराब झालेल्या केबलच्या जागी नविन केबल टाकून तेच वापरण्यात येईल त्याचा तपशिल व प्राकलन रक्कम खालील प्रमाणे आहे.

१. प्रभात चौक ते शिवमंदीर चौक उल्हासनगर ५ नविन केबल टाकणे व त्या रोड वर थोडेफार दिवा बत्ती कामे साठी ४,७३,०००/- रूपयाचे प्राकलन बनविलेले आहे.

२. माणेरा जंक्शन ते नवजीवन बॅंक रतन चेंबर उल्हासनगर ४ येथे खराब झालेल्या केबलच्या जागी नविन केबल टाकणे व दिवा बत्ती मध्ये थोडेफार फेरबदल करण्या करिता रूपये ३,३२,०००/- प्राकलन बनविलेले आहे.

३. विनस कारंजे ते लालचक्की उल्हासनगर ४ येथे नविन केबल टाकणे व असलेल्या दिवाबत्ती कामात फेरबदल करण्याकरिता रूपये ३,१२०००/-प्राकलन बनविलेले आहे.

सदर सर्व कामाचे प्राकलन सार्वजनिक बांधकाम विभाग व कंन्सलटंटच्या दिलेल्या लाईन आऊट प्रमाणे बनविलेले आहे, आणि हे काम तातडीने करण्यासाठी कंन्सलटंटनी मागणी केलेली असून लेबर को.ऑप. सोसायटी मार्फत काम करवून घेण्याचे प्रस्तावित आहे. त्यास मुख्य लेखाअधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी स्थायी समिती पूढे ठेवून मंजुरी साठी सादर करण्यास हरकत नाही अशी शिफारस केलेली आहे. या खर्चाची बजेट मध्ये पुरेशी तरतूद उपलब्ध आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेवून सदर प्राकलनांना मंजुरी मिळण्याकरिता व लेबर को.ऑप.सोसायटीशी थेट संविदा करून त्यांच्या मार्फत काम करून घेण्यासाठी मान्यता मिळण्याकरिता सादर.

स्थायी समिती ठराव क्र.८० दिनांक :-२१.७.२०००

सुचकाचे नाव :-श्री.किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री.नारायण पंजाबी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र.१ अंतर्गत वर नमुद केलेल्या जागी जमीनीतून काही केबल

टाकणे व लहान दिवा बत्तीचे कार्य करणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे तसेच सदरचे काम रस्ते रूंदीकरणामुळे अत्यंत आवश्यक व तातडीचे असून आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.



सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.सचिव :- विषय क्र.१० वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- हे काम नगरसेवक निधीतील आहे का?

श्री.चिजवानी (शहर अभियंता):- ३३ रस्त्यांचे जे काम आहे त्यामध्येच हे करायचे आहे.

मा.सदस्य श्री.कैलाश तेजी :- ३३ रस्त्यांचे काम अगोदर पूर्ण करा, नंतर माहिती पडेल २२ रस्तेच तयार झालेले आहेत म्हणून....

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :- उल्हासनगर ४ येथिल प्र.क्र.१४ मधील ब्लॉक. क्र ३८० ते श्री. ओव्हाळ यांचे घरापर्यंत रस्ता एम २५० ने बांधणे कामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर ४ येथिल प्र. क्र.१४ मध्ये ब्लॉक अे.३८० ते श्री.ओव्हाळ यांचे घरापर्यंत रस्ता एम.२५० नी बांधणे अत्यंत आवश्यक आहे संबंधित नगरसेवक श्री.प्रमोद एन.टाले यांचे प्रभाग क्र.१४ मधील सुभाष टेकडी परिसरात गार्डन सुशोभित करण्याचे महानगरपालिकेने ठरविले होते. परंतु रेल्वे कडून सदर जागेत तोडफोड होवून ती जागा रेल्वे ने आपल्या ताब्यात घेतली आहे. त्यामुळे सन १९९९-२००० च्या नगरसेवक निधीतून सुभाषटेकडी परिसरातील गार्डन सुशोभिकरण करणे रदद करून त्याऐवजि उल्हासनगर यथील प्र.क्र.१४ मध्ये ब्लॉक क्र.अे.३८० ते श्री. ओव्हाळ यांच्या घरापर्यंत रस्ता एम.२५० नी बांधण्याचे काम नगरसेवक निधीतून करण्याचे श्री.प्रमोद एन.टाले यांनी सुचविले आहे, त्याचप्रमाणे सदर रस्त्याची कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष पहाणी करून त्याचे प्राकलन तयार केले असून सदर प्राकलनाची किंमत रूपये २,९९,१५०/- इतकी

आहे. सदर कामास प्रशासकिय वित्तिय मंजुरी मिळणेसाठी स्थायी समिती पुढे ठेवण्यासाठी प्रस्तावित.



स्थायी समिती ठराव क्र.८१ दिनांक :- २१.७.२०००

सुचकाचे नाव :-श्री.राजेंद्र चौधरी.

अनुमोदकाचे नाव :-श्री.प्रमोद टाले.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर ४ येथिल प्र.क्र.१४ मध्ये ब्लॉक क्र. ओ,३८० ते श्री. ओव्हाळ यांचे घरापर्यंत नगरसेवक निधीतून एम.२५० ने रस्ता बांधणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :-विषय क्र.११ वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- न्यु क्लॉथ मार्केट च्या येथे घरे आहेत कि दुकाने?

श्री.चिजवानी (शहर अभियंता):- घरे व दुकाने दोन्ही आहेत?

मा.सदस्य श्री. कैलाश तेजी :- तीन वर्षे झाली, माझ्या प्रभागातील सर्व शौचालये तोडली आहेत ती अदयाप का बांधली जात नाहीत? माझ्या प्रभागातील लोक श्री.किशोर वनवारी यांच्या प्रभागात जातात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- श्री. तेजी यांच्या प्रभागात सार्वजनिक शौचालये बांधली जावीत. त्यानंतर माझ्या प्रभागातील ही शौचालये तोडली जावीत.

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी :- श्री.चिजवानी साहेब प्राकलनिय रक्कम किती आहे?

श्री.चिजवानी (शहर अभियंता):- आठवत नाही, गोषवारा मी वाचलेला आहे. १,९८,२००/- चे प्राकलन आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:- ४ बैठकीचे शौचालय एक लाखामध्ये होते, २ लाख कसे? इम्पॉरटंट लॅट्रीन आहे का?

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण:- पुर्नवसन वाल्यांसाठीचा प्रस्ताव आहे. मंजुर केला जावा.

मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा :- दोन लाखाचे प्राकलन आहे.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-बाजूला सी सी पॅलेस पण करावयाचा आहे.

मा.श्री.किशोर वनवारी :- ठीक आहे. समंत करू या.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

विषय :- उल्हासनगर ५ येथील प्र.क्र.४८ मध्ये आनंदपुरी दरबार साईट क्र.१६ समोर पुर्नवसन केलेल्या लोकांच्या सोयीसाठी ४ बैठकीचे शौचालय बांधणे कामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर ५ येथिल प्र. क्र.४८ मध्ये आनंदपूरी दरबार साईट क्र.१६ समोर पुर्नवसन केलेल्या लोकांच्या सोयीसाठी चार बैठकीचे शौचालय बांधणे अत्यंत गरजेचे आहे. ती सुविधा नसल्यामुळे नागरिकांचे अत्यंत हाल होत आहेत, त्यामुळे हे काम लवकरात लवकर करणे अत्यंत आवश्यक आहे.

वरील काम रस्ता रूंदीकरण कार्यक्रम टप्पा क्र.१ मधुन करावयाचे आहे त्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाने या जागेची पहाणी करून रूपये १,९८,९००/- किंमतीचे प्राकलन तयार केलेले आहे. या कामाच्या खर्चासाठी अंदाजपत्रकात महानगरपालिका लेखा शिर्ष सी.४ (ा)पी.२ मधुन करावयाचे आहे. त्यात तरतुद उपलब्ध आहे. त्यानुसार सदर रूपये १,९८,९००/- किंमतीचे प्रभाग क्र.४८ मधील सदर कामाच्या प्राकलनाला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये मंजुरी मिळणेसाठी व सदर काम मेसर्स स्टॅंडर्ड लेबर को.ऑप.सोसायटी मार्फत काम करून घेण्याचे मान्यतेसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र.८२ दिनांक :-२१.७.२०००

सुचकाचे नाव :-श्री.किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री.नारायण पंजाबी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर ५ येथील आनंदपुरी दरबार साईट क्र.१६ समोर पुर्नवर्सन केलेल्या लोकांच्या सोयीसाठी ४ बैठकीचे शौचालय बांधणे कामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असून आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही /-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.१२ वाचून दाखवितात.

श्री.चिजवानी (शहर अभियंता):-हे काम सुध्दा नगरसेवक निधीतील आहे.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :-पूर्वीच्या स्थायी समिती ठराव क्र.९६ मध्ये फेरबदल करून उल्हासनगर ४ येथील प्र. क्र.२३ व उल्हासनगर ३ येथील प्र. क्र.२८ मध्ये रस्ता बी.एम.व ए.सी.ने बनविणे ऐवजी एम. २५० ने बांधणे कामीचे तीन प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

प्रभाग क्र. २३ मध्ये नगरसेवक श्री.एस दर्शनसिंग यांनी शिफारस केल्याप्रमाणे खालील काम मंजुर केले आहे.

१) उल्हासनगर ४ येथील प्र.क्र.२३ मध्ये कॅनरा बॅंक ते सरस्वती शाळा आणि योगेश नगर, विर सावरकर नगर, आणि गणेश नगर मध्ये रस्ता बी. एम व ए.सी व्दारे बनविणे रूपये १,९८,०००/-



हे काम नगरसेवक निधितून करण्यासाठी ठराव क्र.९६ दिनांक नुसार मंजुरी मिळालेली आहे. सदर काम महानगरपालिका अधिनियम ५ (२)(२) नूसार मंजुर करण्यात आले असून मेसर्स कुमार पी.चैनानी यांना काम देण्यात आले होते. परंतु नगरसेवकाचे पत्र प्राप्त झालेप्रमाणे काम सुरू करण्यास कंत्राटदारास मनाई करण्यात आली. नगरसेवकांचे मागणीनुसार काम रद्द करून त्याऐवजी खालील काम हाती घेण्यासाठी प्रस्तावित केले आहे.

१) उल्हासनगर४ येथील प्रभाग क्र.२३ मध्ये सरस्वती शाळा ते हीडामल तबेला पर्यंत रस्ता एम.२५० ने बांधणे. रूपये १,९८,०००/-

२) उल्हासनगर४ येथील प्रभाग क्र.२३ मध्ये बॅ.क्र.१६६३,१६६५ ते राजू यांचे घरापर्यंत रस्ता एम. २५० बांधणे रूपये.१,९८,०००/-

यापूर्वी मंजुर केलेल्या कामाची अंदाजित किंमत रूपये ३,९८,९२०/- इतकी होते. नगरसेवकांनी सुचविल्याप्रमाणे उपरोक्त नवीन दोन कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबधित कनिष्ठ अभियंत्याने पहाणी करून अंदाजपत्रक तयार केले आहे. सदर नवीन प्रस्तावित दोन कामावरील खर्च ३,९६,१००/- होणार आहे.

तरी नगरसेवक श्री. एस दर्शनसिंग यांनी प्रस्तावित केलेले दोन नविन रस्त्याचे सिमेंटीकरण करणे साठी सुचविलेले आहे. यापुर्वी रस्त्याचे बी.एम.व एसी ने बनविणेसाठी ठराव क्र.९६ नुसार मंजुरी मिळालेली कामे रदद करून त्याऐवजी सुचविलेले दोन कामे हाती घेण्यासाठी मंजुरीसाठी

सदर व दोन कामांच्या प्राकलनीय रक्कम रूपये ३,९६,१००/-यांस प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणेसाठी स्थायी समिती सभेपुढें ठेवण्यासाठी प्रस्तावित.

उल्हासनगर ३ येथील प्रभाग क्र.२८ मध्ये नगरसेवक श्री.राजेंद्र शां. चौधरी यांनी शिफारस केल्याप्रमाणे खालील काम मंजुर केले होते.
उल्हासनगर ३ येथील प्र.क्र.२८ मध्ये माल कंपाऊंड येथील रस्ता बि.एम.ए.सी. व्दारे बनविणे. रूपये. २,४९,९९०/-

हे काम नगरसेवक निधीतून करण्यासाठी ठराव क्र.९६ (४३) दिनांक २०. १.२००० नुसार मंजुरी मिळालेली आहे. सदर काम महानगरपालिका अधिनियम ५ (२)(२)नुसार मंजुर करण्यात आले असून मेसर्स मां.शेरावांली कंन्स्ट्रक्शन यांना काम देण्यात आले होते. श्री.राजेंद्र चौधरी यांनी त्यांच्या दिनांक ४.६.२००० च्या पत्रानुसार सदर काम रदद करून त्याऐवजी खालील काम नगरसेवक निधीतून हाती घेण्यास सुचविले आहे.

उल्हासनगर ३ येथील प्र.क्र.२८ मध्ये खन्ना कंपाऊंड मध्ये शेवटची चाळ पर्यंत रस्ता एम.२५० ने बांधणे रूपये.२,४९,९९०/-

यापूर्वी मंजुर केलेल्या कामाची अंदाजित किंमत रूपये २,४९,९९०/- इतकी होती. नगरसेवकाने सुचविल्याप्रमाणे उपरोक्त नविन कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित कनिष्ठ अभियंताने पहाणी करून अंदाजपत्रक तयार केले आहे. सदर नविन प्रस्तावित कामावरील खर्च रूपये. २,४९,९६०होणार आहे.



तरी नगरसेवक श्री.राजेंद्र चौधरी यांनी प्रस्तावित केलेली नविन रस्त्याचे सिमेंटीकरण करण्यासाठी सुचविलेले आहे. या कामी चालू आर्थिक वर्षाच्या नगरसेवक निधी लेखा शिर्ष सी.४ (९) पी.२ मध्ये रूपये ३.३० इतकी जास्तीची तरतूद आहे. त्यामुळे सदर कामास मान्यता मिळणेस प्रस्तावित आहे. यापूर्वी रस्त्याचे बी.एम. व ए.सी बनविणे साठी ठराव क्र.९६ (४३)नुसार मंजुरी मिळालेले काम रदद करून त्याऐवजी सुचविलेले काम हाती घेण्यासाठी मंजुरीसाठी सदर कामाची प्राकलनीय रक्कम रूपये.२,४९,९६०/- यास प्रशासकिय व वित्तिय मंजुरी मिळणे साठी स्थायी समिती सभेपूढे ठेवण्यास प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र.८३ दिनांक :-२१.७.२०००

सुचकाचे नाव :-श्री. प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :- श्री.कुमार आयलानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार पूर्वीच्या स्थायी समिती ठराव क्र.९६ दिनांक २०.१.२०००मधील संदर्भित भागात अंशत: फेरबदल करून वर नमुद केलेल्या उल्हासनगर ४ येथील प्र.क्र.२३ व उल्हासनगर३ येथील प्रभाग क्र.२८ मधील जागी रस्ता बी.एम व ए.सी.ने बनविणे ऐवजी एम.२५०ने बांधणे कामीचे उपरोक्त प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

श्री.ढाकरे (उपआयुक्त):- माझ्याकडे आयत्त्यावेळचे दोन विषय आहेत,आपली संमती असेल तर सभेच्या कामकाजात समाविष्ठ केले जावेत.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- नगरसेवक निधीतील आहे ना?



श्री.ढाकरे (प्रभारी आयुक्त):- प्र.क्र.३७ मध्ये रस्त्त्यावरील दिवाबत्ती लावणे बाबतचा प्रस्ताव आहे.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- कुणाच्या प्रभागातील?

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी:- श्री.रामचंद पारवानी यांच्या प्रभागातील काम आहे म्हणून मंजुर करूया.

श्री.ढाकरे (प्रभारी आयुक्त):- तसेच आयत्त्यावेळचा दुसरा एक विषय आहे. प्रभाग क्र.५७ मध्ये भुयारी गटार जोडणी व दुरूस्तीच्या कामीचा.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- आयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये आणलेले दोन्ही प्रस्ताव सभेच्या मतानुसार आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यात येत असून सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

विषय :- नगरसेवक निधीतून उल्हासनगर१ येथील प्रभाग क्र. ३७ मधील रस्त्त्यावरील दिवाबत्ती लावणे कामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देणे बाबत, तसेच आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदे शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

आयत्त्यावेळचा विषय :-

प्रस्तावना

उल्हासनगर१ येथील प्रभाग क्र.३७ चे नगरसेवक श्री.राम (चार्ली) पारवाणी यांनी त्यांचे पत्र दिनांक १८.७.२००० अन्वये रस्त्त्यावरील दिवाबत्ती लावण्या कामाची मागणी त्यांच्या नगरसेवक फंडातुन केली आहे. विद्युत विभागाने जागेवर पहाणी करून यासंबंधी रूपये ७५,०००/- इतक्या किंमतीचे खर्च अनुमानित केला होता. या कामाच्या खर्चासाठी नगरसेवक फंडाच्या लेखा शिर्षात तरतूद उपलब्ध आहे. त्यानुसार सदर रूपये ७५,०००/- किंमतीचे प्रभाग क्र.३७ या अभिकरणाने प्राकलन विद्युत खात्त्याने तयार केलेले आहे. सदर कामाच्या खर्चासाठी अंदाजपत्रकात तरतुद शिल्लक असल्याने व हे काम झुलेलाल मंदिर जवळ असल्यामुळे व तिथल्या वर्षक उत्त्सवाची सुरूवात झाल्यामुळे मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी त्यांच्या शेरा नुसार यासंबंधी कामाचे प्राकलनास मंजुरी करण्याची शिफारीश केलेली आहे. त्यानुसार सदर कामास प्रशासकिय व वित्तिय मान्यतेसाठी तसेच काम चालू करण्यासाठी डी.डी.आर. यांचे कडून मजुर कामगार सहकारी संस्थेकडून शिफारशी साठी पाठविणे कार्यवाही करणेसाठी स्थायी समितीकडून मान्यता घेणेसाठी प्रस्तावित आहे आणि कार्याची तातडी असल्यामुळे दिनांक २१.७.२००० च्या स्थायी समितीच्या सभेत आयत्त्या वेळीच्या प्रस्ताव म्हणून घेण्यासाठी विनंती आहे.



स्थायी समिती ठराव क्र.८४ दिनांक :-२१.७.२०००.

सुचकाचे नाव :-श्री.रामचंद पारवानी.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती.भारती रजानी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार नगरसेवक निधीतून उल्हासनगर१ येथील प्रभाग क्र.३७ मधील रस्त्त्यावरील दिवाबत्ती लावणे कामी रू.७५,०००/- चे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्त्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

विषय :- उल्हासनगर ३ येथील प्र.क्र ५७ मधील दोन विविध ठिकाणी भुयारी गटारे जोडणी, दुरूस्ती कामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

आयत्त्यावेळचा विषय

स्थायी समिती ठराव क्र.८५ दिनांक :-२१.७.२०००.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव:- श्री. विनोद तलरेजा.

--२२--

हि स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या भुयार गटार योजने अंतर्गतचे जोडणी व दुरूस्ती कामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्त्यंत तातडीची व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

| अनुक्रमांक | कामाचा तपशिल | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| १. | बॅरेक क्र.९०० शेजारी, भुयारी गटार योजने अंतर्गत भुयारी गटार टाकणे जोडणे आणि दुरूस्तिचे काम करणे . (प्र.क्र ५७, उल्हासनगर ३) | १,५९,२७०/- |
| २. | बॅरेक क्र.८९४ शेजारी भुयारी गटार योजने अंतर्गत भुयारी गटार टाकणे जोडणे आणि दुरूस्तिचे काम करणे. | ९४,८२४/- |

(प्र.क्र ५७ उल्हासनगर ३)

---

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

सायंकाळी ५.१८ वा. सभा संपल्याचे मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-१०.८.२०००

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक १०.८.२००० रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय श्री.किशोर वनवारी हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.कुमार आयलानी | सदस्य |
| २. | श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| ३. | श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| ४. | श्री. चौधरी राजेंद्र | सदस्य |
| ५. | श्री.ठाकुर बेहरानी | सदस्य |
| ६. | श्री.पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ७. | श्री. भांडे भगवान | सदस्य |
| ८. | श्री. टाले प्रमोद | सदस्य |
| ९. | श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| १०. | श्री.तेजी कैलाश | सदस्य |
| ११. | श्रीमती.भारती राजानी | सदस्या |

१२. श्रीमती. पदमा वलेचा सदस्या
तर
१)श्री. चव्हाण रमेश २) श्रीमती. ज्योती कालानी ३) श्री. पंजाबी नारायण हे सदस्य /सदस्या सभेस अनुपस्थितीत होते.

<u>मा.सचिव</u> :- मा.सभापती महोदया काही कारणास्तव आजच्या या सभेस येवू शकणार नसल्याने आजच्या या सभेचे कामकाज चालवण्यासाठी आपणा मधील एका सदस्याची आपण सर्वानुमते पिठसीन अधिकारी म्हणुन निवड करावी अशी मी विनंती करतो.

<u>मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा</u> :- आजच्या या सभेचे कामकाज पाहण्यासाठी पिठसीन अधिकारी म्हणुन श्री.किशोर वनवारी यांची निवड करावी असे मी सुचवू इच्छितो.

श्री.कुमार आयलानी, श्री.ठाकुर बेहरानी, श्रीमती कांता गजवानी, व श्रीमती पदमा वलेचा या सन्माननिय सदस्यांचे सायंकाळी ४.३७ वाजता स्थायी समिती सभागृहात आगमन झाले.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :-हे पिठसीन अधिकारी या स्थानी आसनस्थ झाले.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त)</u> :- हे आयुक्तांच्या आसनावर आसनस्थ झाले.

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

--१--

मागील सभेचे दिनांक २१.७.२००० रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>मा. पिठसीन अधिकारी:-</u> दि. २१.७.२००० रोजीच्या सभेचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र.२ वाचुन दाखवितात.

<u>मा सदस्य श्री.राजेंद्र चौधरी</u> :- ही कामे नगरसेवक निधीतील आहेत ना?

<u>मा.सचिवः-</u> यामधील दोन कामे रस्ते विकास निधीतील आहेत.

<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :-</u> प्रस्ताव क्र.२ मधील बाब क्र.५ वर उल्लेख केलेले काम कोणत्त्या निधीतील आहे.

<u>श्री.दशोरे उप-अभियंता (पा.पु.विभाग)</u> :-ते काम एकात्मिक रस्ते विकास निधीतील आहे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी</u> :- नगरसेवक निधी व्यतिरिक्तची जी कामे असतील ती कामे काढून टाकली जावीत.

<u>श्री.दशोरे (उप-अभियंता पा.पु.विभाग):-</u>उल्हासनगर १ येथील सी.ब्लॉक ते दुनिचंद कालानी कॉलेज पर्यंतच्या एम.एस (लोखंडी)जलवाहिनीवर तसेच दुनिचंद कालानी कॉलेज ते मधुबन हॉटेल पर्यंतच्या एम.एस. (लोखंडी) जलवाहिनीवर सी.सी. इन्केसिंग करायचे आहे.

मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा:- श्री.किशोर वनवारी यांच्या प्रभागात जलवाहिनी टाकण्या कामीचे प्राकलन किती रकमेचे आहे?

श्री.दशोरे (उप-अभियंता पा.पु.विभाग):-या कामाचे सुरवातीचे प्राकलन रू.९९ ,९५०/- चे होते हे काम नगरसेवक निधीतून करावयाचे होते. नगरसेवक निधी ८० हजारा पेक्षा जास्त उपलब्ध नसल्याने आयुक्तांच्या आदेशान्वये या कामाच्या प्राकलनात बदल करून परत ८० हजाराचे प्राकलन तयार करण्यात आले. जलवाहिनीची लांबी कमी केल्यामुळे प्राकलनीय रक्कम रू . ८० ,१००/-एवढी झाली आहे.

श्री. मांडरा (शाखा अभियंता):- नगरसेवक निधीतील शिल्लक असलेल्या रकमेतुन हे काम करण्यांत यावे असे आयुक्त साहेबांनी सांगितल्यामुळे नंतर ८० हजार रूपये खर्चाच्या कामाचा प्रस्ताव ठेवण्यांत आला.

मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा:-८० हजारमध्ये काम कसे होणार? २० हजार खर्चाचे काम कमी केल्यामुळे हया कामाचा काहीच फायदा होणार नाही.

श्री.दशोरे (उप-अभियंता पा.पु.विभाग):-९९ हजारामध्ये हे काम पूर्ण झाले असते म्हणुन सुरवातीस त्याप्रमाणे प्राकलन तयार केले होते.

मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा:- एक लाखामध्ये थोडयाफार प्रमाणात काम होवू शकले.



मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी:- थोडीफार रक्कम समायोजन (ॲडजस्ट) करून एक लाखाचे काम पूर्ण केले जावे.

मा.श्री.किशोर वनवारी(पिठासीन अधिकारी):- हया कामाचे जे प्राकलन तयार केले होते ते मुख्य लेखाअधिकारी ,मुख्य लेखापरिक्षक यांचेकडुन समंत होवून आले होते. माझ्या नगरसेवक निधीतून करावयाच्या १० लाखांच्या कामातून ९ लाख खर्चाची कामे मंजूर झालेली आहेत, प्राकलनिय किंमत ही अंदाजित किंमत असते प्रत्यक्षात खर्च कमी जास्त होत असतो म्हणून या कामांच्या देयक रकमांमध्ये २० हजाराचे (ॲडजेसममेंट) समायोजन करून जलवाहिनी टाकण्याच्या हया कामाचे प्राकलन, एक लाखाचे केले जावे.

मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी:-ठीक आहे. प्राकलनिय रक्कम एक लाख करून समंत करू या.

मा.सचिव :- या कामांचे तांत्रिक ज्ञान असलेले ते (श्री.दशोरे)आहेत. त्यांनी म्हणायला पाहिजे. आपण कसे म्हणु शकता?

श्री.दशोरे (उप-अभियंता पा.पु.विभाग):-मुळ प्राकलनिय किंमतीत आम्ही कपात केली होती.

मा.श्री.किशोर वनवारी(पिठासीन अधिकारी):- मुळ प्राकलन एक लाख रूपये खर्चाचे होते. आयुक्तांनी सांगितले होते की, तुमच्या नगरसेवक निधीतून ९ लाखाचे काम झालेले आहे. म्हणुन उर्वरित एक लाख खर्चाचे प्राकलन तयार केले होते. परंतु या कामाचा येथे जो गोषवारा आलेला आहे. तो रू.८० हजार खर्चाचा आहे.

श्री. दत्ता भडकवाड(प्रभारी आयुक्त):-श्री. दशोरे आपण या कामांमधील जलवाहिनीची लांबी कमी केली आहे काय?

मा.श्री.किशोर वनवारी(पिठसीन अधिकारी):- जलवाहिनीची लांबी कमी केली तर काम पूर्ण होणार नाही. व या कामाचा काही फायदा होणार नाही.

श्री.दशोरे (उप-अभियंता पा.पु.विभाग):- लांबी वाढवायची झाली तर या कामाचे पून्हा सुधारित प्राकलन तयार करावे लागेल.

मा.श्री.किशोर वनवारी(पिठसीन अधिकारी):- मुख्य लेखा अधिकारी / मुख्य लेखा परिक्षक यांनी त्या प्राकलनास समंती दिली होती. रू. ९९ हजाराचे काम रू.८० हजारावर आणले, त्यामुळे जलवाहिनीची लांबी कमी केलीत, लांबी कमी केल्यामुळे प्रभागातील पाण्याची समस्या दुर होणार नाही. म्हणुन हे प्राकलन १ लाखाचे केले जावे.

मा.सदस्य :- पास. पास.

मा. श्री.किशोर वनवारी (पिठसीन अधिकारी):- हया प्रस्तावातील अनुक्रमांक ६ वरील कामाची प्राकलनिय रक्कम रू.९९,९५०/- करून सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

--४--

विषय :- नगरसेवक निधितून व रस्ते विकास निधितून सोबत जोडलेल्या सहा गोषवा-यात नमूद केलेल्या जागी जलवाहिनी टाकणे कामीचे ७प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र.:- ८६ दिनांक:-१०.८.२०००

सुचकाचे नाव :-श्रीमती. पदमा वलेचा.

अनूमोदकाचे नाव :-श्रीमती. कुंदनानी लविना.

ही स्थायी समिती नगरसेवक निधितून व रस्ते विकास निधितून पूढे नमुद केलेल्या जागी जलवाहिनी टाकणे संबंधीच्या ७ कामांच्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची असून आयुक्तांना मजदूर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनीय किंमत |
|---|---|---|
| १) | उल्हासनगर४ येथे गजाननगरसाठी व्हीनस चौक ते शेरा अपार्टमेंट ८० मि. | १,७०,९६८/- |

मि. व्यासाची जी.आय.पाईप लाईन टाकणे
बाबत. (प्र.क्र४३),(नगरसेवक निधितून)

| | | |
|---|---|---|
| २) | डिफेन्स कॉलनी, सूभाष टेकडी, उल्हासनगर४ येथे २' व्यासाची जी.आय. पाईपलाईन टाकणे बाबत),(नगरसेवक निधितून) | ७४,४५०/- |
| ३) | उल्हासनगर३ येथिल औदयोगिक भाग ते बॅ.नं. १०६० ओ.टी. पर्यंत ५० मि. मि व्यासाची जी.आय. जलवाहिनी टाकणे बाबत.(प्र.क्र४२) (नगरसेवक निधितून) | ९४,०००/- |
| ४) | उल्हासनगर१ येथ धुनीचंद कॉलेज ते मधुबन हॉटेल पर्यंत १५० मि. मि व्यासाची एम.एस. लाईनला सी.सी ईन्केरिंग करणे बाबत. | १,९०,४६८/- |
| ५) | उल्हासनगर१ येथे सी ब्लॉक ते धुनिचंद कॉलेज पर्यंत १५० मि.मि. व्यासाची एम.एस. लाईनवर सी.सी. इन्केसिंग करणे बाबत. | १,९०,४६८/- |

--५--

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनीय किंमत |
|---|---|---|
| ६) | उल्हासनगर ५ प्र.क्र१९ येथे बॅरेक क्र.२०४९ ते बॅरेक क्र.२०७०, २०५२ पर्यंत ८०मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत. (नगरसेवक निधीतून) | ९९,९५०/- |
| ७) | उल्हासनगर ५ प्र.क्र४९ येथे बॅरेक क्र.२०७० ते बॅरेक क्र.२०१५,२००९ पर्यंत ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत. (नगरसेवक निधीतून) | १,९९,८०/- |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.सचिव :- विषय क्र३ वाचुन दाखवितात.

मा.पिठासीन अधिकारी (किशोर वनवारी):-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :- नगरसेवक निधीतून, स्थायी समिती सभापती निधीतून व इतर निधीतून सोबत जोडलेल्या पाच गोषवा-यात नमुद केलेल्या जागी दिवाबत्ती लावणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र.८७ दिनांक :-१०.८.२०००

सुचकाचे नाव :-श्री.पारवानी रामचंद्र.

अनुमोदकाचे नाव :-श्री.भांडे भगवान.

हि स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या दिवाबत्ती कामीचे पाच प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

--६--

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची असून आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

| अनुक्रमांक | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|
| १ | विनस टॉकीजच्या मागुन मुक्ती अपार्टमेंट उल्हासनगर ४ च्या रोड वर दिवाबत्ती लावणे. (एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम निधीतून) | २,९२,०००/- |
| २. | उल्हासनगर ४ प्र.क्र.२६ मधील रस्त्यावरील दिवाबत्ती लावणे. (नगरसेवक निधीतून) | २,३०,०००/- |
| ३ | उल्हासनगर ४ येथील प्र.क्र.२४ मध्ये रस्त्यावरील दिवाबत्ती लावणे. (स्थायी समिती सभापती निधीतून) | १,००,०००/- |
| ४ | उल्हासनगर १ येथील प्र.क्र.५ मध्ये रस्त्यावरील दिवाबत्ती लावणे. (नगरसेवक निधीतून) | ८७,०००/- |
| ५ | उल्हासनगर १/२ येथील प्र.क्र.६१ मध्ये रस्त्यावरील दिवाबत्ती लावणे. (नगरसेवक निधीतून) | १,००,०००/- |

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.सचिव :- विषय क्र.४ वाचुन दाखवितात.

मा.पिठासीन अधिकारी (श्री.किशोर वनवारी):- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

--७--

विषय :- नगरसेवक निधीतून सोबत जोडलेल्या बारा गोषवा-यात नमुद केलेल्या जागी सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत करावयाच्या कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र.८८ दिनांक :-१० ८ २०००

सुचकाचे नाव :-श्री.ठाकुर बेहरानी

अनुमोदकाचे नाव :-श्री.कुमार आयलानी.

ही स्थायी समिती पूढील नमूद केलेल्या सार्वजनिक बांधकामांर्तगत कामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची आणि आवश्यक असून आयुक्तांना मजदूर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनीय किंमत |
|---|---|---|
| १) | उल्हासनगर.२ येथिल प्र.क्र.६७ मध्ये बॅ.क्र. ५२२ , ५२३ , ५२४-२५ , चाळीस कोठी आणि विविध ठिकाणी पायवाटा बांधणे.(नगरसेवक निधितून) | १,९९,६००/- |

| | | |
|---|---|---|
| २) | उल्हासनगर -१ येथिल प्र.क्र. ३७ बॅ.क्र.२१८ आणि विविध ठिकाणी सी.सी. एम २५० ने रस्ता बांधणे. .(नगरसेवक निधितून) | ९९,७८०/- |
| ३) | उल्हासनगर ३ येथील प्र.क्र.२८ मध्ये चाळ क्र.४ ते हनुमान मंदिर जवळचा रस्ता, खन्ना कंपाऊंड मध्ये रस्ता एम.२५० ने बांधणे..(नगरसेवक निधितून) | १,९९,९१०/- |
| ४) | उल्हासनगर २येथील,प्र.क्र.६ मध्ये बॅरेक क्र.५७५ गुरूनानक नगर संतू चाळ आणि विविध ठिकाणी सी.सी.एम.२५० ने पायवाटा बांधणे (नगरसेवक निधीतून) | १,९९,६५०/- |
| ५) | उल्हासनगर २ येथील प्र.क्र.६५ मध्ये बॅरेक क्र.२९९ आणि बॅरेक क्र.३०० येथे रस्ता एम.२५० ने बांधणे आणि नाली बांधणे.(नगरसेवक निधितून) | ९९,७८०/- |



| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनीय किंमत |
|---|---|---|
| ६) | उल्हासनगर ४ येथील प्र.क्र.१५ मध्ये पवार यांच्या घरापासून सव्वाखंडे यांच्या घरापर्यंत सी.सी.एम.२५० ने रस्ता बांधणे. (नगरसेवक निधीतून) | १,९९,५५०/- |
| ७) | उल्हासनगर ४ येथिल प्र.क्र.१५ मध्ये पंचस्कुल ते बुध्दविहार ते पवार यांच्या घरा पर्यंत सी.सी.एम २५० ने रस्ता बांधणे (नगरसेवक निधीतून) | १,९९,१५०/- |
| ८) | उल्हासनगर ४ येथील प्र.क्र.१५ मध्ये सव्वाखंडे यांच्या घरापासून ते रायभोळे कॉम्पलेक्स पर्यंत नाली व सी.सी.एम २५० ने रस्ता बांधणे (नगरसेवक निधीतून) | १,९९,७००/- |
| ९) | उल्हासनगर ३ येथील प्र.क्र.६८ मध्ये हिरा सोसायटी समोर सी.सी.एम ३५०ने रस्ता बांधणे.(नगरसेवक निधीतून) | २,९८,९१०/- |
| १०) | उल्हासनगर ३ येथील प्र.क्र.६८ मध्ये विष्णु दर्शन बिल्डिंग जवळ सी.सी.एम ३५० ने रस्ता बनविणे. (नगरसेवक निधीतून) | २,९९,३५४/- |
| ११) | उल्हासनगर ३ येथील प्र.क्र.१२ मध्ये धरमसाई पॅलेस बॅरेक क्र.१०६४ जवळ सी.सी.एम २५० ने रस्ता बांधणे. (नगरसेवक निधीतून) | २,९९,९६०/- |

१२)     उल्हासनगर ३ येथील प्र.क्र.१२ मध्ये
बॅरेक क्र.१०६४ अशोक स्टील फर्निचर
जवळ आणि विविध ठिकाणी सी.सी.पायवाटा
व नाल्या बांधणे. (महापौर निधीतून)     १,०२,४८५/-

---

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजूर

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका
--९--

मा.सचिवः- विषय क्र.५ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :-हा प्रस्ताव कुणाच्या प्रभागातील कामाचा आहे?

मा.सदस्य श्री.विनोद तलरेजाः- माजी नगरसेवकश्री. सतराम जेस्वानी यांच्या पभागाचा असून मध्यंतरी जे 'रस्ता रोको' करून आंदोलन केले होते त्यामुळे......

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :- पावसामुळे रस्त्यात जे खड्डे पडले आहेत त्याचे काय?

श्री.शिर्के (उप-अभियंता):-महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वाल्यांनी परत मोठ-मोठे खड्डे केले होते.

मा.पिठासीन अधिकारी (श्री.किशोर वनवारी):- प्रभाराम मंदिरापासून गांधी रोड पर्यंत बी.एम.ए.सी चे काम केलेले आहे. हे काम आधीच केलेले आहे आता ते कार्योत्तर मंजुरी साठी आणलेले आहे.

मा.सदस्य विनोद तलरेजाः- आशा जेस्वानी यांच्या प्रभागातील बी.एम.ए.सी चे काम मंजुरीस का आणले नाही?

मा.पिठासीन अधिकारी (श्री.किशोर वनवारी):- गांधी रोड पर्यंतचे बी.एम.ए.सी चे काम झालेले असुन आता ते मंजुरी साठी आणलेले आहे. सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :- उल्हासनगर -५ येथिल बॅरेक २१०८ ते करुणा अपार्टमेंट
पर्यंतच्या रस्त्यात पडलेले खड्डे बी.एम. व ए.सी. ने
भरण्याकामी निविदाशिवाय थेट संविदेस कार्योत्तर मंजूरी

देणे बाबत.

---

उल्हासनगर ५ येथिल बॅ.क्र. २१०८ ते करुणा अपार्टमेंट पर्यंतच्या रस्त्यात खड्डं पडलेले होते. प्रभाग क्र. ५० येथिल माजी नगरसेवक व स्थानिक नागरीकांनी सदर रस्त्यात पडलेले खड्डे बी.एम. आणि एसीने भरुन काढणेसाठी त्यांचे पत्र दिनांक ५.६.२००० अन्वये रस्ता रोको व आंदोलन करण्याचे ठरविले होते. त्यानूसार मा. महापौर स्थानिक नगरसेवक व स्थायी समितीचे सभापती यांनी सदर रस्त्याचे खड्डे बी.एम. व एसीने भरण्यासाठी विनंती केली होती. स्थानिक नगरसेवक व माजी नगरसेवक यांच्या मागणी नुसार सदर परिसरात काम करणारे मे. दत्त मजूर कामगार सोसायटी मार्फत उक्त काम सूरु केले. संबंधित कनिष्ठ अभियंता व उप-अभियंता यांनी प्रत्येक्ष रस्त्याची पहाणी करुन त्यानूसार सार्वजनिक बांधकाम विभागाने या कामाचे प्राकलन तयार केले आहे. त्यानुसार प्राकलनाची अंदाजित किंमत रुपये १,९९,२५०/- इतकी होते. सदर काम मे. दत्त मजूर कामगार सोसायटी मार्फत बी.एम.व एसीने करुन घेतलेल्या



कामास कार्योत्तर मंजूरी मिळणेसाठी व स्थायी समिती सभेपूढे मंजूरीसाठी ठेवण्यासाठी प्रस्तावित.

स्थायी समिति ठराव क्र :-८९ दिनांक :-१०.८.२०००

सूचकाचे नाव :-श्री.राजेंद्र चौधरी.

अनूमोदकाचे नाव :-श्री.पारवानी रामचंद्र.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने नुसार उल्हासनगर ५ येथिल बॅ.क्र. २१०८ ते करुणा अपार्टमेंट पर्यंतच्या रस्त्यात पडलेले खड्डे बी.एम. व ए.सी. ने भरणे कामी रु. १,९९,२५० /- च्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता आणि आयूक्तांनी मे. दत्त मजदूर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय केलल्या थेट संविदेस कार्योत्तर मंजूरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनूमोदकाची सही/-

एकमताने मंजूर

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिवः- विषय क्र.६ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरीः- तर मग हा कोणता प्रस्ताव आहे?

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानीः-श्री.दशोरे साहेब, स्पष्टीकरण करा.

श्री.दशोरे (कार्यकारी अभियंता):-उल्हासनगर १ येथील संत निरंकारी हॉल ते गोल मैदान व परीसरात घाण पाणी येत असल्याच्या तक्रारी होत्या त्या दुर करण्यासाठी सी.आय. पाईप लाईनचे चोकअप काढण्याचे काम तातडीने करून घेण्यात आलेले आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरीः- कोणत्त्या निधीतून हे काम करणार? आमच्या प्रभागात तर नगरसेवक निधीतील फक्त दहा लाखाचीच कामे होतात.

मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा :- गोल मैदानाच्या परिसरात कोण कोणते प्रभाग येतात?

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-गोषवा-यात नगरसेवक निधीचा उल्लेख नसल्याने सर्व साधारण निधीतील हे काम आहे का?



मा.सदस्य श्री.रामचंद पारवानीः-प्राकलनिय रक्कम किती आहे?

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरीः- एक लाख चाळीस हजार.....

श्री.मांडरा(शाखा अभियंता):- दुरूस्तीचे काम असल्याने हे काम सर्वसाधारण निधीतून करावयाचे आहे.

मा.सदस्या श्रीमती.कांता गजवानीः- माझ्या प्रभागात तर जलवाहिनीच बंद केली आहे त्याचे काय? हे काम सर्वसाधारण निधीतुन कसे केले जाते? आपण त्यास कशी संमती देता?

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :- माझ्या प्रभागात सुध्दा नळाला दुषित पाणी येते. याबाबत मी आयुक्तांना सांगितले तर ते म्हणतात त्याबाबत आपण आपल्या नगरसेवक निधीतून काम करून घ्या.

मा.श्री.किशोर वनवारी (पिठासीन अधिकारी):-जर कुणाच्याही प्रभागात नळाला दुषित पाणी येत असेल तर त्या कामी करावयाचे काम, हे नगरसेवक निधीतून करू नये. ते जनरल काम आहे जनतेसाठी आहे, ही कामे सर्वसाधारण निधीतून करण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समिती पुढे मंजुरीस आणला जावा, पाणीपुरवठा विभागाकडुन अशा प्रकारे प्रस्ताव सादर केला गेला तर स्थायी समिती मध्ये आपण संमत करू.

मा.सदस्या श्रीमती कांता गजवानीः- आमच्या इकडे तर लाईनच कापली गेली आहे.

मा.सदस्य श्री. कुमार आयलानीः- जलवाहिनीची लांबी कमी न करता, आहे तेवढीच ठेवण्यात यावी, असे नाही की, दुषित पाण्याचे कारण दाखवुन नवीन जोडणी घेतील.

मा. श्री. किशोर वनवारी (पिठासीन अधिकारी):-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :- उल्हासनगर १ येथे संत निरंकारी हॉल ते गोल मैदान व परिसरातील घाण पाण्याच्या तक्रारी दुर करण्याकरिता सी.आय.पाईप लाईनचे चोकअप काढणे कामी निविदेशिवाय केलेल्या संविदेस कार्योत्तर मंजुरी देणे बाबत.

प्रस्तावना :-

उपरोक्त विषयांकित ठिकाणी राहणा-या नागरिकांकडून व नगरसेवकांकडून त्याभागात दुषित पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी होत असल्याने सदर काम तातडीने मेसर्स बजरंगबली मजुर कामगार सहकारी संस्था तालुका उल्हासनगर यांचे मार्फत करून घेण्यात आले आहे.

सदर कामा करिता रक्कम रूपये १,४०,२०३/- इतके खर्च झाले आहेत व त्याचे प्राकलन जिल्हा दर सुची वर्ष १९९८-९९ च्या अधिन राहून तयार करण्यात आले आहे, त्यास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

--१२--

तरी सदर प्राकलनाचे काम रूपये १,४०,२०३/- यास प्रशासकीय व वित्तिय, कार्योत्तर मंजुरी मिळावी.

स्थायी समिती ठराव क्र.९० दिनांक :-१०.८.२०००

सुचकाचे नाव :-श्री विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती.पदमा वलेचा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर १ येथे संत निरंकारी हॉल ते गोलमैदान परिसरातील घाण पाण्याच्या तक्रारी दुर करण्यासाठी सी.आय. पाईप लाईनचे चोकअप काढणे कामी रू.१,४०,२०३/-चे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय तसेच आयुक्तांनी मेसर्स. बजरंग मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय केलेल्या थेट संविदेस कार्योत्तर मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.७ श्री.चंदर धिरमलानी यांचे बडतर्फ विरूध्द न्यायायलयातून आजच स्थगन आदेश प्राप्त झाला असल्याने याबाबत चर्चा करता येणार नाही तसेच सभेत हा विषय घेता येणार नाही.

मा.सदस्य श्री.कुमार आयलानी:-स्थगन आदेश काय आहे?

मा.सचिवः-सध्या जी स्थिती आहे ती कायम ठेवायची आहे (स्टेटस मेंन्टेंन करावयाचा आहे).

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी (पिठासीन अधिकारी):-सदरचा प्रस्ताव या सभेतून वगळण्यात येत आहे.

मा.सचिवः- विषय क्र.८ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी:-कोणते काम आहे?

श्री.शिर्के (उप-अभियंता):-गलिच्छ वस्ती मधील ही कामे आहेत.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी:-कोण कोणत्त्या प्रभागातील कामे आहेत.

श्री. शिर्के (उप-अभियंता):- प्रत्येक महिन्यात दहा लाख खर्चाची कामे करावयाची आहेत. गलिच्छ वस्ती सुधार समितीच्या सभापतींनी ३८ कामां

--१३--

मधुन पाच कामांना प्राधान्य नुसार प्रथमतः दिलेली आहे.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी:-आमच्या प्रभागाचे नाही घेतले. सर्व आरपीआय चे नगरसेवकांचे प्रभागाचे आहेत.

मा.सदस्य श्री.राजेंद चौधरी:-बाकी काही नगरसेवकांचे प्रभागात सुध्दा गलिच्छ वस्त्या आहेत त्यांच्या प्रभागातील सुध्दा कामे मंजुरीस आणली पाहिजेत.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी:- आरपीआय च्या नगरसेवकांच्या प्रभागातीलच कामे मंजुरीस आणली आहेत.बाकी नगरसेवकांच्या प्रभागातील कामे मंजुरीस का आणली नाही?

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी:-एकुण ७४ लाखाची कामे करावयाची आहेत. त्यातून मी सभापती होतो तेव्हा सर्वांचे प्रभागातील कामे आणली होती.गलिच्छ वस्ती समितीचे सभापतींच्या प्रभागातील चार-चार लाखाची कामे मंजुरीस आणता.

मा.सदस्य श्री.कुमार आयलानी:- त्यांना(श्री.टाले यांना)बोलू दया व पास करा नाही तर महासभेत जोर जोराने ओरडत राहतील.

श्री.दत्ता भडकवाड(उप-आयुक्त):- महापालिकेच्या अर्थ संकल्पात या कामांसाठी नगरसेवक निधी व्यतिरिक्त अन्य निधीची तरतूद असेल तरच या कामांना मंजुरी देता येईल.

मा.सदस्य श्री.राजेंद चौधरी:- नगरसेवक निधी व्यतिरिक्त गलिच्छ वस्ती सुधार निधीची तरतुद आहे.

मा. श्री.किशोर वनवारी (पिठासीन अधिकारी):-शासन मान्य ज्या अधिकृत झोपडपट्टया आहेत, त्यामधील कामे एक साथ एकावेळी मंजुरीस आली पाहिजेत त्याबाबत आयुक्त साहेबांशी जेव्हा चर्चा झाली तेव्हा त्यांनी सांगितले की, महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहून प्रत्येक महिन्यात दहा-दहा लाखाची कामे केली जातील.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी:- कधी पर्यंत? डिसेंबर पर्यंत? तोपर्यंत

त्यांचा कार्यकाल संपुष्ठात येईल व आमचे काम असेच राहिल.

मा.श्री.किशोर वनवारी (पिठसीन अधिकारी):- अर्थसंकल्पिय तरतुद मार्च महिन्या पर्यंत असते या पुढे जेवढी काही प्राकलने तयार असतील ती, मंजुरीस आणली जावीत. सर्वात प्रथम स्थायी समिती सदस्यांच्या प्रभागातील कामे मंजुरीस आणली जातील.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:-तर ठिक आहे, आपण तसे आश्वासन दया.

मा. श्री.किशोर वनवारी (पिठसीन अधिकारी):-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

--१४--

विषय :- नागरी सुविधा विषयक व विकास कामांच्या ५प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

मा.सभापती बी.बी.मोरे, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती यांनी सुचविल्या प्रमाणे एकूण ३८ कामांचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत उप-अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी जागेवर प्रत्यक्ष पहाणी करून प्राकलने तयार करण्यात आली. ही सर्व कामे लेखा अधिकारी यांचे कडून तपासणी करण्यात आलेली आहेत.

मा.सभापती यांनी त्यांचे पत्र क्र.११५/२००० दिनांक २४ जुलै,२००० अन्वये उपरोक्त कामा पैकी प्राधान्येनुसार प्रथमतः खालील प्रमाणे पाच कामे करण्याचे प्रस्तावित केलेले आहेत.

| अ.क्र. | मुळयादी अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|---|
| १. | ६ | प्र.क्र.१४ येथील सुभाष टेकडी पंचशील नगर येथे विविध ठिकाणी सी.सी.पायवाटा व नाली बांधणे. | १,९९,९००/- |
| २. | ७ | प्र.क्र.१५ येथील अशोक (वन) नगर मधील ट्रान्सफार्मर जवळ साकव बांधणे. | १,९९,९००/- |
| ३. | १४ | प्र.क्र.३१ येथील डॉ.आंबेडकर नगर येथे सी.सी.पायवाटा व नाली बांधणे. | १,९९,९००/- |
| ४. | १५ | प्र.क्र.३१ येथील डॉ.आंबेडकर नगर सहा बैठकीचे शौचालय बांधणे. | २,१०,३४०/- |
| ५. | २५ | प्र.क्र.१० मधील शास्त्रीनगर येथील शौचालयांची दुरूस्ती करणे. | १,९९,९००/- |

उक्त पाच कामांची प्राकलनिय किंमत रूपये १०,०९,९६५/- ऐवढे होते तरी, प्राकलनिय अंदाजपत्रकिय रूपये १०,०९,९६५ ऐवढया किंमतीस स्थायी समिती पुढे प्रशासकिय व वित्तिय मंजुरी साठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र.९१ दिनांक :-१०.८.२०००

सुचकाचे नाव :-श्री.प्रमोद टाले

अनुमोदकाचे नाव :-श्री.चौधरी राजेंद्र

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर नमुद केलेल्या नागरी

--१५--

सुविधा विषयक व विकास कामाच्या एकुण रक्कम रूपये १०,०९,९६५/- च्या पाच प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिवः- विषय क्र.९ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरीः-कोणत्त्या निधीतील काम आहे. प्राकलने कीती आहेत? गोषवा-याखाली लिहिले आहे की, ही रक्कम वापरली नाही तर व्यपगत होईल.

मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानीः- कोणत्त्या प्रभागातील कामे आहेत?

श्री.शिर्के (उप अभियंता):-एक २५ व ४५........

मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानीः- मंजुर करूया.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरीः- ह्या कामी ५(२)(२)अन्वये निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करण्यासाठी मान्यता देऊ या. त्यांचे दहा कामांना निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करणे बाबत प्रस्ताव आणला त्या आणखी दोन कामे आहेत. ती आणली आहेत, ती पण घ्या.

मा. श्री.किशोर वनवारी (पिठासीन अधिकारी):-१० + २ अशाप्रकारे १२ कामे ५(२)(२)अन्वये करून घेण्यासाठी आयुक्तांना अधिकार देवू या.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरीः-खासदार निधीतील १२ प्राकलनांची कामे ५(२)(२)नुसार केली जातील ना?

मा.सचिवः-५(२)(२)नुसार ही कामे पूढील प्रमाणे करण्याबाबत ठराव मंजूर करित आहोत.

मा.श्री.किशोर वनवारी (पिठासीन अधिकारी):-सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :-खासदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत सोबत जोडलेल्या गोषवा-यात नमुद केलेल्या १२ कामी मा. आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

--१६--

प्रस्तावना

मा.जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र.२८६ दिनांक १२.७.२००० अन्वये ठाणे लोकसभा मतदार संघाचे २८ कामांना प्रशासकिय मंजुरी दिली आहे. त्यात उल्हासनगर महानगरपालिकेतील अ.क्र.१४ ते २५ एकूण बारा कामे मंजुर केली आहेत. सदरची बारा कामांची एकूण रक्कम ४५.७८ लाख एवढी होते. सदरची कामे फेब्रुवारी २००१ पर्यंत पूर्ण करायचे आदेश आहेत. तसेच मा.जिल्हाधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र.२४६, दि.२४.७.२००० अन्वये सन २०००-२००१ मध्ये प्रशासकिय मान्यता दिलेल्या कामांचा ७५ टक्के निधी रूपये ३४.३३ लाखाचा धनादेश मा.आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांचे सुपूर्द केलेला आहे. उर्वरित रक्कम २५ टक्के हा निधी काम पूर्ण झाल्यावर उल्हासनगर महानगरपालिकेला देणार आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र.२ नुसार अ.क्र. २ ते ५ व ७ ते १२ ही कामे पाच लाखाच्या आतील आहे. सदर कामे मजुर कामगार सोसायटी यांचे कडून करून घेण्याकरिता मुख्य लेखा अधिकारी यांचे कडे शिफारसी करता पाठविले होते. सदरची कामे निविदा बोलावून करून घेण्यात यावे असे लेखा अधिकारी यांनी सुचविले.

सभेत चर्चे अंती असे निदर्शनास आले की,अ.क्र.१ व ६ वर उल्लेखकेलेली कामे ही पाच लाखा पेक्षा जास्त रकमेची असल्याने या कामी निविदा मागविल्यास या कामास वेळ लागेल म्हणून ही अत्यंत तातडीची व आवश्यक आहेत.

म्हणुन सदरची १२ कामे तातडीने करावयाची असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २ (२) अंतर्गत स्थायी समितीची मंजुरी घेऊन कामे करण्यात यावीत. व मजुर कामगार संस्थेकडून किंवा इतर कंत्राटदारांकडून सदरची कामे करावयाची असल्यास स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. तरी स्थायी समिती सभेपुढे पुढील आदेश होण्यासाठी आदेशार्थ प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र.९२ दिनांक :-१०.८.२०००

सुचकाचे नाव :-विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :-राजेंद्र चौधरी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार खासदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमां अंतर्गत अत्यंत तातडीच्या व आवश्यक अशा उपरोक्त बारा कामी

मा.आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी किंवा आवश्यक वाटेल त्या इतर कंत्राटदारांशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधीकृत करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

--१७--

मा.सचिवः-विषय क्र.१० वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरीः- हे काम नगरसेवक निधीतील आहे ना?

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानीः- नगरसेवक निधीतील असेल तर संमत करूया.

मा श्री.किशोर वनवारी (पिठासीन अधिकारी):-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :- सोबत जोडलेल्या चार विविध गोषवा-यात नमुद केलेल्या जागी भुयारी गटार योजने अंतर्गत जोडणी व दुरूस्ती कामीचे चार प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र.९३ दिनांक :-१०.८.२०००

सुचकाचे नाव :-श्रीमती. कुंदनानी लविना.

अनुमोदकाचे नावः-श्री.पारवानी रामचंद्र.

हि स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या भुयार गटार योजने अंतर्गतचे जोडणी व दुरूस्ती कामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

| अनुक्रमांक | कामाचा तपशिल | प्राकलनिय रक्कम |
| --- | --- | --- |
| १. | उल्हासनगर भुयार गटार योजने अंतर्गत बॅरेक क्र.७०३ प्र.क्र.३९ कॅम्प नं.३ येथे भुयार गटार पाईप लाईन टाकणे जोडणे व दुरूस्तीची कामे, | १,२९,२८१/- |

(नगरसेवक निधीतून)

२. उल्हासनगर भुयार गटार योजने अंतर्गत बॅरेक क्र.१६४४प्र.क्र.२४ कॅम्प क्र.४येथील भुयार गटार पाईप लाईन टाकणे,जोडणे आणि दुरूस्तीची कामे. (नगरसेवक निधीतून) ७४,०९२/-

३. उल्हासनगर भुयार गटार योजने अंतर्गत बॅरेक क्र.८७, १०४ प्र.क्र.३५ कॅम्प क्र. १येथील भुयार गटार पाईप लाईन टाकणे, जोडणे आणि दुरूस्तीचे कामे (नगरसेवक निधीतून) १,२०,५५३/-



| अनुक्रमांक | कामाचा तपशिल | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| ४. | उल्हासनगर भुयार गटार योजने अंतर्गत बॅरेक क्र. १६६४ प्र.क्र.२३ कॅम्प क्र.४ येथील भुयार गटार पाईप लाईन टाकणे, जोडणे आणि दुरूस्तीचे कामे (नगरसेवक निधीतून) | ९०,६२३/- |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

श्री.दत्ता भडकवाड उप-आयुक्त :-आयत्त्यावेळचे दोन विषय आहेत. आपण सर्वांची संमती असेल तर चर्चेस आणू इच्छितो. त्यातील पहिला विषय आहे, वित्त आयोगाकडून मिळणा-या अनुदानातून शहाड रेल्वे स्टेशन जवळील पूर्वभागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे.

श्री.हरेश इदनानी(उप-मुख्यलेखा अधिकारी):-वित्त आयोगाकडून मिळणा-या अनुदानातून शहाड रेल्वे स्टेशन जवळील पूर्व भागातील रस्त्याचे डांबरीकरणाच्या कामास मंजुरी देऊन प्रशासकीय मंजुरी साठी जिल्हाधिकारी ठाणे यांचे कडे पाठवायचा आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी (पिठासीन अधिकारी):- आयत्त्यावेळचा विषय आजच्या सभेच्या कामकाजात सर्वानुमते समाविष्ठ करण्यात येत असून सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

आयत्त्यावेळचा विषय

विषय :- वित्त आयोगाच्या शिफारसी नुसार मिळालेल्या अनुदानातुन हाती घेण्यात आलेल्या रस्ते विकासाच्या प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्तावना

दहाव्या वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानां नागरी क्षेत्रातील प्राथमिक नागरी सुविधा विषयक विकास कार्य हातात घेण्यासाठी निधीचे वितरण करण्यात आलेले असून उल्हासनगर महानगरपालिकेस रक्कम रूपये ४४,२८,९२४/- (चव्वेचाळीस लाख अठ्ठाविस हजार नउशे चोवीस) फक्त महानगरपालिका हिश्यात पडून आहेत.

--१९--

शासकीय धोरणाप्रमाणे प्राप्त झालेल्या अनुदानाच्या रकमेत महानगरपालिकेच्या स्वतःच्या हिश्याची तेवढीच रक्कम त्यात घालून विकास कामे हाती घेण्याचे बंधनकारक असल्याने महानगरपालिकेने चालू वर्षाच्या अर्थ संकल्पात संबंधीत लेखा शिर्षाखाली तरतूद केलेली असून हया योजने अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या कामांसाठी शासनाचे धोरण लक्षात घेता महानगरपालिकेने शहाड स्टेशन जवळ पूर्व भागांतील रस्त्यांचे डांबरीकरण करण्यासाठी रक्कम रूपये ९५,६२,०९४/- (पंच्याणव लाख बासष्ठ हजार चौ-यांणव) मात्र चे सदरच्या अनुदानातून खर्च करण्याचे ठरविले आहे. तरी सदरच्या प्रस्तावास मंजुरी साठी स्थायी समिती पूढे प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ९४ दिनांक :-१०.८.२०००

सुचकाचे नाव :-राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :-विनोद तलरेजा

उल्हासनगर महानगरपालिकेची ही स्थायी समिती उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे शहाड स्टेशन जवळील पूर्व भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्यासाठी रक्कम रूपये ९५,६२,०९४/- (पंच्याणव लाख बासष्ठ हजार चौ-याणव मात्र) चे काम प्रशासकिय मंजुरी साठी मा.जिल्हाधिकारी,ठाणे यांचेकडे पाठविणेस व वित्त आयोग अनुदानातून खर्च करण्यासाठी मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

श्री.दत्ता भडकवाड उप-आयुक्तः-आयत्त्यावेळचा दुसरा एक विषय आहे. आपणा सर्वांची संमती असेल तर तो विषय मी चर्चेस आणु इच्छितो. मा.उपमहापौर, स्थायी समिती सभापती व नगरसेवक निधीतून सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत करावयाच्या १२ कामाच्या प्राकलनास मंजुरी बाबतचा तो प्रस्ताव आहे.

मा.श्री.किशोर वनवारी (पिठासीन अधिकारी):- आयत्त्यावेळचा हा दुसरा विषय सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ठ करण्यात येत अ तोसून सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

--१०--

आयत्त्यावेळचा विषय

स्थायी समिती ठराव क्र.९५ दिनांक :-१०.८.२०००

सुचकाचे नाव :-श्री.विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :-श्री.राजेंद्र चौधरी.

हि स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्त्यंत तातडीचे असून आयुक्तांना मजदुर कामगार संस्थेशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | प्राकलनीय किंमत |
|---|---|---|
| १) | उल्हासनगर-२ येथील प्रभाग क्र.६ मध्ये बॅ.क्र.५८७ जवळ बॅ.क्र.६२० ,२१ जवळ आणि विविध ठिकाणी शौचालयांची दुरूस्ती करणे.(नगरसेवक निधीतून) | ९९ ,४००/- |
| २) | उल्हासनगर-१ येथील प्रभाग क्र.३७ मध्ये संत पाहुराम अपार्टमेंट ते हिल व्हिव सोसायटी पर्यंत रस्ता एम-२५० ने आणि नाली बांधणे. ( नगरसेवक निधीतून) | १ ,९९ ,८००/- |
| ३) | उल्हासनगर-२ येथील प्रभाग क्र.६६ मध्ये सती भवनच्या मागे शौचालय व मुत्री बांधणे.(महापौर निधीतून) | १ ,२३ ,०००/- |
| ४) | उल्हासनगर-२ येथील प्रभाग क्र.६२ मध्ये सी.सी.पायवाटा व नाली बॅ.नं.४२२ , साई ज्योत बिल्डिंग जवळ.(नगरसेवक निधीतून) | १ ,९९ ,९२५/- |
| ५) | उल्हासनगर-२ येथील प्रभाग क्र.६२ मध्ये सी.सी.पायवाटा व नाली बॅ.नं.४१२ जवळ आणि ४१३ जवळ व विविध ठिकाणी. (नगरसेवक निधीतून) | १ ,९९ ,९२५/- |
| ६) | उल्हासनगर-१ येथील प्र.क्र.३७ मध्ये बॅ.क्र.२५६ , २५७ जवळ आणि झुलेलाल मंदीर आणि विविध | २ ,९९ ,८००/- |

ठिकाणी रस्ता एम.२५० ने बनविणे आणि नाल्या बनविणे.(नगरसेवक निधीतून)

| | | |
|---|---|---|
| ७) | उल्हासनगर-४ येथील प्र.क्र.५१ मध्ये स्मशानभुमी ते मोनिष अपार्टमेंट पर्यंत बि.एम.ए.सी.ने डांबरी करण रस्ता बनविणे.(नगरसेवक निधीतून) | १,९९,९००/- |



| अ.क्र. | कामाचे नांव | प्राकलनीय किंमत |
|---|---|---|
| ८) | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र.२० मध्ये खडी मशीन हजेरी शेडच्या मागे दहा बैठकीचे शौचालय बांधणे.(नगरसेवक निधीतून) | ३,७३,९५०/- |
| ९) | उल्हासनगर येथील प्र.क्र.३९ मध्ये शिवगंगा अपार्टमेंटच्या आसपास नाली आणि कोबा (सी.सी.पॅसेज)करणे.(नगरसेवक निधीतून) | ९९,९००/- |
| १०) | उल्हासनगर-२ येथील प्र.क्र.६५ मध्ये बॅरेक क्र.३२४ ते ३२७ आणि बॅरेक क्र.३०८ येथे व विविध ठिकाणी रस्ता एम.२५० ने बनविणे आणि नाल्या बनविणे.(नगरसेवक निधीतून) | १,९९,८००/- |
| ११) | उल्हासनगर १ येथील प्र.क्र.३४ मध्ये दत्तवाडी येथे मराठे यांच्या घराजवळ सी.सी.पायवाटा आणि नाली बांधणे.(नगरसेवक निधीतून) | १,९९,९२५/- |
| १२) | उल्हासनगर १ येथे प्र.क्र.३४ मध्ये दत्तवाडी येथे नाल्याच्या बाजुला मंदिरासमोर गणेश आयडॉल शॉपच्या बाजुला सी.सी.पायवाटा आणि नाली बांधणे.(नगरसेवक निधीतून) | १,९९,९२५/- |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५.१० वा.सभा संपल्याचे मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

# उल्हासनगर महानगरपालिका

**दिनांक:-२५.८.२०००**

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक २५.८.२००० रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सदस्य श्री. किशोर वनवारी हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. तसेच खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| २. | श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| ३. | श्री. चौधरी राजेंद्र | सदस्य |
| ४. | श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ५. | श्री.पारवानी रामचंद | सदस्य |
| ६. | श्री. पंजाबी नारायण | सदस्य |
| ७. | श्री. भांडे भगवान | सदस्य |
| ८. | श्री. टाले प्रमोद | सदस्य |
| ९. | श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| १०. | श्री.तेजी कैलाश | सदस्य |
| ११. | श्रीमती.भारती राजानी | सदस्या |
| १२. | श्री.ठाकुर बेहरानी | सदस्य |

तर

१) मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी, २)श्रीमती. पदमा वलेचा, ३)श्री.कुमार आयलानी हे सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते/होत्त्या.

<u>मा.सचिव :-</u> मा.सभापती महोदया हया आजच्या सभेत काही कारणास्तव येणार नसल्याने आपणा मधील एका सदस्याची आजच्या सभेचे कामकाज चालविण्यासाठी बहुसंख्येने पिठासीन अधिकारी म्हणुन निवड करावी अशी मी आपणास विनंती करतो.

<u>मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी</u> :- आजच्या या सभेचे कामकाज चालविणेसाठी पिठासीन अधिकारी म्हणुन श्री.किशोर वनवारी यांची निवड करावी असे मी सुचवू इच्छितो.

श्री.किशोर वनवारी हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ झाले.

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र.१ वाचून दखवितात.

मागील सभेचे दिनांक १०.८.२००० रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:</u>- मागील सभेच्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र.१२ व १३ वर विषय सुचीवरील ८ व्या क्रमांकाच्या विषयाची चर्चा आलेले आहे. गलिच्छ वस्त्यामधील कामाबाबतच्या या विषयावर मी बरेचसे स्पष्टीकरण केले होते त्याचे इतिवृत्तात नोंद आलेली नाही.

<u>मा.सचिव</u> :- आपण त्यावेळी काय म्हणाला होतात? कोणती नोंद आलेली नाही?

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले</u>:-गलिच्छ वस्त्यामधील कामाची पाच प्राकलने मंजुरीस आणली होती त्या प्रत्येक प्राकलनाबाबत मी बोललो होतो त्याची इतिवृत्तात नोंद आलेली नाही. ते इतिवृतात का आले नाही?

<u>मा.सदस्य श्री.राजेंद चौधरी</u> :-ते जे काही बोलले असतील ते इतिवृतात आले पाहिजे.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले</u>:-मी प्रत्येक मुद्यावर स्पष्टीकरण (क्लेरिफाय)दिले होते त्यानंतर पिठासीन अधिका-यांनी स्पष्टीकरण केले होते.

<u>मा.सचिव</u>:- आपण जे काही बोलला असाल आपणास आठवत असेल तर ते इतिवृतात समाविष्ट करता येईल.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले</u>:- त्यावेळी मी म्हटले होते की पाचच प्राकलने मंजुरीस का आणली? गलिच्छ वस्त्यामधील कामाची प्राकलने मंजुरीस का आणली नाहीत?

<u>मा.सदस्य श्री.राजेंद चौधरी</u> :-ते मी म्हटले होते त्याची इतिवृत्तात बरोबर नोंद आलेली आहे.

<u>मा.सचिव :-</u> मा.सदस्य श्री.टाले आपण बोलला नसाल म्हणुनच तर इतिवृतात नोंद आलेली नाही. तरीही आपण बोलला होता असे आपण म्हणत असाल तर आपण काय म्हणाला होतात ते इतिवृतात समाविष्ठ करू.

<u>मा. आयुक्त :</u>- त्यामुळे काही फरक पडण्यासारखे आहे काय?

<u>मा.सदस्य श्री.राजेंद चौधरी</u> :-फरक पडण्यासारखे काही नाही, परंतु यापुढे असे होता कामा नये.

<u>मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा:-</u>गलिच्छ वस्त्यांमधील ही पाच कामे करवून घेण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५(२)(२)नुसार आयुक्तांना अधिकार देवू या असे म्हटले होते.

<u>मा.सचिव:-</u> या कामांचा जो गोषवारा देण्यात आला होता त्यामध्ये हा प्रस्ताव प्रशासकिय व वित्तिय मंजुरीसाठी स्थायी समिती पुढे प्रस्तावित असल्याचे लिहिले होते. आता आपण जे म्हणता आहात ते त्या व्यतिरिक्तचे आहे.

<u>मा.सदस्य श्री.राजेंद चौधरी</u> :-(सभापती )। पिठासीन अधिकारी साहेब आपण म्हणाला होतात. सर्व सदस्यांच्या प्रभागातील गलिच्छ वस्त्यांच्या कामांना मंजुरी देऊन दहा दहा लाखाची कामे करू.

<u>मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारी:-</u>या कामांसाठी ५ (२)(२)नुसार आयुक्तांना अधिकार देत असल्याचे ठरावामध्ये लिहिले नाही.

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी</u> :-२-२ लाखाची कामे डी.डी.आर. (जिल्हा उपनिबंधक)यांचे कडे पाठवले जातात का?



<u>मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण:-</u> ही कामे मार्च पुर्वी की नंतर होतील?

*<u>मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारी:-</u> आयुक्त साहेबांचे म्हणणे आहे की, अर्थ संकल्पात ५० लाख रूपये रकमेची तरतुद असल्याने जर आज आपण ७४ लाख रूपये रकमेच्या कामांना मंजुरी दिली तर अर्थसंकल्पीय तरतूदी व्यतिरिक्त रकमेची तरतुद सुधारीत अर्थसंकल्पात करून किंवा समायोजन करून करता येईल.*

*<u>मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण:-</u> सुधारीत अर्थसंकल्पात (रिवाइज बजेट)हि कामे करू शकतो काय?नवीन वर्षात नवीन सभापती आल्यानंतर त्यांचेवर अन्याय होता कामा नये.*

*<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी</u> :- नविन अर्थसंकल्पात करणार?*

*<u>मा.आयुक्त</u> :- ७४ लाखाच्या कामांना मंजुरी दयाल परंतु आपणा कडील अर्थ संकल्पात या कामी फक्त ५० लाखाची तरतुद आहे.*

*नविन वर्षाच्या अर्थसंकल्पापूर्वी करावयाचे असेल तर सुधारीत अर्थ संकल्पात या कामी तरतुद करता येईल.*

*<u>श्री.शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-</u> १३३ कोटी अपेक्षित उत्पन्नाचा आपला अर्थसंकल्प आहे. आपले उत्पन्न १३३ कोटी पेक्षा वाढत असेल तर सुधारित अर्थसंकल्पात आपणास या कामी तरतुद करता येईल, उत्पन्न कमी आले तर?उत्पन्न कसे कसे येते त्यावर अवलंबुन आहे. परंतु सध्या आमच्याकडे जे प्रस्ताव मंजुरीस येतील त्यांना ५० लाखाच्या तरतुदीच्या अधिन राहून मंजुरी देऊ.*

*<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:-</u> आपण असे म्हणता तर अर्थसंकल्पिय तरतुदी पेक्षा जास्त असलेल्या २४ लाख रक्कमेची कामे कशी होणार?*

*<u>मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण</u>:-ती कामे कधी होतील?*

*<u>मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारी:-</u>गलिच्छ वस्ती, उद्याने इत्त्यादी विभागासाठी अर्थ संकल्पात तरतुद केलेली रक्कम ३३ रस्त्यांचे रूंदीकरण, नुतनीकरण कामी घेण्यात आलेली नाही. अमुक एका ठिकाणावरून कर्जाची रक्कम येणार आहे हे गृहित धरून हया कामास मंजुरी दिलेली आहे. जसे कि मिळकतीचे सर्व्हेक्षण करण्याचे काम टाटा इन्फोटेक कंपनीला देण्यांत आलेले आहे, या कामी ही अर्थसंकल्पीय तरतूद नसतांनाही आपण मंजूरी दिली आहे ती हे गृहित धरुन की, इकडुन -तिकडुन अमुक-अमुक ऐवढे पैसे येतील असे गृहित धरून आपण त्यास मंजुरी दिली त्याप्रमाणे या कामास सुध्दा मंजुरी देऊ. अर्थ संकल्पिय तरतुदी व्यतिरिक्तच्या २४ लाखाची काम सुधारीत अर्थसंकल्पात तरतुद करून करू या.*

*<u>मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण:-</u> गलिच्छ वस्ती समीतीच्या सभापतींना घाई आहे. त्यांना त्यांचे प्रभागात चार लाखाची कामे करवून घ्यायची आहेत.*

*<u>मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारी:-</u>आमचे म्हणणे आहे की प्रत्त्येक गलिच्छ वस्तीमध्ये कामे झाली पाहिजेत मग तिथे कोणत्त्याही राजकीय पक्षाचा नगरसेवक निवडुन आलेला असो, प्रशासन व आपण वेगळे नाही. ४८ गलिच्छ वस्त्या अधिकृत आहेत त्यामध्ये ही कामे झाली पाहिजेत.*



*<u>मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी:-</u> असा कोणता सदस्य आहे की,ज्याच्या प्रभागामध्ये झोपडपट्टी नाही.*

मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारीः- श्री.नारायण पंजाबी यांच्या प्रभागात गलिच्छ वस्ती नाही अशा प्रकारे कित्येकांच्या प्रभागात गलिच्छ वस्त्या नाहीत तेथे हि कामे होणार नाहीत. माझ्या प्रभागात गलिच्छ वस्त्या नाहीत. श्री.विनोद तलरेजा यांच्याही प्रभागात गलिच्छ वस्त्या नाही.

मागच्यावेळी पाणी पुरवठयाच्या लेखा शिर्षातील पैसे पडुन होते यापैशातुन प्रत्त्येक सदस्याच्या प्रभागात रस्त्त्यावरील सार्वजनिक दिवा-बत्तीचे कामे करून घेण्यात आली / दोन-दोन सोडीयम व चार टयुबलाईट बसवून घेण्यात आल्या.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरीः- मी जेव्हा गलिच्छ वस्ती समीतीचा सभापती होतो. तेव्हा मी सर्व सदस्यांच्या प्रभागातील कामे मंजुरीस आणली होती.

मा.आयुक्तः- अर्थसंकल्पात तरतुद कमी आहे व कामे जास्त आहेत म्हणुन या कामांना कशा प्रकारे प्राधान्य दयावे याकामी समिती नेमली जावी.

मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारीः- कुणाच्याही प्रभागातील काम राहू नये अशी सर्व सदस्यांची इच्छा आहे.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाणः-चौधरी यांना माहिती आहे. यापुर्वी गलिच्छ वस्ती समितीचे सभापती होते त्यांना विचारले जावे.

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबीः- सर्व पक्षीय नगरसेवकांची कामे झाली पाहिजेत. सर्वांना प्रतिनिधित्त्व मिळाले पाहिजे. पक्षपात झाले नाही पाहिजे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरीः- आम्ही पण तेच म्हणत आहोत.

मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारीः- आयुक्त साहेब दहा-दहा लाखाची टप्प्या-टप्प्याने कामे करून घेतली जावीत.

मा.आयुक्तः- मी या झंझटीत पडणार नाही. गलिच्छ वस्ती समितीने ठरवावे काय ते.

मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारीः-या कामी आपण आयुक्तांना अधिकार देऊया.

मा.सदस्य श्री.प्रमोद टालेः- आयुक्तांना ठरवू दया.

मा.आयुक्तः- याकामी गलिच्छ वस्त्या सुधार समितीने निर्णय घ्यावा.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाणः- कामे डबल डबल होता कामा नये.

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी :- स्थायी समिती आपणास (आयुक्तांना)अधिकार देत आहे. आयुक्त साहेब आपण ठरवा.



मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारीः- स्थायी समिती सर्व संमतीने असे ठरवत आहे की, ज्या ज्या सदस्यांची कामे असतील त्यांना अग्रक्रम देऊन प्राधान्याने ती केली जावीत.

मा.आयुक्त :- मी आपणांस सांगु इच्छितो की, आपण निर्णय घ्यावा.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले:- गलिच्छ वस्ती समितीने निर्णय घ्यावा.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:- स्थायी समितीने याबाबत निर्णय घ्यावा.

मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारी:- गलिच्छ वस्त्या सुधार समितीचे सभापतींना आपण विनंती करूया.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:- या कामांबाबत निर्णय आपण घेणार की, गलिच्छ वस्त्या समिती घेईल हे प्रथम ठरवा.

मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारी:- सभा सुचनेवरील विषय बाजुलाच राहीले त्यानंतर येणा-या आयत्यावेळच्या विषयावरच चर्चा चालली आहे.

दिनांक १०.८.२००० रोजीच्या सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा.सचिव:- विषय क्र.२ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी :- कुणाच्या प्रभागातील काम आहे?

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण:- राजू जग्यासी यांच्या प्रभागातील काम आहे, संमत करूया.

मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :- अपंग अर्जदार श्री.अशोक जे वनवारी व श्री.रघुविरसिंग खालसा यांना महानगरपालिकेच्या जागेवर सोबत जोडलेल्या दोन गोषवा-यात नमुद केलेल्या जागी एस.टी.डी. बुथ चालविणे कामी परवाना नुतनीकरण करणे बाबत.

प्रस्तावना

अर्जदार श्री. अशोक जे. वनवारी या अपंग व्यक्तीस पी.सी.ओ. बुथ चालविणेसाठी प्रभात कॉम्प्लेक्स चे समोर फायर ब्रिगेड ऑफीस समोर उल्हासनगर४ असलेल्या मोकळया जागेत महानगरपालिकेने दिनांक ६.२.९९ रोजी एक वर्षा करिता परवानगी दिली होती. दिनांक ७.२.२००० रोजी परवानगी संपत आल्याने अर्जदाराने नुतनीकरणा साठी अर्ज केलेले आहे. पुढील एक वर्षाचे नुतनीकरण देण्यापूर्वी स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.



अर्जदार श्री.रघुविर सिंह खालसा या अपंग व्यक्तीस पी.सी.ओ. बुथ चालविण्यासाठी शासकीय मध्यवर्ती रूग्णालय यांचे दोन मुख्य प्रवेश व्दार मधिल जागेत उल्हासनगर ३ येथे असलेल्या मोकळया जागेत पी.सी.ओ बुथ

ठेवण्यासाठी महानगरपालिकेने पत्र क्रमांक उ.म.पा / न.र.वि. /सा. / १०७ /९९ /७५ दिनांक १४.६.९९ रोजी एक वर्षासाठी परवानगी दिली होती.

वरील परवानगी नुतनीकरण करण्यासाठी अर्जदाराने अर्ज केलेला आहे. पुढील एक वर्षाचे नुतनीकरण देण्यापूर्वी स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

वरील विषय मान्यतेसाठी स्थायी समितीपूढे सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ९६ दिनांक :- २५.८.२००० ,

सुचकाचे नाव :-श्री.प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :-श्री.रामचंद्र पारवानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्थावनेनुसार अपंग अर्जदार श्री. अशोक जे. वनवारी व श्री. रघुविर सिंग खालसा यांना उपरोक्त उल्लेख केलेल्या महापालिकेच्या जागेवर एस.टी.डी. बुथ चालविणे कामीचे, परवान्याचे पुढील एका वर्षासाठी नुतनीकरण करण्यास मान्यता देत आहे.

तसेच आयुक्तांच्या समाधानकारकतेस अधिन राहून सदरचे परवाने एका वर्षापेक्षा अधिक नसेल एवढया कालावधीसाठी वेळोवेळी नुतनीकरण करण्यासाठी आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.३ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा:- नगरसेवक निधीतील काम आहे. तर संमत करूया.



मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :-सोबत जोडलेल्या दोन गोषवा-यात नमुद केलेल्या प्र.क्र.५५ व प्र.क्र.६५मधील जागी नगरसेवक निधीतून रस्त्यावरील दिवाबत्ती बसविणे कामीचे दोन प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र.९७ दिनांक :-२५.८.२०००

सुचकाचे नाव :-श्रीमती लविना कुंदनानी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती.कांता गजवानी.

ही स्थायी समिती नगरसेवक निधीतून पुढे नमुद केलेल्या दिवाबत्ती कामीचे दोन प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे. तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची असून आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर २ येथील प्र.क्र.६५ मध्ये रस्त्यावरील दिवाबत्ती बसविणे. (नगरसेवक निधीतून) | १,००,०००/- |
| २. | उल्हासनगर ४ येथील प्र.क्र.५५ मध्ये रस्त्यावरील दिवाबत्ती बसविणे. (नगरसेवक निधीतून) | २,७८,०००/- |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.सचिवः- विषय क्र.४ वाचुन दाखवितात.

--८--

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानीः- एक मिनिट, याबाबत मी बोलू इच्छितो. पाणी पुरवठ्याबाबतचे कोणतेही काम कधीही सर्वसाधारण निधीतून असले पाहिजे.

मा.आयुक्तः- सर्व साधारण निधीतून करण्यासाठी एवढा पैसा उपलब्ध नाही म्हणुन हे काम नगरसेवक निधीतून केले जावे.

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबीः- या कामांसाठी सर्व नगरसेवक आपल्या नगरसेवक निधीतून निधी उपलब्ध करून देत आहेतच ना?

*<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टाले:-</u> आयुक्त साहेब, जेथे जेथे दुषित पाणी येते तेथे तक्रारी दुर करण्यासाठी करावयाची कामे सर्व साधारण निधीतून केली जावीत.*

*<u>मा.आयुक्तः-</u> किर्लोस्कर कंन्सलटंटच्या शिफारसी नुसार जलवाहिन्या बदली करण्याचे जे काम चालू आहे त्यामुळे सर्व जलवाहिन्या व यंत्रणा आपण बदली करणार असल्याने जलवाहिन्या टाकण्यावरचा हा खर्च वायफळ (फुकट )जाणार आहे.*

*<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :-</u> जेथे दुषित पाणी येते त्याचे काय? तेथील काम पण नगरसेवक निधीतून करायचे?*

*<u>मा.सदस्य श्रीमती कांता गजवानीः-</u> अगदी पाच-पाच, दहा-दहा हजाराचे काम सुध्दा नगरसेवक निधीतून करण्यास सांगितले जाते.*

*<u>मा.सदस्य श्री.रामचंद पारवानीः</u>- आमचा अर्धा नगरसेवक निधी तर याच कामांमध्ये जाईल.*

*<u>मा.सदस्य श्री.नारायण पंजाबीः-</u> अर्धा काय पुर्ण निधी जावू दया ना?*

*<u>मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारीः-</u> पाईप लाईन चोकअप होतो तेथे नविन पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे. तसेच तेथे दुषित पाणी येते अशा ठिकाणी नविन पाईप लाईन टाकण्याचे काम सर्व साधारण निधीतून केले गेले पाहिजे*

*<u>मा.आयुक्त</u> :- अशी कामे सर्वसाधारण निधीतून करू.*

*<u>मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानीः</u>-पाणी पुरवठा विभागाकडील कामे जे ठेकेदार करतात. त्यांना त्याचे पेमेंट वेळेवर मिळत नसल्याने ते ठेकेदार कामे करण्यास तयार नाहीत.*

*<u>मा.आयुक्तः</u>-ही सर्वसाधारण अडचण आहे.*

*<u>मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानीः</u>- पेमेंट वेळेवर मिळत नाही हीच अडचण आहे, पेमेंट मिळत नाही तर कामे कशी होणार? यावर उपाय काय राहील? या कामांसाठी आम्ही आमचा नगरसेवक निधी उपलब्ध करून देत आहोत तो कशासाठी? अडचण दुर व्हावी म्हणुनच ना?*



*<u>मा.आयुक्तः-</u>बरोबर आहे. परंतु वसुलीची परिस्थिती अतिशय खराब आहे त्यामध्ये सुधारणा झाल्यावर सर्व व्यवस्थीत होवू शकेल.*

*<u>मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानीः-</u>शहाड येथील पाणी पुरवठा विभागाच्या कार्यालयात नागरिक अर्जावर अर्ज देतात. परंतु तेथील अधिकारी त्यावर लक्ष घालीत नाहित. याबाबत आजच मी श्री.ध्रुत (एक्झुक्यूटिव्ह इंजिनियर)यांना सांगितले आहे. नागरिकांना तेथील अधिकारी सांगतात की, तुम्ही नविन मिटर बसवून घ्या, तेथे श्री जयसिंगानी नावाचे कुणी अधिकारी आहेत त्यांना भेटायला सांगितले जाते.श्री. जयसिंगानी जागेवर जावून पहाणी करणार त्यानंतर श्री.शेख यांना भेटावयास सांगितले जाते. नंतर तीन दिवसांनी यावयास सांगितले जाते. हे सारखे सारखे काय आहे? रिमांन्डर वर रिमांन्डर करून सुध्दा कामे होत नाहित तर पाणी पटटीची वसुली कशी होणार. श्री.शेख सारखे अधिकारी असले तर वसुली कधीही होवू शकणार नाही.*

मा.आयुक्त:- अशी कोण व्यक्ती आहे त्यांना मला भेटावयास सांगा. काय धुत साहेब, कोण व्यक्ती आहे त्यांना मला भेटावयास सांगा.

मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी:-किती लोकांना पाठवू?

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:- वसुली बाबत श्री.ठाकुर बेहरानी यांनी आताच सांगितले. कल्याण मधील हॉकर्स कडून महापालिका रोज दहा रूपये वसुल करते त्याप्रमाणे आपल्याकडे सुध्दा अशा प्रकारची वसुली केली जावी, कल्याण महानगरपालिके कडुन अशा प्रकारची पावती दिली जाते अशा प्रकारे आपण वसुली करू शकतो का?

मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी:- प्रथम त्यांना जागा दया.

मा.आयुक्त :- कल्याण महानगरपालिकेने याबाबत काही (बॉय.लॉज)उप-विधी तयार केले असतील तर ते मागुन घ्या. आपली वसुली तरी होईल.

मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारी:- १० रूपयांनी काय होईल? दहा लाख / दहा कोटी मध्ये काही होत नाही तर १० रूपयांनी काय होईल असे आयुक्त साहेब म्हणतात.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:- तेवढीच पाणी पुरवठा विभागाची काम करणा-या ठेकेदारांच्या बिलाची रक्कम वसुल होवू शकेल.

मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी:- उल्हासनगर ही अशी एक महानगरपालिका आहे. जेथे ठेकेदारांना वेळेवर पेमेंट मिळत नाही. कामासाठी ठेकेदार मिळत नाही.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :- त्यांची देयके अदा केली तर ठेकेदार कामे करतील.

मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

--१०--

विषय :- सोबत जोडलेल्या दोन गोषवा-यात नमुद केलेल्या प्र.क्र.५, १४ व १६ मधील जागी नगरसेवक निधीतून जलवाहिनी टाकण्या कामीचे तीन प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र.९८ दिनांक :-२५.८.२०००.

सुचकाचे नाव :-श्री.नारायण पंजाबी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

हि स्थायी समिती पूढे नमुद केलेल्या जागी नगरसेवक निधीतून जलवाहिनी टाकणे कामीचे तीन प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असून आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|
| १. | कॅम्प नं.१ व २ करिता क्रॉस कनेक्शन व अतिरिक्त फिडींग देण्यासाठी विविध ठिकाणी जी.आय. जलवाहिनी टाकणे, प्र.क्र ५ (नगरसेवक निधीतून) | ८८,०७०/- |
| २. | उल्हासनगर ५, प्र.क्र.१६ मध्ये कैलास कॉलनी ते समता नगर २, बुस्टर येथे ८० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणे. (नगरसेवक निधीतून) | १,४०,६००/- |
| ३. | उल्हासनगर ४ प्र.क्र.१४ मधील भारत नगर, नागसेन नगर, सुभाष टेकडी भागातील जलवाहीनीची दुरूस्ती करणे, तसेच पील्लाही ब्लॉक ते डॉमनिक ब्लॉक येथे ५० मी.मी.व्यासाची जलवाहीनी टाकणे. (नगरसेवक निधीतून) | १,८२,६००/- |

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.५ वाचुन दाखवितात.



विषय क्र.५ , ६ व ७ हे जवळ जवळ सारखेच आहेत.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी:- ज्या ज्या प्रभागामध्ये पाणी टंचाई आहे तेथील टॅंकरने ने जे पाणी पुरविले जात आहे त्याचे बिल एवढे काही आहे की, तेवढया पैशामध्ये तेथे नविन पाईप लाईन टाकुन नळाने पाणी देता येण्यासारखे आहे,

श्री.धुत (कार्यकारी अभियंता):-ते असे प्रभाग आहेत जेथे नळाचे पाणी चढू शकत नाही.

मा. सदस्य श्री. रामचंद पारवानी:- बुस्टर सिस्टम आहे ना?

श्री.धुत (कार्यकारी अभियंता):-बुस्टर बसवून पाणी खेचत येईल परंतु किर्लोस्कर कंन्सल्टंसीच्या शिफारसी नुसार ज्या नवीन पाईप लाईन टाकल्या जाणार आहेत. त्यामुळे तेथे बुस्टर वगैरे बसविण्याकामी करावयाचा खर्च फुकट जाईल.

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी:- माझ्या प्रभागात उंच सखलपणा नाही तरी तेथे पाणी येत नाही. माझ्या प्रभागातही टॅकरेन पाणी पुरविले जाते तर आपण त्याबाबत काय करत आहात.

मा.सचिव:- टॅकरने पाणी पुरवठयाचे हे तिन्ही प्रस्ताव संमत झाल्याचे समजायचे काय?

मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :-मेसर्स विजय वॉटर सप्लाय उल्हासनगर यांनी आयुक्तांच्या थेट कार्य आदेशान्वये दि.१.३.२००० ते ३०.६.२००० या कालावधीत टॅकर्सव्दारे केलेल्या पाणी पुरवठयाचे संविदेस कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

मा.आयुक्त यांचे मान्यतेनुसार व रूपये २०३ प्रति टॅकर या दराने (स्थायी समिती ठराव क्र.८ दिनांक ७.५.९७)प्रमाणे मेसर्स. विजय वॉटर सप्लायर्स उल्हासनगर यांनी दिनांक १.३.२००० ते ३०.६.२००० या कालावधीत स्वत:च्या टॅकर्सने शहराच्या विविध भागात पाणीपुरवठा केला आहे. त्यांची देयके खालील प्रमाणे सादर केली आहेत.

| अ.क्र. | कालावधी | टॅकर संख्या | दर | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| १. | १.३.२००० ते ३१.३.२००० | ७५५ | २०३/- | १,५३,२६५/- |
| २. | १.४.२००० ते ३०.४.२००० | ९६३ | २०३/- | १,९५,४८९/- |
| ३. | १.५.२००० ते ३१.५.२००० | ११२६ | २०३/- | २,२८,५७८/- |
| ४. | १.६.२००० ते ३०.६.२००० | ११६४ | २०३ | २,५६,५९२/- |
| | एकुण | ४१०८ | | ८,३३,९२४/- |

हे काम कंत्राटदाराने मंजुर निविदेच्या अटी व शर्तींच्या आधिन राहून पाणी पुरवठा केलेला असुन सदर देयकाची एकूण रक्कम रूपये



८,३३,९२४/-अदा करावयाचे आहे. सदर प्रस्तावात मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर सादर करण्यास मान्यता दीली आहे, त्याअनुसार सदर प्रस्ताव प्रशासकीय व वित्तिय मान्यते करिता तसेच देयक अदा करण्यास मंजुर देण्या करिता सादर करण्यात येत आहेत. तसेच दिनांक १.३.२००० ते ३१.७.२००० ची मुदत वाढ ची मंजुरी मिळावी त्यानंतर निविदाची प्रकीया सुरू करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र.९९ दिनांक :- २५.८.२०००

सुचकाचे नाव:-श्री.ठाकुर वेहरानी

अनुमोदकाचे नाव :-श्री.विनोद तलरेजा.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार विजय वॉटर सप्लाय उल्हासनगर यांना आयुक्तांच्या थेट कार्य आदेशान्वये पाणी टंचाईच्या परिस्थीतीत जनतेच्या सेवेसाठी दिनांक १.३.२०००ते ३१.८.२०००या कालावधी
पर्यंत प्रती खेप रू.२०३/- या, पूर्वीच्या करारामधील दराने टॅकर्स व्दारे पाणी पुरविणे कामीचे निविदेशिवाय थेट संविदेस व अंतर्भुत खर्चास (प्रशासकीय व वित्तिय)मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती /पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव:- विषय क्र.६ वाचुन दाखवितात.

मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :- मेसर्स जयराम वॉटर सप्लाय उल्हासनगर यांनी आयुक्तांच्या थेट कार्य आदेशान्वये दि.१.३.२००० ते ३१.५.२००० या कालावधीत टॅकर्सव्दारे केलेल्या पाणी पुरवठयाचे संविदेस कार्योत्तर मान्यता देणे बाबत.



प्रस्तावना

मा.आयुक्त यांचे मान्यतेनुसार व रूपये २०३ प्रति टॅकर या दराने (स्थायी समिती ठराव क्र.८ दिनांक ७.५.९७)प्रमाणे मेसर्स. जयराम वॉटर सप्लायर्स उल्हासनगर-३ यांनी दिनांक १.३.२००० ते ३१.५.२००० या कालावधीत स्वत:च्या टॅकर्सने शहराच्या विविध भागात पाणीपुरवठा केला आहे. त्यांची देयके खालील प्रमाणे सादर केली आहेत.

| अ.क्र. | कालावधी | टॅकर संख्या | दर | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| १. | १.३.२००० ते ३१.३.२००० | १४८३ | २०३/- | ३,०१,०४९/- |
| २. | १.४.२००० ते ३०.४.२००० | १६४८ | २०३/- | ३,३४,५४४/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | १.५.२००० ते ३१.५.२००० | १९६६ | २०३/- | ३,९९,०९८/- |
| | एकुण | ५०९७ | | १०,३४,६९१/- |

हे काम कंत्राटदाराने मंजुर निविदेच्या अटी व शर्तींच्या अधिन राहून पाणी पुरवठा केलेला असुन सदर देयकाची एकूण रक्कम रूपये १०,३४,६९१/-अदा करावयाचे आहे. सदर प्रस्तावात मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर सादर करण्यास मान्यता दीली आहे, त्याअनुसार सदर प्रस्ताव प्रशासकीय व वित्तिय मान्यते करिता तसेच देयक अदा करण्यास मंजुर देण्या करिता सादर करण्यात येत आहेत. तसेच दिनांक १.३.२००० ते
३१.८.२००० ची मुदत वाढ ची मंजुरी मिळावी त्यानंतर निविदाची प्रकीया सुरू करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.१००</u> <u>दिनांक</u> :- २५.८.२०००

सुचकाचे नावः-श्री.रमेश चव्हाण.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती.कांता गजवानी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार मेसर्स जयराम वॉटर सप्लाय उल्हासनगर यांना आयुक्तांच्या थेट कार्य आदेशान्वये पाणी टंचाईच्या परिस्थितीत जनतेच्या सेवेसाठी दिनांक १.३.२००० ते १.८.२००० या कालावधी पर्यंत प्रती खेप रूपये २०३/- या पुर्वीच्या करारामधील दराने टॅकर्स व्दारे पाणी पुरविणे कामीचे निविदाशिवाय थेट संविदेस व अंतर्भुत खर्चास (प्रशासकीय व वित्तिय)मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती /पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--१४--

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र.७ वाचुन दाखवितात.

<u>मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारीः-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>विषय</u> :- मेसर्स गायत्री वॉटर सप्लाय उल्हासनगर यांनी आयुक्तांच्या थेट कार्य आदेशान्वये दि.१.३.२००० ते ३०.६.२००० या कालावधीत टॅकर्सव्दारे केलेल्या पाणी <u>पुरवठ्याचे संविदेस कार्योत्तर मान्यता देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना</u>

मेसर्स. गायत्री वॉटर सप्लायर्स उल्हासनगर यांनी दिनांक १.३.२००० ते ३०.६.२००० या कालावधीत स्वत:च्या टॅकर्सने शहराच्या विविध भागात पाणीपुरवठा केला आहे. त्यांची देयके खालील प्रमाणे सादर केली आहेत.

| अ.क्र. | कालावधी | टॅकर संख्या | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १. | १.३.२००० ते ३१.३.२००० | ८८५ | १,७९,६५५/- |
| २. | १.४.२००० ते ३०.४.२००० | १०४५ | २,१२,१३५/- |
| ३. | १.५.२००० ते ३१.५.२००० | ११७५ | २,३८,५२५/- |
| ४. | १.६.२००० ते ३०.६.२००० | १२७८ | २,५९,४३४/- |
| | एकुण | ४३८३ | ८,८९,७४९/- |

सदर काम अंदाजपत्रकाच्या दराने व निविदेच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून पाणी पुरवठा केलेला असुन सदर देयकाची एकूण रक्कम रूपये ८,८९,७४९/-अदा करावयाचे आहे. सदर प्रस्तावास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर सादर करण्यास मान्यता दीली आहे, त्याअनुसार सदर प्रस्ताव प्रशासकीय व वित्तिय मान्यते करिता तसेच देयक अदा करण्यास मंजुर देण्या करिता सादर करण्यात येत आहेत. तसेच दिनांक १.३.२००० ते ३१.८.२००० ची मुदत वाढ ची मंजुरी मिळावी त्यानंतर निविदाची प्रकीया सुरू करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.१०१</u>　　　　<u>दिनांक</u> :- २५.८.२०००

सुचकाचे नाव:-श्री.नारायण पंजाबी.

अनुमोदकाचे नाव :-श्री.विनोद तलरेजा.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार मेसर्स गायत्री वॉटर सप्लाय यांना आयुक्तांच्या थेट कार्य आदेशान्वये पाणी टंचाईच्या परिस्थितीत जनतेच्या



सेवेसाठी दिनांक १.३.२००० ते ३१.८.२००० या कालावधी पर्यंत प्रती खेप रूपये २०३/- यापूर्वीच्या करारामधील दराने टॅकर्स व्दारे पाणी पुरविणे कामीचे निविदेशिवाय थेट संविदेस व अंतर्भुत खर्चास (प्रशासकीय व वित्तिय)मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

एकमताने मंजूर

सभापती /पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.आयुक्त:- आयत्त्यावेळचा दुसरा विषय आहे, रोजंदारीवरील सफाई कामगारांच्या नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी देण्याबाबतचा.....

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:- आपण या प्रस्तावास मंजुरी देत असाल तर आणखी एक महिन्यासाठी मुदत वाढ दिली जावी. दहा-दहा सफाई कामगार आणखी एक महिन्यासाठी रोजंदारी वर नेमले जावे.

मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारी:- सर्व सदस्यांचे म्हणणे आहे की, गौरी गणपती सणाचे दिवस असल्याने किमान १५ दिवसाची तरी मुदत वाढ दिली जावी.

मा.सदस्य श्री.भगवान भांडे:- त्यांचा पगार सुध्दा दयायचा बाकी आहे.

मा.आयुक्त:- ४० लाख महिन्याचा खर्च आहे.

मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारी:- एका महिन्याचे २२ लाख व १५ दिवसाचे ११ लाख असे ३३ लाख होतात.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:- तेवढे पैसे हातगाडी वाल्याकडून जमा होवू शकतील.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- हातगाडी वाल्यांकडून एका महिन्यात ४० लाख जमा होवू शकतील.

आयत्त्यावेळचा विषय

विषय :- रोजंदारी वरील सफाई कामगारांच्या नेमणुकीस कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

--१६--

प्रस्तावना :-

स्थायी समिती ठराव क्र.९ दिनांक २७.४.२००० अन्वये पावसाळयात, अतिवृष्टीमुळे, पुराचे पाणी, शहरातील खोलगट भागात साचू नये, महापुरामुळे नागरिकांची वित्तहानी व प्राणहानी होवू नये, तसेच पावसाळयात शहरात रोगराई होवू नये म्हणून महापालिकेने पावसाळयापूर्वी शहरातील लहान-मोठे नाले सफाईचे काम चांगल्या प्रकारे करून घेण्यासाठी प्रभाग निहाय १० कामगारांची ६० दिवसा करिता हंगामी रोजंदारी वर १००/- रूपये प्रतिदिन दराने (९०/- रू. मजुरी व १०/-रू.सफाई कामासाठी लागणारे साहित्त्य फावडे, घमेले, टिकम,कुदळ इत्यादी कामगारांनी स्वत:ची अथवा भाडयांची उपलब्ध करून घेण्यासाठी ) मंजुरी देण्यात आली होती. त्यानुसार सदर कामगारांना प्रथम ३०

दिवसासाठी दि.१०.५.२००० ते ८.६.२००० पर्यंत व नंतर ३० दिवस दि.९.६.२००० ते ८.७.२००० पर्यंत नेमणुक करून शहरातील नाले सफाई तसेच प्रभागातील शौचालयांतील सेप्टीक टॅंक व इतर सफाईचे कामे चांगल्या प्रकारे करून घेण्यांत आलेली आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेने दि.३.७.२००० ते १७.७.२००० पर्यंत विशेष सफाई अभियान आयोजित करण्यात आलेले होते त्यानुसार मा.महापौर, उप-महापौर, सभापती स्थायी समिती व ईतर नगरसेवक यांनी सदर कामगारांना ३० दिवसांसाठी मुदत वाढ देण्यात यावी अशी विनंती मा.आयुक्त यांना करण्यात आलेली होती त्यानुसार मा.आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार सदर कामगारांना दि.९.७.२००० पासून मुदत वाढ देऊन सफाई कामासाठी कामावर ठेवण्यांत आलेले आहे. तरी सदर कामगारांच्या दि.९.७.२००० ते दि.३१.७.२००० पर्यंतच्या <u>१००/-रू.प्रतिदिन</u> रोजंदारी नेमणुक करण्याच्या कामी होणा-या संभाव्य खर्चास स्थायी समितीची वित्तिय व प्रशासकीय मंजुरीस प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.१०२</u>                <u>दिनांक</u> :-२५.८.२०००.

सुचकाचे नाव :-श्री.राजेंद्र चौधरी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. लविना कुंदनानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार पूर्वीच्या स्थायी समिती ठराव क्र.९, दि.२७.४.२००० मधील अटी व शर्तीवर दिनांक ९.७.२००० ते ३१.७.२००० पर्यंत रू.१००/- प्रतिदिन या दराने रोजंदारीवर सफाई कामगार नेमणुकीस कार्योत्तर मान्यता देत आहे तसेच अनुषंगिक खर्चास प्रशासकिय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर.</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--१७--

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:-</u> सचिव साहेब आयत्त्यावेळचा विषय कृपया वाचुन दाखवा.

<u>श्री.भिवापुरकर:-</u>पस्तावातील कामाची लोकेशने वाचुन दाखवितात.

<u>म.सचिव</u> :- या कामांना यापुर्विच मंजुरी देण्यात आलेली असून आता ही कामे ५ (२)(२)अन्वये करण्यास आयुक्तांना दयायचे आहेत.

<u>मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारी:-</u> ही कामे ५ (२)(२)अन्वये करण्यास आयुक्तांना अधिकार देवूया.

आयत्त्यावेळचा हा विषय सर्वानुमते सभेच्या कामकाजात समाविष्ठ करण्यात येत असून तो सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>विषय</u> :- सोबत जोडलेल्या गोषवा-यात नमुद केलेल्या नऊ कामी आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी <u>निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.</u>

<u>स्थायी समिती ठराव क्र. १०३</u> <u>दिनांक :-</u>२५.८.२०००

सुचकाचे नाव :- श्री.प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :- श्री.विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती, सार्वजनिक बांधकाम व गलिच्छ वस्ती निर्मुलन कार्यक्रमा अंतर्गत करावयाची पुढे नमुद केलेली ९ कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने याकामी आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर ४ येथील प्र. क्र.१४ मधील ब्लॉक क्र.३८० ते श्री.ओव्हाळ यांच्या घरापर्यंत रस्ता एम २५० ने बांधणे. (ठराव क्र.८२ दिनांक.२१.७.२००० रोजी प्रशासकिय व वित्तिय मान्यता दिलेली आहे) | २,९९,१५०/- |
| २. | उल्हासनगर ४ येथील प्र.क्र.२३ व उल्हासनगर ३ येथील प्र.क्र.२८ मध्ये रस्ता बी.एम. व ए.सी ने बनविणे ऐवजी एम.२५० ने बांधणे.( ठराव क्र.८३, दिनांक.२१.७.२००० रोजी प्रशासकिय व वित्तिय मान्यता दिलेली आहे) | १,९८,०००/- |
| ३. | उल्हासनगर ३ येथील प्र.क्र.२८ मध्ये खन्ना कंपाऊंड मोवटची चाळ येथे रस्ता एम.२५० ने बांधणे,( ठराव क्र. ८३ दिनांक.२१.७.२००० रोजी प्रशासकिय व वित्तिय मान्यता दिलेली आहे) | २,४९,९६०/- |

--१८--

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| ४. | उल्हासनगर ४ येथे प्र.क्र.२३ मध्ये बॅरेक क्र.१६६५ ते सरस्वती स्कुल पर्यंत रस्ता एम.२५० ने बांधणे (ठराव क्र.८३, दिनांक. २१.७.२००० रोजी प्रशासकिय व वित्तिय मान्यता दिलेली आहे) | १,९८,०००/- |
| ५. | प्र.क्र.१४ येथील सुभाष टेकडी पंचशील नगर येथे विविध ठिकाणी सी.सी.पायवाटा व नाली बांधणे. (ठराव क्र.९१ दिनांक १०.८.२००० रोजी प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे) | १,९९,९००/- |

६.	प्र.क्र.१५ येथील अशोक (वन) नगर मधील ट्रांन्सफार्मर जवळ साकव बांधणे.(ठराव क्र.९१ दिनांक १०.८.२००० रोजी प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे)	१,९९,९००/-

७.	प्र.क्र.३१ येथील डॉ.आंबेडकर नगर येथे सी.सी. पायवाटा व नाली बांधणे..(ठराव क्र.९१ दिनांक १०.८.२००० रोजी प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे)	१,९९,९००/-

८.	प्र.क्र.३१ येथील डॉ.आंबेडकर नगर सहा बैठकीचे शौचालय बांधणे..(ठराव क्र.९१ दिनांक १०.८.२००० रोजी प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे)	२,१०,३४०/-

९.	प्र.क्र.१० मधील शास्त्रीनगर येथील शौचालयांची दुरूस्ती करणे..(ठराव क्र.९१ दिनांक १०.८.२००० रोजी प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे)	१,९९,९००/-

---

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.आयुक्त :- आपणा सर्वांची संमती असेल तर आयत्त्यावेळचा विषय म्हणुन एक प्रस्ताव चर्चेस आणु इच्छितो.



मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारीः- आपल्या उल्हासनगर शहरातील ३३ रस्त्यांचे रूंदीकरण / नुतनीकरणाचे कामास आपण मंजुरी दिलेली असून त्यामध्ये असे काही रस्ते आहेत कि, ज्यांचे काम अद्याप सुरू झालेले नाही. २५ सेक्शन ते नेताजी चौक, गायकवाड पाडा ते जकात नाका क्र.११ तसेच आणखी दुसरे काही रस्ते आहेत यांचा उल्लेख आयुक्त साहेबांनी महासभेत केला होता.

मा.आयुक्तः- पुर्नवसनाची अडचण आहे.

मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारीः- जकात नाका क्र.११ पासुन गायकवाड पाडयापर्यंन्त एकाही घराचे /दुकानाचे पुर्नवसन करावे लागणार नाही. पाणी पुरवठयाची जी जलवाहिनी टाकायची होती ते काम सुध्दा झालेले आहे. दुसरा एक मुदा असा आहे की, प्रत्येक वर्षी गणेश उत्सवाच्या वेळी रस्त्यांमधील खड्डे खडी डांबराने भरले जातात. खड्डे भरण्याचे हे काम अद्याप केलेले नाही. शहाड फाटक सी ब्लॉक रोड वर मोठ मोठे खड्डे पडलेले आहेत. मध्यंतरी ५० लाख रूपये खर्च करून रस्त्यामधील जे खड्डे भरून घेतले ते

रस्ते / खड्डे उखडले आहेत, सहा महिन्याच्या (हमी कालावधीच्या)आतच हे रस्ते पुन्हा खराब झाले असल्याने त्या ठेकेदारांची जी सुरक्षा अनामत रक्कम आपल्याकडे जमा आहे ती त्यांना परत देण्यापूर्वी त्यांच्याकडून त्या-त्या रस्त्यांमधील खड्डे भरण्याचे काम करून घेतले जावे.

मा.सदस्य श्री.राजेंद चौधरी:-माझ्या प्रभागात एक सुध्दा रस्त्याचे काम झालेले नाही.

श्री.चिजवानी (शहर अभियंता):- त्या कोणत्त्याही ठेकेदाराचे पेमेंट केलेले नाही, जो पर्यंत ते ठेकेदार त्या रस्त्यांची दुरूस्ती करून देत नाही तोपर्यंत त्यांचे पेमेंट अदा केले जाणार नाही.

मा.आयुक्त :- त्या ठेकेदारांना सांगा दुरूस्तीचे काम करून दिले जावे.

मा.सदस्य श्री.राजेंद चौधरी:- दरवर्षी सार्वजनिक गणेश उत्त्सव मंडपा शेजारी दगडी किट्टी टाकली जाते. नगरपालिकेच्या कालावधी पासून ती दिली जात आहे. महापालिका सुध्दा देत आली आहे त्याप्रमाणे यावर्षि सुध्दा सार्वजनिक गणेश उत्त्सवाच्या मंडपाजवळ टाकण्यासाठी किट्टी दिली जावी.
मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण:-भाविकांना येण्याजाण्यासाठी त्रास होतो.

मा.आयुक्त :- ते लोक जी वर्गणी गोळा करतात त्यातून याकामी त्यांना खर्च करावयास काही हरकत नाही.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले:- जेथे जेथे चिखल होतो तेथे किट्टी दिली पाहिजे.

मा.सदस्य श्री.राजेंद चौधरी:- बरीचशी सार्वजनिक गणेश उत्त्सव मंडळे गरीब आहेत. किट्टी साठी पैसे खर्च करण्याची त्यांची कुवत नाही यासाठी अशा गणेश उत्त्सवांना किट्टी पुरविली जावी. आमच्या गणेश उत्त्सवाची तशी काही अडचण नाही. आम्ही नगरसेवक लोक काहीही उलाढाल करून असा खर्च भागवू शकतो.

मा.आयुक्त:-कोणत्त्या प्रभागात मग नगरसेवक नाही?



मा.सदस्य श्री.प्रमोद टाले:- गणेश उत्त्सवास प्रत्येकी दोन दोन गाडयातरी किट्टी दिली जावी.

मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी:-गणेशउत्त्सवापूर्वी शहरातील रस्त्याची दुरूस्ती केली जावी.

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी:-मुंबई मध्ये पावसाळयात सुध्दा बी.एम.ए. सी ची कामे होतात. मग येथे का नाही होवू शकत.

मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी:- तेथील ठेकेदारांना वेळेवर पेमेंट मिळते. येथे नाही.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:- नारायण पंजाबी ऐंका श्री.ठाकुर बेहरानी म्हणतात की, तेथील ठेकेदारांना वेळेवर पेमेंट मिळते.

मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारी:- आयत्त्या वेळचा विषय सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ठ करण्यात येत असुन तो सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:- कोणकोणत्त्या प्रभागातील कामे आहेत ते वाचुन दाखवा.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :- चिजवानी साहेब, आपण वाचुन दाखवा.

श्री.भिवापुरकर (कार्यकारी अभियंता):- प्रस्तावामधील ३३ कामांची लोकेशन वाचुन दाखवितात.

मा.सचिव :- या कामांना या पुर्वीच मंजुरी मिळालेली आहे. आता ही कामे ५ (२)(२)अन्वये करण्यास आयुक्तांना अधिकार दयायचे आहेत.

मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारी:- ही कामे ५ (२)(२)अन्वये करण्यास आयुक्तांना अधिकार देवूया.

मा.सचिव:- भिवापुरकर साहेब, आपण नुसते प्रभाग क्र. सांगितले तरी पुरेसे आहे.

श्री.भिवापुरकर (कार्यकारी अभियंता):-प्रस्तावामधील ३३कामांचे प्रस्ताव वाचुन दाखवितात.

--२१--

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी:- प्रभाग क्र.२८ दोन वेळा आला आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:- दोन-दोन लाखाची कामे दोन वेळा आली आहेत.

मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारी:- एकुण ३३ कामे आहेत. त्यांची प्राकलनिय रक्कम रूपये ६४,५२,९६०/- आहे.

मा.सदस्य श्री.भगवान भांडे:- प्रभाग क्र.१८ आहे का त्यामध्ये?

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी:- प्रभाग क्र.२७ नाही आहे काय?

मा.सदस्य श्री.विनोद तलरेजाः- गलिच्छ वस्त्यांमधील ३३ कामांचा हा जो प्रस्ताव आहे ही कामे ५(२) (२) नुसार करून घेण्यासाठी आयुक्तांना अधिकार देवूया.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरीः- ठिक आहे, आयुक्तांना अधिकार दिले जावेत.

मा.आयुक्तः- अर्थसंकल्पात ५० लाखाची तरतुद आहे. तेवढी काम करण्याची प्रशासनाची जबाबदारी आहे. अशी इतिवृतात नोंद घ्या.

मा.पिठासीन अधिकारी श्री.किशोर वनवारीः- अर्थ संकल्पिय तरतुदी व्यतिरिक्तची रक्कम डिसेंबरमध्ये होणा-या सुधारीत अर्थ संकल्पाचे वेळी समायोजित केली जाईल असे पिठासीन अधिका-यांनी सांगितल्या इतिवृत्तात नोंद घ्या.

आयत्त्यावेळचा हा विषय सर्वानुमते सभेच्या कामकाजात समाविष्ठ करण्यात येत असुन सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

--२५--

सायंकाळी ५.३० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे श्री.किशोर वनवारी (पिठासीन अधिकारी)यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः-३१.८.२०००

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक ३१.८.२००० रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सदस्य श्री. किशोर वनवारी हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. तसेच खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| २. | श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| ३. | श्री. चौधरी राजेंद्र | सदस्य |
| ४. | श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ५. | श्रीमती.पद्मा वलेचा | सदस्या |
| ६. | श्री. पंजाबी नारायण | सदस्य |
| ७. | श्री. भांडे भगवान | सदस्य |
| ८. | श्री. टाले प्रमोद | सदस्य |
| ९. | श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| १०. | श्री.तेजी कैलाश | सदस्य |

११. श्रीमती.भारती राजानी सदस्या
१२. श्री.ठाकुर बेहरानी सदस्य

तर

१) मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी, २)श्री.रामचंद पारवानी. ३)श्री.कुमार आयलानी हे सदस्य सभेस अनुपस्थितीत होते/होत्त्या.

<u>मा.सचिव :-</u> आजच्या सभेत मा.सभापती महोदया काही कारणास्तव येणार नसल्याने आजच्या या सभेचे कामकाज चालविण्यासाठी आपणामधील एका सदस्याची पिठासीन अधिकारी म्हणुन निवड करावी अशी मी आपणास विनंती करतो.

<u>मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी</u> :- आजच्या या सभेचे कामकाज पहाण्यासाठी मा. सदस्य श्री.किशोर वनवारी यांची पिठासीन अधिकारी म्हणून निवड करावी असे मी सुचवू इच्छितो.

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:-</u> आजच्या सभेची विषय सुचना कोणी काढली आहे?

<u>मा.सचिव:-</u> पुढे सांगतो सभेचे कामकाज चालू होवू दया.

श्री.किशोर वनवारी हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ झाले.

--१--

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र.१ वाचून दखवितात.

मागील सभेचे दिनांक २५.८.२००० रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u>:- आता हे सांगा की, आजच्या या सभेची विषय सुचना कोणी काढली?

<u>मा.सचिव:-</u> सभेची विषय सूची सचिव काढतात तो अधिकार सचिवांना आहे.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u>:-एखादा सदस्य किती सभांना हजर नाही राहिला तरी चालते?

<u>मा.सचिव:-</u>स्थायी समितीचा जो कोणताही सदस्य तात्पुरता आजार किंवा समितीने मान्य केलेले अन्य कारण या व्यतिरिक्त अन्य कारणामुळे लागोपाठ दोन महिन्यांच्या मुदतीत समितींच्या सभांना स्वतः अनुपस्थितीत राहील किंवा कोणत्याही कारणामुळे-मग ते समितीने मान्य केलेले असो वा नसो-लागोपाठ चार महिन्याच्या मुदतीत समितीच्या सभांना स्वतः अनुपस्थित राहील किंवा उपस्थित राहण्यास असमर्थ होईल तो स्थायी समितीचा सदस्य म्हणून असण्याचे बंद होईल आणि त्यानंतर त्याची जागा रिकामी होईल.

<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टाले:-</u> मागील सभेत, त्या पूर्वीच्या सभेचे इतिवृत कायम करण्याच्या वेळी मी जी हरकत घेतली होती त्याचे काय झाले?

<u>मा. पिठासीन अधिकारी ( श्री. किशोर वनवारी):-</u>ती जी कामे होती ती मंजुर झाली आहेत. त्यांचा ठराव संमत झालेला आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:- त्याचप्रमाणे होईल ना?

मा. पिठासीन अधिकारी ( श्री. किशोर वनवारी):-बिल्कुल, त्याचप्रमाणे होईल.

दि.२५.८.२००० रोजीच्या सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

मा.सचिव:- विषय क्र.२ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी:- या कामांच्या गोषवा-यामध्ये हे लिहिले नाही की, ही कामे कोणत्त्या निधीतून केली जातील म्हणून?

श्री.चिजवानी (शहर अभियंता):-ही कामे ज्या ज्या निधीतून करायची आहेत. त्यांची एक स्वतंत्र यादी तयार केलेली आहे. या यादीच्या छायांकित प्रती तयार करून, एक-एक प्रत आपणांस दिली जाईल.

मा. पिठासीन अधिकारी ( श्री. किशोर वनवारी):-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

--६--

मा.सचिव:- विषय क्र.३ वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :-या प्रस्तावाचे स्पष्टीकरण कोण करेल. वहयांचा दर्जा कसा आहे?

मा.आयुक्त:-श्री.बालकृष्णन, त्या वहया दाखवा......मेसर्स सागर इंटरप्रायझेस यांनी दिलेल्या वहयांचा नमुना दाखवा.

(वहया पुरविणे कामी ज्या ज्या निविदा कारांनी वहयांचे नमुने दिले होते ते वहयांचे नमुने श्री.बालकृष्णन (खरेदी अधिकारी) यांनी स्थायी समिती सदस्यांना दाखविले.)

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी:- हया वहया सन २००० या वर्षासाठीच्या देत आहात की, सन २००१ या वर्षासाठी देत आहात?शाळा सुरू होवून सहा महिने पूर्ण होत आले आहेत.

मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी:-आपणा कडून तर या वहया सहा महिन्या नंतरच दिल्या जातात?

मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा:- वहया दाखवा, आकार कसा आहे?

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी:- (एका वहिचा नमुना दाखवत) ही वही खुपच लहान आहे.

मा.आयुक्त:- श्री.बालकृष्णन, या वहीची किंमत काय आहे?

श्री.बालकृष्णन (खरेदी अधिकारी):- या वहीची किंमत ६ रू ९० पैसे आहे.

मा.आयुक्त:- आणखी दुसरी कोणती ?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-(वहीचा एक नमुना दाखवत) या वहीची किंमत काय आहे?

श्री.बालकृष्णन (खरेदी अधिकारी):- ती वही ' विमल' ची आहे. तिची किंमत ११ रूपये ४० पैसें आहे.

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी:- श्री.रमेश चव्हाण म्हणतात ती वही चांगली आहे.

मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा:- ही वही 'जंबो साईजची' आहे. नगरसेवकांना किती वहया दिल्या जातात?

मा. पिठासीन अधिकारी ( श्री. किशोर वनवारी):- नगरसेवकांना त्याच्या प्रभागातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यासाठी दरवर्षी पाचशे-पाचशे वहया दिल्या जातात.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण:-जरा चांगल्या प्रतीच्या वहया दया या वहयांवर पाठोपाठ लिहिले तर मागील बाजुला लिहिलेले पूर्ण मिटून जाईल असा त्यांचा कागद आहे.



मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी:- प्रत्येक नगरसेवकांना पाचशे-पाचशे वहया दिल्या जातात. त्यापैकी वीस- पंचवीस वहया कमी दिल्या तरी चालतील परंतु ज्या वहया दयाल त्या चांगल्या प्रतीच्या दिल्या जाव्यात.

मा.सदस्य श्रीमती लविना कुंदनानी:-या वहयांचे कागद बघा...कागद कसा आहे?

मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा:- वहया चांगल्या प्रतीच्या असल्या पाहीजेत.

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी:- ही वही आयुक्त साहेबांकडे ठेवा,जेव्हा वहया पुरविल्या जातील तेव्हा या नमुन्याशी त्या पडताळून पाहता येतील.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-वहयांचे हे जे नमुने दिलेले आहेत त्यामध्ये त्यांच्या आकारामध्ये सुध्दा फरक आहे का?

मा. पिठासीन अधिकारी ( श्री. किशोर वनवारी):- ५०-५० वहया कमी मिळाल्या तरी चालतील परंतु वहया चांगल्या प्रतीच्या दिल्या जाव्यात.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:- वहयांचा हा नमुना कोणत्त्या संस्थेने दिलेला आहे?

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:- आपणांस काय करायचे आहे? वहया चांगल्या प्रतीच्या असल्या पाहिजेत.

मा.आयुक्त:- श्री.शेंडें साहेब आपणांस वहयांचा दर्जा राखायचा आहे .तो कसा राखता येईल? वहयांची संख्या कमी करून दर्जा कसा राखता येईल?

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:-त्या निविदाकारांना वाटाघाटीस बोलावले जावे.
मा.आयुक्त:-. लघुत्त्तम दराची निविदाकारास प्रथम वाटाघाटीस बोलवावे लागेल. मेसर्स सागर इंटरप्रायझेस यांची सर्वात लघुत्त्तम दराची निविदा आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:-निविदा भरणा-या सर्वांना वाटाघाटीस बोलवा.

श्री.शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):- न्यूनतम दर वाल्यांना बोलवायचे झाले तर, आपण ज्या प्रतीच्या वहया पसंत केल्या, त्या प्रतीच्या वहया लघुत्त्तम दराचे निविदाकार देत असतील तर आपणांस त्या वहयांचे आकार सुध्दा निश्चित केले पाहिजेत.

मा. पिठसीन अधिकारी ( श्री. किशोर वनवारी):-ज्या चांगल्या प्रतीच्या वहया आहेत. त्या देणे हे आपले कर्तव्य आहे. (वहयांचे नमुने दाखवत)हया दोन नमुन्याच्या वहया पसंत करूया. या नमुना नुसारच त्यांनी वहया पुरवाव्यात त्यास संमती देवू या व त्यांना वाटाघाटीस बोलावू या.

श्री.शेंडे (मुख्य लेखा अधिकारी ):- वहयांचे नमुने वेगवेगळया आकाराचे आहेत. म्हणुन कोणत्त्या आकाराच्या वहया घ्यायच्या? म्हणुन प्रथम आकार निश्चित केला जावा.



मा.आयुक्त:- (वहयांचे नमुने दाखवत) या वहीचा आकार कमी आहे. वहयांचा आकार थोडा मोठा पाहिजे. कागद चांगला पाहिजे व भाव कमी पाहिजे.
मा.सचिव:- हि निविदा रदद करून फेर निविदा मागविली पाहिजे.

मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा:- आम्ही आयुक्तांना अधिकार देतो.

मा.आयुक्त:- वहयाचा आकार मोठा असला पाहिजे, कागद चांगला असला पाहिजे व भाव कमी असला पाहिजे प्रथम लघुत्तम दराचा निविदाकार आणखी दर कमी करण्यास तयार असेल तर त्यास दिले पाहिजे.

श्री.शेंडे (मुख्य लेख अधिकारी):- वहयांचा ट्रेड मार्क पाहिला जावा.

श्री.बालकृष्णन (खरेदी अधिकारी):- हि 'विमल' ची वही आहे.

मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा:- आयुक्त साहेब, आम्ही आपणांवर सोपवितो. आपण जो निर्णय घ्याल तो आम्हास मान्य असेल.

मा. पिठसीन अधिकारी ( श्री. किशोर वनवारी):-वाटाघाटी करून हा प्रस्ताव स्थायी समिती पूढे आणायचा कि आयुक्तांना अधिकार दयायचा?

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:- शाळा सुरू होवून सहा मिहीने झाले तीमाही परिक्षा सुध्दा झाल्या अद्याप वहया दिल्या नाहीत स्थायी समिती पूढे पुन्हा प्रस्ताव आणायचा झाला तर वार्षिक परिक्षा सुध्दा होवून जातील.

मा. पिठसीन अधिकारी ( श्री. किशोर वनवारी):- या प्रस्तावाबाबत पुढील प्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

विषय :-गरजु विद्यार्थ्यांना वहया पुरविणे कामी मेसर्स सागर इंटरप्रायजेस यांची न्यूनतम दराची निविदा स्विकृती योग्य असून संविदेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

सन २०००-२००१ या वर्षा मध्ये महिला व बाल कल्याण समिती तर्फे गरजु विद्यार्थ्यांना वहयांचे वाटप करण्याचे ठरविल्यामुळे, सदरचा प्रस्ताव महासभा ठराव क्र.३ दि.१६.२.२००० अन्वये मंजुर करण्यात आल्या नुसार सदरचे वहयाचे खरेदी करिता जाहिर निविदा मागविण्यात आल्या व त्यानुसार खालील निविदा काराने सदरच्या निविदा भरल्या.

१) कैलास इंटरप्रायझेस.
२) महिला आर्थिक विकास महामंडळ

३) मनमोहन इंटरप्रायझेस.
४) सागर इंटरप्रायझेस.
५) युनिक प्रिन्टींग प्रेस.

उपरोक्त निविदा धारका पैकी मेसर्स सागर इंटरप्रायझेस यांचे दर कमी असून एकूण ३४,५००/- नोटबुक / वहया खरेदी करीता एकूण रूपये १,३८,०५०/- इतका खरेदी खर्च येणार आहे.

--९--

सदरच्या खर्चाची तरतुद वित्तिय वर्ष २०००-२००१चे अंदाजपत्रकातील शिर्ष सी५ (३)मधील तरतूदी मधुन करावयाचा आहे.

तरी मेसर्स सागर इंटरप्रायझेस कडून उपरोक्त वहयाची खरेदी करण्यासाठी वित्तिय व प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव स्थायी समिती पुढे ठेवण्याकरिता सादर.

स्थायी समिती ठराव क्र.१०६ दिनांक :-३१.८.२०००

सुचकाचे नाव :-श्री.राजेंद्र चौधरी.

अनुमोदकाचे नाव :-श्री.विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिके तर्फे गरजु विद्यार्थ्यांना वहया पुरविणे कामी मेसर्स. सागर इंटरप्रायझेस
यांची सर्वात प्रथम लघुत्तम दराची निविदेतील सामुग्री निकृष्ठ प्रतिची असल्याने सदरची निविदा न स्विकारता वरील निविदापैकी आयुक्तास आपल्या स्वइच्छा निर्णयानुसार किंवा वाटाघाटी अंती सर्व परिस्थिती विचारात घेता सर्वात फायदेशीर निविदाकाराशी संविदेस प्राधिकृत करित आहे व अंतर्भुत खर्चास (प्रशासकिय व वित्तिय) मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.आयुक्तः- आपणा सर्वांची संमती असेल तर आयत्त्यावेळच्या विषयान्वये एक प्रस्ताव मंजुरीस आणू इच्छितो.

श्री.पांडूरंग लांडे यांच्या प्रभागात दोन ठिकाणी शंभर मी.मी.व्यासाच्या जलवाहिन्या टाकण्या बाबतचा प्रस्ताव आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरीः- या कामासंबंधी उपायुक्त कोण आहे.

मा.सचिवः- श्री.धुत साहेब (कार्यकारी अभियंता)पाणीपुरवठा विभाग यांच्या विभागाचा हा प्रस्ताव आहे.

मा. पिठासीन अधिकारी ( श्री. किशोर वनवारी):- आयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये मंजुरीस आणलेला प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यात येत असून तो सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

--१०--

आयत्त्यावेळचा विषय

विषयः- सोबत जोडलेल्या गोषवा-यात नमुद केलेल्या जागी जलवाहिनी टाकणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

खाली उल्लेख केलेल्या ठिकाणी पाणी टंचाईवर मात करण्यासाठी जलवाहिनी टाकण्याचा प्रस्ताव नगरसेवक फंडातून प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | नगरसेवकाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| १) | प्र.क्र.२९ मध्ये प्रिया ऑइल कं.ते रेनाड मोटर्स पार्टस (शिवमंदिर स्मशान भुमी समोर) उल्हासनगर.३ येथे १००मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत. | श्री.पांडुरंग लांडे. | १,९९,१४५/- |
| २) | प्रभाग क्र.२९ मध्ये सिध्दार्थ तरूण मंडळ (भैया साहेब आंबेडकर सोया) ते प्रिया ऑईल कंपनी पर्यंत)१०० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत. | श्री.पांडुरंग लांडे | १,६१,५५२/- |

वरील कामाकरिता सदर विभागाचे नगरसेवक यांनी त्यांचा नगरसेवक फंड उपलब्ध करून दिला आहे व त्यास माननीय आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

तरी सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी करिता तसेच सदर काम मजुर कामगार सहकारी संस्था यांच्याकडून करून घेण्यास मंजुरीस्तव स्थायी समितीपुढे सादर.

स्थायी समिती ठराव क्र.१०७ दिनांकः-३१.८.२०००

सुचकाचे नाव :- श्री.विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नावः- श्री.नारायण पंजाबी.

हि स्थायी समिती वर नमुद केलेल्या ठिकाणी नगरसेवक निधीतून जलवाहिन्या टाकणे कामीचे दोन प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

--११--

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५.०० वाजता सभा संपल्याचे पिठासिन अधिकारी श्री.किशोर वनवारी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-८.९.२०००

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक ८.९.२००० रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योति कालानी ह्या पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| २. | श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| ३. | श्री. चौधरी राजेंद्र | सदस्य |
| ४. | श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ५. | श्रीमती.पद्‌मा वलेचा | सदस्या |
| ६. | श्री. पंजाबी नारायण | सदस्य |
| ७. | श्री. भांडे भगवान | सदस्य |
| ८. | श्री. टाले प्रमोद | सदस्य |
| ९. | श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| १०. | श्री.किशोर वनवारी | सदस्य |
| ११. | श्रीमती.भारती रजानी | सदस्या |
| १२. | श्री.ठाकुर वेहरानी | सदस्य |
| १३. | श्री.रामचंद्र पारवानी. | सदस्य |
| १४. | श्री.कुमार आयलानी | सदस्य |

तर

मा.सदस्य श्री. तेजी कैलाश हे सभेस अनुपस्थितीत होते.

मा.सचिव :- विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक ३१.८.२००० रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:- दि.३१.८.२००० रोजीच्या सभेचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

मा.सचिव:- विषय क्र.२ वाचुन दाखवतात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-हा प्रस्ताव संमत केला जावा.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

--२--

विषय :- प्रभाग क्र.७ व ६१ मध्ये नगरसेवक निधीतून प्रभागातील रस्त्त्यावरील दिवाबत्ती लावणे कामीच्या दोन प्राकलनास प्रशासकीय व

विित्तय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र.१०८ दिनांकः-८.९.२०००.

सुचकाचे नाव :- श्री.प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :-श्री.रामचंद पारवानी.

हि स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या जागी नगरसेवक निधीतून दिवाबत्ती लावणे कामीचे दोन प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधीकृत करीत आहे.

| क्र. | कामाचा तपशिल | प्राकलनिय रक्कम अ. |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर १/२ येथील प्र.क्र.६१ मध्ये रस्त्यावरील दिवाबत्ती बसविणे बाबत (नगरसेवक निधीतून) | २,००,०००/- |
| २. | उल्हासनगर २ येथील प्र.क्र.७ मध्ये रस्त्यावरील दिवाबत्ती बसविणे बाबत.(नगरसेवक निधीतून) | १,००,०००/- |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.सचिव :- विषय क्र.३ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- हा प्रस्ताव संमत केला जावा.



मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :-शहरातील नादुरूस्त विंधन विहीरीच्या देखभाल दुरूस्ती कामीची मेसर्स. पार्वती कंन्स्ट्रक्शन, अंबरनाथ यांची वाटाघाटी अंतीची न्यूनतम दराची निविदा विचारात घेवून संविदेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना:-

पाणी पुरवठा विभागा अंतर्गत शहरातील सुमारे ७०० विंधन विहिरी वरील (बोरवेल्स)हातपंपाची देखभाल दुरूस्तीची कामे महानगरपालिकेच्या एक मिस्त्री,तीन मुकादम आणि चार मजुर या अपु-या कर्मचा-याच्या मार्फत केली जातात.

सदर देखभाल दुरूस्तीची कामे अवजड असून शहरातील विविध ठिकाणी जाऊन तक्रारी स्वरूप करावी लागतात. अपु-या कर्मचारी वर्गामुळे ब-याच तक्रारी प्रलंबित राहतात. म्हणुन गेल्यावर्षी प्रमाणे याकामासाठी योग्य ठेकेदारा मार्फत सदरची कामे नित्त्य नियमाने करण्यास यावर्षी सुध्दा मा.आयुक्ताचे परवानगीने परत जाहिर निविदा मागविण्यात आलेल्या होत्त्या. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

जाहीर निविदा सुचना प्रसिध्द झाल्यानंतर नियमांनुसार या कार्यालयास १)मेसर्स. पार्वती कंन्स्ट्रक्शन अंबरनाथ. २)मेसर्स. उमेश पी. पारकर कल्याण. ३) मेसर्स भगवती इंजिनियरिंग कंपनी अंबरनाथ यांच्या सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्यानंतर रितसर उघडण्यात आल्या त्यांचे १)मेसर्स. पार्वती कंन्स्ट्रक्शन ६.०५ टक्के अंदाजित प्राकलना पेक्षा जास्त २)मेसर्स. उमेश पी. पारकर १०.५ टक्के प्राकलनापेक्षा जास्त आणि ३) मेसर्स भगवती इंजिनियरिंग कंपनी १२. ०टक्के प्राकलनापेक्षा जास्त अशा प्रकारे होत्त्या या सर्व निविदामध्ये मेसर्स पार्वती कंन्स्ट्रक्शन अंबरनाथ यांची निविदा प्रथम न्यूनतम होती म्हणून मंजुरी साठी पाठविण्यात आली होती. मात्र लेखाशाख यांचे अभिप्रायानुसार सदर ठेकेदारास दर कमी करण्याच्या वाटाघाटीस रितसर बोलाविले असता सदर ठेकेदारांनी प्रत्यक्ष या कार्यालयात वाटाघाटी अंती पूर्वीच्या दरात १.०५ टक्के दर कमी करून ५ टक्के दरापेक्षा कमी करणे. काम परवडत नाही. असे लिहून दिले. सबब आता त्यांची निविदा प्राकलनाच्या ५ टक्के जास्त (रूपये ८,१७,७८४/-)या रकमेची झालेली आहे.

सदर मेसर्स पार्वती कंन्स्ट्रक्शन अंबरनाथ यांची ५ टक्के जास्त दराची निविदा यांना प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणे व त्यांना कार्यादेश देणेस परवानगी यासाठी सदर बाब स्थायी समिती सभेपुढे सादर करीत आहोत.

स्थायी समिती ठराव क्र.१०९ दिनांक :-८.९.२०००

सुचकाचे नाव :-श्री किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव:-श्री. नारायण पंजाबी.

--४--

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार शहरातील नादुरूस्त विंधन विहरींच्या देखभाल दुरूस्ती कामाची मेसर्स पार्वती कंन्स्ट्रक्शन अंबरनाथ यांची वाटाघाटी अंतीची प्राकलनापेक्षा ५ टक्के जास्त दराची सर्वात प्रथम न्यूनतम दराची निविदा फायदेशीर असून आयुक्तास त्यांच्याशी संविदेस मान्यता व अंतर्भुत खर्च रूपये ८,१७,७८४/- यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.सचिव :- विषय क्र.४ वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानीः- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढे ढकलण्यांत येत आहे.

विषय :- सन २०००-२००१ या वर्षा करिता जंतुनाशक, किटकनाशक व इतर आवश्यक साहित्य पुरविणे कामी आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था नेमणुक करील त्या ठेकेदारांशी आयुक्तांना निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

मा.सचिव :- विषय क्र.५ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढे ढकलण्यात येत आहे.

विषय :- डबल विहल बॉरोज पुरविणे कामी आयुक्तांना मेसर्स महिला आर्थिक महामंडळ यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

मा.सचिव :- विषय क्र.६ वाचुन दाखवितात.

--५--

मा.सदस्य श्री.किशोर वनवारीः- हा प्रस्ताव संमत करूया.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरीः- महापालिकेच्या शाळेंच्या इमारतींची स्थिती अतिशय खराब आहे त्यामुळे हे संगणक ठेवणार कुठे?

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाणः- स्पष्टीकरण देण्यासाठी संबंधित अधिकारी कोण आहे?

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी:-टाऊन हॉल मध्ये ठेवू.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:- संगणक टाऊन हॉल मध्ये ठेवणार?

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :- महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी दहा संगणक पुरविण्या कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना:-

महाराष्ट्र शासनाने सन वर्षा पासुन इयत्ता १ली पासून इंग्रजी विषय अभ्यासक्रमात अंर्तुभुत केलेला आहे.

सध्याचे युग संगणक युग असल्याने महापालिकेतील ३० शाळेतील विद्यार्थ्यांना संगणकाची पुर्ण ओळख (प्राथमिक ज्ञान) होणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रशासनाधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ यांनी १० संगणकाची मागणी केलेली आहे.

सदरचे १० संगणेक खरेदी करण्यासाठी अंदाजित रक्कम रू. ३,५०,०००/-(रूपये तीन लाख पन्नास हजार) येणारा खर्च महापालिकेच्या अर्थसंकल्पातील ''अ'' अंदाजपत्रक लेखाशं (१) प्राथमिक शिक्षण या शिर्षाच्या खाली केलेल्या २० लाख तरतुदी मधुन करावयाचा आहे.

उपरोक्त खर्च अंदाजित केलेला आहे. प्रत्यक्ष दर पत्रके मागवून खर्च निश्चित केले जाईल.

तरी एकुण १० संगणक खरेदी करण्यासाठी होणारा अंदाजित खर्च रूपये ३,५०,०००/-(तीन लाख पन्नास हजार मात्र )खर्चास मान्यता मिळणे साठी प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र.११०                    दिनांक :-८.९.२०००

सुचकाचे नाव:-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. ठाकुरदास वेहरानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिकेच्या शाळेतील



विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी १० संगणक पुरविण्या कामीचे अंदाजित रक्कम रू.३,५०,०००/- यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले यांचे सायंकाळी ४.४५ वाजता स्थायी समिती सभागृहात आगमन झाले.

सायंकाळी ४.४५ वाजता सभा संपल्याचे मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-१४.९.२०००

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक १४.९.२००० रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सदस्य श्री. किशोर वनवारी हे पिठासीन अधिकारी स्थानी आसनस्थ होते. तसेच खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| २. | श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| ३. | श्री. चौधरी राजेंद्र | सदस्य |
| ४. | श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ५. | श्रीमती.पदमा वलेचा | सदस्या |
| ६. | श्री. भांडे भगवान | सदस्य |
| ७. | श्री. टाले प्रमोद | सदस्य |
| ८. | श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ९. | श्री.तेजी कैलाश | सदस्य |
| १०. | श्री.ठाकुर बेहरानी | सदस्य |
| ११. | श्री.रामचंद पारवानी. | सदस्य |

तर

१)मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी,२) श्री. पंजाबी नारायण ३) श्रीमती.भारती राजानी,४) श्री.कुमार आयलानी हे सदस्य/सदस्या सभेस अनुपिस्थितीत होते/होत्त्या.

**मा.सचिव :-** आजच्या या सभेत मा.सभापती महोदया काही कारणास्तव येणार नसल्याने आजच्या या सभेचे कामकाज चालविण्यासाठी आपणांमधील एका सदस्याची पिठासीन अधिकारी म्हणून आपण निवड करावी अशी मी आपणांस विनंती करतो.

**मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी:-** आजच्या या सभेचे कामकाज चालविण्यासाठी पिठासिन अधिकारी म्हणून मा.सदस्य श्री.किशोर वनवारी यांची निवड करावी असे मी सुचवू इच्छितो.

**मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी:-** मा. सदस्य श्री.ठाकुर बेहरानी यांनी सुचविलेल्या प्रस्तावास मी अनुमोदन देतो. पिठासिन अधिकारी म्हणून निवड होण्याची व त्या स्थानी आसनस्थ होण्याची श्री.वनवारी यांनी हॅट्रीक केली आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ झाले.

--२--

**मा.पिठासिन अधिकारी (श्री. किशोर वनवारी):-**आजच्या या सभेच्या कामकाजात आयत्त्यावेळचा एक विषय समाविष्ठ करण्यात येत आहे.

तसेच मा.आयुक्त श्री.आर.डी.शिंदे साहेब यांच्या मातोश्रीचे आज नुकतेच निधन झाले असल्याने या सभेचे कामकाज न चालविता आजची सभा गुरूवार दिनांक २१.९.२००० पर्यंत स्थगित करूया.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी:-मा.आयुक्त श्री.शिंदे साहेब यांच्या मातोश्रीचे निधन झाले असल्याने प्रथम त्यांना श्रध्दांजली अर्पण करूया. सभा स्थगितीचा निर्णय त्यानंतर घेवू या.

स्थायी समिती सभेत उपस्थित असलेल्या सर्वांनी २ मिनिटे स्तब्ध उभे राहून मौन पाळून श्रध्दांजली अर्पण केली.

मा.सचिव :-आयत्त्यावेळचा कोणता विषय सभेच्या कामकाजात समाविष्ठ करण्यात येत आहे. तो प्रथम घोषित केला पाहिजे म्हणजे पुढील सभेत त्यावर चर्चा करता येवू शकेल.

मा पिठासिन अधिकारी (श्री.किशोर वनवारी):-प्रशासनाकडून आयत्त्यावेळच्या विषया अन्वये एक प्रस्ताव आलेला आहे.

दहाव्या वित्त आयोग योजने अंतर्गत केंन्द शासनाकडून राज्य शासनास प्राप्त होणा-या अनुदानातून करावयाच्या दोन कामांचा हा प्रस्ताव आजच्या सभेच्या कामकाजात सर्वानुमते दाखल करण्यांत येत असून हा प्रस्ताव स्थगीत सभेच्या कार्यसूचीचा भाग मानला जाईल व आजची सभा गुरूवार दिनांक २१.९.२००० रोजी सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत सर्वानुमते पुढे ढकलण्यांत येत आहे. हि सभा गुरूवार दि.२१.९.२००० रोजी सायंकाळी
४.०० वा. होईल.

सायंकाळी ४.४० वाजता सभा संपल्याचे मा.पिठासिन अधिकारी श्री.किशोर वनवारी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-२१.९.२०००

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गूरूवार दिनांक १४.९.२००० रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात बोलावण्यात आली होती. सदरची सभा पुढे ढकलून ती दिनांक २१.९.२००० रोजी सायंकाळी ४.०० वाजता घेण्यात आली. या सभेत मा. श्रीमती. ज्योति कालानी हया पिठसीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.आयलानी कुमार उत्त्तमचंद | सदस्य |
| २. | श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| ३. | श्री.पारवानी रामचंद कुटूमल | सदस्य |
| ४. | श्री. पंजाबी नारायण | सदस्य |

५. श्री. भांडे भगवान सदस्य
६. श्री.तलरेजा विनोद सदस्य
७. श्रीमती.रजानी भारती नरेंद सदस्या
८. श्री.किशोर वनवारी सदस्य

तर

१) श्रीमती. गजवानी कांता,२)श्री. चौधरी राजेंद, ३)श्री. चव्हाण रमेश,४)श्री. वेहरानी ठाकुरदास वर्यलदास, ५)श्री.टाले प्रमोद, ६)श्री. तेजी कैलाश, ७)श्रीमती. वलेचा पदमा हे सन्माननिय सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्या.

मा.सचिव :- विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक ८.९.२००० रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा. सदस्य श्री.विनोद तलरेजा :- दि. ८.९.२००० रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम केले जावे.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:- दि.८.९.२००० रोजीच्या सभेचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

मा.सचिव :- विषय क्र.२ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- हा प्रस्ताव समंत केला जावा.

मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--२--

विषय :- शासकिय दवाखान्याजवळ ओटी सेक्शन, उल्हासनगर-४ या भागासाठी पंपीग मशिनरी पुरविणे,बसविणे व कार्यान्वित करणे कामी मेसर्स. ओम इंडस्ट्रिअल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांची,न्यूनतम दराची निविदा स्विकृती योग्य असून संविदेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर ओटी. ४ या भागातील वार्ड क्र.५५,२६ व २५ या जलवितरण व्यवस्थेतील टोकावरच्या प्रभागांना अपु-या प्रमाणात व कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याने शासकीय दवाखान्याजवळ सध्या असलेल्या १० एच.पी.पंपा ऐवजी २५ एच.पी. क्षमतेच्या पंप बसविण्याचे विभागातर्फे प्रस्तावित करण्यात आले होते. सदर प्रस्ताव रूपय २,५१,७०४/- मात्र इतक्या रकमेचा असून त्यास स्थायी समिती ठराव क्र.२८ दिनांक.२५.५.२००० नुसार प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळाली असून बाब क्र.३७३ दि.९.५.२००० नुसार तांत्रिक मान्यता आहे.

सदर कामा करिता विभागातर्फे निविदा मागविण्यात आल्या यासाठी दिनांक १६.६.२००० रोजी वृत्तपत्रातून जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली या सुचनेनुसार एकंदरित पाच ठेकेदारांनी निविदा खरेदी केल्या व पाचही निविदा दिनांक २९.६.२००० रोजी महानगरपालिकेस सादर करण्यात आल्या त्याचा तपशिल पुढील प्रमाणे:-

| | |
|---|---|
| १) मेसर्स गणेश इंटरप्रायझेस, अंबरनाथ | :- कागदपत्रांची पूर्तता न केल्याने निविदा उघडली नाही. |
| २) मेसर्स हर्बल टेक्नीक्स, कुळगाव | :- अंदाजित किंमतीपेक्षा १.१० टक्के कमी (रू.२,४६,४१८=२०) |
| ३) मेसर्स कल्पतरू इंजिनियरिंग, बदलापुर | :- अंदाजित किंमतीपेक्षा ९.२१ टक्के जास्त (रू.२,७४,८८५=९०) |
| ४) मेसर्स ओम इंडस्ट्रिअल इंजिनियर सर्व्हिसेस, डोंबिवली. | :- अंदाजित किंमतीपेक्षा १८.७५ टक्के कमी (रू.२,०४,५०९=५०) |
| ५)मेसर्स.सुवास इलेक्ट्रीकल्स,ठाणे. | :-अंदाजित किंमतीपेक्षा १२.५० टक्के कमी (रू.२,२०,२४१=००) |

उपरोक्त निविदापैकी मे.ओम इंडस्ट्रिअल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस याची निविदा तुलनात्तमकरित्त्या न्यूनतम असून वाजवी दराची असल्याने स्विकारण्याची प्रस्तावित आहे. यास मुख्य लेखा अधिकारी यांची शिफारस असून मा.आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

त्यानुसार शासकीय दवाखान्या जवळ पंपींग मशीनरी पुरविणे, बसविणे व कार्यान्वित करणे या कामासाठी रू. २,०४,५०९=५० मात्र च्या खर्चास व निविदेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळण्यासाठी सदर प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र.१११ दिनांक :-२१.९.२०००.

सुचकाचे नाव :-श्री.नारायण पंजाबी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती.लविना कुंदनानी.



हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार शासकीय दवाखान्याजवळ, ओटी सेक्शन उल्हासनगर ४ या भागासाठी पंपींग मशीनरी पुरविणे, बसविणे व कार्यान्वित करणे कामी मेसर्स ओम इंडस्ट्रियल इंजिनियरिंग सर्व्हिसेस यांची सर्वात प्रथम लघुत्तम दराची निविदा स्विकृत असून संविदेस मान्यता व अंतर्भुत खर्च रू.२,०४,५०९=५०पै. यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.सचिव :- विषय क्र.३ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- हा प्रस्ताव समंत केला जावा.

मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर भुयार गटार योजने अंतर्गत प्रभाग क्र. २३ ,२४ व ३५ मध्ये नगरसेवक निधीतून भूयार गटार पाईप लाईन टाकणे, जोडणे व दुरूस्ती करणे कामीच्या ३ प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र.११२ दिनांक :-२१.९.२०००.

सुचकाचे नाव :-श्री.नारायण पंजाबी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती.लविना कुंदनानी.

हि स्थायी समिती पूढे नमुद केलेल्या जागी नगरसेवक निधीतून उल्हासनगर भुयार गटार योजने अंतर्गत पाईप लाईन टाकणे जोडणे व दुरूस्ती करणे कामीच्या तीन प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे. तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर भुयार गटार योजने अंतर्गत बॅरेक क्र.१६४५ वार्ड क्र.२४ कॅम्प क्र.४ येथील भुयार गटार पाईप लाईन टाकणे, जोडणे आणि दुरूस्ती कामे. (नगरसेवक निधीतून) | ८०,७१४/- |

--४--

| अ.क्र. | कामाचा तपशिल | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| २. | उल्हासनगर भुयार गटार योजने अंतर्गत बॅरेक क्र.९४ वार्ड क्र.३५ कॅम्प क्र.१ येथील भुयार गटार पाईप लाईन टाकणे, जोडणे आणि दुरूस्ती कामे. (नगरसेवक निधीतून) | ९७,४२२/- |
| ३. | उल्हासनगर भुयार गटार योजने अंतर्गत बॅरेक क्र.१५८३,१५८४ वार्ड क्र.२३ कॅम्प क्र.४ येथील भुयार गटार पाईप लाईन टाकणे, जोडणे आणि दुरूस्ती कामे. (नगरसेवक निधीतून) | १,१७,१३२/- |

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासिन अधिकारी

स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.सचिव :- विषय क्र.४ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- हा प्रस्ताव समंत केला जावा.

मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- मा.महापौर / नगरसेवक निधीतून प्रभाग क्र १३ मध्ये जलवाहिनी टाकणे कामीचे ४ प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र.११३ दिनांक :-२१.९.२०००.

सुचकाचे नाव :-श्री.नारायण पंजाबी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती.लविना कुंदनानी.

हि स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या जागी मा.महापौर / नगरसेवक निधीतून प्रभाग क्र.१३ मध्ये जलवाहिनी टाकणे कामीचे चार प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.



तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधीकृत करीत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १) | उल्हासनगर ३, प्रभाग क्र.१३ मध्ये सिध्दार्थ बालवाडी ते आर.पी.आई ऑफिस ते इंडस्ट्रियल कंपाऊंड सम्राट अशोक नगर साठी १०० मि.मि.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकणे बाबत.(अंशत: महापौर निधी / अंशत: नगरसेवक निधी) | रू.१,८४,६००/- |
| २) | उल्हासनगर ३, प्रभाग क्र.१३ मध्ये साईबाबा मंदिर ते सिध्दार्थ बालवाडी, आर.पी.आई ऑफिस पर्यंत सम्राट अशोक नगर साठी १०० मि.मि.व्यासाची सी.आय. जलवाहिनी टाकणे बाबत. (अंशत: महापौर निधी / अंशत: नगरसेवक निधी) | रू.१,९९,९५०/- |
| ३) | उल्हासनगर ३, प्रभाग क्र.१३ मध्ये सम्राट अशोक नगर साठी साईबाबा मंदिर ते सिध्दार्थ बालवाडी पर्यंत ५०मि.मि.व्यासाची जी.आय. जलवाहिनी टाकणे बाबत. (नगरसेवक निधी) | रू.८८,४६५/- |

४) उल्हासनगर ३ ,प्रभाग क्र.१३ मध्ये
बॅरेक क्र.१०७० ते आयोध्या नगर येथे ५०
मि.मि.व्यासाची जी.आय. रू.७२ ,००१/-
जलवाहिनी टाकणे बाबत.
(नगरसेवक निधी)

---

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.सचिव :- विषय क्र.५ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- हा प्रस्ताव समंत केला जावा.

मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--६--

विषय :- मा.उपमहापौर / नगरसेवक निधीतून प्रभाग क्र.३८ मधील रस्त्त्यावरील दिवाबत्ती लावणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर १ येथील प्र.क्र.६२ चे नगरसेवक श्री. पम्मी कुमार अचनानी व उपमहापौर यांनी उल्हासनगर २ प्रभाग क्र.३८ येथे रस्त्त्यावरील दिवाबत्ती लावण्या कामीची मागणी त्यांच्या नगरसेवक फंडातून केली आहे. विद्युत विभागाने जागेवर पहाणी करून या संबंधी रू.७५ ,०००/-इतक्या किंमतीचे खर्च अनुमानित केला होता. या कामाच्या खर्चासाठी नगरसेवक फंडाच्या लेखा शिर्षात तरतुद उपलब्ध आहे. त्यानुसार सदर रू.७५ ,०००/- किंमतीचे प्रभाग क्र.३८ मधील रस्त्त्यावरील दिवाबत्ती लावण्या कामी या अभिकरणाने प्राकलन विद्युत खात्त्याने तयार केलेले आहे. सदर कामाच्या खर्चासाठी अंदाजपत्रकात तरतुद शिल्लक असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी त्यांच्या शे-यानुसार यासंबंधी कामाचे प्राकलनास मंजुरी करण्याची शिफारस केलेली आहे. त्यानुसार सदर कामास प्रशासकीय व वित्तिय मान्यतेसाठी तसेच काम चालू करण्यासाठी डी.डी.आर यांचे कडून मजुर कामगार सहकारी संस्थेकडून शिफारसीसाठी पाठविणे अथवा निविदा मागविण्याची कारवाई करण्यासाठी स्थायी समिती कडून मान्यता घेण्यासाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र.११४ दिनांक :-२१.९.२०००.

सुचकाचे नाव :-श्री.किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री.विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मा.उपमहापौर/नगरसेवक निधीतून प्रभाग क्र.३८ मधील रस्त्यावरील दिवाबत्ती लावणे कामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.सचिव :- विषय क्र.६ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- हा प्रस्ताव समंत केला जावा.

मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--९--

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :-आयत्त्या वेळच्या विषयान्वये मंजुरीस आणलेला प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यांत येत असून तो सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

आयत्त्यावेळचा विषय :-

विषय :-दहाव्या वित्त आयोग शिफारिशी मुळे योजने अंतर्गत केंद्र शासनाकडून राज्य शासनास प्राप्त होणा-या अनुदानातून करावयाच्या दोन कामास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देणे बाबत.

प्रस्तावना:-

वित्त आयोग शिफारिशी मुळे सन २०००-२००१ या आर्थिक वर्षात राज्य शासना मार्फत मिळणा-या अनुदानातून उल्हासनगर महानगरपालिकेसाठी विकास कामांना निधी उपलब्ध होणे करिता प्रस्ताव नगरविकास विभाग, मंत्रालय यांना त्यांचे अर्थशासकीय पत्र क्र. दविभा/१०९८/२८६३ प्र.क्र.६३/९८/भाग-२/नवि-४ दि. १०.८.२००० नुसार पाठवणे आवश्यक आहे. महानगरपालिका व्दारा खालील दोन रस्त्यांचे रूंदीकरणाचे व सुधारणा करण्याचे काम महानगरपालिकेच्या विचाराधिन आहे. सदर रस्त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | लांबी | डीपी प्रमाणे रूंदी | अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| १) | उल्हासनगर-५ येथे जुने बस टर्मीनस ते स्वामी शांती प्रकाश आश्रम बसंत बहार मार्गेचा रस्ता | | | |

सिमेंट कॉंक्रिटकरण करणे.   ४३९मी.   ४० फुट   ७३.२९ लाख

२) उल्हासनगर-३ येथे सोनेसर ऑफिस जवळील चौकापासून १ सी. या ४०० मी. ४० फुट   ६६.२७ लक्ष रस्त्यापर्यंतच्या पुर्नविस्तारितांसाठी असलेल्या   ----------- भुखंड मार्गेचा रस्ता डांबरीकरणाने बांधणे. एकुण   १३९.५६

---

उपरोक्त कामाची अंदाजित किंमत रूपये १३९.५६लाख असलेली दोन कामे वित्त आयोग शिफारिशी पोटी उपलब्ध होऊ शकणा-या निधीतून करण्यासाठी विचाराधीन आहेत. सदर रस्त्याची कामे या याजनेअंतर्गत करण्यासाठी महानगरपालिकेची मंजुरी आवश्यक आहे. मंजुरी प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्ताव शासनाकडे या योजनेअंतर्गत निधी उपलब्ध होणे करीता व मंजुरीकरता पाठविता येईल. सदर योजने अंतर्गत महानगरपालिका हिश्यासंबंधी आवश्यक रकमेची तरतूद सुधारीत अंदाजपत्रकात करण्यात येईल.

तरी उपरोक्त दोन कामांच्या रू.१३९.५६ लक्ष खर्चाच्या प्रस्तावांना स्थायी समिती कडून मंजुरी करीता प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.११६</u>   <u>दिनांक</u> :-२१.९.२०००

सुचकाचे नाव :-श्री.किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री.रामचंद पारवानी



हि स्थायी समिती हया सरकारी वर्षाच्या अवधित सुधारित अंदाजपत्रकात जमाखर्चाच्या पुन: समायोजनेस महासभेच्या मंजुरीस आधिन राहून वरील प्रस्तावनेत नमुद केल्या प्रमाणे दोन कामीचे रू.१३९.५६ लाख खर्चाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदर प्रस्ताव वित्त आयोग शिफारिशी मुळे अनुदान प्राप्त होणेकरिता शासनास सादर करण्यात यावे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर</u>
सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ४.१५ वाजता सभा संपल्याचे मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

श्री.भगवान भांडे व श्री.कुमार आयलानी हया सन्माननिय सदस्यांचे सायंकाळी ४.१६ वाजता स्थायी समिती सभागृहात आगमन झाले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :- २८.९.२०००

इतिवृत्तः-

दिनांक २८/९/२००० रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक २८.९.२००० रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योति कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.आयलानी कुमार | सदस्य |
| २. | श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| ३. | श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| ४. | श्री. चौधरी राजेंद्र | सदस्य |
| ५. | श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ६. | श्री.पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ७. | श्री. पंजाबी नारायण | सदस्य |
| ८. | श्री.ब्रहरानी ठाकूरदास | सदस्य |
| ९. | श्री. भांडे भगवान | सदस्य |
| १०. | श्री. टाले प्रमोद | सदस्य |
| ११. | श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| १२. | श्रीमती.भारती राजानी | सदस्या |
| १३. | श्री.वनवारी किशोर | सदस्य |
| १४. | श्री.वलेचा पदमा | सदस्या |

तर

मा.सदस्य श्री. तेजी कैलाश हे सभेस अनुपस्थितीत होते.

मा.सचिव :- विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक १४.९.२००० सह २१.९.२००० रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:- दि.१४.९.२००० रोजी जी सभ झाली. त्या सभेमध्ये सर्व सदस्यांना स्पष्ट सुचना देण्यांत आल्या होत्त्या की, आजची ही सभा गुरूवार दि.२१.९.२००० रोजी सायंकाळी ४.०० वाजता तर दर आठवडयात होणारी स्थायी समितीची सभा त्याच दिवशी सायंकाळी ४.३० वाजता घेण्यांत येईल.

दर आठवडयात होणारी स्थायी समितीची सभा त्या दिवशी झाली नाही. त्याचे कारण काय?



तसेच १४.९.२००० रोजीची पुढे ढकललेली जी सभा २१.९.२००० ला झाली या सभे बाबातचे पत्र सदस्यांना न देता फक्त दुरध्वनीवरून घरी कळविण्यांत आले. सभे बाबतचे पत्र प्राप्त झाले असते तर आम्ही बाहेर गेलो

नसतो. पत्र प्राप्त न झाल्यामुळे आम्ही सकाळीच बाहेर गेलो. फक्त दुरध्वनीवरून कळविणे हे बरोबर नाही यापुढे असे होता कामा नये.

तसेच दहाव्या वित्त आयोग योजने अंतर्गत केंन्द्र शासनाकडुन राज्य शासनास प्राप्त होणा-या अनुदानातून करावयाच्या कामांबाबत जो प्रस्ताव मंजुरीस आणलेला होता. त्याबाबत खास करून आमची हरकत आहे, कुणाशी सल्लामसलत करून हा प्रस्ताव आणला गेला होता? आर.पी.आय.शी याबाबत सल्लामसलत केली नसल्याने आमची या प्रस्तावास हरकत आहे, आम्हाला आमच्या एका रस्त्याच्या कामाचा प्रस्ताव त्यामध्ये ठेवायचा होता.

मा.सचिवः- सभा स्थगित करून कधी घेण्यांत येणार आहे. हे सर्व सन्माननिय सदस्यांना सांगितले होते. स्थगित केलेल्या सभे बाबत सन्माननिय सदस्यांना पुन्हा पत्र देणे कायदयानुसार आवश्यक / किंवा जरूरीचे नाही. सभा गुरूवारी ४-०० होणार आहे हे आपण लक्षात ठेवायचे होते. आपल्या लक्षात असेल, किंवा नसेल म्हणुन आम्ही सर्वांना दुरध्वनी वरून कळविले होते.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-परंतु यापूढे असे होता कामा नये.....

मा.सचिव :- म्हणजे दुरध्वनीवरून कळवू नये......?

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी :- आपला कशा बाबत विरोध आहे..? आर.पी. आय. चे आपले गटनेते श्री.बी.बी.मोरे यांनी तर या प्रस्तावाचे स्वागत केले आहे. असे असताना आपण कसा विरोध करत आहात?

मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी :-दि.१४/९/२००० सह २१/९/२००० रोजीच्या सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे बहुमताने कायम करण्यांत येत आहे.

मा.सचिव :- विषय क्र.२ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी / श्री.भगवान भांडे :- सदरचा प्रस्ताव समंत केला जावा.

मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- मेसर्स फिलीप्स इंडिया लि. यांचे कडून दुरूस्तीसाठी लागणारे विद्युत साहित्य पुरविणे कामी मा.आयुक्तांना थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

प्रस्तावना :-

महानगरपालिकेने या वित्तिय वर्षात व मागच्या दोन वित्तिय वर्षा पासुन जवळ जवळ हजार एक फिलिप्स ब्रांडचे दिवाबत्ती लावलेल्या आहेत. त्यातुन जवळ जवळ आठशे नग फिलिप्स मॉडेल एसआरएक्स०८६/२५०



डबलु आहे. सदरचे दिवाबत्ती दुरूस्ती करण्यासाठी इगनेटर, बलास्ट, आकृलिक कव्हर इत्त्यादी लागतात. हे विद्युत साहित्ये फिलिप्सचे असले पाहिजे कारण दिवाबत्तीत तेच फिट होणार आहेत. यासाठी फिलिप्स इं.लि. कडुन त्यांचे दर इ-मेलने मागविले आहेत. इगनेटरचे दर रू.३६५/- प्रति नग आहे व १५० इगनेटर साठी रू.५४७५०/- इतका खर्च येईल, २५० वॅटच्या बलास्ट साठी फिलिप्सने रू.८७५/- प्रति नग दर दिलेले आहे आणि १०० नग साठी रू.

८७५००/- खर्च येईल आणि आर्कलिक साठी रू.२७५/- दर कंपनीने दिलेला आहे व १०० नग खरेदी करण्यासाठी रू.२७५००/- इतका खर्च येईल.

सदरचे दर उत्पादक कंपनी कडुन आलेले आहे आणि या वित्तिय वर्षात बजेट मध्ये पुरेशी तरतुद उपलब्ध आहे. मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी पण थेट उत्पादक कंपनी मे.फिलिप्स इंडिया लि. यांच्या कडुन सदर साहित्ये खरेदी करण्यास ना हरकत दर्शाविलेली आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेऊन सदर साहित्ये थेट मे. फिलिप्स इंडिया लि. यांच्या कडुन खरेदी करण्या करिता व एकूण लागणारा खर्च १,६९,७५०/- यास प्रशासकिय व वित्तिय मान्यतेसाठी स्थायी समिती पुढे प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र.११७ दिनांक :-२८.९.२०००

सुचकाचे नाव :-श्रीमती. पदमा वलेचा.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती.लविना कुंदनानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दुरूस्तीसाठी लागणारे विद्युत साहित्य पुरविणे कामी एकुण रूपये १,६९,७५०/- च्या अंदाजित प्राकलनिय रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे आणि आवश्यक असल्याने आयुक्तांना मे. फिलिप्स इंडिया लि. यांच्याकडुन सदर साहित्य खरेदी करण्या करिता निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--४--

मा.सचिव :- विषय क्र.३ वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- सदरचा प्रस्ताव समंत केला जावा.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- मा. महापौर निधीतून उल्हासनगर-४ येथील प्रभाग क्र.२४ मध्ये रस्त्यावरील दिवाबत्ती बसविणे कामीचे प्राकलनास प्रशासकिय व

वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर ४ येथील प्रभाग क्र.२४ चे नगरसेवक श्री.प्रमनानी ईश्वरच्या वार्डात महापौर यांनी रस्त्यावरील दिवाबत्ती बसविणे या कामीची मागणी त्यांच्या महापौर फंडातून केली आहे. विद्युत विभागाने जागेवर पहाणी करून यासंबंधी रूपये १,००,०००/- इतक्या किंमतीचे खर्च अनुमानित केला होता. या कामाच्या खर्चासाठी महापौर फंडाच्या लेखा शिर्षात तरतुद उपलब्ध आहे. त्यानुसार सदर रूपये १,००,०००/- किंमतीचे प्रभाग क्र.२४ मधील रस्त्यावरील दिवाबत्ती बसविणे. या अभिकरणाने प्राकलन विद्युत खात्याने तयार केलेले आहे. सदर कामाच्या खर्चासाठी अंदाजपत्रकात तरतुद शिल्लक असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी त्यांच्या शे-यानुसार यासंबंधी कामाचे प्राकलनास मंजुरी करण्याची शिफारिश केलेली आहे. त्यानुसार सदर कामास प्रशासकिय व वित्तिय मान्यतेसाठी तसेच काम चालु करण्यासाठी डी.डी.आर. यांचे कडून मजुर कामगार सहकारी संस्थेकडुन शिफारशीसाठी पाठविणे अथवा निविदा मागविणेची कार्यवाही करणेसाठी स्थायी समितीकडून मान्यता घेणेंसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.११८</u>　　　　<u>दिनांक</u> :- २८.९.२०००

सुचकाचे नाव :-श्री.नारायण पंजाबी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती.भारती राजानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महापौर निधीतून उल्हासनगर४ येथील प्र.क्र.२४ मधील रस्त्यावरील दिवाबत्ती कामी रू. १,००,०००/- चे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

--७--

तसेच आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

<u>सुचकाची</u> <u>सही/-</u>

<u>अनुमोदकाची</u> <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

<u>सभापती / पिठासीन अधिकारी</u>
<u>स्थायी समिती सभा</u>
<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

मा.सचिव :- विषय क्र.४ वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- सांगा काळे साहेब, किती खर्च झाला आहे? व मा.महापौर, उप-महापौर स्थायी समिती सभापती इत्त्यादीचा निधी वाढविण्यासाठी काय तरतूद करत आहात?

मा.सदस्य श्री.ठाकुर वेहरानी :-१० लाखाचा नगरसेवक निधीच पूर्ण करत नाहीत तर इतर निधी ते काय वाढवणार?

श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक):- ऑगस्ट पर्यंत ४५,९०,४५०००/- एवढे उत्त्पन्न अपेक्षित होते. परंतु प्रत्यक्षात रू.२६,५२,२९,२८७/- एवढेच उत्त्पन्न प्राप्त झालेले आहे. मालमत्ता कराची फक्त १६ टक्के एवढी वसुली झालेली आहे. एप्रिल ते ऑगस्ट या पाच महिन्यामध्ये मिळकत करापोटी ११ कोटी रूपयांची वसुली होणे आवश्यक होते. प्रत्यक्षात ती रू.१,८२,३८,६८८ एवढी झालेली आहे. पाणी पुरवठा देयका पोटी १४ कोटी रूपयांची वसुली अपेक्षित होती मात्र प्रत्यक्षात २.३३ कोटी एवढीच वसुली झालेली आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- पाणीपट्टी व घरपट्टीची वसुली एवढी कमी का झाली आहे? याबाबत संबंधित अधिका-यांनी स्पष्टीकरण दयावे, वसुली कमी होण्याची कारणे काय आहेत?

श्री.सोनाळे साहेब आहेत, श्री.लाल पिंजानी आहेत, पाणी पुरवठा विभागात अनेक अधिकारीगण असताना, व महिला कर्मचा-यांना सुध्दा मालमत्ता कराचे वसुलीचे काम दिलेले असताना वसुली एवढी कमी का आहे?

श्री.सोनाळे (उप-आयुक्त):- अधिकाधिक वसुली करणे बाबत प्रयत्न चालु आहेत. काही मिळकतीची दोन-दोन, तिन-तिन वेळा नोंदी झालेल्या आहेत. तर काही मिळकतींच्या कर आकारणी बाबत वाद आहेत, कोर्ट केसेस आहेत. कायदेशिर अडचणी इत्त्यादीमुळे वसुली कमी आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- मिळकतींचे सर्व्हेक्षण करण्याकामी आम्ही जून मध्ये मे.टाटा इन्फोटेक यांना ठेका दिला. त्यावेळी निविदा मागविण्यास वेळ नाही असे सांगण्यांत आले होते म्हणुन निविदा न मागविता मे.टाटा



इन्फोटेक यांना ते काम देण्यांत आले. दोन महिन्यामध्ये ते काम पूर्ण करणार होते. परंतु दोन महिन्यामध्ये त्यांनी फक्त दोन प्रभागा मधीलच मिळकतींचे सर्व्हेक्षण केले आहे.

या वर्षीच्या मालमत्ता कराच्या देयका बरोबर मागील वर्षीचे देयक तसेच पाणी पट्टीच्या बिलाची रक्कम त्यामध्येच समाविष्ट करून देयके वाटप करायची होती. परंतु अशा प्रकारची देयके अद्याप वाटप न झाल्यामुळे वसुली ज्या प्रमाणात व्हावयास पाहिजे होती त्या प्रमाणात झालेली नाही. त्यामुळे कर्मचा-यांना पगार देण्यासाठी पैसा नाही, ठेकेदारांची देयके अदा करण्यासाठी पैसा नाही.

मला वाटते अशा आशयाची एक टिप्पणी आपण सादर केली होती....?

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :- पाणी वाटपामध्ये १५ टक्के कपात करण्यांत येणार असल्या बाबतचे एक पत्र सर्व सदस्यांना काही दिवसापूर्वी देण्यांत आलेले आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- त्याचे कारण हे आहे की पाण्याची देयके अदयात पाठविली गेली नाहीत.....

श्री.धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि.):- सप्टेंबर महिना संपल्यानंतर बिले पाठविली जातील,त्यांनी सांगितले आहे की, १० दिवसाच्या आत देयके तयार करून देवू...

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- कोणती ऐजन्सी आहे?

श्री.धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):- ऐजन्सी नाही, देयके संगणकावर तयार केली जातात.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :- ज्या लोकांच्या नळजोडण्या तोडल्या जातात ते लोक त्यानंतर पाणी देयकाच्या रक्कमा भरणार नाहीत. परंतु तोडलेली नळ जोडणी ते पुन्हा चालू करतात. तोडलेली नळ जोडणी पून्हा चालु तर केली नाही ना? हे पहाण्यासाठी पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी जातात का? की विसरून जातात..?

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- पाणी बिल वाटपाची कोणती पध्दती सद्या चालु आहे? नविन की जूनी?

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- सद्या तरी दोन्ही पध्दती बंद आहेत.

श्री. सोनाळे (उप-आयुक्त):-नविन पध्दती नुसार बिले पाठविण्याचे प्रयत्न चालु आहेत. जूनी बिले जून्या पध्दतीने तर नविन बिले नविन पध्दतीने पाठविली जातात.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- माझ्या प्रभागात २'' च्या दोन बोअर मारून घेतल्या आहेत. त्यास २४ तास पूर्ण दाबाने पाणी पुरवठा होत आहे. त्यास ना कॉक आहे ना मिटर आहे.... अशा लोकांना कोणत्त्या हिशोबाने बिले देणार?

--७--

मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी :- प्लम्बर लोक रोज शेकडो अनाधिकृत नळ जोडण्या करून देत आहेत. त्याकडे कुणी लक्ष देत नाही, याबाबत तक्रारी दिल्यानंतर सुध्दा चौकशीसाठी अधिकारी का पाठविले जात नाहीत? त्यांच्यावर कारवाई का होत नाही? याची कारण काय आहेत? तक्रारी करून किती दिवस झाले?

श्री.धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि.):- तीन-चार दिवस झाले.

मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी :- तीन-चार दिवसापूर्वी तर फोन केला होता, तक्रारी त्या पूर्वीच्या आहेत. आपण सांगितले होते की, अनाधिकृत नळ जोडण्या करून देणा-या प्लंम्बरर्सचे लायसन्स रदद करतो म्हणुन, तर मग त्यांचे लायसन्स अदयाप रदद का नाही केले? रोज शेकडो अनाधिकृत नळ जाडण्या करून दिल्या जात आहेत. अमुक एकाच्या सांगण्यावरून तमुक एकाच्या सांगण्यावरून नळ जोडण्या करून दिल्याचे ते प्लंबर सांगत असतात. माझे म्हणणे आहे की त्यांच्यावर कारवाई का नाही केली जात? आपल्या मर्जीनुसार ते लोक वाटटेल तेथे वाटटेल तेव्हा नळ जोडण्या घेत आहेत.

मा.सदस्य श्री.कुमार आयलानी :-त्यांचेवर खटला भरा.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :-त्यांचा लायसन्स रदद करा.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :-त्यांची मिली भगत आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- चिजवानी साहेब आपणाकडे याबाबतचे काही रेकॉर्ड आहे का? चिजवानीसाहेब पाणी पुरवठा विभागाचा आपल्याकडे कोणता कार्यभार आहे? यांच्यावर आपण काय कारवाई करणार?

मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी:- चोरी करणा-यावर एफ.आय.आर. दाखल केला जातो, पाणी चोरी करणा-यावर एफ. आय.आर का नाही दाखल केला जात? आपण का नाही करत?

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-फोन करून एखादी तक्रार दयायची झाली तर अधिकारी फोन वर उपलब्ध नसतात, त्यांच्या ऑफिस मधुन सांगितले जाते की, साहेब ४ नंबरला गेले आहेत. तर कधी ५ नंबरला गेल्याचे सांगितले जाते.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- मालमत्ता कराची देयके दरवर्षी आपण कोणत्त्या महिन्यात काढतो?

मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी :- किशोर, पाणी पुरवठ्याचा विषय पूर्ण होवू दया. सभापती महोदया, आपण या विषयाकडे लक्ष द्या. आज शहरात रोज शेकडो अनाधिकृत नळ जोडण्या घेतल्या जात आहेत, तक्रारी करून सुध्दा त्यांच्यावर काहीच कारवाई होत नाही.

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी :- मधुबन हॉटेलच्या येथे अनाधिकृत नळ जोडण्या घेतल्या जात आहेत. तेथे एक नगरसेविका स्वत: त्यावेळी उभा राहातो. अशा नळ जोडण्यांना २४ तास भरपुर पाणी येते.

--८--

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :-त्यात नगरसेवकांचा काय रोष आहे?

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- साहेब ,५० हजाराच्या प्राकलनाचे काय झाले?

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- पाण्याची टंचाई आहे, आपण म्हणाला होतात मी पहातो म्हणुन... त्या प्राकलनाचे काय करणार?

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी :- ६ इंची जलवाहिनीवर जवढया काही नळ-जोडण्या घेतल्या आहेत. त्यासर्व नळजोडण्या तोडल्या जाव्यात.

मा.सदस्य श्री.कुमार आयलानी :- यासाठी नगरसेवकांनी काय आपसात भांडत रहायचे काय? आपण अधिकारीगण काय करत आहात?

मा.सदस्या श्रीमती कांता गजवानी :- लोक अनाधिकृत नळ जोडण्या घेत आहेत, अधिकृत नळ जोडण्यांना पाणी येत नाही, बॅरेक मधील लोकांना पाणी मिळत नाही, एकतर ६ महिने नळजोडणी मंजुर होत नाही, मंजुर झाली तर म्हणे प्लंम्बर नाही.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- या प्रकरणी लक्ष घातले जावे.

मा.सदस्य श्री.कुमार आयलानी :-तुम्ही असे का करता फिफ्टी-फिफ्टी करा.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- फिफ्टी-फिफ्टी करा तसेच श्री.ठाकुर बेहरानी यांनी जे सांगितले त्याबाबत कारवाई केली जावी.

पाणी पुरवठ्याची जी समस्या आहे. त्याबाबत मी असे सांगु इच्छितो की, नळ जोडण्यावरील मिटर रिडींग नुसारची बिल आकारणी १ एप्रिल पासून बंद केली आहे. त्याऐवजी ठराविक (आकार)रक्कम निश्चित केली आहे, आपणाकडे १२५ मिटर रिडर आहेत त्यांना आता मिटर रिडींगचे काम राहिले नसल्याने त्यांना कर वसुलीचे काम दिले जावे.

श्री.सोनाळे (उप- आयुक्त):- आयुक्त साहेबांनी अशा प्रकारच्या सुचना दिल्या आहेत.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-मालमत्ता कराची देयके दरवर्षी कोणत्त्या महिन्यात वाटप केली जातात?

श्री.लाल पिंजानी (उप-कर निर्धारक व संकलक) :- दरवर्षी जुलै महिन्यामध्ये मालमत्ता कराची देयके वाटप केली जातात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-ऑगस्ट-सप्टेंबर महिना संपत आला आहे. तरीही अदयाप मालमत्ता कराची देयके वाटप करण्यांत आलेली नाहीत.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:-टाटा इन्फोटेकला तुम्ही काम केले त्यांनी दुस-याला दिले. दुस-याने तिस-याला दिले याच्या मध्येच वेळ गेली.....

--९--

श्री.सोनाळे (उप-आयुक्त) :- ज्यावर्षी मिळकतींचे सर्व्हेक्षण होते त्यावर्षी मालमत्ता कराची देयके सप्टेंबर महिन्या पर्यंत वाटप केली जातात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- टाटा वाल्यांनी एक वर्षभरात काम नाही केले तर आम्ही वर्षभर थांबून रहाणार काय? ऑक्टोबरच्या पहिल्या आठवडया पर्यंत देयके वाटप कराल काय? आजची परिस्थिती अशी आहे की, कर्मचा-यांना पगार देण्यासाठी पैसा नाही, ठेकेदारांची देयके अदा करण्यासाठी पैसा नाही. बिल वाटप झाली नाहीत म्हणुन वसुली नाही, म्हणुन स्थायी समितीने आज असा निर्णय घ्यावा की, याबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांचे विरूध्द कारवाई केली जावी.

मा.सदस्य श्री.ठाकुर वेहरानी :- सर्व संमतीने असा निर्णय घेतला जावा.

मा.सचिव :- विषय क्र ४ व ५ हे दोन्ही विषय एक सारखेच आहेत.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्तावाबाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव समंत करण्यांत येत आहे.

विषय :- मुख्य लेखा परिक्षकांनी सादर केलेल्या माहे एप्रिल ते जुन २००० पर्यंतच्या जमा खर्चाच्या लेखांच्या अहवालाची छाननी करणे बाबत.

प्रस्तावना :-

वित्तिय वर्ष २०००-२००१ च्या 'अ' व 'क' अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे उत्पन्न अपेक्षित दर्शविलेले आहे.

| अर्थसंकल्प | अपेक्षित जमा |
| --- | --- |
| 'अ' | रू. ९१,७८,२४,०००/- |
| 'क' | रू. ३९,९४,९६,०००/- |
| एकुण अपेक्षित जमा | रू.१,३१,७३,२०,०००/- |

वर दर्शविलेल्या अपेक्षित जमेमध्ये खालील बाबी अंतर्भूत आहेत.

| | | |
| --- | --- | --- |
| १) | महसुल जमा | रू. १,०१,३४,३५,०००/- |
| २) | शासकीय अनुदान | रू. ५,८५,५०,०००/- |
| ३) | अनामत रकमा / दायित्त्वे | रू. ९,५३,३५,०००/- |
| ४) | कर्ज (भांडवली) | रू.१५,००,००,०००/- |
| | | रू.१,३१,७३,२०,०००/- |

अपेक्षित महसूल जमा रू. १,०१३४,३५,०००/- मध्ये जकात करापासुन रू.३६,३३,३०,०००/- उत्त्पन्न अपेक्षित केले होते परंतु प्रत्त्यक्षात



जकात कराची निविदा जादा दराने स्विकारली गेल्याने जकात करापासुन :-
स्विकृत निविदा ४५,१६,०१,९००/-
अंदाजपत्रकीय अपेक्षित उत्त्पन्न ३६,३३,३०,०००/-
--------------------
रू.८,८२,७१,९००/-मिळणारे अधिक उत्त्पन्न लक्षात घेता अपेक्षित महसुल जमा :- मुळ अंदाज १,०१,३४,३५,०००/-
जकात अधीक्य ८,८२,७१,९००/-
--------------------------------
रू.१,१०,१७,०६,९००/- लक्षात घेता सरासरीने एप्रिल २००० ते जुन २००० या तीन महिन्याच्या कालावधीत रू. २७,५४,२६,०००/- उत्त्पन्न अपेक्षित होते परंतु प्रत्त्यक्षात जुन २००० अखेर रू. १३,५३,०४,७११ (४९ टक्के) महसूल व रू.१५,२७,२५,१८६/- एकूण उत्त्पन्न प्राप्त झाले. (लेखापरिक्षण प्रलंबित आहे)

महानगरपालिकेच्या उत्त्पन्नाच्या अत्त्यंत महत्त्वाच्या बाबी (१) जकात कर (२)मालमत्ता करा, (३)पाणी पुरवठा देयके ही असून खाजगीकरण केलेले जकात कर वसुली व्यतिरिक्त इतर दोन लेखा शिर्षाखालील वसुलीची टक्केवारी खालीलप्रमाणे आहे.

| लेखाशिर्ष | एप्रिल-जुन २००० अपेक्षित उत्त्पन्न | एप्रिल-जुन २००० प्रत्त्यक्ष उत्त्पन्न | |
| --- | --- | --- | --- |
| १)मालमत्ता कर | रू.६,७७,७०,०००/- | रू.१,०२,४०,८१८ | १५.११टक्के |
| २)पाणी पुरवठा देयके | रू.८,७५,००,०००/- | रू.१,४४,२३,६५७ | १६.४८टक्के |
| | रू.१५,५२,७०,०००/- | रू.२,४६,६४,४७५/- | १५.८८टक्के |

वरील लेखा शिर्षाखालील वसुलीची असमाधानकारक परिस्थिती पाहता खालील उपाय योजना करणे आवश्यक आहे.
१) विशेष प्रयत्न करून वसुलीचा लक्ष्यांक गाठणे.
२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०४ च्या तरतूदीप्रमाणे चालु आर्थिक वर्षामध्ये जमा खर्चाचे पुन:समायोजन करणे.
किंवा

३)    अधिनियमाच्या कलम १५० प्रमाणे अनुपुरक कराधनाचा अवलंब करणे.

खर्च :-

माहे एप्रिल २००० ते जुन २००० अखेरच्या तीन महिन्यांच्या कालावधीत रू. २० ,२० ,१९ ,२४०/- खर्च लेखांकित झालेला आहे.

खर्चाचे पुर्व लेखापरिक्षण होत असते. लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकांचे प्रदान झालेले आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका-यांच्या पुर्व / कार्योत्तर मंजूरीने झालेला असुन उपलब्ध तरतूदी अधिन आहे.

माहे जुन, २००० अखेर लेखाशिर्षानिहाय उत्पन्न खर्च दर्शाविणारी पत्रके सोबत जोडलेली आहेत.

--११--

सेवानिवृत्ती वेतन प्रकरणे :-

अहवाल कालावधीत सेवानिवृत्ती वेतनाचे एकूण १२ प्रकरणे प्राप्त झालेली होती ती सर्व निकाली काढण्यात आलेली आहेत.

स्थायी समिती ठराव क्र.११९ दिनांक :-२८.९.२०००.

सुचकाचे नाव :-श्री.किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री.रमेश चव्हाण.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे पुढील लेख्यांची तपासणी व छाननी न करता माहे एप्रिल २००० ते जून २००० पर्यंतचा मुख्य लेखा परिक्षकांचा जमा खर्च लेख्याचा छाननी अहवाल स्विकृत करीत आहे.

तसेच पाणीपटटी व घरपटटी विभागातील करांची वसुली समाधानकारक नसल्याने तसेच देयके तयार व वाटप करण्यामध्ये अक्षम्य दिरंगाई केल्यामुळे या विभागांमधील संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर याबाबतची जबाबदारी निश्चित करून त्यांच्या विरूध्द एक महिन्याचे आत कारवाई करण्याबाबत तसेच वसुली वाढविण्या कामी प्रभावी उपाय योजना करण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र. ५ वाचून दाखवितात.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्तावाबाबत ठराव सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव समंत करण्यांत येत आहे.

विषय :- मुख्य लेखा परिक्षकांनी सादर केलेल्या माहे जूलै ते ऑगस्ट २००० पर्यंतच्या जमा खर्चाच्या लेख्यांच्या अहवालाची छाननी करणे बाबत.

प्रस्तावना :-

वित्तिय वर्ष २०००-२००१ च्या 'अ' व 'क' अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे उत्पन्न अपेक्षित दर्शविलेले आहे.



| अर्थसंकल्प | अपेक्षित जमा |
| --- | --- |
| 'अ' | रू. ९१,७८,२४,०००/- |
| 'क' | रू. ३९,९४,९६,०००/- |
| एकुण अपेक्षित जमा | रू.१,३१,७३,२०,०००/- |

वर दर्शविलेल्या अपेक्षित जमेमध्ये खालील बाबी अंतर्भूत आहेत.

| | | |
| --- | --- | --- |
| १) | महसुल जमा | रू. १,०१,३४,३५,०००/- |
| २) | शासकीय अनुदान | रू. ५,८५,५०,०००/- |
| ३) | अनामत रकमा / दायित्त्वे | रू. ९,५३,३५,०००/- |
| ४) | कर्ज (भांडवली) | रू.१५,००,००,०००/- |
| | | रू.१,३१,७३,२०,०००/- |

अपेक्षित उत्पन्नामध्ये महसुल उत्पन्न :-

रू. १,०१,३४,३५,०००/-
\+ ८,८२,७१,९००/- जकात अधीक्य
रू. १,१०,१७,०६,९००/- लक्षात घेता

सरासरी माहे एप्रिल २००० ते ऑगस्ट २००० या पाच महिन्याच्या कालावधीत रू.४५,९०,४५,०००/- उत्पन्न अपेक्षित होते. प्रत्यक्षात ऑगस्ट २००० अखेर रूपये २६,५२,२९,२८७/- (५८ टक्के)महसूल व रू.३१,५५,३६,१४६ एकुण उत्पन्न प्राप्त झालेले आहे. (लेखा परिक्षण प्रगतीपथावर आहे)

महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या अत्यंत महत्त्वाच्या बाबी (१) जकात कर (२)मालमत्ता करा, (३)पाणी पुरवठा देयके ही असून खाजगीकरण केलेले जकात कर वसुली व्यतिरिक्त इतर दोन लेखा शिर्षाखालील वसुलीची टक्केवारी खालीलप्रमाणे आहे.

| लेखाशिर्ष | एप्रिल २००० ते ऑगस्ट २००० पर्यंतचे अपेक्षित उत्पन्न | एप्रिल २००० ते ऑगस्ट २००० पर्यंतचे प्रत्यक्ष उत्पन्न | |
| --- | --- | --- | --- |
| १)मालमत्ता कर | रू.११,२९,५०,०००/- | रू.१,८२,३८,६८८ | १६.१४टक्के |

२)पाणी पुरवठा देयके रू.१४ ,५८ ,३३ ,०००/-रू.२ ,३० ,२३ ,५७६१५.७९टक्के

----------------------------------------------------------------

रू.२५ ,८७ ,८३ ,०००/- रू४ ,१२ ,६२ ,२६४/- १५.९४टक्के

----------------------------------------------------------------

(-२१ ,७५ ,२० ,७३६)

वरील लेखा शिर्षाखालील वसुलीची असमाधानकारक परिस्थिती पाहता खालील उपाय योजना करणे आवश्यक आहे.

--१३--

१) विशेष प्रयत्न करून वसुलीचा लक्ष्यांक गाठणे.

२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०४ च्या तरतूदीप्रमाणे चालु आर्थिक वर्षामध्ये जमा खर्चाचे पुन:समायोजन करणे.

किंवा

३) अधिनियमाच्या कलम १५० प्रमाणे अनुपुरक कराधनाचा अवलंब करणे.

<u>खर्च :-</u>

माहे एप्रिल २००० ते ऑगस्ट २००० अखेरच्या कालावधीत रू. ३० ,२० ,७० ,१०८/- खर्च लेखांकित झालेला आहे.

खर्चाचे पुर्व लेखापरिक्षण होत असते. लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकांचे प्रदान झालेले आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका-यांच्या पुर्व / कार्योत्तर मंजूरीने झालेला असुन उपलब्ध तरतूदी अधिन आहे.

माहे जुन, २००० अखेर लेखाशिर्षानिहाय उत्पन्न खर्च दर्शविणारी पत्रके सोबत जोडलेली आहेत.

<u>सेवानिवृत्ती वेतन प्रकरणे :-</u>

अहवाल कालावधीत सेवानिवृत्ती वेतनाचे एकूण १२ प्रकरणे प्राप्त झालेली होती ती सर्व निकाली काढण्यात आलेली आहेत.

<u>स्थायी समिती ठराव क्र.१२०</u> <u>दिनांक</u> :-२८.९.२०००.

सुचकाचे नाव :-श्री.किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री.रमेश चव्हाण.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे पुढील लेख्यांची तपासणी व छाननी न करता माहे जुलै २००० ते ऑगस्ट २००० पर्यंतचा मुख्य लेखा परिक्षकांचा जमा खर्च लेख्याचा छाननी अहवाल स्विकृत करीत आहे.

तसेच पाणीपट्टी व घरपट्टी विभागातील करांची वसुली समाधानकारक नसल्याने तसेच देयके तयार व वाटप करण्यामध्ये अक्षम्य दिरंगाई केल्यामुळे या विभागांमधील संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर याबाबतची जबाबदारी निश्चित करून त्यांच्या विरूध्द एक महिन्याचे आत कारवाई करण्याबाबत तसेच वसुली वाढविण्या कामी प्रभावी उपाय योजना करण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

<u>सुचकाची</u> <u>सही-</u>

<u>अनुमोदकाची</u> <u>सही-</u>

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका



मा.सचिव :- विषय क्र.६ वाचुन दाखवितात.

मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- सोबत जोडलेल्या ६ गोषवा-यात नमुद केलेल्या जागी नगरसेवक निधीतून सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत करावयाच्या ६ कामांचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देणे.

स्थायी समिती ठराव क्र. १२१ दिनांक :-२८.९.२०००.

सुचकाचे नाव :-श्री.प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :-श्री.रमेश चव्हाण.

हि स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे असुन आयुक्तांना मजदुर कामगार संस्थेशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|
| १) | उल्हासनगर येथील प्रभाग क्र.३ मध्ये शहाड गांव येथे अर्जुन मढवी यांचे घरामागे चार बैठकीचे शौचालय बांधणे. (नगरसेवक निधीतून) | १,९९,६००/- |
| २) | उल्हासनगर येथील प्र.क्र.५ मध्ये संभाजी नगर येथे प्रदिप किराणा, मुकूंद किराणा स्टोअर आणि विविध ठिकाणी शौचालय दुरूस्ती करणे.(नगरसेवक निधीतून) | ९९,८००/- |
| ३) | उल्हासनगर-३ येथील प्र.क्र.५७ मध्ये बॅ.नं. ९०२ समोरील उद्यान येथे स्टेज बांधणे. (नगरसेवक निधीतून) | १,०९,८५०/- |
| ४) | उल्हासनगर येथील प्र.क्र.६३ मध्ये सोनारा हॉलसमोर विविध ठिकाणी नाल्यांची भिंत दुरूस्त करणे आणि रस्ता एम.२५० ने बांधणे.(नगरसेवक निधीतून) | १,९९,९००/- |
| ५) | उल्हासनगर येथील प्र.क्र.३१ मध्ये आंबेडकर | |

नगर येथे विविध ठिकाणी सी.सी.पाथवे आणि १,००,०००/-
नाल्या बांधणे.(नगरसेवक निधीतून)

--१५--

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|
| ६) | उल्हासनगर येथील प्र.क्र.५२ मध्ये गुरुकिृपा कॉलनी ते गजानन नगर आणि विविध ठिकाणी नाला बांधणे.(नगरसेवक निधीतून) | २,९९,०००/- |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.७ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- काय करणार आहात?

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- उड्डाणपूल.......

श्री.चिजवानी (शहर अभियंता):-यांनी या कामाबाबतचा गोषवारा वाचुन दाखविला.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- गोषवारा आम्ही वाचला आहे, पण काम काय करणार आहात?

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- पोच मार्ग म्हणजे नेमके काय?

श्री.चिजवानी (शहर अभियंता):- पूल तयार करावयाचा आहे. तसेच पूलाच्या दोन्ही बाजूला पोच मार्गाचे काम महापालिकेला करावयाचे आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- उड्डाण पूल तर रेल्वे बांधणार आहे. मग आपणास आता काय करायचे आहे?

श्री.चिजवानी (शहर अभियंता):- प्रस्तावास प्रशासकीय व वित्तिय मान्यता दयायची आहे.

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी :- आमच्या श्री. राम नाईक साहेबांनी या उड्डाण पूलासाठी ५ कोटीचा प्रस्ताव मंजुर केला आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- आमच्या श्री. पप्पू कालानी साहेबांनी या कामासाठी बराच पत्र व्यवहार केला आहे. फक्त आपल्या श्री. राम नाईक साहेबांनीच प्रयत्न केले असे काही नाही. श्री. शांताराम भाऊ घोलप जेव्हा खासदार होते तेव्हा त्यांना घेवुन आम्ही रेल्वे मंत्रालयाकडे गेलो होतो.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- आमच्या खासदारांनी सुध्दा केले आहे. श्री.प्रकाश परांजपे यांनी केले आहे.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :- आमच्या श्री.राम नाईक साहेबांनी या कामी ५ कोटी चा प्रस्ताव मंजुर केला आहे.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- श्री.राम नाईक साहेब तर रेल्वे राज्यमंत्री आहेत ना? ते आमचे पण आहेत.

सदर प्रस्तावाबाबत सर्वानुमते पूढील प्रमाणे ठराव समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासस्टेशन, उल्हासनगर-३ येथील (कि.मी. ५७/९-१० मध्ये) रेल्वे फाटक गेट क्र.३ सीईएसई वरून जाणा-या उड्डाण पुलांचे दोन्ही बाजूला पोच मार्गाचे काम करणे व पोच मार्गाची उंची वाढविण्या कामीच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर-३ मधील उल्हास स्टेशन येथे कि.मी. ५७/९-१० मध्ये रेल्वे फाटका वरून जाणा-या उड्डाण पूलाची दोन्ही बाजूला पोचमार्गाचे काम करणे व त्याची उंची वाढविण्याचे काम करावयाचे आहे.

रेल्वे उड्डाण पुलाचे काम करण्यासाठी रेल्वेने निविदा मागविलेली आहे. व निविदा प्रक्रिया प्रगती पथावर आहे. रेल्वे उड्डाण पुलाच्या दोन्ही बाजूला पोच मार्गाचे काम उल्हासनगर महानगरपालिकेला करावयाचे आहे.

उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळ बांधावयाचे पोचमार्गाचे प्राकलन मेसर्स उत्तम इंजिनिअरिंग कंन्स्ट्रंट प्रा.लि.कल्याण यांनी रू.३,६१,९०,३१२/- एवढया रकमेचे तयार झाले असून सदर काम सद्या महानगरपालिकेच्या निधीतून करावयाचे आहे. सदर कामी होणा-या खर्चासाठी एम.एम.आर.डी.ए. यांच्याकडे कर्ज निधी उपलब्ध करण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेने महासभेच्या मान्यत्त्यांचा एम.एम.आर.डी.ए. यांच्याकडे या कार्यालयाचे पत्र क्रमांक उमपा/साबा/६/-दिनांक २०.१०.९९ अन्वये प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविला आहे. सदर कामास महानगरपालिकेचे महासभा ठराव क्रमांक २३/४ दिनांक १६.१०.९८ अन्वये मंजूरी प्रदान केली आहे.

उड्डाण पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करून नागरिकांना वापरण्यासाठी उपलब्ध होऊन त्यांचा फायदा नागरिकांना होण्यासाठी उड्डाण पुलाच्या पोच मार्गाच्या निविदा संबंधीची प्रक्रिया महानगरपालिकेकडून तावडतोब सुरू करणे आवश्यक आहे.

रेल्वे प्रशासनाने उड्डाण पुलाचे काम व पोचमार्गाचे कामाचा वाटा मंजुर केलेला आहे. त्यात रेल्वेचा वाटा रू.२५२ ,९६/- लाखाचा आहे. व उल्हासनगर महानगरपालिकेचा वाटा रू.२२५ ,६६/- लाखाचा आहे. त्यामध्ये महानगरपालिकेने रेल्वे प्रशासनाकडे उड्डाण पुलाचे कामाकरिता रू.३५ ,०८/- लाखाचा वाटा ठेव म्हणुन द्यावयाचे आहे. पोच मार्गाचे अंदाजपत्रात रू. ३६१ ,९१/- एवढया रकमेच्या तयार करण्यात आला असून त्यास प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता आहे. तसेच रू.२२५ ,६६/- लाखाचे कामास वित्तिय मंजूरी देण्याची आवश्यकता आहे. सदर पुलाचे पोचमार्गाचे काम महानगरपालिके मार्फत करावयाचे आहे. तरी सदर काम करण्यासाठी स्थायी समिती मधुन मान्यता मिळणे आवश्यक आहे.

सदर खर्च करण्यासाठी मुख्य लेखा अधिकारी, यांनी मंजूरी दिलेली आहे. तरी पोचमार्गाची अंदाजपत्रीय किंमत रू.३६१ ,९१/- लाखास प्रशासकीय मंजूरी व रू.२२५ ,६६/- लाखास वित्तिय मान्यता मिळण्यासाठी स्थायी समिती सभेपुढे मंजुरीसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.१२२</u> <u>दिनांक</u> :-२८.९.२०००

सुचकाचे नाव :-श्री.किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री.रामचंद्र पारवानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे उल्हासनगर-३ येथील उल्हासस्टेशन येथील <u>कि.मी.५७/९-१०</u> मध्ये रेल्वे फाटक गेट क्र.३ सी.ई. एस.ई. वरून जाणा-या उड्डाण पुलाचे दोन्ही बाजूला पोचमार्गाचे काम करणे. पोचमार्गाची उंची वाढविणे कामी रूपये ३६१.९१ लाखास प्रशासकीय मंजुरी व रूपये २२५.६६ लाख खर्चाच्या कामास वित्तिय मान्यता देत आहे.

<u>सुचकाची सही-</u>

<u>अनुमोदकाची सही-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

<u>सभापती / पिठासीन अधिकारी</u>
<u>स्थायी समिती सभा</u>
<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>मा.सचिव :- विषय क्र.८ वाचुन दाखवितात.</u>



<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी / श्री.रमेश चव्हाण :- स्पष्टीकरण कोण करणार? उड्डाण पुलाचे काम आहे? या प्रस्तावाबाबतचा गोषवारा कुठे आहे?</u>

मा.सचिव :- या प्रस्तावा बाबतचा गोषवारा आपणा सर्वांना या पूर्वीच्या सभेपूर्वीच प्रस्तुत करण्यांत आलेला आहे.

श्री.चिजवानी (शहर अभियंता):- त्या कामाची जी निविदा मागविण्यांत आली होती. ती निविदा भरणा-या निविदा कारामध्ये श्री.आर.के.चंदनानी हे सर्वात लघुत्त्तम दर भरणारे निविदाकार होते.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- प्रथम जी निविदा मागविली होती ती प्राकलनिय दरापेक्षा किती कमी किंवा जास्त दराची होती?

श्री.चिजवानी (शहर अभियंता):- या कामासाठी भरलेल्या निविदेत श्री.आर.के. चंदनानी यांनी सुरवातीस भरलेले दर हे प्राकलनिय दरापेक्षा १४. ५० टक्के ने जास्त होते. हे दर जास्त असल्याने ते कमी करण्यासाठी त्यांना वाटाघाटीस बोलवले असता त्यांनी आपले दर १टक्के ने कमी केली म्हणजे प्राकलनिय दरापेक्षा १३. ५० टक्के जास्त दराने काम करण्यास तयारी दर्शविली. परंतु हा दर सुध्दा जास्त असल्याने त्यांना पून्हा वाटाघाटीस बोलावले असता. प्राकलनिय रक्कमे पेक्षा ४. १९ टक्के जास्त दराने काम करण्यास संमती दर्शवून तसे लेखी पत्र दिले. परंतु आयुक्त साहेबांनी सर्व ठेकेदारास वाटाघाटीस बोलावले. त्यावेळी श्री. आर. के. चंदनानी यांना आपले दर आणखी कमी करण्यास सांगीतले. शेवटी प्राकलनिय दराने काम करण्यास श्री. चंदनानी यांनी लेखी संमतीपत्र दिले आहे. त्यास मंजुरी देण्यासाठीचा प्रस्ताव आपणापूढे ठेवला आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- सद्या जे काम चालू आहे ते...?

श्री.चिजवानी (शहर अभियंता):- सद्या जे काम चालु आहे ते रेल्वे वाल्यांकडून चालु आहे.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :-पवईचा रोड बंद असल्यामुळे शहरातील कैंम्प नं.४ व ५ च्या लोकांना कॅम्प नं.३ कडे अंबरनाथ वरून यावे लागत आहे, हिंदुस्थान, पाकिस्तान असे शहराचे दोन भाग झाले आहेत.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :- कॅम्प नं.४ व ५ वाल्यांना येण्याजाण्यासाठी खुप त्रास होत आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- या पुलाचे काम लवकरात लवकर केले जावे.
मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- स्थायी समितीपूढे असे काही प्रस्ताव मंजुरीस येतात,जसे की मागील काही आठवडयापूर्वी शालेय वहया वाटप करण्याबाबतचा प्रस्ताव, ३३ रस्त्त्यांचे रूंदीकरण व नुतनीकरणाचा प्रस्ताव अशा प्रस्तावातील कामे प्राकलनिय दरापेक्षा १७ टक्के १८ टक्के कमी दराने जावू शकतात. त्या प्रमाणे हे काम सुध्दा प्राकलनिय दरापेक्षा १५ टक्के, १६ टक्के कमी दराने जावू शकते. म्हणून ह्या कामासाठी सेकंड लोएेस्ट तसेच इतर सर्वांना वाटाघाटीस बोलावले जावे.



श्री.चिजवानी (शहर अभियंता) :- सुरवातीस आम्ही फस्ट लॉवेस्ट ला वाटाघाटीस बोलावले होते. त्यानंतर सर्व निविदाकारांना वाटाघाटीस बोलावले होते परंतु अन्य कुणी या कामात स्वारस्य (इन्टरेस्ट) दाखविले नाही.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- फेर निविदा मागविल्या जाव्यात.

मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी :- १५ दिवसाच्या आत फेर निविदा मागवा, दिवाळीच्या आत फेर निविदा मागवा, दिवाळीला अदयाप एक महिना बाकी आहे.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- हा प्रस्ताव मंजूर झाला पाहिजे. अन्यथा शहराचा विकास खोळंबेल. लोकांना येण्या-जाण्याचा त्रास होत आहे.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :- रस्त्त्याचे काम पूर्ण झाले नाही तरी चालेल. परंतु पूलाचे काम तरी पूर्ण होईल ना?वहातूक खोळंबून रहाता कामा नये.

मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी :- १०-१५ दिवसांनी काय फरक पडणार आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- आमचे म्हणणे आहे हा प्रस्ताव समंत केला जावा.

मा.सचिव :- या प्रस्तावावर मतदान घ्यायचे काय?

मा.सदस्य श्री.राजेंद चौधरी :- टाटा इन्फोटवूला ठेका दिला तेव्हा अल्प मुदतीची नोटीस का नाही दिली?

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- ३-४ दिवस लागतील तसेच ज्यांनी आपल्या कर्तव्यात कसुर केली. अशा अधिकारी / कर्मचा-यांवर कारवाई करण्याबाबत आम्ही सांगितले आहे. मिळकतीच्या सर्व्हेक्षणाचे काम जेव्हा मे.टाटा इन्फोटेवूला देण्यास जेव्हा मंजुरी दिली. तेव्हा आम्ही आयुक्तांना सहकार्य दिले. परंतु काही कामामध्ये आम्हाला ते सहकार्य देत नाहीत.

श्री.चिजवानी (शहर अभियंता):- नाही-नाही १५ दिवसाची नोटीस दयावी लागते. त्यानंतर त्यापुढील कार्यवाही करावी लागते.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालीनी :- शहराचा प्रश्न आहे. माझ्या मते हा प्रस्ताव समंत केला पाहिजे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- आता हे आयुक्तांवर अवलंबून आहे, काही ठिकाणी ते निविदा मागवून प्राकलनिय दरापेक्षा कमी दराने कामे करवून घेवू इच्छितात.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- ३३ रस्त्त्याच्या कामा बाबत आम्ही (स्थायी समितीने) आयुक्तांना पूर्ण सहकार्य दिले होते. टाटा इन्फोटेकला जे काम दिले ते शहराच्या विकासासाठीचे म्हणुन आम्ही विना निविदा त्यास मंजुरी दिली. कारण शहर विकासाचा तो मुददा होता. परंतु मध्यंतरी महिला

--२०--

बाल कल्याण समितीचा एक प्रस्ताव आला होता, ३ लाख रूपये खर्चाचा तो प्रस्ताव होता. एवढया छोटयाश्या खर्चाच्या प्रस्तावात त्यांनी आम्हाला सहकार्य दिले नाही. शालेय विद्यार्थ्यांना वहया वाटपाचा प्रस्ताव होता त्यामध्ये सुध्दा त्यांनी सहकार्य दिले नाही. शाळा चालु होवून ६ महिने होत आले आहेत. क्रिडा समितीचा एक प्रस्ताव होता त्यामध्ये सुध्दा त्यांनी सहकार्य दिले नाही. त्यामध्ये सुध्दा त्यांनी तंग केले. जर आपण शहराच्या हिताचे काम केले तर चांगले होईल.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी:-शिलाई मशिन सुध्दा देत नाहीत.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-वर्ष संपत आले आहे. सभापतीचा कालावधी संपत आला आहे. एक लाखासाठी आयुक्तांच्या मागे-मागे धावावे लागते.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- १५ दिवसात फेर निविदा मागविल्या जाव्यात. फेर निविदा मागवू शकत नसाल तर पून्हा वाटाघाटीस बोलवा.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी :-फेर निविदा १५-२० टक्के कमी दराने येवू शकतील.

मा.सचिव :-बहुमताने समंत करत आहात काय?

मा.सदस्य श्री.राम पारवानी :- रस्त्या वहातूकीस चालू होईल ना?

श्री.चिजवानी (शहर अभियंता):- ३० तारखेस रस्ता वहातुकीस चालु होईल.

मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी :-वहातूक खोळंबून रहाण्याचा प्रश्नच नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- पवईचा रस्ता २२ ते ३० तारखे पर्यंत बंद ठेवण्यांत येणार आहे. त्यानंतर तो वहातूकीस खुला होईल.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :-सदर प्रस्तावा बाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर -३ येथील पवई चौक येथे (५६/१) रेल्वे उड्डाण पुलाचे दोन्ही बाजूला पोच मार्गाचे काम करणे व पोच मार्गाची उंची वाढविण्या कामीचे संविदेस व अंतर्भूत खर्चास मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर ३ येथिल पवई चौक येथे रेल्वे उड्डाण पुल ५६ / १ मध्ये दोन्ही बाजुला पोच मार्गाने काम करणे व पोच मार्गाने उंची वाढविणेसाठी सदर कामासाठी महानगरपालिकेने निविदा मागविल्या होत्या. सदर निविदेची सदर किंमत ५० ,७४ ,३५०/- इतके होते. प्राप्त झालेल्या निविदा पैकी मेसर्स आर.के. चंदनानी यांची निविदा सर्वात कमी दराची (१४.५० टक्के जास्तीने)असल्याने त्यांनी दिनांक २९.८.२००० रोजी महानगरपालिकेत वाटाघाटी करीता बोलविण्यांत आले होते. सदर ठेकेदार



तेव्हा शहर अभियंता यांच्या दालनात बोलावून मा.आयुक्त यांच्या दालनात वाटाघाटी करण्यात आल्या. तेव्हा सदर मेसर्स आर.के.चंदनानी यांनी १ टक्के दर कमी म्हणजे १३.५० टक्के अधिक दराने कमी करण्यास तयारी दर्शविली तसे लेखी पत्र दिले आहे. परंतु हा दर देखील जास्त असल्याचे मा.आयुक्त यांना सुचविले. त्याकरिता मा.आयुक्तांनी ज्या ठेकेदारांनी या कामासाठी निविदा भरल्या होत्या त्या सर्वांना दिनांक ३१.८.२००० रोजी महानगरपालिकेत दुपारी १२.०० वाजता वाटाघाटी बोलावले होते. मा.आयुक्तांच्या दालनात ठेकेदारां सोबत झालेल्या वाटाघाटीस सदर कामास फक्त मेसर्स. आर.के.चंदनानी यांनी ४.९९ टक्के अधिक दराने काम करण्यासाठी तसे लेखी पत्र दिले. परंतु मा.आयुक्तांनी सदर कामाचे दर परत कमी करण्यास सदर ठेकेदारास विनंती केली त्यानुसार मेसर्स. आर.के.चंदनानी यांनी दिनांक ३१.७.२००० वाटाघाटी नंतर (अेटी पार)निविदा दराने काम करून देणे बाबत लेखी पत्र दिले तरी मेसर्स आर.के. चंदनानी ठेकेदाराचे वाटाघाटी नंतर कमी केलेल्या दरास स्थायी समिती सभेपुढे मंजुरीसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र.१२३ दिनांक :-२८.९.२०००

सुचकाचे नाव :- श्री.किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री.नारायण पंजाबी.

हि स्थायी समिती उल्हासनगर ३ येथील पवई चौक येथे ५६/१ रेल्वे उड्डाण पुलाचे दोन्ही बाजुला पोच मार्गाचे काम व पोच मार्गाची उंची वाढविणे कामीची सर्वात प्रथम निविदाकार श्री.आर. के.चंदनानी यांची मुळ निविदा प्राकलनिय रक्कमे पेक्षा जास्त दराची असल्याने व वाटाघाटी अंतीची सर्व परिस्थिती पहाता सदरची निविदा फायदेशिर व स्विकृती योग्य नसल्याने संविदेस मान्यता देत नाही.

तसेच १५ दिवसाचे आत नविन निविदा मागविण्यास व स्थायी समितीपुढे प्रस्तुत करण्यास शहर अभियंता यांना निर्देश देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--२२--

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :- सायंकाळी ५. ०० वाजता स्थायी समिती सभेतून बाहेर पडले.....

मा.सचिव :- विषय क्र.९ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-हा प्रस्ताव यापूर्वी सुध्दा पूढे ढकलला होता.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :-माझ्या प्रभागात झाडू सुध्दा मारला जात नाही, महापालिकेकडे किटकनाशके सुध्दा नाहीत.

डॉ.लांजेवार (सहा.आरोग्य अधिकारी):- आम्ही दिले आहेत. याबाबत मी लक्ष घालीन....

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :- झाडु नाहीत. टोपल्या नाहीत. सफाई कशी करणार?

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :-हा प्रस्ताव पूढे ढकलण्याची कारणे काय आहेत?

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- पुढे ढकलता तर स्थायी समितीपूढे आणता कशाला? परत परत पूढे कसा ढकलता?

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पूढे ढकलण्यांत येत आहे.

विषय :-सन २००० -२००१ या वर्षा करिता जंतुनाशके किटकनाशके व इतर आवश्यक साहित्य पुरविणे कामी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था नेमणूक करील त्या ठेकेदारांशी निविदेशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करणे बाबत.

मा.सचिव :- विषय क्र.१० वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- याबाबत निविदा मागविल्या जाव्यात. बिना निविदा हा प्रस्ताव समंत केला जावू नये.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :-निविदा मागवा....

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्तावा बाबत सर्वानुमते पूढील प्रमाणे ठराव समंत करण्यांत येत आहे.

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी :- सायंकाळी ५. ०५ वाजता स्थायी समिती सभागृहात पुन्हा आले.

--२३--

विषय :- डब्बल व्हिल बॅरोज पुरविणे कामी आयुक्तांना मेसर्स महिला आर्थिक महामंडळ यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

प्रस्तावना:-

उपरोक्त विषयांकित साहित्य पुरवठा करण्याकरिता महानगरपालिकेने संचालक अखिल भारतीय स्वराज्य संस्था मुंबई यांना भांडार विभागाचे पत्र क्र. २३ दिनांक २०.५.२००० अन्वये पुरवठा करण्याचे आदेश दिले होते. व संचालक अखिल भारतीय स्वराज्य संस्थेने सदर व्हिलबरोज प्रतिनग रू.२,६००/- या दराने पुरवठा करण्याचे आदेश मसेर्स साई शक्ती स्टील फर्निचर, उल्हासनगर यांना दिले होते.

परंतु सन १९९८ साली मेसर्स महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी सदरचे 'व्हिल बरोज' प्रतिनग रू.२,४००/-या दराने उल्हासनगर महानगरपालिकेस पुरवठा केले होते व सन २०००-२००१ या वर्षा करिता लागणारे ''व्हिल बरोज'' पुर्वीच्याच दराने (रू.२,४००/-)पुरवठा करण्याचे त्यांचे दिनांक २.६.२००० चे पत्रान्वये कळविले असून त्यांचे दर मेसर्स साई शक्ती स्टील फर्निचर यांचे दरा पेक्षा कमी असून ते योग्य असल्याचे वाटते.

सन २०००-२००१ या वर्षा करिता एकूण ३०० व्हिल बरोज खरेदी करावयाचे असून त्यांचे खरेदी करिता येणारा अंदाजित खर्च रूपये ७,२०,०००/- इतका अपेक्षित आहे.

उपरोक्त खर्चाची तरतूद महापालिकेच्या सन २०००-२००१ चे अंदाजपत्रकात शिर्ष सी १.(२)मध्ये करण्यात आली असून अंदाजपत्रकीय तरतूद रू. ५४,००,०००/- इतकी आहे.

तरी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेस्तव स्थायी समिती कडे सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.१२४</u> <u>दिनांक</u> :-२८.९.२०००.

सुचकाचे नाव :-श्री.किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री.विनोद तलरेजा.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार सन २०००-२००१ या वर्षाकरिता डब्बल व्हिल बॅरोज पुरविणे कामी आयुक्तांना मेसर्स महिला



आर्थिक विकास महामंडळ यांच्याशी पुर्वीच्या करारातील दराने (प्रति नग रू. २४००/- प्रमाणे ) निविदा शिवाय थेट संविदा करण्यास मान्यता देत नाही. तसेच नविन निविदा मागविण्यास निर्देश देत आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र.११ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा :-</u>मंजुर करू या.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- का?समजवा, या कामासाठी शासनाकडून निधी येणार आहे का? शहर अभियंत्यांना बोलू दया. त्यानंतर आम्ही बोलू.

या प्रस्तावात हेच रस्ते का घेतले? दुसरे रस्ते घेता येण्यासारखे नव्हते काय?

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- पैसा येणार कुठून, जाणार कुठे....

श्री.चिजवानी (शहर अभियंता):- या पूर्वीच्या सभेत दोन रस्त्त्यांचा प्रस्ताव ठेवला होता व आता दोन रस्त्त्यांचा प्रस्ताव ठेवला आहे. अशा प्रकारे ४ रस्त्त्यांच्या कामांचा प्रस्ताव पाठवत असून ते मंजुर होवून आल्यानंतर स्थायी समिती पूढे मंजुरीस ठेवले जातील.

हया कामांचा प्रस्ताव प्रशासकिय किंवा वित्तिय मंजुरीसाठी ठेवलेला नाही. तर फक्त प्रस्ताव पाठविण्यास मंजुरी दयायची आहे.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :- पैसे नक्की येणार आहेत का?

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :- अनुदान किती आहे?

श्री.चिजवानी (शहर अभियंता):- या वर्षीचे अनुदान माहित नाही, मागील वर्षी ४१ लाख मिळाले होते.



श्री.काळे (मुख्यलेखा परिक्षक) :- सन १९९८-९९ मध्ये ४४ लाख मिळाले होते.
मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :-आता तर हा २ कोटीचा प्रस्ताव आहे.

श्री.काळे (मुख्यलेखा परिक्षक):-अतिरिक्त कामांचा प्रस्ताव व फक्त मंजुरीसाठी आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-हेच दोन रस्ते घेण्याचे कारण काय? दुसरे रस्ते नव्हते का?

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- कॅम्प ५,वरून अंबरनाथला जोडणारे रस्ते घेतले जावेत.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :-याबाबत सर्व पक्षीय सभा घ्या.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- ३३ रस्त्त्यांच्या कामातून जे ३-४ कोटी रूपये व शिल्लक रहात होते त्यातून ही कामे घ्यायची होती पण.....

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :- यामध्ये आर.आी.आय चा एका रस्त्त्याचा प्रस्ताव आम्हाला घ्यायचा होता.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- ३३ रस्त्यामधुन जो पैसा शिल्लक रहात होता त्यातून शिवाजी चौकाचा रस्ता, ते गौशाळे पर्यंतचा रस्ता श्रीमती. लवीना कुंदनानी यांच्या प्रभागातील रस्ता निरंकारी हॉल ते गोल मैदाना पर्यंतचा रस्ता इत्त्यादी रस्ते हाती घेतले आहेत.मध्यंतरी वित्त्त आयोगाकडुन एक पत्र प्राप्त झाले त्यात तातडीने हाती घ्यावयाच्या रस्त्त्यांचा प्रस्ताव पाठविण्यास सांगितले होते म्हणुन हया रस्त्त्यांचा प्रस्ताव ठेवला आहे.

शिवाजी चौक ते संतु बिल्डींग ,निरंकारी हॉल ते गोल मैदान व श्री.टाले सांगत आहेत तो रस्ता असे रस्ते हाती घेवू. वित्त आयोगाकडून पैसे मिळाले नाहीत तरीही श्रीमती लविना कुंदनानी यांच्या प्रभागात नागेश्वर मंदिर ते नारी शाळा मार्गेचा रस्ता, हया दोन रस्त्यांची कामे हया दोन कोटी मधुन करू व दुसर सुध्दा दोन रस्ते महापालिकेच्या निधीतून तयार करू.

<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :-</u>उल्हासनगर स्टेशन ते कुर्ला कॅम्प पर्यंतचा रस्ता तयार करणे बाबत सांगितले होते तो रस्ता सुध्दा झाला पाहिजे, मा.महापौरांनी आश्वासन दिले होते.

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी</u> :-३३ रस्त्यांतून १४कोटी वाचणार काय?

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :- सदरचा प्रस्तावाबाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय</u> :-वित्त आयोग शिफारिशीपोटी सन २०००-२००१ या आर्थिक वर्षात राज्य शासनास उपलब्ध होणा-या अनुदानातुन रस्त्यांचे दोन कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देणे <u>बाबत.</u>

--२६--

<u>प्रस्तावना:-</u>

दहाव्या वित्त आयोगाकडून सन २०००-२००१ या आर्थिक वर्षात राज्य शासनास मिळणा-या अनुदानातून उल्हासनगर महानगरपालिकेसाठी विकास कामांना निधी उपलब्ध होणे करिता प्रस्ताव नगरविकास विभाग, मंत्रालय यांना त्यांचे अर्थशासकीय पत्र क्र. <u>दविभा/१०९८/२८६३</u> प्र.क्र.६३/९८/भाग-२/नवि-४ दि. १०.८.२००० नुसार पाठवणे आवश्यक आहे. महानगरपालिका व्दारा खालील दोन रस्त्यांचे रूंदीकरणाचे व सुधारणा करण्याचे काम स्थायी समितीने ठराव क्र. ११६, दिनांक २१.९.२००० अन्वये मंजुरी प्रदान केली आहे. सदर रस्त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | लांबी | डीपी प्रमाणे रूंदी | अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| १) | उल्हासनगर-५ येथे जुने बस टर्मीनस ते स्वामी शांती प्रकाश आश्रम बसंत बहार मार्गेचा रस्ता सिमेंट कॉंक्रिटकरण करणे. | ४३९मी. | ४० फुट | रू.७३.२९ लाख |
| २) | उल्हासनगर-३ येथे सोनेसर ऑफिस जवळील चौकापासून १ सी. या रस्त्यापर्यंतच्या पुर्नविस्तारितांसाठी असलेल्या भुखंड मार्गेचा रस्ता डांबरीकरणाने बांधणे. | ४०० मी. | ४० फुट | ६६.२७ लक्ष |
| | | | एकुण | १३९.५६ |

उपरोक्त कामाची ढोबळ मानाने अंदाजपत्राकिय अंदाजित किंमत रूपये १३९. ५६लाख असलेली दोन कामे वित्त आयोग कडुन उपलब्ध होऊ शकणा-या निधीतून करण्यासाठी विचाराधीन आहेत. त्याकरिता एकुण २.००

कोटी इतका निधी खर्च करणे अपेक्षित आहे.या निधीतून वरील दोन कामांची किंमत वजा करता उर्वरित ६१ लाख निधी शिल्लक रहातो. त्या उर्वरित ६१ लाखाच्या निधीतून खाली नमुद केलेली दोन कामे करण्यासाठी खालील प्रमाणे प्रस्ताव तयार केलेला आहे. व त्याकामाची ढोबळ मानाने अंदाजपत्रकीय अंदाजित किंमत नमुद केली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | लांबी | डीपी प्रमाणे रूंदी | अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| १) | उल्हासनगर-५ येथे बसंत बहार समोरील चौक ते बुस्टर बॅ.क्र. १९६९ चे मागे पर्यंत रस्ता सिमेंट कॉक्रीटीकरण करणे. | २२०मी. | ४० फुट | रू.३९लाख |

--२७--

| अ.क्र. | कामाचे नाव | लांबी | डीपी प्रमाणे रूंदी | अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| २) | उल्हासनगर-४ येथे पार्वती अपार्ट. समोरील नागेश्वर मंदिर ते लिलाशहा नारी शाळा मार्गेचा रस्ता डांबरीकरण व बांधकाम करणे. | ३५० मी. | ४० फुट | ३१.५० लक्ष |
| | | | एकुण | ७०.५०लाख |

सदर रस्त्याची काम दहाव्या वित्त आयोगाच्या योजने अंतर्गत करण्यासाठी महानगरपालिकेची मंजुरी आवश्यक आहे. मंजुरी प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्ताव शासनाकडे या योजनेअंतर्गत निधी उपलब्ध होणे करीता व मंजुरीकरता नगर विकास विभागाकडे पाठविता येईल. सदर योजने अंतर्गत महानगरपालिका हीश्यासंबधी आवश्यक रकमेची तरतूद सुधारीत अंदाजपत्रकात करण्यात येईल.

तरी उपरोक्त अतिरिक्त दोन कामांच्या प्रस्तावांना स्थायी समिती कडून मंजुरी करीता प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.१२५</u> <u>दिनांक</u> :-२८.९.२०००

सुचकाचे नाव :-श्री.नारायण पंजाबी.

अनुमोदकाचे नाव :-श्री.किशोर वनवारी.

हि स्थायी समिती हया सरकारी वर्षाच्या अवधित सुधारित अंदाजपत्रकात जमाखर्चाच्या पुन: समायोजनेस महासभेच्या मंजुरीस अधिन राहून वरील प्रस्तावनेत नमुद केल्या प्रमाणे दोन कामांचे रू.७०.५० लाख खर्चाच्या प्राकलनास मान्यता देत आहे.

तसेच सदर प्रस्ताव वित्त आयोग शिफारिशी प्रमाणे अनुदान प्राप्त होणेकरिता शासनास सादर करण्यात यावेत.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका
--२८--

मा.सचिव :- विषय क्र.१२ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी हे सायंकाळी ५. २० वा. स्थायी समिती सभागृहातून बाहेर पडले.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- हा प्रस्ताव समंत करू या.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- नगरसेविका श्रीम. बेबी वसीटा यांच्या प्रभागातील जलवाहिनीचे काम आहे.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- नगरसेवक निधीतून प्रभाग क्र.२६ मध्ये जलवाहिनी टाकणे कामीचे दोन प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र.१२६ दिनांक :-२८.९.२०००

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री.रामचंद्र पारवानी.

हि स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची असून आयुक्तांना मजदुर कामगार संस्थेशी निविदा शिवाय थेट संविदेस प्रधिकृत करीत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|
| १) | उल्हासनगर -४ वार्ड क्र.२६ , मधील शर्मा यांचे दुकान ते पवई रेल्वे ब्रिज पर्यंत १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत. (श्रीमती.बेबी वसीटा) | रू.१ ,६८ ,९००/- |

--२९--

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|
| २) | उल्हासनगर-४ वार्ड क्र.२६ मधिल पवई पंपगृह ते शर्मा यांचे दुकाना पर्यंत १५० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत. (श्रीमती बेबी वसीटा) | रू.६६ ,३००/- |

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

श्री. कमलेश सोनाळे (उप-आयुक्त):- आयत्त्यावेळचे दोन विषय आहेत. आपणा सर्वांची संमती असेल तर आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करून घेण्यांत यावेत.

तीन विविध ठिकाणी जलवाहिनी टाकण्याचा एक प्रस्तव आहे तर दुसरा प्रस्ताव आहे. सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत करण्यांत येणा-या १६ विविध कामांचा....

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी हे स्थायी समिती सभागृहात सायंकाळी ५. २५ वा.पुन्हा आले.

मा.सदस्य श्री.ठाकुरदास बेहरानी :- सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत करावयाच्या १६ कामांची यादी कुठे आहे?

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- आयत्त्यावेळच्या विषया अन्वये आणलेले दोन्ही प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकालात समाविष्ट करण्यांत येत असून ते सर्वानुमते समंत करण्यांत येत आहेत.

आयत्त्यावेळचा विषय :-

स्थायी समिती ठराव क्र.१२७ दिनांक :-२८.९.२०००

सुचकाचे नाव :-श्री किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री विनोद तलरेजा.

--३०--

हि स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्त्यंत तातडीची असून आयुक्तांना मजदुर कामगार संस्थेशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|
| १) | उल्हासनगर-३ येथे सेक्शन-१७ साठी रोटरी गार्डन येथे बुस्टर रूम बांधणे व डर्बी हॉटेल ते बॅ. ८५० पर्यंत १०० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकणे. | रू. ३,६८,९९६/- |
| २) | उल्हासनगर ३ येथे प्रभाग क्र.५७ मध्ये महालक्ष्मी ज्वेलर्स ते बॅ.नं.९३७, सेक्शन-२१ पर्यंत ८० मि.मि.व्यासाची जी.आय जलवाहिनी टाकणे बाबत. (नगरसेवक निधीतून) | रू.१,१६,६००/- |
| ३) | उल्हासनगर-३ येथे प्रभाग क्र.६० मध्ये रेजिन्सी हॉटेल ते मधुबन हॉटेल नियर नवीन टेलिफोन बिल्डिंग पर्यंत ४० मि.मि. व्यासाची जी.आय. जलवाहिनी टाकणे बाबत.(नगरसेवक निधीतून) | रू.१०६,६००/- |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

आयत्त्यावेळचा विषय :-

स्थायी समिती ठराव क्र.१२८ दिनांक :-२८.९.२०००

सुचकाचे नाव :- श्री.किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

--३१--

हि स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची असून आयुक्तांना मजदुर कामगार संस्थेशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|
| १) | उल्हासनगर-३ येथील प्र.क्र.१२ मध्ये बॅ.क्र.१०६४ घनश्याम चाळ जवळ शौचालय दुरूस्त करणे.(नगरसेवक निधीतून) | ९९,९००/- |
| २) | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र.४८ मध्ये बॅ.क्र. १८५५ जवळ रस्ता एम-२५० ने बांधणे. (नगरसेवक निधीतून) | १,९९,७००/- |
| ३) | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र.४८ मध्ये जय जनता कॉलनी आणि विविध ठिकाणी रस्ता एम-२५० ने बांधणे आणि नाली बांधणे. (नगरसेवक निधीतून) | १,९९,८५०/- |
| ४) | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र.५० मध्ये बॅ.क्र. २१२५, २१२६ आणि विविध ठिकाणी रस्ता एम-२५० ने बांधणे (नगरसेवक निधीतून) | २,००,५००/- |
| ५) | उल्हासनगर येथील प्र.क्र.१६ मध्ये समतानगर मध्ये बाबुराव बगाडे यांचे घरापर्यंत रस्ता फुल ग्राऊंटीगने बनविणे.(नगरसेवक निधीतून) | ९०,०००/- |
| ६) | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र.५० मध्ये बॅ.क्र. २११९ ते साई बाबाधाम मुख्य रस्त्या पर्यंतचा रस्ता बी.एम.आणि एसी ने विकसित करणे. (नगरसेवक निधीतून) | १,९९,३००/- |
| ७) | उल्हासनगर येथील प्र.क्र.१६ मध्ये समता नगर मध्ये किशोर किराणा स्टोअर पर्यंतच्या रस्त्याला संरक्षक भिंत बांधणे व फुल ग्राऊंटींग करणे.(नगरसेवक निधीतून) | २,००,०००/- |
| ८) | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र.५० मध्ये ओंकार आश्रम ते गुरूदास सिंग यांच्या घरापर्यंत रस्ता एम.२५० ने बांधणे.(नगरसेवक निधीतून) | ९९,९८०/- |

९) उल्हासनगर-५ येथील प्र.क्र४८ मध्ये
बॅ.नं.१८४३ ते ४८ साधवानी हॉस्पीटल जवळ १,९९,९५०/-
रस्ता एम-२५० ने बांधणे आणि नाली बांधणे.
(नगरसेवक निधीतून)



| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत |
| --- | --- | --- |
| १०) | उल्हासनगर -५ येथील प्र.क्र.१९ मध्ये वडारी पाडा आणि विविध ठिकाणी रस्ता एम-२५० ने बांधणे आणि नाली बांधणे. (प्र.क्र४१ च्या नगरसेवक निधीतून) | १,००,९००/- |
| ११) | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र.१९ मध्ये बॅ.क्र.२०८४, २०७७,२०७६ आणि २०४४ येथे सी.सी रोड बांधणे. (प्र.क्र४१ च्या नगरसेवक निधीतून) | २,००,०००/- |
| १२) | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र.१९ मध्ये बॅ.क्र.२०८६ आणि विविध ठिकाणी सी.सी.रोड आणि नाली बांधणे.(प्र.क्र४१ च्या नगरसेवक निधीतून) | २,००,०००/- |
| १३) | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र४९ मध्ये बॅ.क्र. १८२२-२४ च्या बाजुला आणि विविध ठिकाणी रस्ता एम-२५० ने बांधणे आणि नाली बांधणे. ( प्र.क्र ४१ च्या नगरसेवक निधीतून) | १,००,०००/- |
| १४) | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र४९ मध्ये कॅनरा बॅंक मागे आणि विविध ठिकाणी रस्ता एम-२५० ने बांधणे आणि नाली बांधणे. (प्र.क्र. ४१ च्या नगरसेवक निधीतून) | १,००,०००/- |
| १५) | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र४९ मध्ये बॅ.क्र.२०२०, २०१५ जवळ आणि विविध ठिकाणी रस्ता एम-२५० ने बांधणे. (प्र.क्र४१ च्या नगरसेवक निधीतून) | २,००,०००/- |

| कामाचे नाव | प्राकलनिय किंमत | अ.क्र |
| --- | --- | --- |
| १६) उल्हासनगर-५ येथील प्र.क्र.१८ मध्ये इंदिरानगर येथे चार बैठकिचे शौचालय बांधणे. (उप-महापौर निधी) | १,०१,५००/- | |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५ . ४५ वाजता सभा संपल्याचे मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :- १२.१०.२०००

इतिवृत्तः-

दिनांक १२/१०/२००० रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक १२.१०.२००० रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योति कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| २. | श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| ३. | श्री. चौधरी राजेंद | सदस्य |
| ४. | श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ५. | श्री.पारवानी रामचंद | सदस्य |
| ६. | श्री. पंजाबी नारायण | सदस्य |
| ७. | श्री.बहरानी ठाकूरदास | सदस्य |
| ८. | श्री. भांडे भगवान | सदस्य |
| ९. | श्री. टाले प्रमोद | सदस्य |
| १०. | श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ११. | श्रीमती.भारती राजानी | सदस्या |
| १२. | श्री.वनवारी किशोर | सदस्य |
| १३. | श्री.वलेचा पदमा | सदस्या |
| १४. | श्री. तेजी कैलास | सदस्य |

तर

मा. सदस्य श्री.आयलानी कुमार हे सभेस अनुपस्थितीत होते.

मा.सचिव :- विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक २८.९.२००० रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी:- दि.२८.९.२००० रोजीच्या सभेच्या विषय पत्रिकेवरील विषय क्र.८ वरील चर्चेत हया प्रस्तावा बाबत फेरनिविदा मागविल्या जाव्यात असे मा.सदस्य श्री.किशोर वनवारी यांनी म्हटले होते. तशी नोंद इतिवृतांतातील पृष्ठ क्र.१९ वर आलेली आहे. परंतु श्री.वनवारी यांच्या नावाबरोबर माझ्याही नावाची तेथे नोंद आलेली आहे. फेर निविदा मागविल्या जाव्यात असे मी म्हटले नसल्याने ती नोंद काढून टाकली जावी.

मा.सचिव :- तेथे दुरूस्ती करून घेवू...

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- इतिवृतांतील पृष्ठ क्र.३१ वर श्रीमती. सुनिता बगाडे यांच्या प्रभागातील दोन कामांची नोंद आलेली आहे. श्री.बाबुराव बगाडे यांच्या घरापर्यंत बी.एम.ओ.सी चा रस्ता तयार करण्याबाबत यापूर्वीच प्रस्ताव मंजूर होवून काम ही झालेले आहे.

--२--

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- मागच्या सभेत पी.डबलु.डी. च्या १६ कामांचा जो प्रस्ताव मंजुरीस आणला होता त्यामध्ये अनुक्रमांक ५ व ७ वर या दोन कामांचा उल्लेख आलेला आहे.

मा.सचिव :- पृष्ठ क्रमांक काय?

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- पृष्ठ क्र.३१ वर.... दोन लाख नव्वद हजार रूपये खर्चाची ही दोन कामे आहेत.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:- काय काम करणार आहात? श्री.बगाडे यांच्या घरापर्यंत तर यापुर्वीच बी.एम.ओ.सी चा रस्ता तयार केलेला आहे.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- बाबुराव बगाडे यांच्या घरापर्यंत बी.एम.ओ.सी चा रस्ता तयार करण्यांत आलेला आहे.

मा.सदस्य श्री.रोजेंद्र चौधरी :- मला वाटते. पत्ता लिहिण्यामध्ये चूक झाली असावी. बाबुराव बगाडे यांच्या 'घरापर्यंत' ऐवजी 'घरापासून' असा उल्लेख असावयास पाहिजे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- पावसाळयापूर्वी रस्त्त्यावर जे बी.एम.ओ.सी चे काम केले गेले, ते रस्ते आता उखडले आहेत, त्यांची दुरूस्ती केली जावी. त्यानंतरच त्या रस्त्त्याचे बी.एम.ओ.सी चे काम करणा-या ठेकेदारांना पेमेंट दयावे असे मागील काही दिवसांपूर्वीच्या स्थायी समिती सभेत ठरले होते. परंतु अदयाप या रस्त्त्याची दुरूस्ती केली गेली नाही.

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी :- रस्त्त्यांवर पॉट व्होल चे काम अदयाप झालेले नाही त्याचे काय? माझ्या प्रभागात ते काम अदयाप झालेले नाही. पावसाचे कारण सांगितले जात होते. आता तर पावसाळा संपला आहे.

श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता):-पावसाळयानंतर करणार आहोत. पावसाळयामुळे सर्वाच्याच प्रभागाचे काम राहिले आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-ब-याचश्या प्रभागात अशा प्रकारे रस्ते उखडले आहेत, या दिवाळीपूर्वी त्या रस्त्त्याची दुरूस्ती झाली पाहिजे.

मा.सचिव :- दि.२८.९.२००० रोजीच्या इतिवृतांतील ठराव क्र.१२२ मध्ये पोच मार्गाचे काम करणे, पोच मार्गाची उंची वाढविणे कामी एकुण रू.५८७.५७ लाख खर्चाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे. अशी नोंद झालेली आहे. त्याऐवजी या कामीचे रू.३६१.९१ लाख खर्चास प्रशासकीय मंजूरी व रू.२२५.६६ लाख खर्चाचे कामास वित्तिय मंजुरी देत आहे. असा उल्लेख पाहिजे. प्रस्तावनेमध्ये असा उल्लेख आलेला आहे. या ठरावामध्ये दुरूस्ती करावी लागेल.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी:- दि. २८.९.२००० रोजीच्या सभेच्या इतिवृतांतात सुचविलेल्या दुरूस्त्यां करून हे इतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा.सचिव :- विषय क्र.२ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी:- दुस-या इतर प्रभागात सुध्दा बरेच बगीचे आहेत. तेथील बगीच्यामध्ये सुध्दा मुलांना खेळण्यासाठीचे साहित्त्य बसविले जावे.

*मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-* **इतर प्रभागातील उद्यानात सुध्दा खेळण्याचे साहित्य बसविले जाईल. कुठे महापौर निधीतून तर कुठे उपमहापौर निधीतून ही कामे करून घेतली जातील त्यासाठी मा.महापौर, उप-महापौर, स्थायी समिती सभापती या सर्वांचा निधी वाढवू. आयुक्तांना धन्यवाद देवू या. जकात वसुली ठेक्यावर देवून त्यांनी ६ कोटी आणि काही लाख रूपयांचे जे उत्पन्न वाढविले आहे त्यांचा पुरेपुर फायदा घेवू या.**

*मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :-* **सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.**

विषय :- मा.महापौर निधीतून व नगरसेवक निधीतून प्रभाग क्र.५७ व ६६ मधील बगीच्यांमध्ये मुलांना खेळण्यासाठीचे साहित्य पुरविण्याकामी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था नेमणुक करील त्या ठेकेदारांशी निविदाशिवाय थेट संविदेस मा.आयुक्तांना प्राधिकृत करणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र.१२९ दिनांक :-१२.१०.२०००.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी.

हि स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या बगीच्यांमध्ये मुलांना खेळण्याचे साहित्य पुरविण्याकामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्र.५७ मधील बॅरेक क्र.९०२ जवळील बगीच्यांमध्ये मुलांना खेळण्यासाठीचे साहित्य पुरविणे. (नगरसेवकनिधीतून) | २,२८,०८३/- |
| २. | प्रभाग क्र.६६ मधील बगीचा क्र.४४४ (भाजी मार्केट)येथील बगीच्यांमध्ये मुलांना खेळण्यासाठीचे साहित्य पुरविणे. (मा.महापौर निधीतून) | ६६,०००/- |

तसेच अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था नेमणुक करील त्या ठेकेदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करित आहे

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.सचिवः- विषय क्र.३ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :- पास. पास.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- बोलु तर दया, विरोधी पक्षीय सदस्यच पास. पास. म्हणतात ?

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- गोषवारा कुठे आहे? काही सदस्यां कडे आहे. काही सदस्यां कडे नाही, श्री.वनवारी यांच्याकडे आहे. आमच्या कडे नाही, असे कसे ?

मा.सचिव :- ते घेवून गेले असतील....

मा.सदस्या श्रीमती. भारती रजानी :- गोषवारा मला सुध्दा देण्यांत आलेला नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- या प्रस्तावामध्ये नगरसेवक निधी व्यतिरिक्तची सर्वसाधारण निधीतून करावयाची दोन कामे मंजुरीस आणली आहेत. ती कामे कोणती आहेत त्याचा कार्यकारी अभियंता श्री. धुत साहेब यांना खुलासा करावा.

धुत (कार्यकारी अभियंता):- गोल मैदान येथे मुख्य जलवाहीनीवर ब्रॅच लाईन टाकायची आहे.

मा.आयुक्त (आर.डी.शिंदे):- मुख्य जलवाहिनीचे काम पूर्ण झालेले आहे. ब्रॅच लाईन टाकली नाही तर पूढच्या प्रभागामध्ये पाणी जाणार नाही. ब्रॅच लाईन वर कुणालाही व्यक्तीगत नळ जोडणी दिली जाणार नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-ब-याचशा प्रभागात पाण्याची टंचाई आहे, तेथे सुध्दा मुख्य जलवाहीनीवरून (एम.एस.लाईन वरून) जोडणी दिली जावी. यापूर्वी १२ लाखाची एक ब्रॅच लाईन टाकली गेली होती. त्याप्रमाणे मुख्य जलवाहिनीवर जोडणी दिली जावी.

मा.सदस्य श्री रामचंद पारवानी :- गोल मैदान येथे जलवाहीनी टाकण्यासाठी मध्यंतरी जे १२ लाख खर्च केले त्याचे काय?

मा.आयुक्त :- एम.आय.डी.सी च्या जलवाहिनीवर टॅप करून एम.एस.लोखंडे जलवाहीनीस जोडली जाणार आहे, आपल्या जलवाहीनीवर टॅप करून देत नाही आहोत.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- नगरसेवक निधीतून प्रभाग क्र.३ ,१३ ,३२ ,४७ ,५१ मध्ये व इतर विभागांमध्ये सर्वसाधारण निधीतून जलवाहिनी टाकणे कामीच्या ९ प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. १३०    दिनांक :-१२.१०.२०००

सुचकाचे नाव :-श्री. राम पारवानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी.

हि स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्त्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर १ येथील प्रभाग क्र.३ मध्ये विठ्ठल राम मंदिर (शहाड गावठाण)ते बिर्ला गेट पर्यंत ८० मी.मी.व्यासाची जी.आय. जलवाहिनी टाकणे.(नगरसेवक निधीतून) | १,६८,७८६/- |
| २ | उल्हासनगर १ येथील प्रभाग क्र.३ मध्ये शहाड गावठाण सेंच्युरी गेट ते विठ्ठल राम मंदीरा पर्यंत ८० मी.मी.व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे. (नगरसेवक निधीतून) | १,६८,७८६/- |
| ३ | उल्हासनगर ३ येथील प्रभाग क्र.१३ मध्ये रॅायल टेलरिंग ते सम्राट चौक पर्यंत सम्राट अशोक नगर सठी १०० मी.मी. व्यासाची जी.आय जलवाहिनी टाकणे.(नगरसेवक निधीतून) | १,५६,८००/- |
| ४ | उल्हासनगर १ येथील प्रभाग क्र.३२ मध्ये मेन रोड ते बॅरेक नं.४०१ व ४०२ पर्यंत ५० मी.मी. व्यासाची जी.आय. जलवाहिनी टाकणे.(नगरसेवक निधीतून) | ६५,१००/- |
| ५ | उल्हासनगर ५ येथील प्रभाग क्र.४७ मध्ये बॅरेक क्र.१८२४ ते नगरपालिका निवासीस्थाना पर्यंत १०० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणे. (नगरसेवक निधीतून) | ९९,१००/- |
| ६ | उल्हासनगर ४ येथील प्र.क्र.५१ मधील मेन रोड नेताजी चौक ते देवसमाज रोड पर्यंत ५० मी.मी व्यासाची जलवाहिनी टाकणे.(नगरसेवक निधीतून) | ४८,५६६/- |
| ७ | उल्हासनगर ४ येथील प्रभाग क्र.५१ मधील निखिलेश्वर नगर येथे विनस टॅाकीज चौकातून ५० मी.मी.व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे. (नगरसेवक निधीतून) | १,१९,८५०/- |
| ८ | उल्हासनगर १ येथे सी.ब्लॅाक ते मधुबन हॅाटेल, बी.पी.एल गॅलरी ते जुने पोस्ट ऑफीस, बी.पी.एल गॅलरी ते निरंकारी हॅाल पर्यंत ८० मी.मी.व्यासाची जलवाहीनी टाकणे. (सर्वसाधारण निधीतुन) | १,४९,०००/- |

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
| --- | --- | --- |
| ९ | उल्हासनगर १ येथील मधुबन हॉटेल ते गोल मैदान, गोल मैदान ते बांसुरी हॉटेल, गोल मैदान ते बी.पी.एल गॅलरी, मधुबन हॉटेल ते टेलिफोन एक्चेंज आणि गोलमैदान ते धिरज अपार्टमेंट पर्यंत ८० मी.मी.व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे.(सर्वसाधारण निधीतून) | १,६१,०००/- |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.सचिवः- विषय क्र.४ वाचुन दाखवितात.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर-४ येथील प्रभाग क्र.१६ व ११ मध्ये नगरसेवक निधीतून रस्त्यावरील दिवाबत्ती लावणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. १३१ दिनांकः-१२.१०.२०००

सुचकाचे नाव :-श्री. प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :-श्री. ठाकुर बेहरानी.

हि स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
| --- | --- | --- |
| १ | उल्हासनगर ४ येथील प्रभाग क्र.१६ मध्ये रस्त्यावरील दिवाबत्ती लावणे. (नगरसेवक निधीतून) | ७९,०००/- |
| २ | उल्हासनगर ३ येथील प्रभाग क्र.११ मध्ये रस्त्यावरील दिवाबत्ती लावणे. (नगरसेवक निधीतून) | २,५५,०००/- |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.सचिव :- विषय क्र.५ वाचून दाखवितात.

प्रत्यक्षात १४ कामांचा प्रस्ताव आहे. विषयसूची तयार करताना संगणकावर चुकीने ७ असा आकडा प्रिंट झालेला आहे. आता आपण सांगा १४ कामांचा प्रस्ताव मंजुरीस घ्यायचा कि.७ कामांचा?

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- १४ कामांना मंजुरी दिली जावी.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

विषय :- सोबत जोडलेल्या १४ गोषवा-यात नमुद केलेल्या जागी नगरसेवकनिधीतून सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत करावयाच्या १४ कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र.१३२ दिनांक :-१२.१०.२०००.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी.

हि स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| १ | उल्हासनगर १ येथील प्रभाग क्र.३२ मध्ये आणि विविध ठिकाणी सी.सी.पाथ वे आणि नाल्या बांधणे.(नगरसेवक निधीतून) | १,१४,३५०/- |
| २ | उल्हासनगर येथील प्रभाग क्र.३२ मध्ये अपना इंडस्ट्रीज ते पापा अपार्टमेंट आणि विविध ठिकाणी सी.सी.पाथवे आणि नाल्या बांधणे. (नगरसेवक निधीतून) | १,९९,९२७/- |
| ३ | उल्हासनगर येथील प्रभाग क्र.३३ मध्ये मंदिर आणि युनियन बॅंक मागे सी.सी.पाथवे आणि नाली बांधणे आणि विविध ठिकाणी शौचालय दुरूस्ती करणे. (नगरसेवक निधीतून) | १,९९,९२७/- |
| ४ | उल्हासनगर १ येथील प्रभाग क्र.६३ मध्ये सरला सदन जवळ आणि विविध ठिकाणी सी.सी.पाथवे आणि नाल्या बांधणे.(नगरसेवक निधीतून) | १,९९,९२७/- |
| ५ | उल्हासनगर २ येथील प्रभाग क्र.६६ मध्ये उद्यान नं. ४४४ समोरील प्लॉटला बांधकाम करून तार लावून विकसित करणे.(नगरसेवक निधीतून) | १,७०,०००/- |
| ६ | उल्हासनगर १ येथील प्रभाग क्र.६३ मध्ये विविध ठिकाणी सी.सी.पायवाटा बांधणे आणि शौचालय दुरूस्ती करणे.(नगरसेवक निधीतून) | १,९९,९००/- |
| ७ | उल्हासनगर येथील प्रभाग क्र.३२ मध्ये इंदिरा गांधी कॉलनी, क्रिष्णा कॉटेज जवळ आणि विविध ठिकाणी सी.सी.पाथवे आणि नाल्या बांधणे. (नगरसेवक निधीतून) | १,९९,९००/- |
| ८ | उल्हासनगर २ येथील प्रभाग क्र.६७मध्ये बॅ.क्र.५३५ आणि विविध ठिकाणी सी.सी. रोड आणि नाल्या बांधणे.(नगरसेवक निधीतून) | ९९,६००/- |
| ९ | उल्हासनगर येथील प्रभाग क्र.६६ मध्ये विविध ठिकाणी सी.सी.पाथवे आणि नाल्या बांधणे. (मा.महापौर निधीतून) | १,९९,९२५/- |
| १० | उल्हासनगर येथील प्रभाग क्र.२१ मध्ये निर्मल भवन ते ब्लॉक सी.७ पर्यंतचा रस्ता बी.एम. आणि एसी ने विकसित करणे. (नगरसेवक निधीतून) | १,००,०००/- |

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| ११. | उल्हासनगर येथील प्रभाग क्र.७ मध्ये हनुमाननगर येथील मस्जिद जवळ पासुन ते ऑर्डनस कंपाऊंड पर्यंत बी.एम. ग्राऊटिंग आणि गटर करणे.(नगरसेवक निधीतून) | ३,८८,७००/- |
| १२. | उल्हासनगर येथील प्रभाग क्र.७ मध्ये भय्यासाहेब आंबेडकर नगर मध्ये प्रकाश मा.गोडबोले ते (उमपा) समाज मंदिर पर्यंत डब्लु बी.एम.ग्राऊंटिंग आणि गटर बांधकाम करणे.(नगरसेवक निधीतून) | १,९९,९००/- |
| १३. | उल्हासनगर येथील प्रभाग क्र.७ हनुमाननगर मध्ये शिव मंदिर येथे ५०० लिटर पाण्याची टाकी तसेच जय भवन यादव यांचे घरापर्यंत डब्लु बी एम रस्ता बांधणे. (नगरसेवक निधीतून) | ९९,९००/- |
| १४ | उल्हासनगर येथील प्रभाग क्र.९ मध्ये बाबुराव यांच्या घरापासून सुभाष यादव यांच्या २,९९,५००/- दुकानापर्यंत एम-३५० ने सिमेंट रस्ता बनविणे. (नगरसेवक निधीतून) | |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.सचिवः- विषय क्र.६ वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी यांचे सायंकाळी ४. ५५ वाजता स्थायी समिती सभागृहात आगमन झाले.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- हा प्रस्ताव २-३ वेळा पुढे ढकलण्यांत आलेला आहे. त्याचे कारण हे आहे की, जंतुनाशके, किटकनाशके इत्त्यादी सामुग्री बरोबर मिळते काय? मागील वेळी अशी काही जंतुनाशके पुरविण्यांत आली होती की, ज्यामुळे रोगजंतु मरण्याऐवजी ते अधिक धष्ठपुष्ठ होतात. कारण भिवंडीच्या एका ठेकेदाराने मुदत संपलेली ही औषधे पुरविली होती.

डॉ.लांजेवार(सहा-आरोग्य अधिकारी):- जंतुनाशके /किटकनाशके चांगल्या प्रतीचीच आहेत. मागील वेळी जी जंतुनाशके मागविली होती. त्यातील गटारांमध्ये टाकावयाची जंतुनाशके रस्त्यावर टाकली गेली, रस्त्यावर टाकावयाची जंतुनाशके गटारामध्ये फवारण्यांत आली. अशाप्रकारे चुकीच्या पध्दतीने ती वापरली गेली.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-</u>झाडु बाबत वर्तमानपत्रामध्ये किती तरी छापुन आले होते. झाडु नाही, हे नाही ते नाही, सर्व घोटाळा आहे असे छापून आले होते.

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-</u> झाडु कोण बघून घेणार? मध्यंतरी माझ्या असे ऐैकण्यांत आले होते की, नगरसेवक झाडू बघून घेणार म्हणुन?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- माझे म्हणणे आहे की, वस्तुंचा दर्जा राखला जावा. क्वालिटी मेंन्टेन केली जावी. मच्छर डास मेले जावेत, मरणारे धष्टपुष्ठ होवू नयेत...

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय</u> :- सन २०००-२००१ या वर्षा करिता जंतुनाशके, किटकनाशके व इतर आवश्यक साहित्य पुरविणे कामी आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था नेमणुक करील त्या ठेकेदारांशी आयुक्तांना <u>निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर महानगरपालिके करिता सन २०००-२००१ या आर्थिक वर्षाकरिता खालील साहित्यांची खरेदी करावयाची आहे.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | अपेक्षित खरेदी खर्च |
|---|---|---|
| १) | कपाट (३५ x १६ x ७७) | रू. ५२,५४५/- |
| २) | फेनकोट व किलेझर ऑशिथिऑन | रू.२३,१८,४७०/- |
| ३) | झाडू | रू.५,९२,२८८/- |
| ४) | जंतुनाशके | रू.३७,७३,२७८/- |
| ५) | जर्मिक्लीन | रू.९९,०००/- |
| ६) | अे.एफ.एम.डिओडरेट | रू.१,५९,८०५/- |
| ७) | ब्लीचींग पावडर | रू.३९,१९५/- |
| ८) | ऑलटॉक्झ मेलिथिऑन, इंडोकार्ब पावडर, हायना फॉगींग मशिन, बांबुचा वांड्यासह झाडू, टिकाव दातारी घमेला, खिले, चॉकॉप खोलन्याचे सयंत्र | रू.८,५०,०००/- |

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्रां/जीईएन/१०९२/५३८/प्र.क्र/४३/९२ नं. वि-१४ मंत्राालय मुंबई-३२ दिनांक २१ जुन १९९२ चे अधिन राहून दरवर्षी प्रमाणे या वर्षीही सदरचे साहीत्य संचालक आर्थिक भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था मुंबई यांचे मार्फत खरेदी करावयाचे आहे.

सन २००० - २००१ या आर्थिक वर्षाकरीता सदर सामग्रीच्या खरेदी करीता एकूण रू. १,०४,००००/- ईतकी अंदाजपत्रकिय तरतुद करण्यात आली असून प्रत्यक्ष खरेदी खर्च रू.७८,८४,५८१/- ईतका अपेक्षित आहे.

तरी सदरच्या प्रस्तावास प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेस्तव स्थायी समिती समोर सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.१३३</u> <u>दिनांक</u> :-१२.१०.२०००

सुचकाचे नाव :-श्रीमती. लविना कुंदनानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद्र चौधरी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार सन २०००-२००१ या वर्षाकरिता शहरातील साफसफाई व स्वच्छता राखण्यासाठी लागणारे जंतुनाशक, किटकनाशक व इतर आवश्यक साहित्य पुरविणे कामी आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था नेमणुक करील त्या ठेकेदारांशी आयुक्तांना निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकुत करित आहे. तसेच अंतर्भुत खर्च रू. ७८,८४,५८१ यास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र.७ वाचुन दाखवितात.
नगरसेवक निधीतील कामे आहेत.

<u>मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी</u> :-सर्वसाधारण निधीतून जेट पंप कुठे देत आहात?

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :-श्री.ठाकुर बेहरानी म्हणतात ते बरोबर आहे. मागील वेळी आपण मोठ्या मनाने कॅम्प १ ते ५ मध्ये जेट पंप बसविण्याच्या प्रस्तावास संमती दिली होती, त्याचा प्रस्ताव मंजुर होवून पडला आहे. अदयाप जेट पंप बसविले गेले नाहीत. ते कधी बसविले जातील?

<u>मा.आयुक्त :-</u> ठेकेदार आता सुध्दा वर्क ऑर्डर घेण्यासाठी बाहेर उभे आहेत. हे काम कशा प्रकारे करायचे हे ठरवायचे आहे बाकी सर्व तयारी झालेली आहे, उदया परवा हे काम होईल.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :- उशिरा पेमेंट दिले तरी ते काम करण्यास ते तयार आहेत. आपण आदेश दया, आपण आदेश दिले तर लवकरात लवकर जेट पंप बसविले जातील.

<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी</u> :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> मा.उपमहापौर निधीतून व नगरसेवक निधीतून अनुक्रमे प्रभाग क्र.१२,१३ मध्ये दोन पी.व्ही.सी.टाक्या व प्रभाग क्र.२८ मध्ये एक जेटपंप बसविणे कामीचे दोन प्राकलनास <u>प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.</u>

स्थायी समिती ठराव क्र.१३४ दिनांक :-१२.१०.२०००

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी.

हि स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

ि तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्र.१२ व १३ मध्ये संतोष नगर व रेणुका सोसायटी जवळ ५००० लि. क्षमतेच्या दोन पिव्हीसी टाक्या बसविणे. (मा.उप-महापौर निधीतून) | ७९,१७०/- |
| २. | प्रभाग क्र.२८ मध्ये महिंद्र स्टोर्स समोरील विंधन विहिरीवर जेट पंप बसवुन कार्यान्वित करणे आणि इंदिरा नगरमध्ये ५००० लि. क्षमतेची पीव्हीसी टाकी बसविणे. (नगरसेवक निधीतून) | ९८,१७०/- |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

मा.आयुक्त:- आपणां सर्वांची संमती असेल तर आयत्त्यावेळच्या विषयान्वये ३ कामांचे प्रस्ताव चर्चेस आणु इच्छितो. एम २५० चे दोन रस्ते व श्री.भगवान भांडे यांच्या प्रभागात जलवाहिनी टाकण्याचा एक प्रस्ताव अशा प्रकारे ३ प्रस्ताव आहेत.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-श्री. भगवान भांडे यांच्या प्रभागात जलवाहिनी टाकण्या बाबतचा प्रस्ताव आहे. तो सुध्दा घेतला जावा.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- आयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेले तिन्ही प्रस्ताव या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यांत येत असून ते सर्वानुमते समंत करण्यांत येत आहेत.

आयत्त्यावेळचा विषय

स्थायी समिती ठराव क्र. १३५ दिनांक :-१२.१०.२०००.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :- श्री विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्त्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर २ येथील प्रभाग क्र.६ मध्ये मुख्य रस्ता जगदिश वायर ते महादेव कंपाऊंड पर्यंतचा रस्ता एम.२५० ने बांधणे व नाली बांधणे. (स्थायी समिती सभापती निधी व नगरसेवक निधी) | १,९९,७५०/- |
| २. | उल्हासनगर१ येथील प्रभाग ३ मध्ये तानाजी नगर येथे शाखा क्र.२३, २६ ते शेटटी चाळ पर्यंतचा रस्ता एम.२५० ने बांधणे (मा.उपमहापौर निधीतून) | १,९९,७५०/- |
| ३. | उल्हासनगर५ वार्ड क्र.१७ मध्ये मेन रोड मेट्रो बार ते तानाजी नगर (गणेश मंदिर) पर्यंत ५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे. (नगरसेवक निधीतून) | ६९,१००/- |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका.

सायंकाळी ५ . ०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः-२१.१०.२०००

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक २१.१०.२००० रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योति कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| २. | श्री. चौधरी राजेंद्र | सदस्य |
| ३. | श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ४. | श्री.पारवानी रामचंद | सदस्या |
| ५. | श्री.बहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ६. | श्री. भांडे भगवान | सदस्य |
| ७. | श्री. टाले प्रमोद | सदस्य |
| ८. | श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ९. | श्रीमती.भारती राजानी | सदस्या |
| १०. | श्रीमती. वलेचा पदमा | सदस्या |

तर

१ श्री. किशोर वनवारी ,२ श्री.कुमार आयलानी ,३ श्रीमती. कुंदनानी लविना ,४ श्री. पंजाबी नारायण, ५ श्री. तेजी कैलाश हे मा.सदस्य सभेस अनुपस्थितीत होते.

मा.सचिव :- विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक १२.१०.२००० रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- ठिक आहे. इतिवृत कायम केले जावे......

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः- दि.१२.१०.२००० रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा.सचिवः- विषय क्र.२ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :-हा प्रस्ताव संमत केला जावा.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानीः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.



विषय :- नगरसेवक निधीतून प्रभाग क्र.२७, ४६, ५० व ६१ मधील रस्त्यावरील दिवाबत्ती लावण्याकामीचे ४प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र.१३६ दिनांक :-२१.१०.२०००.

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती पदमा वलेचा.

ही स्थायी समिती पुढे नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्त्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर -३ येथील प्रभाग क्र.२७ मध्ये रस्त्त्यावरील दिवाबत्ती बसविणे. (नगरसेवक निधीतून) | १,२४,०००/- |
| २. | उल्हासनगर-४,५ येथील प्रभाग क्र.४६ मध्ये रस्त्त्यावरील दिवाबत्ती बसविणे. (नगरसेवक निधीतून) | ६४,०००/- |
| ३. | उल्हासनगर -५ येथील प्रभाग क्र.५० मध्ये रस्त्त्यावरील दिवाबत्ती बसविणे. (नगरसेवक निधीतून) | ७०,०००/- |
| ४. | उल्हासनगर-१ येथील प्रभाग क्र.६१ मध्ये रस्त्त्यावरील दिवाबत्ती बसविणे. (नगरसेवक निधीतून) | ८७,०००/- |

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव:- विषय क्र.३ वाचुन दाखवितात.

--३--

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- काय आहे? तेच अंबिका अपार्टमेंटच्या बाजूला ना? नगरसेवक निधीतून व महापौर निधीतून अशा दोन्ही निधीतील काम आहे ना?

मा.सचिव :- होय, दोन्ही निधीतील आहे...

*<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :</u>- प्रमोद टाले यांना सुध्दा त्यांच्या प्रभागात महापौर निधीतून काम करून घेण्यास संधी मिळेल....*

*<u>मा.सदस्या श्रीमती.कांता गजवानी</u> :- महापौर निधीतून काम केले जात आहे ना? आम्हाला पण महापौर निधीतून काम करून घेता येईल...*

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u> या प्रस्तावा मधील कामात बी.बी.मोरे यांचा नगरसेवक निधीतील किती निधी आहे? ते लिहिलेले नाही.*

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :</u>- दोन्ही निधीतील कामाचे एकच पाकलन मंजुरीस आणले आहे. दोन्ही निधीतील कामाची अलग-अलग प्राकलने मंजुरीस आणली जावीत तो पर्यंत हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा.*

*<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :-</u>यापूर्वी असे कधी झाले आहे का? अलग-अलग प्राकलने तयार केली आहेत का?*

*<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानीः-</u> मला असे माहित पडले आहे की, काही नगरसेवकाचा नगरसेवक निधी संपला आहे.*

*<u>मा.आयुक्त (आर.डी.शिंदे):-</u> नगरसेवक निधीची आम्ही स्वतंत्र नोंद ठेवलेली आहे. संगणकीय यादी तयार आहे त्यामध्ये कोणत्त्या नगरसेवकाने नगरसेवक निधीतून किती रकमेचे कामे मंजुर करून घेतलेली आहेत व किती रक्कम बाकी आहे याची सविस्तर माहिती आमच्याकडे उपलब्ध आहे.*

*<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानीः-</u>माझ्या (स्थायी समिती सभापती) निधीतून किती निधी बाकी आहेत. तेथे असे दर्शविण्यांत आले आहे की, सर्व रक्कम संपली आहे. माझ्या मते निधी शिल्लक राहीला असला पाहिजे. माझ्याच बाबतीत असे का झाले आहे?*

*<u>श्री. शेंडे (मुख्यलेखा अधिकारी):-</u> नगरसेवक निधीची रजिस्टर मध्ये नोंद घेतली जाते व ते रजिस्टर आम्ही नियमितपणे तपासुन पहातो याबरोबर संबंधित नगरसेवकाचे पत्र असते ते पण आम्ही तपासुन पहातो.*

*<u>मा.सदस्य श्री.राम पारवानी</u> :-कुणाच्या प्रभागात नगरसेवक निधीपेक्षा जास्त रकमेची कामे झाली तर त्या निधीचे आपण समायोजन करता का?*

*<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानीः-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.*

*<u>विषय :-</u>मा.महापौर / नगरसेवक निधीतून प्रभाग क्र.३१ मध्ये*
*जलवाहिनी टाकणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय*
*<u>व वित्तिय मान्यता देणे बाबत.</u>*

*--४--*

*<u>प्रस्तावना :-</u>*

*खाली उल्लेख केलेल्या ठिकाणी पाणी टंचाईवर मात करण्यासाठी जलवाहिनी टाकण्याचा प्रस्ताव नगरसेवक व महापौर फंडातून प्रस्तावित करण्यात येत आहे.*

| अ.क्र. | कामाचे नाव | नगरसेवकाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|

----------------------------------------------------------------------

| | | |
|---|---|---|
| १ उल्हासनगर ३ येथे प्रभाग क्र.३१ मध्ये सी ब्लॉक गुरूव्दारा ते महाराष्ट्र हॉटेलपर्यंत डॉ.आंबेडकर नगर (चौपडा)साठी ८० मि.मि.व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे बाबत. | श्री.बी.बी.मोरे व श्री.हरदास माखीजा महापौर यांच्या निधीतून | रू.१ ,६२ ,५००/- |

----------------------------------------------------------------------

- वरिल कामाकरिता नगरसेवक श्री.बी.बी.मोरे व महापौर श्री.हरदास माखीजा यांनी आपली नगरसेवक व महापौर निधि उपलब्ध करून दिला आहे व त्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

तरी सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी करिता तसेच काम मजुर कामगार सहकारी संस्था यांचे कडुन करून घेण्यास मंजुरीस्तव स्थायी समिती पुढे सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u>१३७ <u>दिनांक</u> :-२१.१०.२०००

सुचकाचे नाव :-श्री. प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :-श्री. ठाकुर बेहरानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार मा.महापौर / नगरसेवक निधीतून वर दर्शाविलेल्या जागी जलवाहिनी टाकणे कामीचे रू.१ ,६२ ,५००/- चे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव:-</u>विषय क्र ४ वाचुन दाखवितातात.

<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी:-</u> मला वाटते या कामाबाबत आणखी एक निविदा आलेली आहे.



<u>मा.आयुक्त (आर.डी.शिंदे):-</u> एका निविदाकाराचा पहिला लिफाफा उघडला असता असे आढळून आले की, त्यांने निविदेच्या शर्ती पूर्ण केलेल्या नाहीत त्यामुळे त्याचा दुसरा लिफाफा उघडला नाही. तर दुस-या निविदाकाराने एकाच लिफाफ्यात सर्व कागदपत्रे टाकली असल्याने आम्ही तो लिफाफा उघडला नाही त्यामुळे या दोन्ही निविदाकारांनी निविदेत काय दर भरले आहेत ते आम्हाला माहित नाहीत. होवू शकते ते दर कमी किंवा जास्तही असू शकतील.

*<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u> असे म्हणतात की, त्यांनी प्राकलनिय रकमेपेक्षा १९ टक्के कमी दर लिहिले आहेत, त्यांची काहीतरी चुक झालेली आहे.*

*<u>मा.आयुक्त (श्री.आर.डी.शिंदे):-</u> पण आम्ही काय करायचे त्याला? त्यांनी निविदा भरण्यातच चुक केली आहे ते काम काय करणार?*

*<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानीः-</u> याचा अर्थ त्यांनी निविदा बरोबर भरली नाहीत. सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.*

*<u>विषय :-उल्हासनगर-३ येथील पवई चौक येथे रेल्वे उड्डाण पुलाचे दोन्ही बाजूला पोच मार्ग व उंची वाढविण्या कामीची मे. आर.के. चंदनानी यांची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून संविदेस मान्यता देणे बाबत.</u>*

*<u>प्रस्तावना :-</u>*

*उल्हासनगर ३ येथिल पवई चौक येथे रेल्वे उड्डाण पुल ५६ / १ मध्ये दोन्ही बाजुला पोच मार्गाचे काम करणे व पोच मार्गाची उंची वाढविणेसाठी सदर कामासाठी महानगरपालिकेने निविदा मागविल्या होत्त्या. सदर निविदेची सदर किंमत ५०,७४,३५०/- इतके होते. प्राप्त झालेल्या निविदा पैकी मेसर्स आर.के. चंदनानी यांची निविदा सर्वात कमी दराची (१४.५० टक्के जास्तीने)असल्याने त्यांना दिनांक २९.८.२००० रोजी महानगरपालिकेत वाटाघाटी करीता बोलविण्यांत आले होते. सदर ठेकेदारास तेव्हा शहर अभियंता यांच्या दालनात बोलावून मा. आयुक्त यांच्या दालनात वाटाघाटी करण्यात आल्या. तेव्हा सदर मेसर्स आर.के. चंदनानी यांनी १ टक्के दर कमी म्हणजे १३. ५० टक्के अधिक दराने कामे करण्यास तयारी दर्शविली तसे लेखी पत्र दिले आहे. परंतु हा दर देखील जास्त असल्याने मा.आयुक्त यांनी सुचविले. त्याकरिता मा.आयुक्तांनी ज्या ठेकेदारांनी या कामासाठी निविदा भरल्या होत्त्या त्या सर्वांना दिनांक ३१.८.२००० रोजी महानगरपालिकेत दुपारी १२.०० वाजता वाटाघाटी बोलावले होते. मा. आयुक्तांच्या दालनात ठेकेदारां सोबत झालेल्या वाटाघाटीस सदर कामास फक्त मेसर्स. आर.के.चंदनानी यांनी ४.९९ टक्के अधिक दराने काम करण्यासाठी तसे लेखी पत्र दिले. परंतु मा.आयुक्तांनी सदर कामाचे दर परत कमी करण्यास सदर ठेकेदारास विनंती केली त्यानुसार मेसर्स. आर.के.चंदनानी यांनी दिनांक ३१.७.२००० वाटाघाटी नंतर (अेटी पार)निविदा दराने काम करून देणे बाबत लेखी पत्र दिले तरी मेसर्स आर.के.चंदनानी ठेकेदाराचे वाटाघाटी नंतर कमी केलेल्या दरास स्थायी समिती सभेपुढे मंजुरीसाठी पाठविले असता सदर कामासाठी स्थायी समिती व ठराव क्र.१२३, दि.२८.९.२००० नुसार सदर निविदा रदद करून पुन्हा निविदा बोलाविण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने निविदा मागविलेल्या होत्त्या त्यानुसार नऊ ठेकेदारांनी निविदा भरलेल्या होत्त्या त्यांची माहिती खालील प्रमाणे आहे.*



| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव | भरलेले दर ---टक्के कमी. | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.आर.के.चंदनानी | १६ . ०६ टक्के कमी | १ले कमी दराचे |
| २ | मे.जयहिंद कन्स्ट्रक्शन लि. | ११ . ०७ टक्के कमी | २रे कमी दराचे |
| ३ | मे.डी.एस.कन्स्ट्रक्शन | १० . ९९ टक्के कमी | ३रे कमी दराचे |
| ४ | मे.श्रीकृष्णा इंटरप्राईजेस | १० . ०१ टक्के कमी | ४ थे कमी दराचे |

| | | |
|---|---|---|
| ५ मे.बुधरानी बुल्डर्स | ९ टक्के कमी | ५वे कमी दराचे |
| ६ मे.ज्योती कस्ट्रक्शन | ७.८६ टक्के कमी | ६वे कमी दराचे |
| ७ मे.कूमार पी.सी. | -- | निविदा उघडण्यात आले नाही |
| ८ मे.प्रकाश कंन्स्ट्रक्शन | -- | --''---- |
| ९ मे.व्ही.एम.वजरानी | -- | ---''---- |

उपरोक्त दिलेल्या निविदेनुसार मे.आर.के.चंदनानी यांनी भरलेल्या निविदेचे दर सर्वात कमी म्हणजे १६ . ०६ टक्के कमी दराचे आहे. मे.आर.के. चंदनानी यांनी भरलेले दर सर्वात कमी दराची असुन स्थायी समितीची मंजुरी देणे आवश्यक आहे. तरी मे.आर.के.चंदनानी यांनी भरलेल्या १६. ०६टक्के कमी दरास मंजुरीसाठी स्थायी समिती सभेपुढे मंजुरीस्तव प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.१३८</u> <u>दिनांक</u> :-२१.१०.२०००

सुचकाचे नाव :-श्री. राजेंद्र चौधरी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. कांता गजवानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर ३ येथील पवई चौक येथे रेल्वे उड्डाण पुल ५६ /१ मध्ये दोन्ही बाजुला पोच मार्गाचे काम व पोच मार्गाची उंची वाढविण्या कामी मे.आर.के.चंदनानी यांची सर्वात प्रथम लघुत्त्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून संविदेस व अंतर्भूत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव:-</u>विषय क्र.५ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी</u>:- कसला प्रस्ताव आहे? जे.सी.बी. दुरूस्तीचा?

<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी</u> :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--७--

<u>विषय</u> :- <u>महानगरपालिकेच्या जे.सी.बी. मशिनची मे. न्यु बॉम्बे अर्थ मुव्हर्स प्रा.लि.यांनी आयुक्तांच्या थेट कार्य आदेशान्वये केलेल्या दुरूस्ती कामीचे संविदेस कार्योत्तर मंजुरी देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

महानगरपालिकेने ३३ रस्ते रूंद करण्याचे व बनविण्याचे काम हाती घेतलेले आहे. ते रस्ते रूंद करण्यास आलेल्या अतिक्रमण व झाडे इत्त्यादी तोडण्याचे काम महापालिकेच्या जे.सी.बी. मशिन व्दारे युध्द पातळीवर करण्यात येत आहे. हे काम करीत असताना दिनांक १७ मे २००० रोजी जे.सी.बी मशिन मध्ये बिघाड झाला. त्यामुळे मशीन दुरूस्तीसाठी कंपनीचे मान्यताप्राप्त दुरूस्ती करणारे मे. न्यु.बॉम्बे अर्थ मुव्हर्स प्रा.लि. नवी मुंबई यांचेकडुन दरपत्रक मागविले व रस्ते रूंदीकरणाच्या कामाची निकड पाहता त्यांच्याकडे जे.सी.बी. मशीन दुरूस्तीसाठी पाठवुन दुरूस्ती करून घेतलेली आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेऊन जे.सी.बी.मशीनचे प्राधीकृत दुरूस्ती करणारे कंपनीचे न्यु बॉम्बे अर्थ मुव्हर्स प्रा.लि. नवी मुंबई यांचेकडुन केलेल्या दुरूस्ती कार्यवाहीस व दुरूस्ती खर्च रू.७४,२२९/- यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५चे कलम २ (२)च्या तरतुदीखाली मान्यतेसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u>१३९ <u>दिनांक</u> :-२१.१०.२०००

सुचकाचे नाव :-श्री. प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :-श्री. रमेश चव्हाण.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे मा. आयुक्तांच्या थेट कार्यआदेशान्वये मे.न्यु बॉम्बे अर्थ मुव्हर्स प्रा.लि. यांनी महानगरपालिकेच्या जे.सी.बी.मशिनची निविदा शिवाय केलेल्या दुरूस्ती कामीचे अंर्तभूत खर्च रू.७४,२२९/- च्या संविदेस कार्योत्तर (प्रशासकीय व वित्तिय) मंजुरी देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--८--

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :-</u> हे सायंकाळी ४ . ५५ वाजता स्थायी समिती सभागृहातून बाहेर पडले.

<u>मा.आयुक्त (आर.डी.शिंदे):-</u> १९९७ मध्ये आम्ही ज्या दराने डब्बल व्हिल बॅारोज खरेदी केल्या होत्त्या. त्यामध्ये कोणत्त्याही प्रकारची वाढीव रक्कम न देता त्याच दराने आम्ही आता डब्बल व्हिल बॅारोज खरेदी करत आहोत ३०० डब्बल व्हिल

बॉरोजची आवश्यकता असून त्यापैकी १०४ डब्बल व्हिल बॉरोज आम्ही खरेदी केल्या आहेत. यापूर्वी हा प्रस्ताव स्थायी समिती पुढे मंजुरीस आला होता. त्यास कार्योत्तर मंजुरी घ्यायची होती. परंतु आमचे सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. लांजेवार हे योग्य त्या प्रकारे त्यावेळी स्पष्टीकरण करू शकले नाहीत. त्यामुळे या प्रस्तावास मंजुरी न देता याकामी निविदा मागविण्यास सांगितले होते.

<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :-</u> या प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी हवी आहे का?

<u>श्री.आयुक्त (आर.डी.शिंदे):-</u> होय., डब्बल व्हिल बॉरोज प्रत्येकी रू. २६००/- या दरा प्रमाणे खरेदी करण्यास स्थानिक स्वराज्य संस्था मुंबई यांनी ठेकेदारास सुचविले होते. परंतु हया डब्बल व्हिल बॉरोज महिला आर्थिक विकास महामंडळाकडुन १९९७ च्या दराप्रमाणे आम्हास सद्या मिळत आहेत.

<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-</u> डब्बल व्हिल बॉरोजच्या दर्जात कुठलाही फरक असता कामा नये.

<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u>नविन निविदा मागविण्याबाबत आम्ही सांगितले होते, या प्रस्तावामध्ये काही कायदेशिर अडचण तर येणार नाही ना?

<u>मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :-</u>सायंकाळी ५ . ०० वा. स्थायी समिती सभागृहात पून्हा आले.

<u>श्री.आयुक्त (आर.डी.शिंदे):-</u>१०४ डब्बल व्हिल बॉरोज त्यांनी पुरविले आहेत.

<u>श्री. शेंडे (मुख्यलेखा अधिकारी):-</u> १९९७ मध्ये स्थानिय स्वराज्य संस्थेने मे. जयप्रकाश यांना डब्बल व्हिल बॉरोजचा पुरवठा करणे कामी शिफारस केली होती. मे. जयप्रकाश यांनी जो मालपुरवठा केला त्याचा दर्जा बरोबर नव्हता त्यामुळे त्याबाबत अनेक तक्रारी आल्या होत्त्या. त्यामुळे जयप्रकाश नावाच्या ठेकेदारास ब्लॅक लिस्ट मध्ये टाकले होते. त्यामुळे डब्बल व्हिल बॉरोज पुरविण्यांत आलेल्या नव्हत्त्या. तत्त्कालीन आयुक्त श्री.एस.एस.शुळ यांनी याची निकड लक्षात घेता कलम ६७ (क)नुसार आणिबाणिची स्थिती लक्षात घेवून मे. महिला आर्थिक विकास महामंडळाकडून डब्बल व्हिल बॉरोज खरेदी करण्यास संमती दिली.

<u>मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :-</u> हे सायंकाळी ५ . ०३ वाजता पून्हा स्थायी समिती सभागृहातून बाहेर पडले.

<u>श्री. शेंडे (मुख्यलेखा अधिकारी):-</u>आता शेवटी शेवटी त्त्यांनी जो माल पुरवठा केला त्याबाबत सुध्दा अनेक तक्रारी येऊ लागल्या आहेत. याबाबत आम्ही त्यांना नोटीस सुध्दा दिली होती. तसेच गोषवा-यात उल्लेख केलेल्या महाराष्ट्र शासनाचे दि. २१.६.९२च्या पत्रकातील (डब्बल व्हिल बॉरोज खरेदी करणे



कामीचे)उल्लेखानुसार फक्त औषधे व इतर अत्त्यावश्यक साहित्त्य आपण खरेदी करू शकतो. दुसरे इतर साहीत्त्य खरेदी करू शकत नाही तसा उल्लेख नाही.

<u>श्री.आयुक्त (आर.डी.शिंदे):-</u> आम्ही महीला विकास महामंडळाला यासाठी प्राधान्य देत आहोत कारण की, माल सारखाच असून दर २०० रूपयांनी कमी आहे.

<u>श्री. शेंडे (मुख्यलेखा अधिकारी):-</u>आपण त्यांना १५ टक्के बेनेफिट (लाभ)देवू शकतो. परंतु त्यांना निविदेच्या शर्यतीत यावे लागेल. निविदा न मागविता १५ टक्के लाभ देण्याची शासन परिपत्रकात तरतुद नाही.

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>* *म्हणुनच तर नविन निविदा मागविण्यास आम्ही सांगितले होते.*

*<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>* *नविन निविदा मागवा म्हणुन आम्ही सांगितले होते त्याचे कारण हेच होते.*

*<u>श्री.आयुक्त (आर.डी.शिंदे):-</u>* *त्यांनी काही डब्बल व्हिल बॅरोजचा पुरवठा केला आहे. त्याव्यतिरिक्त जो माल आपणास लागणार आहे. त्यासाठी आपण निविदा मागवूया. स्थानिक स्वराज्य संस्थेत डब्बल व्हिल बॅरोजची किंमत २६०० प्रती नग अशी ठरविली आहे. महिला आर्थिक विकास महामंडळ आपणास २४,००/- रूपयांत देत आहे.*

*<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:-</u>* *याबाबत निधी अधिका-याचे कायदेशिर मत अजमावले जावे.*

*<u>मा.सचिव :-</u>नुकसान भरपाई म्हणुन आपणास काही रक्कम त्यांना दयावी लागेल.*

*<u>श्री. शेंडे (मुख्यलेखा अधिकारी):-</u>या प्रस्तावाबाबत माझी अशी सुचना आहे की, आपणास जो माल पुरविला गेला आहे. तो माल जर चांगल्या प्रतीचा असेल, समाधानकारक असेल तर त्यामालाचे आपण देयक अदा करू व इतर मालाच्या पुरवठयासाठी निविदा मागवू या.*

*<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>* *या सर्व बाबींचा उल्लेख करून पुन्हा सविस्तर प्रस्ताव दया.*

*<u>श्री.आयुक्त (आर.डी.शिंदे):-</u>* *हा जो प्रस्ताव आहे तो तसाच आहे, आपण गोषवारा वाचून पहा. स्थायी समितीने मंजुरी दिली तर ते काम बिनभरोशयाचे थोडेच होणार आहे?*

*<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>* *काही कायदेशिर अडचण निर्माण हावू नये?*

*<u>मा.सचिव:-</u>* *प्रथम ३०० व्हिल बॅरोज प्रति नग रू.२६००/- या दराने पूरविण्याचे आदेश स्थानिक स्वराज्य संस्थेच्या ठेकेदारास दिले होते त्याच दरम्यान महिला आर्थिक विकास महामंडळाकडून एक पत्र प्राप्त झाले की, आम्ही या डब्बल व्हिल बॅरोज प्रतिनग २,४००/- रू. या दराने देण्यास तयार आहोत. त्यानुसार त्यांना डब्बल व्हिल बॅरोज पुरविण्याकामी आयुक्तांकडून थेट कार्य आदेश (निविदेशिवाय)देण्यांत आले होते. त्यानुसार महिला आर्थिक विकास महामंडळाने १०४ डब्बल व्हिल बॅरोजचा पुरवठा केला. त्याचे देयक जेव्हा लेखा विभागात पेमेंटसाठी गेले तेव्हा याकामी ५(२)(२) अन्वये मंजुरी घेतलेली नसल्याने स्थायी समिती पुढे हे प्रकरण ठेवून मंजुरी घेण्यास लेखा विभागाकडून सांगण्यांत आले.*



*त्यानंतर हा विषय प्रथमत: कार्योत्तर मंजुरीसाठी स्थायी समिती पूढे आला तेव्हा हा विषय पुढे ढकलण्यांत आला. त्यानंतर स्थायी समितीत ठराव क्र. १२४ दि. २८.९.२००० अन्वये या प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी न देता नविन निविदा मागविण्याचे निर्देश देण्यांत आले. आता हा प्रस्त्ताव पुन्हा कार्योत्तर मंजुरीसाठी व पहीला ठराव रदद करण्यासाठी आलेला आहे. परंतु असे होवू शकत नाही जर असे झाले तर या बाबतीत अनेक प्रश्न उपस्थित होवू शकतील. स्थायी समिती ठराव १२४ पारित होण्यापूर्वी महीला आर्थिक विकास महामंडळाने १०४ डब्बल व्हिल बॅरोजचा पुरवठा केलेला आहे त्याची त्यांना नुकसानभरपाई दयावी लागेल आणि उर्वरित डब्बल व्हिल बॅरोजसाठी नविन निविदा मागवाव्या लागतील.*

*<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी</u>* :-पूरवठा केलेल्या १०४ डब्बल व्हिल बॅरोजच्या नुकसानभरपाई बाबत पुन्हा नविन प्रस्ताव स्थायी समिती पुढे मंजुरीस आणला जावा.

*<u>सचिवः-</u>*ते अधिक चांगले होईल.

*<u>श्री.आयुक्त (आर.डी.शिंदे):-</u>* काही अडचण येणार नाही.

*<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरीः</u>*- जेवढा माल पुरविला गेला आहे.

*<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी</u>* :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पूढे ढकलण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u>पूर्वीचा स्थायी समिती ठराव क्र.१२४
दि. २८.९.२००० मध्ये सुधारणा करणे व
महिला आर्थिक विकास महामंडळाने
पुरविलेल्या डब्बल व्हिल बॅरोजच्या संविदेस
<u>कार्योत्तर मंजूरी देणे बाबत.</u>

*<u>श्री.आयुक्त (आर.डी.शिंदे):-</u>* आपणा सर्वांची समंती असेल तर आयत्त्या वेळच्या विषयाअन्वये एक प्रस्ताव चर्चेस आणु इच्छितो. पीसीओ बाबतचा प्रस्ताव आहे.

*<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>* कुठल्या विभागातील आहे?

*<u>श्री.आयुक्त (आर.डी.शिंदे):-</u>* विठ्ठलवाडी पोलीस चौकी समोर महापालिकेच्या जागेवर एस.टी.डी. बुथ बांधण्यासाठी अपंग अर्जदार श्री. किसन बाबुराव कांबळे यांना परवाना देणे बाबतचा प्रस्ताव आहे.

*<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानीः-</u>*आयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेला प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यांत येत असून तो सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

*<u>आयत्त्यावेळचा विषय :-</u>*

<u>विषय</u> :- अपंग अर्जदार श्री.किसन बाबुराव कांबळे यांना
विठ्ठलवाडी पोलीस चौकीचे समोर महापालिकेच्या
जागेवर तात्पुरत्त्या स्वरूपी एस.टी.डी.बुथ चालविणे
<u>कामी परवाना देणे बाबत.</u>



अर्जदार श्री. किशन बाबुराव कांबले ह्यां अपंग व्यक्तीस टेलिफोन बुथ चालविण्यासाठी विठ्ठलवाडी पोलिस चौकी चे समोर, विद्युत जनेत्र चे जवळ बसलेले कुम्भार / लोहार चे मध्ये उल्हासनगर -४ येथे जागा मागितली आहे.

अर्जदार व्यक्तीस अंध असल्यामुळे अत्यंत तात्पुरत्त्या स्वरूपात ४ x ४ च्या लाकडी कॅबीन मध्ये टेलिफोन बुथ साठी खालील अटीवर परवानगी बाबत स्थायी समितीची संमती घेणे आवश्यक आहे.

१) महानगरपालिका सांगेल त्यावेळी लाकडी बुथ हठवुन जागा खाली करावी लागेल.

२) कोर्टातून कोणत्त्याही प्रकारचा स्टे आणता येणार नाही.
३) फक्त आपण तेथे काम करील.
४) एस.डी.ओ ऑफीसच्या ना हरकत दाखला हया कार्यालयांत देण्यांत यावा.
५) वरील बाबी अर्जदारास मान्य असल्याबाबत २०/- रूपयेच्या स्टॅंपपेपरवर ॲफीडेव्हीट करावे लागेल.

स्थायी समिती ठराव क्र. १४० दि. २१ /१०/२०००

सुचकाचे नाव :-श्री.विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी.

ही स्थायी वरील प्रस्तावनेनुसार श्री. किशन बाबुराव कांबळे हया अपंग व्यक्तीस वरील नमुद केलेल्या महानगरपालिकेच्या जागेवर आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्तीवर तात्पुरत्त्या स्वरूपात एस.टी.डी. बुथ बांधणे, व चालविणे कामी एका वर्षाच्या कालावधीसाठी परवाना देणेस मान्यता देत आहे.

तसेच आयुक्तांच्या समाधानकारकतेस अधिन राहून सदरचा परवाना एका वर्षापेक्षा अधिक नसेल एवढया कालावधीसाठी वेळोवेळी नुतनीकरण करण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५ . ०७ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-२५.१०.२०००

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा बुधवार दिनांक २५.१०.२००० रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योति कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.कुमार आयलानी | सदस्य |
| २. | श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| ३. | श्री. चौधरी राजेंद्र | सदस्य |
| ४. | श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ५. | श्री. पंजाबी नारायण | सदस्य |
| ६. | श्री.पारवानी रामचंद्र | सदस्या |
| ७. | श्री.ब्रहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ८. | श्री. भांडे भगवान | सदस्य |
| ९. | श्री. टाले प्रमोद | सदस्य |
| १०. | श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ११. | श्री. किशोर वनवारी | सदस्य |

तर

१ श्रीमती. कुंदनानी लविना ,२ श्री.तेजी कैलाश ,३ श्रीमती.राजानी भारती, ४. श्रीमती. पदमा वलेचा हे मा.सदस्य/ सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक २१.१०.२००० रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी</u> :- दि.२१.१०.२००० रोजीच्या सभेच्या इतिवृतांचे एक पान आता येथे परत वाटप करण्यांत आले. तर काय या सभेच्या इतिवृतांत काही चुक होती का?

<u>मा.सचिव</u> :- मा.सदस्य श्री.किशोर वनवारी हे त्या सभेस अनुपस्थितीत होते त्यांच्या नावाची नोंद अनुपस्थित सदस्यांमध्ये आलेली नाही. म्हणुन त्याबाबत दुरूस्ती केलेले पान आता आपणास वाटप करण्यांत आलेले आहे.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-</u> त्या सभेच्या इतिवृतांतात माझे नाव उपस्थित किंवा अनुपस्थित अशा कुठल्याही ठिकाणी नाही.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u>:- दि.२१.१०.२००० रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

--२--

<u>मा.सचिव:-</u> विषय क्र.२ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u>स्पष्टीकरण कोण करणार? मागील त्याच दराने देणार काय?

<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :-</u>याबाबत दोन प्रस्ताव आहेत, ड्रेनेज पंपींग स्टेशन चालविणे, देखभाल दुरूस्तीसाठी आजच्या तारखेपासुन देत आहात काय? ड्रेनेज पंपीग स्टेशन किती आहेत.

श्री. दशोरे (शाखा अभियंता):-ड्रेनेज पंपींग स्टेशन दोन आहेत. एक ड्रेनेज पंपींग स्टेशन क्र.२ (शांतीनगर) व क्र.३ नेहरू नगर.

मा.सचिव :-दि.१.१२.९९ पासुन ३१.१०.२००० पर्यंत मुदत वाढ दयावयाची आहे.

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :-दर काय आहेत?

मा.आयुक्त :- पूर्वीच्या निविदेतील दरा प्रमाणेच मुदत वाढ दयायची आहे.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-विषय क्र.२ व ३ हे वेगवेगळे विषय आहेत ना?

मा.सचिव :- विषय क्र.२ मुदत वाढीचा असून यानंतरचा विषय क्र.३ हा निविदेबाबतचा आहे.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :- ड्रेनेज पंपींग स्टेशन चालवणे, देखभाल व दुरूस्ती करणे कामी मे. ओम इंजिनिअरिंग सर्व्हिसेस डोंबिवली यांना दि. १/१२/९९ ते ३१/१०/२००० पर्यंत पूर्वीच्या निविदेतील दरास अनुसरून संविदेस मुदत वाढ देणे बाबत.

प्रस्तावना:-

ड्रेनेज पंपिंग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणेचे काम मे. ओम इंडस्ट्रिअल इंजिनिइरिंग सर्व्हिसेस, डोंबिवली यांना कार्यादेश क्र. युएमसी / डबलू एसएसडी/ मेक/१५६८ दि. १.६.९८ नुसार देण्यांत आले होते. सदर कामाचा बारा महिन्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर कामाची आवश्यकता लक्षांत घेता ठेकेदारास दिनांक ३०.११.९९ अखेर पर्यंतची मुदतवाढ स्थायी समिती ठराव क्र. ६७ दि. ५.११.९९ नुसार मंजुर करण्यांत आली होती.

पुढील ठेकेदार नियुक्त करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करून निविदा अंतिम करण्यांत कालावधी लागला. या कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असून त्यांपैकी मे. ओम इंडस्ट्रिअल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस, डोंबिवली यांची रू. ९,५०,९२३/- मात्र किंमतीची निविदा तुलनात्मकरित्त्या न्यूनतम असल्याने मंजूरीसाठी सादर करण्यांत आली असून त्यावर कार्यवाही सुरू आहे. निविदा अंतिम करून प्रत्यक्ष कार्यादेश देईपर्यंत लागणारा अवधी लक्षांत घेता सदर ठेकेदारास दि. ३१.१०.२००० पर्यंत मुदतवाढ देण्याची शिफारस करण्यांत येत आहे.



या कामाचा मंजूर दर रू. ४८९०२/- प्रति महिना इतका असून याप्रमाणे दि. १.१२.९९ ते ३१.१०.२००० या कालावधीची मुदतवाढ व त्याकरिता रू. ५,३७,९२२/- मात्र इतका खर्च आहे. सदर प्रस्तावास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांची शिफारस असून मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदर प्रस्ताव प्रशासकीय व वित्तिय मान्यतेसाठी स्थायी समितीसमोर सादर करण्यांत येत आहे. त्यास मंजूरी मिळण्याची विनंती आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.१४१</u>          <u>दिनांक</u> :-२५.१०.२०००

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्या प्रमाणे ड्रेनेज पंपींग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे कामी मे. ओम इंडस्ट्रिअरिंग इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांना दि. १.१२.९९ ते ३१.१०.२००० पर्यंत पूर्वीच्या निविदेतील दरास अनुसरून संविदेच्या मुदत वाढीस व अंर्तभूत खर्च रू. ५,३७,९२२/- यांस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी</u> :- झाले ना?

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले</u> :-आयुक्त साहेब, माझे काय म्हणणे आहे. हया कामाची निविदा प्राकलनिय रक्कमेपेक्षा ४० टक्के कमी दराने स्विकारली गेली आहे, या कामाची मागील निविदा सुध्दा प्राकलनिय रक्कमेपेक्षा ४० टक्के कमी दराने गेली होती व हे तेच पंपींग स्टेशन आहे, मुदत वाढीच्या प्रस्तावाच्या ऐवजी तेव्हा निविदा मागविल्या असत्त्यातर आणखी कमी दरात गेल्या असत्त्या.



<u>श्री. दशोरे (शाखा अभियंता):-</u> निविदा मागविल्या असत्त्या तर त्यामध्ये अधिक कालावधी गेला असता, तसेच याकामी मागील वेळी ज्या निविदाकारास ज्या दराने काम देण्यांत आले होते त्याच दराने त्यांनी ते काम केलेले आहे, मागील वेळी निविदेमध्ये मजूराचे जे दर लिहिले होते ते ४ थ्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीच्या आधारावरील दरानुसारच होते. आता निविदेमध्ये जे दर लिहिले आहेत ते ५ व्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीच्या आधारावरील दरानुसारचे आहेत व यावेळी साधनसामुग्री सुध्दा ते पुरविणार आहेत. मागच्या वेळी साधनसामुग्री त्यांनी पुरविली नव्हती.

मा.सचिव :-हा जो प्रस्ताव आहे त्यामध्ये देखभाल दुरूस्तीसह साहित्य सामुग्री सुध्दा पुरविणार आहेत ना? त्यामुळेच हया निविदेतील दर जास्त आहेत ना?

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :- याकामीची निविदा आजच्या तारखेला प्राकलनिय रक्कमेपक्षा ४० टक्के कमी दराने येऊ शकतो तर त्यावेळी का नाही?

श्री. दशोरे (शाखा अभियंता):- मलप्रक्रिया केंद्र क्र.२ (शांतीनगर) व क्र.३ (नेहरूनगर) ही मलप्रक्रिया केंन्द्र वार्षिक तत्त्वावर चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे कामी पाणी पुरवठा विभागातर्फे निविदा मागविण्यांत आल्या होत्या. एकुण ३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी मे. ओम इंडस्ट्रीयल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस--डोंबिवली यांनी रू.९,५०,९२३/- इतक्या रक्कमेची निविदा भरली होती ती प्राकलनिय रक्कमेपेक्षा ४०.१५ टक्के कमी दराची होती व तुलनात्मकरित्या न्यूनतम असल्याने स्विकारण्यासाठी प्रस्तावित केलेली असून या प्रस्तावास मुख्यलेखा परिक्षक, मुख्य लेखाअधिकारी यांनी शिफारस केलेली असून मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :-ड्रेनेज पंपींग स्टेशन चालवणे, देखभाल व दुरूस्ती करणे कामी मे. ओम इंजिनिअरिंग सर्व्हिसेस डोंबिवली यांची सर्वात प्रथम लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून संविदेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना:-

ड्रेनेज पंपींग स्टेशन क्र.२ शांतीनगर व क्र.३ नेहरू नगर वार्षिक तत्त्वावर चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणेचे कामाकरीता पाणी पुरवठा विभागातर्फे निविदा मागविण्यात आल्या होत्या. यासाठीच्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.३१ दि. २५.५.२००० अनुसार प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळालेली असून बाब क्र. ३७५ दि.९.५.२००० नुसार तांत्रिक मान्यता आहे. या कामाची अंदाजित किंमत रूपये १५,८८,८४४/- मात्र इतकी आहे.

या कामाकरिता दैनिक लोकमत व दैनिक नवभारत या राज्यस्तरीय वृतपत्रातून तसेच दैनिक नगरसेवक या स्थानिक वृतपत्रातून निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार दि. ६.९.२००० रोजी तीन ठेकेदारांनी आपल्या निविदा महानगरपालिकेस सादर केल्या. या निविदा त्याच दिवशी उघडण्यांत आल्या. त्यात खालीलप्रमाणे दर नमुद करण्यात आले होते.



| | |
|---|---|
| १ मे.ओम. इंडस्ट्रीअल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस, डोंबिवली. | -- अंदाजित किंमती पेक्षा ४०.१५ टक्के कमी (रू.९,५०,९२३/-) |
| २ मे.अरूण कॉन्ट्रक्टर कंपनी नवी मुंबई. | -- अंदाजित किंमती पेक्षा ३४ .७० टक्के कमी (रू.१०,३७,५१५/-) |
| ३ मे. वैभव इलेक्ट्रीक वर्कस् कल्याण. | -- अंदाजित किंमती पेक्षा २३.७० टक्के कमी (रू.१२,१२,२८८/-) |

उपरोक्त निविदापैकी मे.ओम इंडस्ट्रिअल इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांची रू. ९,५०,९२३/-मात्र रकमेची निविदा तुलनात्मकरित्या न्युनत्तम असून स्विकारण्यास प्रस्तावित आहे. या प्रस्तावास मुख्य लेखाधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांची शिफारस असून मा. आयुक्तांनी मान्यता दीलेली आहे. त्यानुसार मे. ओम इंडस्ट्रिअल इंजिनिअरींग सर्व्हिसेस, डोंबिवली यांची उपरोक्त संदर्भित कामाची निविदा व त्यासाठी येणारा खर्च रू. ९,५०,९२३/- मात्र यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता निर्णयाकरिता सदर प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे. त्यास मंजुरी मिळण्याची विनंती आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.१४२</u>          <u>दिनांक</u> :-२५.१०.२०००

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :-श्री.ठाकुरदास बेहरानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे ड्रेनेज पंपींग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे व इतर साहित्य सामुग्री पुरविणे कामी मे. ओम इंडस्ट्रिअल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस, डोंबिवली यांची सर्वात प्रथम लघुत्तम दराची निविदा स्विकृत असून संविदेस मान्यता व अंतर्भुत खर्च रू. ९,५०,९२३/- यांस (प्रशासकीय व वित्तिय )मंजुरी देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.आयुक्त</u>:- आपणा सर्वांची संमती असेल तर आयत्त्यावेळच्या विषयान्वये दोन प्रस्ताव चर्चेस आणू इच्छितो पहिला प्रस्ताव आहे १०४ व्हील बॅरोजच्या भरपाई रक्कमेस मान्यता देणे व दुसरा प्रस्त्ताव आहे टाऊन हॉल पट्टयाने देण्याचा निविदेचा.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u>:- मा.आयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये १०४ व्हील बॅरोजच्या भरपाई रक्कमेस मान्यता देणे बाबत आणलेला प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यांत येत असून तो सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.



## <u>आयत्त्यावेळचा विषय</u>

<u>विषय :-</u> स्थायी समिती ठराव क्र.१२४ <u>दि.२८/९/२०००</u>
च्या आधीच मा. आयुक्तांच्या कार्यादेशान्वये
महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी
निविदाशिवाय थेट पुरविलेल्या १०४ व्हील
बॅरोजच्या भरपाई रक्कमेस मान्यता

देणे बाबत.

प्रस्तावना :-

वैद्यकीय आरोग्य अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांनी आरोग्य विभागासाठी जंतुनाशके, किटकनाशके ३०० व्हील बॉरोजची आवश्यकता असल्याची मागणी केली. त्यानुसार संचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था मुंबई यांचेकडे सदर जंतुनाशके / किटकनाशके व्हील बॉरोजचा पुरवठा करणे बाबत इकडील पत्र क्र.उमपा / भांडार/२३/२००० , दिनांक २०.५.२००० अन्वये मागणी नोंदवली स्थानिक स्वराज्य संस्था यांनी रू. २६००/- प्रमाणे पुरवठा करणेची तयारी दर्शविली.

१९९६-९७ मध्ये महिला आर्थिक विकास महामंडळाकडे रू. २४००/- प्रमाणे व्हील बॉरोज पुरविण्यासंबधी महापालिकेने मागणी केली होती व त्याप्रमाणे महिला आर्थिक विकास महामंडळाने ११० व्हिल बॉरोज त्यावेळी पुरविले होते. आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडुन २६००/- रू.प्रमाणे व्हील बॉरोज पुरवठा होणार होता. त्याऐवजी महिला आर्थिक विकास महामंडळाने २४००/- रू प्रमाणे व्हील बॉरोज पुरविण्याचे दिनांक २/६/२०००च्या पत्रान्वये तयारी दर्शविली आरोग्य विभागासाठी व्हील बॉरोजची पावसाळयामुळे नितांत आवश्यकता होती. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या दरापेक्षा महिला आर्थिक विकास महामंडळाचा दर कमी असल्यामुळे ३००/- व्हील बॉरोज च्या खरेदीमध्ये रू. ६०,०००/- चा आर्थिक फायदा महापालिकेस होईल पर्यायाने महापालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणुन स्थानिक स्वराज्य संस्थेस व्हील बॉरोजचा पुरवठा करणेबाबतचे आदेश दिनांक २८.६.२००० च्या पत्राव्दारे देण्यात आले. त्यानुसार महिला आर्थिक विकास महामंडळाने दिनांक १९.७.२००० रोजी ३०० व्हील बॉरोजपैकी १०४ व्हील बॉरोज तातडीने पुरविले आहेत. महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (सी) अन्वये निविदेशिवाय थेट आदेश मिळाल्यामुळे १०४ व्हिल बॉरोज महिला आर्थिक विकास महामंडळाने पुरविलेले आहेत. पावसाळयातील व्हिल बॉरोजची नितांत गरज लक्षांत घेऊन मागणी निविदेशिवाय देण्यात आली होती.

तसेच सभेच्या चर्चेअंती असे आढळून आले की, पूर्वीचा ठराव क्र १२४ दि.२८.९.२००० पारीत होण्या आधिच महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी आयुक्तांच्या कार्यादेशान्वये १०४ व्हील बॉरोज पुरविल्यामुळे त्यांचा वापर पण करण्यात आलेला आहे. म्हणुन ठेकेदारांनी पुरविलेल्या सामुग्री बाबत भरपाई रक्कम देणे महापालिकेची जबाबदारी ठरते.

तरी महिला आर्थिक विकास महामंडळाने महापालिकेस पुरविलेल्या व्हील बॉरोजची भरपाई रक्कम अदा करणेस मंजुरी मिळावी.

--७--

स्थायी समिती ठराव क्र.१४३ दिनांक :-२५.१०.२०००

सुचकाचे नाव :-श्री. प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद चौधरी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे आयुक्तांच्या कार्यादेशान्वये महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी निविदाशिवाय थेट १०४ व्हील बॉरोज पुरविल्यामुळे त्यांची भरपाई म्हणुन रक्कम रू. २,४९,६००/-यांस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच स्थायी समिती ठराव क्र.१२४ दि, २८.९.२००० प्रमाणे उर्वरित १९६ व्हील बॉरोजसाठी निविदा मागविणे आवश्यक राहील.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.आयुक्त</u> :- आयत्त्यावेळचा दुसरा प्रस्ताव आहे. टाऊन हॉल पट्टयाने देण्याबाबतच्या निविदेचा....

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-</u> हा आयत्त्यावेळचा विषय आहे काय? आम्ही या प्रस्तावाबाबत आयत्त्यावेळी अभ्यास कसा करणार? आम्ही अभ्यास केलेला नसल्याने हा प्रस्ताव पुढच्या नियमित सभेच्या कार्यसुचीवर आणला जावा.

<u>मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :-</u> या प्रस्तावाबाबत तुम्ही आम्हाला माहिती पुरविली काय?

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :-हा प्रस्ताव संमत केला जावा.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u> हा प्रस्ताव अजेंडयावर आणला तर आम्ही त्यास संमती देऊ.

<u>मा.सदस्य श्री.कुमार आयलानी :-</u> या प्रस्तावाबाबत थोडक्यात माहिती दिली जावी.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-</u>हा प्रस्ताव समंत केला जावा.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u> नाही-नाही हा प्रस्ताव आयत्त्यावेळी घेण्यास आमचा विरोध आहे.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> ते ऐकुन घेण्यास तयार नाहीत तर आम्ही काय करायचे.

सार्वजनिक बांधकाम समितीचे सभेत हा प्रस्ताव संमत झालेला आहे. महासभेत सुध्दा हा प्रस्त्ताव संमत झालेला असताना याबाबत आणखी काही



सांगण्याची जरूरत दिसत नाही. वर्तमानपत्रात सुध्दा याबाबत सविस्तरपणे वृत छापुन आलेले आहे. या प्रस्तावाबाबत सर्वांना माहिती आहे. महापालिकेला उत्त्पन्न मिळवून देणारा प्रस्ताव आहे. सध्या महापालिकेची आर्थिक स्थिती कमजोर असल्याने उत्त्पन्न मिळवून देणारा हा प्रस्ताव संमत केला जावा.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>सार्वजनिक बांधकाम समितीत आमच्या पक्षाचे कुणी सदस्य नाहीत त्यामुळे तेथे काय चर्चा झाली, ठराव झाला तो आम्हाला माहित नाही.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:- मला वाटते हा प्रस्ताव सर्व संमतीने संमत झाला तर खुप चांगले होईल.

मा.सदस्य श्री.ठाकुर वेहरानी:-गोषवारा तर वाचुन दाखवा काय विषय आहे तो?

मा.आयुक्त:- हा प्रस्ताव यासाठी आयत्त्यावेळच्या विषयामध्ये आणण्यात आलेला आहे की, याबाबत मागविण्यात आलेल्या निविदा दिनांक २३.१०.२००० रोजी सायंकाळी ५.०० वाजता उघडण्यात आल्या त्यानंतर स्थायी समितीची पहिली पहिली जी सभा असेल तर ती आजची सभा आहे, काम लवकरात लवकर सुरू करता यावे म्हणुन हा प्रस्ताव आजच्या सभेत चर्चेस आणलेला आहे. सर्वसाधारण महासभेत या प्रस्तवावर सविस्तर चर्चा झाली नाही. निविदे मध्ये ज्या काही अटी शर्ती घातलेल्या आहेत त्यावर चर्चा झाली पाहीजे म्हणुन हा प्रस्ताव स्थायी समितीपुढे चर्चेस आणला आहे. मला वाटते हा प्रस्ताव सर्व संमतीने संमत केला जावा.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-पुढच्या सभेच्या कार्यसुचीवर आणला तर काय हरकत आहे? आम्हाला या प्रस्तावावर अभ्यास करावयाचा आहे.

मा.सदस्य श्री.ठाकुर वेहरानी :- सर्व संमतीने समंत होत नसेल तर बहुमताने हा प्रस्ताव संमत होऊ शकतो ना?

मा.सदस्य श्री.कुमार आयलानी :- यांना कोणताही प्रस्ताव योग्य वाटत नाही तर काय करायचे?

मा.सदस्य श्री.ठाकुर वेहरानी :- आयुक्त साहेब, आपण माहिती दया...

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- या प्रस्तावाबाबत कुणालाही माहिती नाही. एका सदस्याला समोर ठेऊन त्याचा विषय तातडीने या स्थायी समितीत आयत्त्यावेळी आणला आहे.

मा.आयुक्त :- मला काय माहिती निविदा कोण भरणार? व कोण त्यावेळी उपस्थित राहील?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- निविदा भरणे सर्वांसाठी खुली होती. व हा तर आयुक्तांवर आरोप आहे.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- आमचा या प्रस्तावास विरोध आहे.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी:- शिवसेना भाजपाचे वरिष्ठ म्हणतात की, याबाबत सविस्तर माहिती घेतली जावी म्हणुन माझे असे म्हणणे आहे की, हा



प्रस्ताव आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस न आणता पुढच्या सभेच्या कार्यसुचीवर हा विषय चर्चेस आणला जावा, ३० वर्षासाठी टाऊन हॉल भाडे पट्ट्याने दयायचा आहे, शहराचा प्रश्न आहे, शहराबाबत आमची सुध्दा काही जबाबदारी आहे. आजपर्यंत सर्व ठराव सर्व संमतीने समंत झाले आहेत. आज या प्रस्तावावर मतदान व्हावे किंवा बहुमताने हा विषय समंत करणे हे बरोबर नाही आहे, प्रस्ताव एक आठवडयाने पुढे ढकलला तर काय फरक पडणार आहे?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- कोण वरीष्ठ? नाव सांगा. मिळकतींच्या सर्व्हेक्षणाचे टाटा इन्फोटेकला ८४ लाखाचे आयुक्तांनी जे काम दिले ते महानगरपालिकेला फायदयाचे होते. तसेच आजचा हा विषय सुध्दा महापालिकेच्या

फायदयाचा आहे, हा प्रस्ताव ज्या महासभेत समंत झाला त्या सभेचे इतिवृत सुध्दा कायम झालेले आहे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :- हा प्रस्ताव एक आठवडा पुढे ढकलला तर काय फरक पडणार आहे?

<u>मा.सदस्य श्री.ठाकुरदास बेहरानी</u> :- आयुक्त साहेब गोषवारा वाचुन दाखवत असतील तर आपणास काय हरकत आहे?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- या प्रस्तावाबाबत मा. उपमहापौर साहेबांशी सुध्दा एक तास सविस्तर चर्चा झालेली आहे.

<u>मा.आयुक्त</u> :- श्री.पाटणकरांची मा.उप-महापौर साहेबांशी चर्चा झाली आहे.

<u>श्री.पाटणकर (उपआयुक्त जकात):-</u> त्यांनी विचारले होते. प्रवेश फी कधी पासून लावणार आहात?

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण</u> :- या प्रस्तावाबाबत मा.उपमहापौर साहेबांनी जश्या सूचना केल्या तश्या अन्य कुणास करायच्या असतील तर? यास्तव हा विषय सविस्तर विचार विनिमय करून पूढच्या नियमित सभेच्या कार्यसूचीवर आणला जावा.

<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :-</u> हा प्रस्ताव महासभेत चर्चेस आला होता. त्यावेळी त्याबाबतचा सविस्तर गोषवारा (सह माहिती) सर्व सदस्यांना त्यावेळी प्रस्तुत करण्यांत आला होता. तो सर्वांनी वाचला असेलच.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी</u> :- आम्हाला दिलेला नव्हता...

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- गोषवारा सर्वांना दिला होता.

<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी</u> :- १९९७ मध्ये जेव्हा मी नगराध्यक्षा होते तेव्हा टाऊन हॉल विकसित करून त्याचे खाजगी करणाचा प्रस्ताव माझ्यासमोर आला होता. आम्ही त्या बाबत प्रयत्न केले होते. श्री. पप्पु कालानी यांनी शहराला अतिशय चांगला असा हा प्रोजेक्ट दिलेला आहे. करोड रूपये खर्च करून त्याचे बांधकाम केले आहे.काही काम अर्धवट आहे. त्यानंतर श्री. पप्पु कालानी यांना अटक झाल्यानंतर टाऊन हॉलचे काम बंद पडले आहे. एवढा खर्च करून बांधलेला हा टाऊन हॉल असाच पडून राहू नये म्हणुन खाजगीकरणातून या मालमत्तेचा विकास करण्याचा मुददा पुढे आला आहे. जस जसा कालावधी लोटला जात आहे, तसतशी या बांधकामाची किंमत व (स्ट्रेन्गथ)मजबुती कमी कमी होत आहे. एवढा खर्च करून बांधलेल्या या मिळकतीचा शहराच्या चांगल्या कामासाठी उपयोग झाला पाहिजे.



<u>मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी</u> :- परंतु आम्ही कुठे नाही म्हणतो? आम्ही म्हणतो हा विषय पुढच्या सभेत घेतला जावा. आयत्त्यावेळी चा प्रस्ताव म्हणुन आमचा यास विरोध आहे.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण / श्री. राजेंद चौधरी</u> :- विषय सुचीवर विषय आणला असता तर आम्ही त्याचे मंजूरीस संमती दिली असती, सार्वजनिक बांधकाम समितीत आमच्या पक्षाचा सदस्य नसल्याने या समितीत याबाबत काय चर्चा झाली/ ठराव झाला ते आम्हास माहित नाही.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- हा प्रस्ताव समंत केला जावा.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- हा ठराव आयत्त्यावेळचा विषय म्हणुन समंत करण्यास आमचा विरोध आहे. तसेच कुणा कुणाचा विरोध आहे?

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- आमची इच्छा आहे हा प्रस्ताव सर्व संमतीने समंत व्हावा.

मा.सचिव :- या प्रस्तावावर मतदान घ्यायचे काय?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- आयुक्त साहेबांनी प्रस्ताव आणलेला आहे, आम्हास वाटते मंजुर केला जावा.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- डब्बल व्हील बॉरोजचा प्रस्ताव सुध्दा आयुक्तांनीच आणला होता, तो का दोन -तीन वेळा पुढे ढकलला होता?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- डब्बल व्हिल बॉरोजचा प्रस्ताव स्थायी समिती सभेत जेव्हा चर्चेस आला होता. तेव्हा मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी हे दोन-तीन वेळा सभागृहातून बाहेर पडले होते. व पुन्हा सभागृहात येत होते, त्या सभेच्या इतिवृतांतात याची नोंद आलेली आहे. आता श्री. पारवानी हे हा प्रस्ताव समंत व्हावा या बाजूने आहेत? मला वाटते हा प्रस्त्ताव समंत केला जावा.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- या प्रस्तावास कुणा कुणाचा विरोध आहे?

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- या प्रस्त्तावास कुणाचा विरोध आहे त्यांनी आपले हात वर करावेत.

प्रस्तावाच्या विरूध्द :- १)श्री. रामचंद्र पारवानी
२)श्री.रमेश चव्हाण
३)श्री. राजेंद्र चौधरी
४)श्री. भगवान भांडे

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- या प्रस्त्तावाच्या बाजुने किती सदस्य आहेत त्यांनी हात वर करावेत....

प्रस्तावाच्या बाजुने :-१)श्रीमती.ज्योती कालानी.
२)श्रीमती. कांता गजवानी
३)श्री. कुमार आयलानी
४)श्री. नारायण पंजाबी
५)श्री. ठाकुर बेहरानी
६)श्री. विनोद तलरेजा
७)श्री. किशोर वनवारी
८)श्री. प्रमोद टाले.

--११--

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- मा. आयुक्तांनी आयत्त्या वेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेला हा दुसरा प्रस्ताव बहुमताने आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यांत येत असून तो बहुमताने समंत करण्यांत येत आहे.

## आयत्त्यावेळचा विषय

विषय :- महानगरपालिका मालकीचे टाऊन हॉल कॉम्पलेक्स पटट्याने बी.ओ.टी तत्त्वावर ३० वर्षासाठी देणेकामी श्री. कुमार पी. चैनानी यांची निविदा स्विकृती योग्य असून संविदेस मान्यता देणेबाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिका मालकीचे सेंन्ट्रल हॉस्पीटल जवळ, उल्हासनगर-३ येथील "टाऊन हॉल कॉम्पलेक्स" बी ओ टी तत्त्वावर ३० वर्षे मुदतीसाठी (बिल्ट, ऑपरेटर व ट्रान्सफर तत्त्वावर) देण्याचा प्रस्ताव तयार केला होता. सदर प्रस्तावास सार्वजनिक बांधकाम समिती ठराव क्रमांक ३ दिनांक ३/७/२००० अन्वये मान्यता मिळाली आहे तसेच महासभा ठराव क्रमांक ९ दिनांक २०.७.२००० अन्वये देखील मान्यता प्राप्त झालेली आहे.

सदर कामी विभागामार्फत निविदा मागविण्यासाठी दिनांक २० सप्टेंबर २००० रोजी विविध पांच वृत्तपत्रात जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. या सुचनेनुसार एकंदर सहा ठेकेदारांनी निविदा फॉर्म खरेदी केल्या व त्यापैकी दोन निविदा दिनांक २३.१०.२००० रोजी महानगरपालिकेस सादर करण्यात आल्या, त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

१. मे. जयहिंद कॉन्ट्रेक्टर्स लि, नेरूळ, नवी मुंबई.
२. कुमार पी चैनानी, शॉप नं ११२, बसंतराम चौक, उल्हासनगर-१.

उपरोक्त ठेकेदाराकडुन प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २३.१०.२००० रोजी सायंकाळी ५.०० वाजता अधिकारी पदाधिकारी व निविदाकारांच्या उपस्थित उघडण्यात आल्या व त्यांचा तुलनात्त्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| १ मे. जयहिंद कॉन्ट्रेक्टर्स लि.नेरूळ, नवी मुंबई | -- देकार रक्कम रूपये २,००,००,०००/- |
| २. कुमार पी चैनानी, शॉप नं ११२, बसंतराम चौक, उल्हासनगर-१ | --देकार रक्कम रूपये २,०२,८५,०००/- |

उपरोक्त निविदापैकी कुमार पी चैनानी यांची देकार रक्कम सर्वाधिक असलेने संविदा करणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र.१४४ दिनांक:- २५.१०.२०००

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. प्रमोद टाले.

--१२--

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिकेचे टाऊन हॉल कॉम्पलेक्स पटटयाने बी.ओ.टी. तत्त्वावर ३० वर्षासाठी देणे कामी श्री. कुमार चैनानी यांची निविदा स्विकृत असून संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>बहुमताने मंजुर</u>

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५. ०२ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)

महानगरपालिका सचिव.
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

<u>दिनांक</u>:-९.११.२०००

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक ९.११.२००० रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योति कालानी हया पिठसीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शाविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.कुमार आयलानी | सदस्य |
| २. | श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| ३. | श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| ४. | श्री. चौधरी राजेंद्र | सदस्य |
| ५. | श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ६. | श्री. पंजाबी नारायण | सदस्य |
| ७. | श्री.पारवानी रामचंद्र | सदस्या |
| ८. | श्री.बहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ९. | श्री. भांडे भगवान | सदस्य |
| १०. | श्री. टाले प्रमोद | सदस्य |
| ११. | श्री.तेजी कैलाश | सदस्य |
| १२. | श्री. किशोर वनवारी | सदस्य |
| १३. | श्रीमती. पदमा वलेचा | सदस्या |

तर

१)श्री.तलरेजा विनोद २)श्रीमती.राजानी भारती, हे मा.सदस्य/ सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :- सभेची वेळ झालेली आहे मा.सभापती / पिठासिन अधिकारी आलेल्या नाहीत. नियमानुसार सदस्यांमधुन एका सदस्याची पिठासिन अधिकारी म्हणुन निवड केली जावी.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी यांची सर्वानुमते पिठासिन अधिकारी म्हणुन निवड करण्यात आल्या नंतर ते पिठासिन अधिकारी या स्थानी आसनस्थ झाले. तर श्री. कमलेश सोनाले (उपायुक्त)यांना आयुक्तांनी प्राधिकृत केल्यानुसार ते आयुक्तांच्या आसनावर आसनस्थ झाले.

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी:- मा.सभापती सभेस येण्यासाठी घरून निघाल्या आहेत, त्या आल्यानंतर...?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-भाभी आल्यानंतर मी सदस्य या नात्याने माझ्या आसनावर जावून बसेन.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :- भाभी....?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:- होय. आमची भाभी म्हणजे मा.सभापती. ज्योती कालानी.

--१--

मा.सचिव:- विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि.२५.१०.२००० रोजीचे इतिवृत कायम करणे बाबत.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :-इतिवृत्तांतातील पृष्ठ क्र.११ वर आयत्त्यावेळच्या विषयाबाबत मा.सभापतींच्या निर्णयाची नोंद आलेली आहे. त्यामध्ये सदरचा प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यांत येत असल्याची नोंद आलेली आहे. या प्रस्तावास आमचा सुरूवातीपासून विरोध होता म्हणुन सर्वानुमते असे लिहिणे चुकीचे आहे.

मा.सचिव:-ठराव बहुमताने समंत झालेला आहे. इतिवृत्तांतील मा.सभापतीच्या नावे जी नोंद आलेली आहे. ती चुकीची आहे त्याठिकाणी सुधारणा केली जाईल.

मा.सदस्य श्री.राजेंद चौधरी:-तसेच प्रस्तावनेत उल्हासनगर चौधरी मालकीचे सेंन्ट्रल हॉस्पीटल जवळ अशी चुकीची नोंद आलेली आहे, माझी काही तेथे मिळकत नाही आहे. उल्हासनगर चौधरी मालकीचे ऐवजी उल्हासनगर महानगरपालिका मालकीचे अशी नोंद करावयास पाहिजे.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-यांचे सायंकाळी ४ . ४५ वाजता स्थायी समिती सभागृहात आगमन झाले. व त्या पिठासिन अधिकारी स्थानी आसनस्थ झाल्या तर मा.सदस्य श्री. किशोर वनवारी हे सदस्य या नात्याने त्यांच्या आसनावर आसनस्थ झाले.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :-इतिवृत्तांताच्या पृष्ठ क्र.९ वर मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांच्या निवेदनाची नोंद आलेली आहे. त्यामध्ये श्री. पप्पु कालानी यांनी टाऊन हॉल शहराला हा अतिशय चांगला प्रोजेक्ट दिलेला आहे अशी नोंद आलेली आहे. हा प्रशासक उल्हासनगर शहर वसाहत यांच्या कार्यालयातून (डिस प्लेस परसन) निर्वासित व्यक्तींना ज्या सनदा दिल्या जातात. त्यापासुन जी (मिळकत) प्राप्त होते त्यांच्यातुन महापालिकेला जे अनुदान दिले जाते त्या अनुदानातुन टाऊन हॉल तयार करण्यांत आलेला आहे. पप्पु कालानी यांनी शहराला हा प्रोजेक्ट दिला हे म्हणणे चूकीचे आहे.

मा. सचिव :- हे शब्द त्यावेळी मा.सभापती महोदयांनी म्हटलेले शब्द आहेत. आपणास जर याबाबत काही हरकत असेल तर.....

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :-टाऊन हॉल पप्पू कालानी यांनी दिलेला नाही.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- त्यांचे कार्यकालामध्ये स्पोर्टस कॉम्पेक्स, टाऊन हॉल इत्यादी मोठे-मोठे हे प्रोजेक्ट तयार झाले आहेत. श्री. पप्पु कालानी हे नगराध्यक्ष असताना या मिळकतींचे बांधकाम झालेले आहे. आपण आता जो विरोध करत आहात तो विरोध करायचा म्हणून विरोध करत आहात. विरोध कसा करायचा ते आमच्याकडुन शिकुन घ्या.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-आमचे म्हणणे आहे. त्यांचा उपयोग चांगल्या कामासाठी झाला पाहिजे.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- टाऊन हॉल विकसित करण्यासाठी पैसा नाही तर आम्ही सर्व नगरसेवक आपापल्या नगरसेवक निधीतून एक-एक लाखाचा निधी उपलब्ध करून देतो. त्यामध्ये मा.महापौर, उपमहापौर व स्थायी समिती सभापती इत्यांदीनी आपापल्या निधीतून ५-५ लाखाचा निधी उपलब्ध करून दयावा.

--३--

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी :- पहिले कुठे गेले होते हे विचार मांडण्यासाठी?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- महासभेत हा विषय आला होता व टेंण्डर काढले गेले होते तेव्हा का नाही बोललात?

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी :- मी एक गोपनिय गोष्ट सांगु इच्छितो की, या प्रस्तावास भाजपाचे अप्रत्यक्ष समर्थन होते म्हणुन त्यांनी त्यावेळी भाजपाच्या नगरसवेकांनी महासभेतुन जाणीवपूर्वक सभा त्याग केला होता. व त्याची इतिवृत्तांतात सुध्दा नोंद आलेली आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- काही सदस्य स्थायी समिती सुध्दा आले नव्हते. जे आले होते ते अधुन मधुन उठून जात होते.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :- आपणास बोलण्यास काही नाही म्हणुन काहीही बोलता. मी तर आपणांस भाऊ मानतो म्हणुन आपले बोलणे सहन करतो. दुसरा कुणी सहन करणार नाही.

मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी :- श्री. रामचंद पारवानी यांचे विचार चांगले आहेत. परंतु ते थोडया उशीरा सुचलेले विचार आहेत.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :-चूक कधीही सुधारली जावू शकते.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी :-झोपला तो संपला... इतिवृत्त बहुमताने कायम करण्यांत येत आहे.

मा.सचिव :- इतिवृत्त बहुमताने कायम झाल्याचे समजायचे काय?

मा.सदस्य श्री.नारायण पंजाबी :- नाही, नाही, एकमताने....

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- बहुमताने..? इतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यास आमची हरकत नाही परंतु मी ज्या दुरूस्त्या सूचविल्या आहेत त्या झाल्या पाहिजेत.

__मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी__ :- दि. २५.१०.२००० रोजीच्या सभेच्या इतिवृत्तांतात सुचविलेल्या दुरूस्त्या करून हे इतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

__मा.सचिव :-__ विषय क्र.२ वाचुन दाखवितात.

__मा.सदस्य श्री. किशोर वनवारी__ :- हा प्रस्ताव कुणाच्या प्रभागातील आहे?

__श्री. सोनावणे (नगररचनाकार)__ :- या प्रस्तावाबाबत मा. उपमहापौर यांनी शिफारस केलेली आहे.

__मा.सदस्य श्री. किशोर वनवारी__ :- मागील काही दिवसापूर्वीच्या स्थायी समिती सभेत सर्व सदस्यांनी एकमताने असा निर्णय घेतलेला आहे की, ज्या प्रभागात एस.टी.डी.बुथ बांधायचा आहे. त्या प्रभागातील नगरसेवकाची त्यास संमती असल्याबाबतचे संमतीपत्र (प्रस्तावासोबत) असले पाहिजे. हा प्रस्ताव श्रीमती आशा



जेस्वानी यांच्या प्रभागातील असून त्यांनी मला दुरध्वनीवरून असे कळविले आहे की, या प्रस्तावाबाबत माझे संमतीपत्र घेतलेले नाही.

आज पर्यंत असे जे प्रस्ताव समंत झाले त्यामध्ये संबंधित त्या-त्या नगरसेवकाचे संमतीपत्र घेतलेले आहे.

__मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण__ :- तसा काही नियम आहे का?

__मा.सदस्य श्री. राजेदं चौधरी__ :- श्रीमती आशा जेस्वानी यांचा या प्रस्तावास विरोध आहे का?

__मा.सदस्य श्री. किशोर वनवारी__ :- त्यांचे म्हणणे आहे की, त्यांनी माझे संमती पत्र घेतलेले नाही, संमती पत्र नव्हते म्हणुन मी माझ्या प्रभागातील असा एक प्रस्ताव दोन वेळा (रिजेक्ट केला होता) नाकारला होता. यास्तव हा प्रस्ताव पूढे ढकलला जावा.

__मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :-__ ठिक आहे. आपल्या प्रभागातील किंवा पक्षाचा प्रस्ताव आला तर आम्ही सुध्दा असेच बोलू.

__मा.सदस्य श्री. किशोर वनवारी__ :-आम्ही आमचे सदस्य श्री. नारायण पंजाबी यांचा प्रस्ताव सुध्दा याच कारणास्तव नाकारला होता.

__मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी__ :-हा प्रस्ताव पूढे ढकलून पून्हा मंजुरीस आणला जावा.

__मा.सदस्य श्री. किशोर वनवारी__ :- पूढे ढकलण्याचा अर्थ काय?

__मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी__ :- माझे म्हणणे आहे संबंधित नगरसेवकाचे संमती पत्र घेतल्यानंतर हा प्रस्ताव पुन्हा मंजुरीस आणला जावा.

__मा.सदस्य श्री. किशोर वनवारी__ :- हा प्रस्त्ताव पुढे ढकलला जावा.

__मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी__ :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढे ढकलण्यांत येत आहे.

विषय :- अपंग अर्जदार श्री.बालु ब्रिजलाल यांना तहसिलदार कार्यालयाच्या बाजूला, विकलांग शाळेच्या शेजारी, उल्हासनगर-५ येथील महापालिकेच्या जागेवर तात्पुरत्त्या स्वरूपी एस.टी.डी. बुथ बांधणे व चालविणे कामी परवाना देणे बाबत.

मा.सचिव :- विषय क्र.३ वाचुन दाखवितात.
हि कामे नगरसेवक निधीतील आहेत.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- प्रभाग क्र.३ व २४ मधील कामांचा प्रस्ताव आहे ना? समंत केला जावा.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--५--

विषय :-. नगरसेवक निधीतून प्रभाग क्र.३ व २४ मध्ये भुयार गटार योजने अंतर्गत भुयार गटार पाईप लाईन टाकणे, जोडणे व दुरूस्तीकरणे कामीचे दोन प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. १४५ दिनांक :- ९.११.२०००,

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री.नारायण पंजाबी.

हि स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्त्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| १. | बॅरेक क्र.१६४६ प्र.क्र.२४ कॅम्प क्र.४ येथे भुयार गटार टाकणे, जोडणे आणि दुरूस्ती करणे (नगरसेवक निधीतून) | ८१,६९४/- |
| २. | उल्हासनगर-१ येथील प्र.क्र.३ येथे | |

भुयार गटार पाईप लाईन टाकणे, जोडणे आणि दुरूस्तीकरणे (उपमहापौर निधीतून) ६७,८४८/-

---

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--६--

मा.सचिव :- विषय क्र४ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. कुमार आयलानी :- हा प्रस्ताव समंत केला जावा.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- मा.स्थायी समिती सभापती निधीतून व नगरसेवक निधीतून अनुक्रमे प्रभाग क्र४० ,९ व प्रभाग क्र. ३ मधील सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत करावयाच्या कामीचे तीन प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. १४६ दिनांक :- ९.११.२०००,

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी.

हि स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर येथिल प्र.क्र. ४० मध्ये विविध ठिकाणी सी.सी. पायवाटा व नाल्या बांधणे. (मा. स्थायी समिती सभापती निधीतून) | ९९,९००/- |
| २. | उल्हासनगर-२ येथील प्र.क्र.९ मध्ये सुपर चौक ते शारदा विद्यानिकेतन पर्यंतचा रस्ता बी.एम.ए.सी ने विकसित करणे (नगरसेवक निधीतून) | ९९,९००/- |

--७--

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर-१ येथिल प्र.क्र. ३ मध्ये शनिवार मढवी, प्रदिप भंडारे हाऊस आणि विविध ठिकाणी सी.सी. पायवाटा व नाल्या बांधणे. (नगरसेवक निधीतून) | ४९,९००/- |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ४ . ५० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषय</u> :- सोबत जोडलेल्या दोन गोषवा-यात नमुद केलेल्या जागी जलवाहिनी टाकण्या कामीच्या दोन प्राकलनास <u>प्रशासकिय व वित्तिय मान्यता देणे बाबत.</u>

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १४८ <u>दिनांक</u> :-१६.११.२०००,

सुचकाचे नाव :-श्री. ठाकुर वेहरानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. कुमार आयलानी.

हि स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| १. | आशेळे गावाकरिता कॅनरा बॅंक मेन रोड ते व्ही.टी.सी मानेरा गाव रोड पुढे ५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे. | १,४०,०००/- |
| २. | उल्हासनगर-४ वार्ड क्र. ५२ मध्ये कलानी सोसायटी ते अभय स्टोअर पर्यंत ६५ मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे. (नगरसेवक निधीतून) | १,८८,३५०/- |

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने मंजुर.</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय :- सोबत जोडलेल्या गोषवा-यात नमुद केलेल्या जागी सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत करावयाच्या बारा कामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. १४९ दिनांक :-१६.११.२०००,

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी.

हि स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर-२ येथील प्र.क्र६६ मध्ये ६ बैठकीचे शौचालय बांधणे या मंजुर झालेल्या कामाऐवजी उल्हासनगर-१ येथील प्र.क्र६६ मध्ये हिंदुस्थान क्लॉथ स्टोअर्सचे बाजूला एम-२५० ने रस्ता आणि नाली बांधणे (महापौर निधीतुन) | २,१०,०००/- |
| २. | उल्हासनगर-१ येथील प्र.क्र३५ मध्ये बॅ.नं.१०४, काका कोरगांवकर यांचे घराजवळ १० बैठकीचे शौचालय बांधणे. (महापौर निधीतुन) | ३,००,०००/- |
| ३. | उल्हासनगर-१ येथील प्र. क्र६४ मध्ये बॅ.नं. १८९, १९० जवळ आणि विविध ठिकाणी एम-२५० ने रस्ता आणि नाल्या बांधणे. (नगरसेवक निधीतुन) | २,९९,६२५/- |
| ४. | उल्हासनगर-४ येथील प्र.क्र४५ मध्ये दुर्गानगर येथे विविध ठिकाणी एम-२५० ने रस्ता बांधणे. (नगरसेवक निधीतुन) | ९३,५५०/- |
| ५. | उल्हासनगर येथील प्र. क्र२० मध्ये आंबेडकर नगर मध्ये विविध ठिकाणी सी सी पायवाटा आणि नाल्या बांधणे. (नगरसेवक निधीतून) | ७७,०००/- |
| ६. | उल्हासनगर-३ येथील प्र.क्र१२ मध्ये नेनूमल अपार्ट, बॅ.नं.१०७३ मागे सी सी पायवाटा आणि नाली बांधणे, (स्थायी समिती सभापती निधीतून) | ९९,९५०/- |

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
| --- | --- | --- |
| ७. | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र४८ मध्ये जय जनता कॉलनी बॅ.नं.१८७६ ते १८७४ आणि भाजी मार्केट येथे सी सी रोड आणि नाली बांधणे.(नगरसेवक निधीतुन) | १,९९,८५०/- |
| ८. | उल्हासनगर-१ येथील प्र.क्र३५ मध्ये बॅ.नं८९ ते ९५ जवळ आणि विविध ठिकाणी एम-२५० ने रस्ता आणि नाल्या बांधणे. (नगरसेवक निधीतुन) | २,९९,६१५/- |
| ९. | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र४८ मध्ये बॅ.नं१८९८ ते १८९२ पर्यंतचा रस्ता सी सी रोड बांधणे. (नगरसेवक निधीतून) | १,९९,९९०/- |
| १० | उल्हासनगर-१ येथील प्र.क्र ६४ मध्ये सतगुरू ट्रेडर्स जवळ साकव बांधणे या मंजुर झालेल्या कामाऐवजी उल्हासनगर-१ येथील प्र.क्र६४ मध्ये बॅ.नं.१७२,७३ जवळ विविध ठिकाणी सी सी पाथवे आणि नाल्या बांधणे.(नगरसेवक निधीतून) | १,१४,०००/- |
| ११ | उल्हासनगर येथील प्र.क्र६३ मध्ये कुमार सोसायटी आणि हॅप्पी होम अपार्टमेंटच्या मधील नाल्याची भिंत बांधणे.(मा.महापौर निधीतून) | ९९,६००/- |
| १२ | उल्हासनगर येथील प्र.क्र.२० मध्ये नेहरू नगर आणि विविध ठिकाणी सी सी पायवाटा आणि नाला बांधणे. (नगरसेवक निधीतून) | ७५,०००/- |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर.</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषय :- अपंग अर्जदार श्री.बालु बिजलाल यांना तहसिलदार कार्यालयाच्या बाजूला, विकलांग शाळेच्या शेजारी, उल्हासनगर-५ येथील महापालिकेच्या जागेवर तात्पुरत्त्या स्वरूपी एस.टी.डी. बुथ बांधणे व चालविणे कामी परवाना देणे बाबत.

प्रस्तावना

अर्जदार श्री. बालु बिजलाल महानुभाव हया अपंग व्यक्तीस टेलिफोन बुथ चालविणेसाठी तहसिलदार कार्यालयाच्या बाजुला विकलांग शाळेजवळ गांधीरोड उल्हासनगर ५ येथे जागा मागीतली आहे.

अर्जदार व्यक्तीस अपंग असल्यामुळे अत्त्यंत तात्पुरत्त्या स्वरूपात ४ x ४ची लाकडी कॅबीन मध्ये टेलिफोन बुथसाठी खालील अटींवर परवानगी बाबत स्थायी समितीची संमती घेणे आवश्यक आहे.

१) महानगरपालिका सांगेल त्यावेळी लाकडी कॅबीन (बुथ)हटवून जागा खाली करावी लागेल.
२) कोर्टातून कोणत्त्याही प्रकारचा स्टे आणता येणार नाही.
३) फक्त आपण तेथे काम करावे.
४) एस.डी.ओ ऑफिसच्या ना हरकत दाखला हयां कार्यालयात देण्यात यावा.
५) वरील बाबी अर्जदारास मान्य असल्याबाबत २०/-स्टॅम्प पेपर वर ॲफिडेव्हीड करावे लागेल.

स्थायी समिती ठराव क्र. १४७ दिनांक :- १६.११.२०००,

सुचकाचे नाव :-श्रीमती. भारती रजानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. रमेश चव्हाण.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार अपंग अर्जदार श्री. बालु बिजलाल महानुभव या व्यक्तीस वर नमुद केलेल्या महापालिकेच्या जागेवर आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्ती वर तात्पुरत्त्या स्वरूपात एस.टी.डी. बुथ बांधणे व चालविणे कामी एक वर्षाच्या कालावधीसाठी परवाना देणेस मान्यता देत आहे.

तसेच आयुक्तांच्या समाधानकारकतेस अधिन राहून सदरचा परवाना वेळोवेळी एका वर्षापेक्षा अधिक नसेल ऐवढया कालावधीसाठी नुतनीकरण करण्यासाठी आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>दिनांक</u>:-१६.११.२०००

## <u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक १६.११.२००० रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योति कालानी ह्या पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.कुमार आयलानी | सदस्य |
| २. | श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| ३. | श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| ४. | श्री. चौधरी राजेंद्र | सदस्य |
| ५. | श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ६. | श्री. पंजाबी नारायण | सदस्य |
| ७. | श्री.पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ८. | श्री.बहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ९. | श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| १०. | श्री. टाले प्रमोद | सदस्य |
| ११. | श्री.तेजी कैलाश | सदस्य |
| १२. | श्रीमती.राजानी भारती | सदस्या |
| १३. | श्री. किशोर वनवारी | सदस्य |

तर

१) श्री. भांडे भगवान  २) श्रीमती. पदमा वलेचा, हे मा.सदस्य/ सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u> मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी यांचा आज ४१ वा वाढदिवस आहे. स्थायी समितीचे आपण सर्व सदस्य त्यांना शुभेच्छा देऊ या. (मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी श्री.रामचंद पारवानी यांना पुष्पगुच्छ देवून वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या)

<u>मा.आयुक्त (श्री.आर.डी. शिंदे):-</u> मी सुध्दा प्रशासनाच्या वतीने श्री.रामचंद पारवानी यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो.

<u>मा.सदस्य श्री. कुमार आयलानी :-</u>तर सभागृहाच्या वतीने सभागृह नेते श्री. किशोर वनवारी हे श्री. रामचंद पारवानी यांना हार श्रीफळ देवून शुभेच्छा देतील.

यानंतर आर.पी.आयच्या वतीने श्री.टाले यांनी पुष्पगुच्छ देवून त्यांना शुभेच्छा दिल्या.तर अपक्षांच्या वतीने श्री. कुमार आयलानी यांनी पुष्पगुच्छ देवून त्यांना शुभेच्छा दिल्या.

यानंतर मा.सदस्या श्रीमती कांता गजवानी, श्री. ठाकुर बेहरानी, श्रीमती लविना कुंदनानी यांनी पुष्पगुच्छ देवून श्री.रामचंद पारवानी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

<u>मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी</u> :- आभारी आहे.

मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी :- सन्माननिय सदस्य हो. एका निकडीच्या कामासाठी मला बाहेर जावे लागत आहे.

सायंकाळी ४. ४७ वा.मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी स्थायी समिती सभागृहातून बाहेर पडल्या.

मा.सदस्य श्री.कुमार आयलानी:- आता या सभेचे कामकाज चालविण्यासाठी पिठासिन अधिकारी म्हणुन श्री. रामचंद्र पारवानी यांची निवड करावी असे मी सुचवू इच्छितो. श्री. पारवानी यांचा आज वाढदिवसही आहे. त्यांना पिठासिन अधिका-यांच्या आसनावर बसवून सन्मानित करू या.

मा.सदस्य श्री. कुमार आयलानी यांच्या प्रस्तावास १)श्री.प्रमोद टाले, २) श्री. रमेश चव्हाण, ३) श्री. राजेंद्र चौधरी, ४) श्री. ठाकुर बेहरानी यांनी अनुमोदन दिल्या नंतर मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी हे पिठासिन अधिका-यांच्या आसनावर सायंकाळी ४ . ४८ वाजता आसनस्थ झाले.

मा.सदस्य श्री. कुमार आयलानी :- पिठासिन अधिकारी महोदय, आता आपणास कसे वाटते? ब-याच दिवसानंतरची आपली इच्छा आज पुर्ण झाली.

मा.आयुक्त (श्री. आर.डी. शिंदे):-नेहमीसाठी पिठासिन अधिकारी व्हा. अशा आपणाकडुन त्यांना शुभेच्छा हव्यात?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- नेहमी करता? हे त्यांनी विसरून जावे. असे होवू शकत नाही. आम्ही त्यांना अंधारात ठेवू इच्छित नाही.

मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी :- परंतु श्री. पारवानी हे असे बोलणार नाहीत...

मा.सचिव :- विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. ९.११.२००० रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा.पिठासिन अधिकारी श्री. रामचंद्र पारवानी :- दि. ९.११.२००० रोजीच्या सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा.सचिव :- विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी यांचे सायंकाळी ५ . ०० वाजता स्थायी समिती सभागृहात आगमन झाले.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- या प्रस्तावास संमतीबाबत आताच श्री. रामचंद्र पारवानी यांनी मा. सदस्या श्रीमती. आशा जेस्वानी यांना दुरध्वनी वरून विचारणा केली, श्रीमती जेस्वानी यांनी त्याबाबत काय सांगितले?

मा.सदस्य पिठासिन अधिकारी श्री. रामचंद्र पारवानी :-त्यांनी त्याबाबत काही हरकत घेतलेली नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- ठिक आहे.

मा.पिठासिन अधिकारी श्री. रामचंद्र पारवानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.



विषय :- अपंग अर्जदार श्री.बालु ब्रिजलाल यांना तहसिलदार

कार्यालयाच्या बाजूला, विकलांग शाळेच्या शेजारी, उल्हासनगर-५ येथील महापालिकेच्या जागेवर तात्पुरत्त्या स्वरूपी एस.टी.डी. बुथ बांधणे व चालविणे कामी परवाना देणे बाबत.

प्रस्तावना

अर्जदार श्री. बालु ब्रिजलाल महानुभाव हया अपंग व्यक्तीस टेलिफोन बुथ चालविणेसाठी तहसिलदार कार्यालयाच्या बाजुला विकलांग शाळेजवळ गांधीरोड उल्हासनगर ५ येथे जागा मागीतली आहे.

अर्जदार व्यक्तीस अपंग असल्यामुळे अत्त्यंत तात्पुरत्त्या स्वरूपात ४ x ४ची लाकडी कॅबीन मध्ये टेलिफोन बुथसाठी खालील अटींवर परवानगी बाबत स्थायी समितीची संमती घेणे आवश्यक आहे.

१) महानगरपालिका सांगेल त्यावेळी लाकडी कॅबीन (बुथ)हटवून जागा खाली करावी लागेल.
२) कोर्टातून कोणत्त्याही प्रकारचा स्टे आणता येणार नाही.
३) फक्त आपण तेथे काम करावे.
४) एस.डी.ओ ऑफिसच्या ना हरकत दाखला हयां कार्यालयात देण्यात यावा.
५) वरील बाबी अर्जदारास मान्य असल्याबाबत २०/-स्टॅम्प पेपर वर ऑफिडेव्हीड करावे लागेल.

स्थायी समिती ठराव क्र. १४७ दिनांक :- १६.११.२०००,

सुचकाचे नाव :-श्रीमती. भारती रजानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. रमेश चव्हाण.

हि स्थायी समिती वरील प्रस्त्तावनेनुसार अपंग अर्जदार श्री. बालु ब्रिजलाल महानुभव या व्यक्तीस वर नमुद केलेल्या महापालिकेच्या जागेवर आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्ती वर तात्पुरत्त्या स्वरूपात एस.टी.डी. बुथ बांधणे व चालविणे कामी एक वर्षाच्या कालावधीसाठी परवाना देणेस मान्यता देत आहे.

तसेच आयुक्तांच्या समाधानकारकतेस अधिन राहून सदरचा परवाना वेळोवेळी एका वर्षापेक्षा अधिक नसेल ऐवढया कालावधीसाठी नुतनीकरण करण्यासाठी आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव:- विषय क्र.३ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी / श्रीमती कांता गजवानी :- कोणत्त्या निधीतील काम आहे?

या दोन कामांपैकी एक काम नगरसेवक निधीतील असून दुसरे काम कोणत्त्या निधीतून करायचे आहे. ते गोषवा-यात लिहिलेले नाही. पाणी पुरवठा विभागाचा हा प्रस्ताव असून त्या विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.धुत साहेब येथे उपस्थित आहेत ते याबाबत सविस्तर खुलासा करतील.

श्री. धुत (कार्यकारी अभियंता):-आशेळे गावातील रस्त्त्यांचे काम होते तेव्हा तेथील लोकांनी आम्हाला सहकार्य दिले होते.

मा.आयुक्त (श्री. आर.डी. शिंदे) :- आशेळे व मानेरा या गावांना जोडणा-या रस्त्त्याच्या कामांची पहाणी करण्यासाठी मा.महापौर साहेब व मी जेव्हा त्या ठिकाणी गेलो होतो तेव्हा तेथील लोकांनी आम्हास सांगितले की, आमच्या पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवत असाल तर रस्त्त्यांच्या कामात आम्ही आपणास सहकार्य करण्यास तयार आहोत.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :- परंतु साहेब ही गावे कल्याणच्या हद्दीत येतात का आपल्या?

मा.आयुक्त :- आपल्या महापालिकेच्या हद्दीवर आहेत.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- ठिक आहे.

नारायण पंजाबी यांनी श्री. पारवानी यांना पुष्पगुच्छ देवून शुभेच्छा दिल्या.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- ३३ रस्त्त्यांचे नुतनीकरण व रूंदीकरणााचे सद्या जे काम चालु आहे. त्यामध्ये गायकवाड पाडयाच्या रस्त्त्याचे जे काम प्रलंबित आहे ते काम नगरसेवक निधी ऐवजी सर्व साधारण निधीतून केले जाईल ना? ते काम सर्वसाधारण निधीतून केले जावे.

मा. आयुक्त (श्री. आर. डी. शिंदे) :-हा रस्ता विकास आराखडयामध्ये आहे. ३३ रस्त्त्यांच्या नुतनीकरण व रूंदीरकरण करताना त्यामध्ये येणा-या पाईप लाईन जोडणी व दुरूस्तीची कामे ही त्याच बरोबर केली जातील त्यासाठी वेगळे प्राकलन तयार करण्याची जरूरी नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- आणखी काही कामे प्रलंबित असतील तर ती सुध्दा आणली जावीत व सर्वसाधारण निधीतून केली जावीत.

मा. पिठासिन अधिकारी श्री. रामचंद्र पारवानी :- सदरचा प्रस्त्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- सोबत जोडलेल्या दोन गोषवा-यात नमुद केलेल्या जागी जलवाहिनी टाकण्या कामीच्या दोन प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. १४८ दिनांक :-१६.११.२०००,

सुचकाचे नाव :-श्री. ठाकुर बेहरानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. कुमार आयलानी.

हि स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
| --- | --- | --- |
| ३. | आशेळे गावाकरिता कॅनरा बॅक मेन रोड ते व्ही.टी.सी मानेरा गाव रोड पुढे ५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे. | १,४०,०००/- |
| ४. | उल्हासनगर-४ वार्ड क्र. ५२ मध्ये कलानी सोसायटी ते अभय स्टोअर पर्यंत ६५ मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे. (नगरसेवक निधीतून) | १,८८,३५०/- |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर.</u>

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र ४ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u> :- ही, १२ ही कामे नगरसेवक निधीतीलच आहेत ना?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- दोन लाख पर्यंतच्या खर्चाची कामे डी.डी.आर च्या शिफारशी नुसार केली जातात. २ लाख पेक्षा ज्यादा खर्चाच्या कामांसाठी निविदा मागविल्या जातात. परंतु माझ्या माहिती प्रमाणे असे एक पत्र आलेले आहे की, ५ लाख पर्यंतच्या खर्चाची कामे सुध्दा डी.डी.आर यांच्या मार्फत होवू शकतात.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.डी. शिंदे):-</u> श्री. शेंडे साहेब, वित्तिय मर्यादा वाढविली आहे काय? काही अडचण आहे का? असेल तर ती ही सांगा?

<u>श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक):-</u> डी.डी.आर यांना कामे देण्याबाबत शासनाचे जे परिपत्रक आहे ते आपणास बंधनकारक नाही. महापालिकेस लागु असलेल्या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार तर त्यांना कामे दयायची नाहीत.

<u>मा.सचिव</u> :- ते शासन परिपत्रक आपणांस बंधनकारक नाही आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- हया १२ कामांच्या प्राकलनास मंजुरी दिली जावी तसेच ही कामे डी.डी.आर (जिल्हा उप निबंधक) यांच्या शिफारशी नुसार झाली पाहिजेत. निविदा मागविल्या जाऊ नयेत अशी मी पिठासिन अधिकारी यांना विनंती करू इच्छितो.

मा. पिठासिन अधिकारी (श्री. रामचंद्र पारवानी) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- सोबत जोडलेल्या गोषवा-यात नमुद केलेल्या जागी सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत करावयाच्या बारा कामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. १४९ दिनांक :-१६.११.२०००,

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी.

हि स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर-२ येथील प्र.क्र.६६ मध्ये ६ बैठकीचे शौचालय बांधणे या मंजुर झालेल्या कामाऐवजी उल्हासनगर-१ येथील प्र.क्र.६६ मध्ये हिंदुस्थान क्लॉथ स्टोअर्सचे बाजूला एम-२५० ने रस्ता आणि नाली बांधणे (महापौर निधीतुन) | २,१०,०००/- |
| २. | उल्हासनगर-१ येथील प्र.क्र.३५ मध्ये बॅ.नं.१०४, काका कोरगांवकर यांचे घराजवळ १० बैठकीचे शौचालय बांधणे. (महापौर निधीतुन) | ३,००,०००/- |
| ३. | उल्हासनगर-१ येथील प्र. क्र.६४ मध्ये बॅ.नं. १८९, १९० जवळ आणि विविध ठिकाणी एम-२५० ने रस्ता आणि नाल्या बांधणे. (नगरसेवक निधीतुन) | २,९९,६२५/- |

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
| --- | --- | --- |
| ४. | उल्हासनगर-४ येथील प्र.क्र ४५ मध्ये दुर्गानगर येथे विविध ठिकाणी एम-२५० ने रस्ता बांधणे. (नगरसेवक निधीतुन) | ९३,५५०/- |
| ५. | उल्हासनगर येथील प्र. क्र.२० मध्ये आंबेडकर नगर मध्ये विविध ठिकाणी सी सी पायवाटा आणि नाल्या बांधणे. (नगरसेवक निधीतून) | ७७,०००/- |
| ६. | उल्हासनगर-३ येथील प्र.क्र.१२ मध्ये नेनूमल अपार्ट, बॅ.नं.१०७३ मागे सी सी पायवाटा आणि नाली बांधणे, (स्थायी समिती सभापती निधीतून) | ९९,९५०/- |
| ७. | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र ४८ मध्ये जय जनता कॉलनी बॅ.नं.१८७६ ते १८७४ आणि भाजी मार्केट येथे सी सी रोड आणि नाली बांधणे.(नगरसेवक निधीतुन) | १,९९,८५०/- |
| ८. | उल्हासनगर-१ येथील प्र.क्र ३५ मध्ये बॅ.नं.८९ ते ९५ जवळ आणि विविध ठिकाणी एम-२५० ने रस्ता आणि नाल्या बांधणे. (नगरसेवक निधीतुन) | २,९९,६१५/- |
| ९. | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र ४८ मध्ये बॅ.नं१८९८ ते १८९२ पर्यंतचा रस्ता सी सी रोड बांधणे. (नगरसेवक निधीतून) | १,९९,९९०/- |
| १० | उल्हासनगर-१ येथील प्र.क्र ६४ मध्ये सतगुरू ट्रेडर्स जवळ साकव बांधणे या मंजुर झालेल्या कामाऐवजी उल्हासनगर-१ येथील प्र.क्र६४ मध्ये बॅ.नं.१७२,७३ जवळ विविध ठिकाणी सी सी पाथवे आणि नाल्या बांधणे.(नगरसेवक निधीतून) | १,१४,०००/- |
| ११ | उल्हासनगर येथील प्र.क्र ६३ मध्ये कुमार सोसायटी आणि हॅप्पी होम अपार्टमेंटच्या मधील नाल्याची भिंत बांधणे.(मा.महापौर निधीतून) | ९९,६००/- |

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
| --- | --- | --- |
| १२ | उल्हासनगर येथील प्र.क्र.२० मध्ये नेहरू नगर आणि विविध ठिकाणी सी सी पायवाटा आणि नाला बांधणे. (नगरसेवक निधीतून) | ७५,०००/- |

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने मंजुर.**

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ४ . ५५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. पिठासिन अधिकारी श्री. रामचंद पारवानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः-२४.११.२०००

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक २४.११.२००० रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योति कालानी ह्या पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.कुमार आयलानी | सदस्य |
| २. | श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| ३. | श्री.पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ४. | श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ५. | श्रीमती.राजानी भारती | सदस्या |
| ६. | श्री. किशोर वनवारी | सदस्य |

तर

१) श्रीमती. कुंदनानी लविना, २)श्री. चौधरी राजेंद ,३)श्री. चव्हाण रमेश,४)श्री. पंजाबी नारायण,५)श्री.भांडे भगवान, ६)श्री.बहरानी ठाकुरदास,७)श्री. टाले प्रमोद,८)श्री.तेजी कैलाश, ९) श्रीमती. पदमा वलेचा, हे मा.सदस्य/ सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

मा.सचिव :- विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि.१६.११.२०००रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- दि.१६.११.२००० रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा. सचिव :-विषय क्र.२ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. कुमार आयलानी :-किती वर्षासाठी परवाना नुतनीकरणाचा प्रस्ताव आहे?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- एक वर्षासाठी......

मा.सदस्य श्री. कुमार आयलानी :- ठिक आहे.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :-अपंग अर्जदार श्री.अनिलकुमार एच. प्रिमलानी यांना महापालिकेच्या जागेवर एस.टी.डी. बुथ चालविणे कामी दिलेल्या परवान्यात नुतनीकरण करणे बाबत.



प्रस्तावना

अर्जदार श्री. अनिलकुमार एच. प्रिमलानी या अंपग व्यक्तीस पी.सी.ओ बुथ चालविण्यासाठी बॅरेक नं. २०५८ जवळ, नाका नं.११ चे बाजुला उल्हासनगर-५ असलेल्या मोकळया जागेत महानगरपालिकेने दिनांक १३.१०.२००० रोजी एका वर्षाकरिता परवानगी दिली होती. दिनांक १३.१०.२००० रोजी परवानगी संपत असल्याने नुतनीकरणासाठी अर्ज केलेला आहे. पुढील एका वर्षाच्या नुतनीकरण देण्यापुर्वी स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

वरील विषय मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे सादर करण्यांत येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १५०                    दिनांक :- २४.११.२००० ,

सुचकाचे नाव :-श्रीमती.भारती रजानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री.रामचंद्र पारवानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार अपंग अर्जदार श्री. अनिलकुमार एच. प्रिमलानी यांना वर नमुद केलेल्या महापालिकेच्या जागेवर एस.टी.डी. बुथ चालविणे कामीच्या परवान्याचे पूढील एका वर्षासाठी नुतनीकरण करण्यास मान्यता देत आहे.

तसेच आयुक्तांच्या समाधानकारकतेस अधिन राहून सदरचा परवाना वेळोवेळी एका वर्षापेक्षा अधिक नसेल ऐवढया कालावधीसाठी नुतनीकरण करण्यासाठी आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :-विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-कसला प्रस्ताव आहे? कोण सांगेल? एस.टी.डी. बुथ बांधण्याचा नविन प्रस्ताव आहे काय?

मा.सदस्य श्री. कुमार आयलानी :- एस.टी.डी. बुथ बांधण्याचा प्रस्ताव आहे. संबंधित प्रभागाच्या नगरसेवकाचे संमतीपत्र नसल्याने हा प्रस्ताव पूढे ढकलला जावा.

*<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा</u> :- संबंधित प्रभागाच्या नगरसेवकाचे संमतीपत्र नसल्यामुळे हा प्रस्ताव पुढे ढकलला जात असल्याची इतिवृत्तांत नोंद घेतली जावी.*

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :- समंतीपत्र नसल्याने हा प्रस्ताव पूढे ढकलला जावा व तशी इतिवृत्तांत नोंद घ्यावी असे त्यांचे म्हणणे आहे.*

*<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी</u> :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढे ढकलण्यांत येत आहे.*

*<u>विषय</u> :- अपंग अर्जदार श्री. शंकर काशिद आणि श्री. तोलाराम कन्हैयालाल या व्यक्तीस सोबत जोडलेल्या दोन गोषवा-यात नमुद केलेल्या महापालिकेच्या जागेवर तात्पुरता एस.टी.डी. बुथ बांधणे, चालविणे कामी परवाना देणे <u>बाबत</u>.*

*<u>मा. सचिव</u> :- विषय क्र.४ वाचुन दाखवितात.*

*<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u> विधान परिषद सदस्यांच्या निधीतून (एम.एल.सी. फंडातून)उल्हासनगर-४ येथील स्मशानभुमीमध्ये नविन शेड बांधण्याचे काम मंजुर झाले होते, मे. कांती कंन्स्ट्रक्शन या निविदाकाराने सर्वात लघुत्तम दर लिहिले होते त्यामुळे त्यांना हे काम देण्यांत आले होते. १२० दिवसामध्ये हे काम पुर्ण करावयाचे होते परंतु त्यांनी अदयाप काम सुरू केले नसल्याने त्यांची अनामत रक्कम जप्त करून जिल्हा उप निबंधका मार्फत मजुर कामगार सहकारी संस्थेकडुन हे काम करून घेण्यासाठी स्थायी समिती पुढे प्रस्तावित केले आहे.*

*<u>मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी</u> :- या कामी निविदा मागविल्या जाव्यात.*

*<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u> मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे नियम ५ (२)(२)अन्वये सदरचे काम करून घेण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत केले जावे.*

*<u>मा. सदस्य श्रीमती. भारती रजानी</u> :- लोकांची खुपच गैरसोय होत आहे. निविदा मागविल्यास खूप वेळ लागेल. हे काम अतिशय निकडिचे व तातडीचे असल्याने ५ (२)(२)नुसार मजूर कामगार सहकारी सोसायटी कडुन करून घेतले जावे.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> आम्ही आपल्या भावनांचा आदर करतो. आपण ब-याच दिवसांनी, पहिल्यांदाच काही मागीतले आहे,*

*<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :</u>- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

*<u>विषय</u> :- उल्हासनगर ४ येथील स्मशानभुमीमध्ये नवीन शेड बांधणे कामी आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत <u>करणे बाबत</u>.*

*<u>--४--</u>*

*<u>प्रस्तावना :-</u>*

उल्हासनगर-४ येथील स्मशानभुमी मध्ये नविन शेड बांधणे आवश्यक आहे हे काम करण्यासाठी जिल्हाधिकारी, ठाणे यांनी एम.एल.सी निधीतून करणेसाठी मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार महापालिकेने याकामाच्या निविदा मागविल्या होत्या. आलेल्या निविदेमध्ये मेसर्स कांती कंन्स्ट्रक्शन यांनी सर्वात कमी दराने म्हणजेचे १०. ७० टक्के दराने भरलेल्या निविदेस स्थायी समितीने ठराव क्र.८७, दि. ३०.१२.९९ नुसार मंजुरी दिलेली होती त्याप्रमाणे ठेकेदारास वर्क ऑर्डर नं.१५७९ दि.२९.१.२००० नुसार दिलेली होती त्या कामाचा कालावधी १२० दिवसांचा होता त्यानुसार सदर काम दि.२८.५.२००० पर्यंत पुर्ण करणे आवश्यक होते. मेसर्स कांती कंन्स्ट्रक्शन यांचे याबाबत वेळोवेळी संपर्क करूनही त्यांनी काम सुरू केले नव्हते त्यामुळे उल्हासनगर महानगरपालिकेने पत्र क्र.४११ दि.८.९.२००० नुसार सदर ठेकेदारास तीन दिवसांचे आत काम सुरू करावे जर हे काम तीन दिवसांचे आत सुरू केले नाही तर आपली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अशी ताकीद दिलेली आहे. हे पत्र देऊन सुध्दा ठेकेदारानी आजतागायत काम सुरू केले नाही त्यामुळे सदर काम रदद करण्यासाठी व ठेकेदाराची अनामत रक्कत जप्त करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने लेखा विभागामार्फत मा.आयुक्त यांचे कडे मंजुरीसाठी सादर करण्यात आले त्यानुसार संबंधीत ठेकेदाराचे अनामत रक्कम जप्त करण्यांत येत आहे तरी सदरचे काम नव्याने जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांचे मार्फत करणे साठी लेबर कॉ.ऑप.सोसायटी कडून अथवा निविदा बोलावूने करून घेण्यासाठी स्थायी समिती पुढे मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र.१५१ दिनांक :- २४.११.२०००,

सुचकाचे नाव :-श्रीमती.भारती रजानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री.रामचंद्र पारवानी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-४ येथील स्मशानभुमी मध्ये नविन शेड बांधणे कामी मागविलेल्या निविदेमधील सर्वात लघुत्तम दराचे निविदाकार मेसर्स कांती कंन्स्ट्रक्शन यांना कार्याआदेश तसेच वारंवार ताकीद देऊनही त्यांनी काम सुरू न केल्याने त्यांनी या कामी भरलेली अनामत रक्कम जप्त करून त्यांच्याशी केलेली संविदा रदद करण्यास तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने आयुक्तांना जिल्हा उपनिबंधक ठाणे यांचे मार्फत मजुर कामगार सहकारी संस्थेकडुन करवून घेण्यास प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--५--

मा.सचिव :- विषय क्र.५ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- हे काम श्री. प्रमोद टाले यांच्या प्रभागातील आहे.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :-मा.महापौर निधीतून व नगरसेवक निधीतून आंबेडकर चौक व उल्हासनगर स्टेशन जवळ उल्हासनगर-४ या ठिकाणी वॉटर कुलर पुरविणे व बसविणे कामी अंदाजित रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

प्र.क्र.१४ चे नगरसेवक श्री. प्रमोद टाले यांच्या मागणीनुसार उल्हासनगर कॅम्प ४ या विभागात रेल्वे स्टेशनजवळ आणि आंबेडकर चौक उल्हासनगर-४ येथे वॉटर कुलर पुरविणे व बसविणे या कामाकरिता रूपये १,४१,०२०-८० मात्र अंदाजित किंमतीचा प्रस्ताव सादर करण्यात आला.

या कामाकरिता मा.नगरसेवक प्र.क्र.१४ यांच्या नगरसेवक निधीतून ८६,८४०/- मात्र उर्वरित रक्कम रूपये ५४,१८०-८० मात्र मा.महापौर उल्हासनगर महानगरपालिका यांचे महापौर निधीतून लागणारा निधी उपलब्ध करून दिला आहे.

वॉटर कुलर प्रशासनातर्फे बसवून दिल्यानंतर त्याचे व्यवस्थापन, देखभाल व दुरूस्ती तसेच विद्युत पुरवठ्याची जबाबदारी स्थानिक, ''मारोती जाधव रिक्षा युनियन'' ने घेतलेली आहे.

सदर प्रस्त्तावास मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखापरिक्षक यांची शिफारस असुन जागेबाबत नगररचनाकार यांनी प्रमाणित केलेले आहे. तसेच मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली असून सदर प्रस्ताव प्रशासकीय व वित्तिय मंजुरीकरिता स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १५२ दिनांक :- २४.११.२०००,

सुचकाचे नाव :- श्री. कुमार आयलानी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती.कांता गजवानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर-४ येथील रेल्वेस्टेशन जवळ व आंबेडकर चौक उल्हासनगर-४ येथे वॉटर कुलर पुरविणे व बसविणे कामीचे अंदाजित रक्कमेपैकी रू.८६,८४०/- नगरसेवक निधीतून आणि

उर्वरित रक्कम रूपये ५४,१८०-८० महापौर निधीतून खर्च करण्या कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र ६ वाचुन दाखवितात.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- नगरसेवक निधीतून प्रभाग क्र ६७मध्ये आणि प्रभाग क्र. ३६ मध्ये अनुक्रमे दोन जेटपंप बसविणे व दोन पी.व्ही.सी.टाक्या बसविणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

विनंतीपुर्वक निवेदन की, उपरोक्त विषयांकित प्रकरणी सदर मा. नगरसेवकांचे अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेले असून मा. आयुक्त यांच्या परवानगीने सदर कामांची अनुक्रमे रूपये १,३०,०००/- व ७९,१९३/-या रकमेची अंदाजित प्राकलने या कार्यालयाने तयार केलेली आहेत.

सदर कामे अनुक्रमे प्र.क्र६७ मध्ये १)सतनाम कॉलनी मधील विंधन विहिर.२) बॅरेक क्र५३५ जवळ विंधन विहीरी यांना जेटपंप बसविणे आणि प्र.क्र. ३६ मध्ये १)तेजुमल चक्कीजवळ २)बॅरेक क्र१२७ जवळ ५००० लि.क्षमतेच्या पी.व्ही.सी टाक्या बसविणेच्या आहेत. सदर दोन्ही कामांसाठी लागणारा आवश्यक निधी नगरसेवक यांच्या निधीतून उपलब्ध आहे तसचे सदरची कामे पाणी टंचाईमुळे करणे आवश्यक आहेत आणि या प्रस्तावास लेखा शाखेने मान्यता व मा.आयुक्त यांचीही मान्यता प्राप्त झालेली आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करून याकामाच्या अनुक्रमे १)रू. १,३०,०००/- व २)रू.७९,१९३/- या अंदाजित प्राकलनांना प्रशासकीय आणि वित्तिय मान्यता मिळणेस व तद्नंतर रितसर काम करून घेणेच्या कार्यवाहीस परवानगी साठी सदर बाब स्थायी समिती सभेपुढे सादर करीत आहेत.

स्थायी समिती ठराव क्र. १५३ दिनांक :- २४.११.२०००,

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्र.क्र.६७ मध्ये सतनाम कॉलनी व बॅरेक क्र.५३५ जवळील विंधन विहीरीवर जेटपंप बसविणे तसेच प्र.क्र.३६ मध्ये तेजुमल चक्कीजवळ व बॅरेक क्र.११७ जवळ ५००० ली.क्षमतेच्या पी.व्ही.सी. टाक्या बसविणे कामीच्या अनुक्रमे १३,०००/- व ७९,१९३/- खर्चाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :-विषय क्र.७ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- प्रभाग क्र.१८ मध्ये कुठून कुठ पर्यंत जलवाहिनी टाकण्याचा प्रस्ताव आहे? एक मिनिट प्रस्ताव काय आहे तो वाचुन दाखविला जावा.

मांडरा (शाखा अभियंता):- प्रभाग क्र.१८ मधील नाका क्र.११ ते ओ.टी. सेक्शन उल्हासनगर-५ पर्यंतच्या ८० मी.मी. व्यासाच्या जलवाहिनीवरील अनाधिकृत नळ जोडण्या खंडीत करावयाच्या आहेत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- म्हणजे नविन जलवाहिनी टाकायची नाही. श्री. सेवलदास ठाकुर यांच्या प्रभागात नाका क्र.११ ते ओ.टी. सेक्शन पर्यंतच्या ३ इंची लाईनवर कुठेकुठे अनाधिकृत नळजोडण्या घेतल्या आहेत. त्यांचा शोध घेवून त्या हटवायच्या आहेत, हे काम ज्या ठेकेदाराला दिलेले आहे. तो फक्त खोदाईच्या कामाचे पैसे घेणार आहे, पाणी पुरवठा विभागाची कामे कधीच योग्य पध्दतीने होत नाहीत. प्रत्येक वेळी निविदेशिवाय थेट संविदेचाच प्रस्ताव मंजुरीस आणतात. निविदा कधीच मागवत नाहीत.

मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- नगरसेवक निधीतून प्रभाग क्र.९,१८व ५९ येथे जलवाहिनी टाकणे कामीचे तीन प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. १५४ दिनांक :- २४.११.२०००,

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

ही स्थायी समिती खाली नमुद केलेल्या जागी जलवाहीनी टाकणे कामीच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधीकृत करीत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव व नगरसेवकाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर-२ येथे प्र.क्र.९ मध्ये बालकनजी बारी बुस्टर ते चर्च पर्यंत जवळ राहूल नगर साठी ५० मी. मी.व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे बाबत. (नगरसेवक निधीतून) | ४७,९००/- |
| २. | उल्हासनगर-५ येथे प्र.क्र.१८ येथील ११ नंबर नाका ते कॅम्प-५ ओटी सेक्शन पर्यंतचा ८० मी.मी.व्यासाची जलवाहिनी वरील अनाधिकृत नळजोडण्या खंडीत करण्याबाबत (नगरसेवक निधीतून) | ५०,५५०/- |
| ३. | उल्हासनगर-३ येथे प्र.क्र.५९ मध्ये शमशान भुमी ते मोहता देवी चौक ते कौशल नगर जवळ ८० मी. मी.व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे बाबत. (नगरसेवक निधीतून) | ८१,९००/- |

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव:- विषय क्र.८ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :-नगरसेवक निधीतील कामांचा हा प्रस्ताव आपण येथे मंजुरीस आणला आहे या प्रभागातील नगरसेवकांचा १० लाखाचा नगरसेवक निधी पूर्ण झाला आहे की नाही? की अदयाप बाकी आहे?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):- ज्या ज्या नगरसवेकांचा नगरसेवक निधी बाकी आहे. त्यांच्या प्रभागातील कामांचा हा प्रस्ताव मंजुरीस आणला आहे.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :-ही कामे सुध्दा मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियमाच्या नियम ५ (२)(२)मधील तरतुदी नुसार करण्यात यावीत. त्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत केले जावे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- ठीक आहे, श्री. पारवानी यांच्या या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर शहरातील विविध प्रभागातील सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत करावयाच्या ७ कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. १५५ दिनांक :- २४.११.२०००,

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

ही स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्त्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधीकृत करीत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव व नगरसेवकाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर-४ येथील प्र.क्र.५१ मध्ये देवसमाज रोड, गोकुळधाम सोसायटी पंकज अपार्टमेंट मागे विनस सिनेमा ते मीरानी यांचे घरापर्यंतचा रस्ता बी.एम आणि ए.सी. ने विकसित करणे.(नगरसेवक निधीतून) | २,४६,०५०/- |
| २. | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र.२१ मध्ये ब्लॉक अे ७०० हिरापुरी चौक ते शांती प्रकाश ट्रस्ट पर्यंतचा रस्ता बी.एम आणि ए.सी ने विकसित करणे (नगरसेवक निधीतून) | १,९९,९००/- |

| अ.क्र | कामाचे नाव व नगरसेवकाचे नाव | अंदाजित रक्कम |
| --- | --- | --- |
| ३. | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र.२१ मध्ये ब्लॉक ऑ.७५० ते ७५८ पर्यंतचा रस्ता बी.एम. आणि ए.सी.ने विकसित करणे (नगरसेवक निधीतून) | ९९,९५०/- |
| २. | उल्हासनगर-४ येथील प्र.क्र.५१ मध्ये मीरानी यांचे घरामागे आणि विविध ठिकाणी सी.सी.पायवाटा आणि नाल्या बांधणे आणि दुरूस्त करणे. (नगरसेवक निधीतून) | ४९,९५०/- |
| ५. | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र.२१ मध्ये सहयाद्री पोलीस स्टेशन ते ब्लॉक ऑ.७३३ पर्यंतचा रस्ता बी.एम आणि ए.सी ने विकसित करणे (नगरसेवक निधीतून) | १,९९,९००/- |
| ६ | उल्हासनगर येथील बॅरेक.क्र.१२५, एस.आय. ऑफीसजवळ आणि विविध ठिकाणी सी.सी. पायवाटा आणि नाली बांधणे (नगरसेवक निधीतून) | १,६०,३००/- |
| ७. | उल्हासनगर-१ येथील प्र.क्र.५ मध्ये कमला नेहरू नगर येथे काशिराम कहार तबेल्या जवळ आठ बैठकीची शौचालये बांधणे आणि नाला बांधणे.(नगरसेवक निधीतून) | २,४८,२००/- |

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.९ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. कुमार आयलानी :- सदरचा प्रस्ताव समंत केला जावा.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय</u> :- नगरसेवक निधीतून व मा.स्थायी समिती सभापती यांचे निधीतून प्रभाग ७७ मध्ये बॅरेक १२९३-९४ येथे भुयार गटार पाईप लाईन टाकणे, जोडणे व दुरूस्ती करणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व <u>वित्तिय मान्यता देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त ठिकाणी भुयार गटार पाईप लाईन व चेंबर वारंवार चोकअप होत असुन दुरूस्तीची आणि पाईपलाईन टाकणेची आवश्यकता आहे. त्याकरिता रक्कम रूपये १,३३,४७३/- चे प्राकलन जिल्हा दरसुची १९९८-९९ च्या अधिन राहून तयार करण्यात आलेले आहे.

त्या भागातील नगरसेविका श्रीमती लविना एस. कुंदनानी व स्थायी समिती सभापती यांनी आपल्या निधीतून त्याकामासाठी निधी उपलब्ध करून दिलेला आहे.

सदर प्रस्तावास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता तसेच काम मजुर कामगार सहकारी संस्थेमार्फत करून घेण्यास स्थायी समिती कडून मंजुरी मिळावी.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १५६ <u>दिनांक</u> :- २४.११.२०००,

सुचकाचे नाव :-श्री. कुमार आयलानी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती.कांता गजवानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार प्र.क्र.७७ मध्ये बॅरेक क्र. १२९३-९४ येथे मा.स्थायी समिती सभापती व नगरसेवक निधीतून भुयार गटार पाईप लाईन टाकणे, जोडणे व दुरूस्ती करणे कामीचे रू.१,३३,४७३/-खर्चाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने मंजुर.</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--१२--

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र.१० वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :- या कामासाठी निविदा मागविल्या आहेत ना? तर हा प्रस्ताव समंत करण्यास हरकत नाही.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र.१ अंतर्गत काही रस्त्यांवर दिवाबत्ती लावणे कामी लघुत्तम दराच्या विविध निविदाकारांच्या निविदा स्विकृती योग्य असुन संविदेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

सादर करण्यात येत आहे की, महानगरपालिकेने महासभेच्या ठराव क्र.१२ दि.११.११.९९ अन्वये ३३ रस्त्यांचे रूंदीकरण करून बनविण्याचे कार्य हाती घेतलेले आहे त्यातुन महानगरपालिकेच्या तांत्रिक सल्लागार व सामान्य बांधकामखात्त्याच्या मतानुसार जे काही रस्ते दिवाबत्ती लावण्यासाठी तयार होत आहेत. त्या अनुक्रमांकात त्या रस्त्यावर दिवाबत्ती लावण्याची कार्यवाही करण्याचे कार्य हाती घेतले जात आहे. तसेच तांत्रिक सल्लागार व सार्वजनिक खात्त्याच्या सांगण्यानुसार जे काही रस्ते सध्या दिवाबत्ती लावण्यासाठी तयार होत आले आहेत. आणि दिवाबत्ती बसविणे शक्य आहे. त्यांचे प्राकलन १९९९-२००० च्या डी.एस.आर प्रमाणे बनवून वर्तमानपत्रात निविदा सुचना देऊन सिलबंद निविदा मागविण्यात आलेली आहे. त्यांचा तुलनात्त्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| कार्य क्र. | कार्य व रस्त्यांचे वर्णन | अंदाजित रक्कम | विविध कंपन्यांनी दिलेल्या दराचा तुलनात्त्मक तक्ता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | जयेश | प्रेम | विनय | जाधव | जे.डी. | बी.जे. |
| १. | बॅंक ऑफ बडोदा ते बलराम अपार्टमेंट उल्हासनगर-१ | १,६४,९२० | ७. ५५ टक्के कमी | ८.७५ टक्के कमी | ७.०० टक्के कमी | ---- | ---- | ८. ५०टक्के कमी |
| २. | शांतीनगर पेट्रोल पंप ते ब्रिज उल्हासनगर-३ | ४,३४,७६६ | ८. ५५ टक्के कमी | ---- | ---- | ९. ६५ टक्के कमी | ९.४० टक्के कमी | ८. ५० टक्के कमी |
| ३. | युनिटेक ते विठ्ठलवाडी चौक उल्हासनगर-३ | २,७१,९६५.५ | ८ . ५५ टक्के कमी | ----- | ----- | ९. ६९ टक्के कमी | ९. ४०टक्के कमी | ८. ५५ टक्के कमी |
| ४. | शामाप्रसाद मुखर्जी चौक ते रामगिरधर इंडस्ट्रीयल इस्टेट उल्हासनगर-३ | ३,३९,८५३.५ | ८. ५५ टक्के कमी | ---- | ----- | ९. ७५ टक्के कमी | ९. ५० टक्के कमी | ८. ९५ टक्के कमी |
| ५. | झुलेलाल मंदीर ते रूहानी सतसंग हॉल उल्हासनगर-२ | ३,४६,४८७ | ९. २० टक्के कमी | --- | --- | ९.८० टक्के कमी | १०.३५ टक्के कमी | १०.५६ टक्के कमी |
| ६. | बालकनजी बारी ते रेडक्रॉस उल्हासनगर-२/३ | ४,०१,९७२.५ | ९. ५० टक्के कमी | ---- | ---- | ९. ८० टक्के कमी | १०. ४० टक्के कमी | १०.६७ टके कमी |
| ७. | नेहरूचौक ते शिवाजी चौक उल्हासनगर -२/३ | ३,९३,९८८ | १०. ७५ टक्के कमी | ---- | ----- | ९. ८५ टक्के कमी | १०. ५० टक्के कमी | १०. ६० टक्के कमी |



वरील सर्व कार्य वेळेवर पुर्ण करण्यासाठी रस्त्याप्रमाणे निविदा मागविल्या आहेत व सदर तुलनात्त्मक तक्त्यानुसार मेसर्स जयेश इंजिनियर कॉर्पोरेशन मुंबई कार्य क्र.७ मध्ये सर्वात कमी दर दिलेले आहेत. मेसर्स प्रम इंटरप्रायझेस यांनी कार्य क्र.१ मध्ये सर्वात कमी दर दिलेले आहेत. मेसर्स जाधव ॲन्ड सन्स

कल्याण यांनी दोन, तीन व चार मध्ये सर्वात कमी दर दिलेले आहेत. मेसर्स विनय इलेक्ट्रीक सर्व्हिस व मेसर्स जे.डी. इलेक्ट्रीक वर्कस कुठल्याही कार्यात सर्वाधिक कमी दर दिलेले नाहीत आणि मेसर्स बी.जे.इलेक्ट्रीक कंपनी नाशिक यांनी कार्य क्र.५ व ६ मध्ये सर्वाधिक कमी दर दिलेले आहेत. व ज्या कार्यात कंपनीने सर्वाधिक कमी दर दिलेले आहेत ते दर वाजवी आहेत व महानगरपालिकेच्या सदर कार्यावर येणा-या खर्चाची पुरशी तरतुद अंदाजपत्रकात पण उपलब्ध आहेत यासर्व बाबी लक्षात घेऊन ज्या कार्यात ज्या कंपनीने सर्वात कमी दर दिलेले आहेत. त्यांच्या निविदेला मंजुरी देऊन लागणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र</u>. १५७ <u>दिनांक</u> :- २४.११.२००० ,

सुचकाचे नाव :-श्री. कुमार आयलानी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. कांता गजवानी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र.१ अंतर्गत तयार झालेल्या काही रस्त्यांवर दिवाबत्ती लावणे कामी मागविलेल्या निविदा पैकी वर नमुद केलेल्या कार्य अनुक्रमांक.१ करिता मे.जयेश इंजिनियरिंग कार्पोरेशन, कार्य अनुक्रमांक १ करिता मे. प्रेम इंन्टरप्राईजेस कार्य अनुक्रमांक २ ,३ ,व ४ करिता मे. जाधव अण्ड सन्स, कल्याण तर कार्य अनु क्र.५ व ६ करिता बि.जे.इलेक्ट्रीकल कंपनी नाशिक, तुलनात्मक तक्त्याप्रमाणे या लघुत्तमदराच्या निविदाकारांच्या निविदा स्विकृती योग्य असून आयुक्तांना संविदेस व अंतर्भूत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने मंजुर.</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र.११ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा</u> :- आमदार निधीतील हे काम आहे, त्यामधील फक्त लोकेशन बदली करण्यासाठी हा प्रस्ताव आणलेला आहे.



<u>मा.सदस्य श्री.कुमार आयलानी</u> :- कोणत्या प्रभागातील काम आहे?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- प्रभाग क्र.६७, श्री. मोहन रामरख्यानी यांच्या प्रभागातील हे काम आहे.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- प्रभाग क्र६७ मध्ये नाक्यापासून किशीन कन्हैया फर्नीचर पर्यंत ३५० सी.सी. ऐवजी प्रभाग क्र. ६७ मध्ये गणेश कारखाना ते गोविंद विश्वकर्मा यांच घर, सतनाम कॉलनी येथे रस्ता एक-२५० ने बांधणे कामी आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

प्रस्तावना :-

प्र.क्र६७ मध्ये नाक्यापासुन ते किशन कन्हैया फर्निचर पर्यंत ३५० सी सी करणे या मंजुर झालेल्या प्रभाग क्र६७ मध्ये गणेश कारखाना ते गोविंद विश्वकर्मा यांचे घर सतनाम कॉलनी येथे रस्ता एम-२५० ने बांधणे आवश्यक आहे सदर काम आमदार निधीतून करणेसाठी जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कडुन मंजुर होऊन आलेले आहे. पत्र क्र.एस.एस.२/८/५४१ दिनांक २६.५.२००० असा आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर काम लेबर को. ऑप सोसायटी मार्फत अथवा निविदा मागवून करून घेण्याकरिता मंजुरीसाठी पाठविले असता लेखा विभागाने सुचविले की,सदर कामाच्या निविदा बोलावून काम करण्यात यावे. तरी सदर काम करून घेणेसाठी स्थायी समिती संस्थेकडुन मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १५८ दिनांक :- २४.११.२०००,

सुचकाचे नाव :-श्री. कुमार आयलानी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. कांता गजवानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार प्र.क्र६७ मध्ये नाक्यापासुन किशन कन्हैया फर्निचरपर्यंत ३५० सी.सी.ऐवजी प्रभाग क्र६७ मध्ये गणेश कारखाना ते गोविंद विश्वकर्मा यांचे घर सतनाम कॉलनी येथे एम.२५० ने रस्ता बांधणे कामीच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.



तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर.</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ४. ५० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः-३०.११.२०००

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक ३०.११.२००० रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योति कालानी हया पिठसीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | |
|---|---|
| १. श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| २. श्री. चौधरी राजेंद्र | सदस्य |
| ३. श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ४. श्री.पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ५. श्री. बहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ६. श्री. भांडे भगवान | सदस्य |
| ७. श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ८. श्री. तेजी कैलास | सदस्य |
| ९. श्रीमती.राजानी भारती | सदस्या |
| १०. श्री. किशोर वनवारी | सदस्य |
| ११. श्री.पदमा वलेचा | सदस्या |

तर

१)श्री.कुमार आयलानी , २)श्रीमती. गजवानी कांता ३)श्री.पंजाबी नारायण ,४)श्री. टाले प्रमोद, हे मा.सदस्य/ सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

तर श्री.सोनाळे (उपआयुक्त) हे आयुक्तांच्या आसनावर आसनस्थ होते.

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि.२४.११.२०००रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u>त्या सभेस किती सदस्य उपस्थित नव्हते?

<u>मा.सचिव</u> :- ९ सदस्य उपस्थित नव्हते. फक्त ७ सदस्य उपस्थित होते.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u>७ सदस्य उपस्थित राहिले तरी ही सभेचे कामकाज होवु शकते काय?

<u>मा.सचिव</u> :- होय, किमान ५ सदस्य उपस्थित असले तरी सभेचे कामकाज होवू शकते.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u> दि.२४.११.२००० रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा. सचिव :-विषय क्र.२ वाचुन दाखवितात.



मा.सदस्य श्री. कैलास तेजी :-जुन्या बोअर ज्या बंद पडल्या आहेत त्यांचे काय करणार?

श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):- हे स्पष्टीकरण करण्यास उभे राहीले व मराठीत या पस्तावाचे स्पष्टीकरण करू लागले परंतु ते काय बोलत आहेत ते सदस्यांना ऐकु येत नव्हते.

मा.सदस्य श्री. ठाकुर बहरानी :- हिंदीत बोला व जरा मोठ्याने बोला.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-येथे (स्थायी समितीत) सुध्दा आता माईक सिस्टम बसवावी लागेल.

श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-उन्हाळयामध्ये काही ठिकाणी पाणी टंचाई निर्माण होते, पाणी टंचाई दुर करण्यासाठी काही विभागात तातडीने विंधन विहीरी खोदण्याचे प्रस्ताव हाती घेतले जातात, आपल्या शहरातील पाणी टंचाई लक्षात घेता प्रयत्न केले तर या योजनेनुसार २५ लाख रूपया पर्यंत शासननिधी मिळू शकतो. 'क' वर्ग नगरपालिकांना याकामी १०० टक्के शासनाकडुन अनुदान दिले जाते. 'अ' व 'ब' वर्ग नगरपालिकांना / महानगरपालिका याकामासाठी १० टक्के लोक वर्गणी दयावी लागते. यासाठी स्थायी समितीचा ठराव करणे आवश्यक आहे. तसेच भुजल सर्वेक्षण कार्यालय ठाणे, यांचे कार्यालयास जलशोधन करण्याकामी प्रती स्थल १०००/-रू.भरणे आवश्यक आहे. १३३ ठिकाणे याकामी सुचविलेली असून त्यापैकी १०२ ठिकाणी विंधन विहीरी घेण्यात येणार आहेत.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :- ज्या १०२ ठिकाणी विंधन विहीरी घेणार आहात त्यांची आपण यादी दिलेली नाही.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- ज्या १०२ ठिकाणी विंधन विहिरी घेणार आहात त्याची यादी आपण आम्हास दया. कुठे कुठे विंधन विहीरी घेणार आहात.

श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):- आम्ही १३३ ठिकाणे निवडली आहेत त्यातील १०२ ठिकाणी विंधन विहीरी घेतल्या जाणार आहेत. मागे पुढे आणखी काही विंधन विहीरी घ्यावा लागल्या तर यातुन घेतल्या जातील.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- कॅम्प १ ते ५ मधील सर्व प्रभागातील सर्व विभाग कव्हर झाला आहे ना?

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी :- कुणाला जर एखादया ठिकाणी विंधन विहीर घ्यायची नसेल तर त्याच्या बाजुला विंधन विहीर खोदुन घेता येइल का? त्याचे सुध्दा तुम्ही यामध्ये प्रावधान कराल ना?

श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-भुजल सर्वेक्षण कार्यालयाचे लोक याकामी सर्व्हे करण्यासाठी जेव्हा येतील. त्यावेळी ते ज्या ज्या ठिकाणी सर्व्हे करतील त्या प्रभागातील संबंधित नगरसेवकास सुध्दा बरोबर घेतले जाईल.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :- भुजल सर्वेक्षण कार्यालयाच्या लोकांनी सर्व्हे केल्यानंतर जी १०२ ठिकाणे निश्चित होतील त्यातील एखादया ठिकाणी विंधन

*विहीरी रद्द करण्यास कुणी सांगीतले तर ती रद्द केली जाऊ नये. विंधन विहीरीचे काम झाले पाहिजे.*

*<u>श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):</u>-भुजल सर्वेक्षण कार्यालयाच्या लोकांनी विंधन विहिरीचे स्थळ निश्चित करून दिले. परंतु तेथे पाणी लागले नाही तरच ते ठिकाण बदली केले जाईल.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- त्याठिकाणी पाणी लागले नाही तर उर्वरित जी स्थळे आहेत त्यातील एखादे स्थळ विंधन विहीर खोदण्यासाठी निवडले जावे.*

*<u>श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि)</u>:-होय, या ठिकाणा मधील ठिकाण निवडले जाईल.*

*<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :</u>- आम्हाला तेच म्हणायचे आहे.*

*<u>मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी</u> :- कॅम्प १,२,३, मध्ये आपण किती ठिकाणे सुचविली आहेत, आपणांस माहिती असेलच ना?*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :</u>- यादी दिली जावी.*

*<u>मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी</u> :- आम्ही हा प्रस्ताव समंत करू परंतु यादी दिली पाहिजे.*

*<u>मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण</u> :- जुन्या ज्या विंधन विहीरी बंद पडल्या आहेत. त्या दुरूस्त करण्यास आपणाकडे माणसे आहेत का? तक्रारी ॲटेंन्ड केल्या जात नाहीत.*

*<u>श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):</u>-आमच्या कडे माणसे आहेत ते तक्रारी ॲटेंड करतात. आपली काही तक्रार असेल तर दया.*

*<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> कुठे आहेत?*

*<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :- प्र.क्र१९ व ४९ या आमच्या दोन प्रभागात सहा विंधन विहीरी बंद पडल्या आहेत. माणसे येतात व फक्त हात लावून जातात, काम करून गेले म्हणजे काही निशानी असली पाहिजे. या ज्या विंधन विहीरीची दुरूस्ती करण्यांत आली त्या पुन्हा बंद पडल्या आहेत. त्यांची पुन्हा दुरूस्ती केली जावी.*

*<u>मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी</u> :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.*

*<u>विषय :-</u>शासन निधी २०००-२००१ मधून पाणी टंचाईच्या विविध ठिकाणी विंधन विहिरी खोदुन त्यांना हातपंप बसविणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे <u>बाबत.</u>*

<u>प्रस्तावना :-</u>

नागरी क्षेत्रात तातडीच्या योजनांचे अंतर्गत पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय यांच्या दिनांक १७.१०.२००० चे पत्रानुसार या कार्यालयाने उपरोक्त कामाचे रू.२४,९१,६०२/- रकमेचे अंदाजित प्राकलन तयार केलेले आहे.

सदर कामासाठी शासनाकडुन निधी मिळण्यासाठी शासनाच्या पत्रातील अटी प्रमाणे महानगरपालिकेस १० टक्के लोक वर्गणी जमा करणे आवश्यक आहे. तसेच प्रथम भुजल सर्वेक्षण कार्यालय ठाणे यांचेकडुन जलशोधन करणे जरूरीचे आहे व त्याचे रू.१०००/- प्रती स्थळ प्रमाणे त्यांच्या कार्यालयास भरणे जरूरीचे आहे. तदनंतर जलशोधन होऊन पुढील काम सुरू होणार आहे.

उपरोक्त परिस्थिती पाहता एकुण अंदाजित प्राकलन रक्कम १०० टक्के लोक वर्गणी स्वरूपात तसेच जल शोधन शुल्क रू.१०००/- प्रती स्थळ याप्रमाणे यांना मंजुरी मिळणे आवश्यक आहे म्हणुन सदर प्रकरण स्थायी समिती सभेपुढे प्रशासकीय व वित्तिय मान्यतेसाठी सादर करीत आहोत.

<u>स्थायी समिती ठराव क्र</u>.१५९ <u>दिनांक</u> :-३०.११.२०००.

सुचकाचे नाव :-श्री. रामचंद पारवानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. ठाकुर बेहरानी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार शासननिधी (२०००-२००१) मधुन पाणी टंचाईच्या विविध ठिकाणी विंधन विहिरी खोदुन त्यांना हात पंप बसविणे व कार्यान्वित करण्या कामीचे रू.२४,९१,६०२/-च्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच एकुण अंदाजित प्राकलनिय रक्कमेच्या १० टक्के लोकवर्गणी तसेच जलशोधन शुल्क रू.१०००/- प्रती स्थळ यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर.</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र.३ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी</u> :- कोण सांगेल? कोण कोणत्त्या शाळांमध्ये संगणक बसविणार? स्पष्टीकरण करण्यास संबंधित कुणी येथे उपस्थित नाही.

*<u>मा.सदस्य श्री. कैलास तेजी</u> :- कुणाच्या घरी ठेवणार? कोण चालवेल?*



*<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :- गोषवारा आहे ना?*

*<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी</u> :- आजच्या सभेतील आयुक्त सांगतील ना? गोषवा-यामध्ये लिहिले आहे निविदा न मागविता....*

*<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :- आयुक्त साहेब आपण यावर प्रकाश टाकावा, निविदा न मागविता. संगणक खरेदी करण्याचा प्रस्ताव मंजुरीस आणला आहे. संगणकास मंजुरी दिली पाहिजे. परंतु प्रत्येक प्रभागामध्ये पाच-पाच गरीब, गरजु, विधवा महिलांना शिलाई मशीन देण्याबाबतचा प्रस्ताव ब-याच दिवसापासून प्रलंबित असून त्या प्रस्तावाबाबत निविदा मागवत आहात. संगणकासाठी विना निविदा तर शिलाई मशीनसाठी निविदा मागवायच्या हे कसे?*

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u> :- संगणक कोणत्त्या शाळांमध्ये ठेवणार ते लिहिले नाही,नाही तर त्यानंतर म्हणाल संगणक चालविण्यासाठी १० शिक्षकांच्या नेमणुका करा म्हणुन?*

*<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी</u> :- आयुक्त साहेब, सांगतील ना?*

*<u>श्री. सोनाळे (उप-आयुक्त)</u>:-या प्रस्तावाबाबत मला काही माहीती नाही. आयुक्त साहेबांनी या प्रस्तावाच्या गोषवा-यावर स्वाक्षरी केली आहे, ते व संबंधित विभागाचे विभाग प्रमुख हेच यावर सांगु शकतील.*

*<u>मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी</u> :- आपल्या मतानुसार या प्रस्तावाबाबत काय केले पाहीजे?*

*<u>मा.आयुक्त(श्री.सोनाळे उपायुक्त)</u> :- प्रस्ताव मंजुरीस आणला आहे. परंतु मला याबाबत काही माहिती नसल्याने आयुक्त साहेब येईपर्यंत हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा.*

*<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी</u> :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढे ढकलण्यांत येत आहे.*

*<u>विषय :</u> महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी १० संगणक पुरविणे कामी निविदाशिवाय थेट संविदेस <u>आयुक्तांना प्राधिकृत करणे बाबत.</u>*

*<u>मा.सचिव :-</u> विषय क्र४ वाचुन दाखवितात.*

*<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

*<u>विषय :</u> खडेगोळवली येथील मल प्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल व दुरूस्ती कामी मे. वैभव इलेक्ट्रीक वर्कस-कल्याण यांची लघुत्त्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून संविदेस <u>मान्यता देणे बाबत.</u>*

प्रस्तावना :-

खडेगोळवली येथील मलप्रक्रीया केंद्र चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे या कामाकरिता वार्षिक कंत्राटी तत्त्वावर ठेकेदार नियुक्त करण्याबाबतचा रूपये १३,३१,७४८/- मात्र अंदाजित खर्चाचा प्रस्ताव पाणीपुरवठा व जलनिस्सारण विभागातर्फे सादर करण्यात आला. या प्रस्तावास स्थायी समिती ठराव क्र.१४ दि.११.५.२००० अन्वये प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळाली तसेच बाब क्र. ३७४, दि.९.५.२००० नुसार तांत्रिक मंजुरी घेण्यात आली आहे.

याकामाकरिता दैनिक नवभारत व दैनिक लोकमत या वृत्तपत्रातुन निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली. या निविदा सुचनेनुसार तीन ठेकेदारांनी आपल्या निविदा दिनांक २६.२००० रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेस सादर केल्या. या निविदा त्याच दिवशी दुपारी ५.१५ वाजता उघडण्यात आल्या. त्यात पुढील प्रमाणे दर नमुद केले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मेसर्स ए.व्ही.आर. इलेक्ट्रीकल्स नवी मुंबई | अंदाजित किंमतीपेक्षा (०.२ टक्के कमी) (रू.१३,२९,०८५/-) |
| २) | मेसर्स वैभव इलेक्ट्रीक वर्कस, कल्याण | अंदाजित किंमतीपेक्षा १३ टक्के कमी (रू.११,५८,६२१/-) |
| ३) | मेसर्स ओम इंडस्ट्रीयल इंजिनियरिंग सर्व्हिसेस, डोंबिवली. | अंदाजित किंमतीपेक्षा ०.७ टक्के कमी(रू.१३,२२,४२६/-) |

उपरोक्त निविदांपैकी मेसर्स वैभव इलेक्ट्रीक वर्कस, कल्याण यांची निविदा तुलनात्त्मकरित्त्या न्युनत्तम असून वाजवी दराची असल्याने स्विकारण्यास प्रस्तावित करण्यात आली. या प्रस्तावास मा. आयुक्त यांनी मान्यता दिल्याने उपरोक्त कामाची मे.वैभव इलेक्ट्रीक वर्कस, कल्याण यांची रूपये ११,५८,६२१/- मात्र रकमेची निविदा प्रशासकीय व वित्तिय मंजुरी करीता स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे. त्यास मंजुरी मिळण्याची विनंती आहे.

स्थायी समिती ठराव क्र.१६०                दिनांक :-३०.११.२०००.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती.लविना कुंदनानी.

हीं स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार खडेगोळवली येथील मलप्रक्रीया केंद चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे कामी मे.वैभव इलेक्ट्रीक वर्कस,



कल्याण यांची सर्वात लघुत्त्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून आयुक्तांना त्यांच्याशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर.</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव</u>:- विषय क्र.७ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी</u> :- कसला प्रस्ताव आहे?

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :- हा प्रस्ताव समंत केला जावा.

<u>श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता वि.वि)</u>:-महापालिका सभागृहात बसविलेल्या पब्लिक ॲड्रेस सिस्टमची वायरिंग लुज झाल्यामूळे या यंत्रणेत बिघाड झाला आहे. २२.११.२००० रोजीच्या महासभेच्या वेळी या वायरिंगच्या जंक्शन वरील सोल्डींग तुटले होते. हे काम यापूर्वी ते मॉर्डन रेडिओ हाऊस प्रा. लि.यांनी केले होते. त्यामुळे त्यांचेकडील अभियंत्यांना बोलावून तपासणी केली असता पुन्हा वायरिंग करावी लागणार आहे, . पब्लिक ॲड्रेस सिस्टम बरोबर एक राखिव पब्लिक ॲड्रेस सिस्टम बसविण्याची ही या प्रस्तावात तरतुद आहे.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण</u> :- श्री. बी.बी.मोरे यांना एक राखीव सिस्टम लावून दया तेच जास्त बोलतात.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u>:- त्या दिवशी आयलानी यांनी माईकची तात्पुरत्त्या स्वरूपाची व्यवस्था केल्याने विरोधी पक्षीयांचा आवाज दबु दिला नाही. यास्तव त्यांचे अभिनंदन केले पाहिजे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :- विरोधी पक्षीयांचा आवाज दाबण्याची सत्ताधारी पक्षीयांची त्या दिवसाची चाल होती ती श्री. मुकेश आयलानी यांनी तात्पुरत्त्या स्वरूपाची माईकची व्यवस्था करून चालु दिली नाही. यास्तव श्री. मुकेश आयलानी यांचे खरोखरच अभिनंदन केले पाहीजे.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :-आम्ही सत्त्ताधा-यांनी विरोधी पक्षीय कुणाचाही आवाज दाबण्याचा कधीच प्रयत्त्न केला नाही. महासभेच्या मागील दोन वर्षाच्या

इतिवृत्तांतावर प्रकाश टाकला तर आपणांस असे दिसून येईल की, महापौर श्री. हरदास माखीजा यांनी महासभेत सर्वांना बोलण्यास परवानगी दिली आहे.



एक-एक सदस्य दहा-दहा वेळा बोलत असतो, त्याच्यापूर्वीचे महापौर सदस्यांना ऐवढे बोलु देत नव्हते.

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी</u>:-श्री. बी.बी.मोरे यांना समजवा तेच पुन्हा पुन्हा बोलत असतात.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी</u>:- मा.महापौर, आपणासं सर्वात जास्त वेळ बोलण्यास परवानगी देतात.

<u>मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी</u> :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :</u> महापालिकेच्या सभागृहात लावलेल्या पब्लीक अड्रेस सिस्टम मध्ये सुधारणा करणे व एक लहान राखीव पब्लीक अड्रेस सिस्टम बसविणे कामी फिलिप्स इंडिया लि. कंपनीचे प्राधिकृत विक्रेते मे. मार्डन रेडिओ हाऊस-प्रा.लि. यांच्याशी मा.आयुक्तांना निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे <u>बाबत.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

महानगरपालिकेने जवळ जवळ तीन वर्षापुर्वी महासभेच्या हॉल मध्ये मेसर्स मॉडर्न रेडीओ हाऊस, प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई यांच्याकडुन आमसभेसाठी एक पब्लिक ॲड्रस सिस्टम बसविले होते त्या पब्लिक ॲड्रेस सिस्टम मध्ये २२.११.२००० रोजी झालेल्या दुस-या सभेच्या सुरवातीस अचानक बिघाड निर्माण झाला. त्यासाठी दुस-या दिवशी मेसर्स. मॉडर्न रेडिओ हाऊस प्रा.लि. यांच्या अभियंत्त्यांना बोलावून त्यांच्याकडुन तात्पुरत्त्या स्वरूपाची दुरूस्ती करून घेतली त्यांनी सांगीतले की, त्याप्रकारचा बिघाड वारंवार होऊ शकतो. यासाठी सध्या सिस्टम मध्ये काही सुधारणा करण्याचा सल्ला दिला व एक राखीव म्हणुन लहान पब्लिक ॲड्रेस सिस्टम करण्याचा सल्ला दिला. आणि यासाठी एकूण रू.२,२५,०००/- मात्र खर्चाची प्राकलन / दरपत्रक पण तयार करून दिली आहेत. त्या दरपत्रकात दिलेले दर वाजवी वाटतात. व मेसर्स मॉडर्न रेडिओ हाऊस प्रा.लि. मुंबई यांनी पूर्वीच्या पण पब्लिक ॲड्रेस सिस्टम बसविला आहे व ही कंपनी फिलिप्स आणि शुअर कंपनीच्या सामानाची प्राधिकृत विक्रेता आहे. सर्व बाबी लक्षात घेवून महानगरपालिकेच्या सभागृहात लावलेल्या पब्लिक ॲड्रेस सिस्टम मध्ये सुधारणा करण्याकरिता व राखीव पब्लिक ॲड्रेस सिस्टम बसविण्याकरिता मेसर्स मॉडर्न रेडिओ हाऊस प्रा.लि.यांना त्यांच्या दरानुसार थेट काम देण्याची मान्यता देऊन लागणारा अंदाजित खर्च रू.२,२५,०००/- मात्र यास प्रशासकीय व वित्तिय मंजुरीसाठी स्थायी समिती पुढे सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र</u>.१६१ <u>दिनांक</u> :-३०.११.२०००.

सुचकाचे नाव :-श्रीमती.पदमा वलेचा.

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद्र चौधरी.

--९--

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार महानगरपालिकेच्या सभागृहात लावलेल्या पब्लिक ॲड्रेस सिस्टम मध्ये सुधारणा करणे व एक लहान रखीव पब्लिक ॲड्रेस सिस्टम बसविणेकामी रक्कम रूपये. २,२५,०००/- यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असून आयुक्तांना मेसर्स. फिलिप्स ॲन्ड शुअर कंपनीचे प्राधिकृत विक्रेते मेसर्स मॉडर्न रेडिओ हाऊस प्रा.लि. यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिवः- विषय क्र.६ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-हा प्रस्ताव या पूर्वी मंजुरीस आला होता का?

मा.सचिव :- मागील काही दिवसापूर्वीच्या स्थायी समिती सभेसमोर हा प्रस्ताव मंजुरीस आला होता परंतु त्यावेळी श्री. धिरमलानी यांनी न्यायालयाकडुन स्थगित आदेश मिळविल्याने, या प्रस्तावावर चर्चा होऊ शकली नाही, न्यायालयाचा स्थगित आदेश आता रदद झाला असल्याने हा प्रस्ताव पुन्हा मंजुरीस स्थायी समिती पुढे ठेवला आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- या प्रस्तावावर श्री.ढाकरे साहेबांनी माहीती दयावी कारण की, उदया कदाचित सामनेवाल्याने न्यायालयात किंवा महासभेपूढे अपिल केले तर त्यावेळी आम्हाला त्याबाबत बोलता येईल, सविस्तर माहिती देता येईल.

मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा :- कायदयानुसार या प्रस्तावास स्थायी समितीने मंजुरी दयायची आहे की महासभेने? स्थायी समितीला हा अधिकार आहे का?

श्री. ढाकरे (उपायुक्त):- हा प्रस्ताव स्थायी समिती पुढे मंजुरीस आणला आहे. श्री. धिरमलानी यांनी माजी व प्रथम महापौर श्री. गणेश चौधरी यांच्या नावाने श्री. अमर ढमके यांच्याकडे पैसे मागीतले होते. श्री. चंदर धिरमलानी यांनी हे श्री. गणेश चौधरी यांच्यासमोर कबुल ही केले होते.

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी :- त्यांच्या नावाने पैशाची मागणी केली होती का?

श्री. ढाकरे (उपायुक्त):- पैसे घेतले होते.

--१०--

कायदेशिर बाबी पहाता याकामी चौकशी अधिका-याची नेमणुक केली होती, चौकशी अधिका-यांनी केलेल्या सखोल चौकशी अंती श्री.धिरमलानी यांच्यावरील दोष सिध्द झालेले असुन त्यांना महापालिकेचे सेवेतुन बडतर्फ करण्याची शिफारस केली आहे. मागील काही दिवसापूर्वीच्या स्थायी समिती सभे समोर हा प्रस्ताव चर्चेस आला होता परंतु त्याचवेळी न्यायालयातुन स्थगिती आदेश आला होता. निर्णय प्रलंबित होता हे सर्व गोषवा-यामध्ये सविस्तर आले आहे.

मा.सदस्य श्री.विनोद तलरेजा :- स्थायी समितीच्या निर्णयानंतर तो महासभेपुढे अपिल साठी जाईल काय?

श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक):- महासभेपुढे जाऊ शकतो.

श्री.ढाकरे (उपआयुक्त) :- महासभेपुढे अपील होवू शकते, परंतु हया प्रस्तावा वर निर्णय घेणे हा स्थायी समितीच्या अधिकारात आहे.

मा.सचिव :- जर त्यास स्थायी समितीचा निर्णय मंजुर नसेल तर तो स्वत: महासभेपूढे अपील करेल.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- हा प्रस्ताव आयुक्तांनी स्थायी समिती समोर चर्चेस आणला आहे ना? तर समंत करू या.

मा.सचिव :-प्रस्ताव समंत समजायचा?

मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी :-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- श्री. चंदर धिरमलानी, गॅरेज हेल्पर यांचेवरील गैरवर्तणुकीबाबतचे दोष सिध्द झाल्यामुळे त्यांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेतुन बडतर्फ करण्यास मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

श्री.चंदर धिरमलानी, गॅरेज हेल्पर उल्हासनगर महानगरपालिका, यांचे नावांसमोर दर्शविलेल्या कारणामुळे त्यांना महापालिकेच्या सेवेतून बडतर्फ करणे कामी तपशिल खालील प्रमाणे आहे.

दोषारोप पत्र क्रमांक युएमसी/जीईएन/टे-१/१४७ दिनांक १३.०६.१९९७ मधील सदर खातेनिहाय चौकशी अधिकारी श्री.जे.पी.शेंडे, मुख्य लेखा अधिकारी यांनी खातेनिहाय चौकशी पुर्ण करून त्यांनी महानगरपालिकेला जा.क्र. उमपा/चौआ/चं.धि./६०/२००० दिनांक २५.४.२००० अन्वये चौकशी अहवाल सादर केला.

सदर दोषारोप पत्रातील सर्व आरोपावरून संबंधित कर्मचारी यांना दोषी ठरविण्यात आले. श्री.चंदर धिरमलानी, गॅरेज हेल्पर ( व तत्कालीन अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मूलन विभागात मुकादम) यांनी आपल्या कामात



बेजबाबदारपणा दाखविल्याबद्दल त्यांना महापालिका सेवेतून बडतर्फ का करण्यात येऊ नये. याबाबत खुलासा करणे संबंधी त्यांना पत्र क्र. युएमसी/जीईएन/ईएसटी/ठे-१/२५ दिनांक २२.६.२००० अन्वये १० दिवसांच्या आंत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती, परंतु सदर कर्मचारी यांनी १० दिवसांच्या आंत उत्तरे दिलेले नाही.

सदर खातेनिहाय चौकशीत चौकशी अधिकारी यांनी खातेनिहाय चौकशी करून श्री.चंदर धिरमलानी, गॅरेज हेल्पर (तत्कालीन अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मुलन विभागात मुकादम) यांचे स्टेटमेंट व माजी महापौर, श्री. गणेश चौधरी यांनी दिलेले पत्र श्री. अमर ढमके यांची श्री.चंदर धिरमलानी यांनी केलेल्या उलट तपासणीच्या वेळेच्या वाचनाचे अवलोकन केले असता श्री.चंदर धिरमलानी यांनी श्री. अमर ढमके यांचे बांधकामाचे संरक्षण करणेसाठी व त्यांना अनधिकृत बांधकामाचा अवैध लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने त्यांच्याकडून रूपये ५०००/-(रूपये पाच हजार) घेतल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांच्या विरूध्द अप्रामाणिकपणाचा आरोप सिध्द होतो.

तसेच श्री.चंदर धिरमलानी यांचे काम करतांना अनधिकृत बांधकामांचे संरक्षण करण्यासाठी कोणत्त्याही प्रकारची व आपल्या कामाशी त्यांना एकनिष्ठ असावे असे अपेक्षित असतांना त्यांनी रूपये ५०००/- (रूपये पाच हजार) वरीलप्रमाणे घेतल्याचे दिसत असल्याने ते आपल्या कामाशी व महानगरपालिकेशी एकनिष्ठ होते असे वाटत नाही. त्यामुळे त्यांच्या विरूध्द लावलेला आरोप (ब्रीज ऑफ ट्रस्ट) विश्वास भंग हा ही आरोप सिध्द होतो.

सबब चौकशी अधिकारी यांचे चौकशी अहवालानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ प्रकरण ३ कलम ५(९)तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ५६ (२) (ह)अन्वये श्री.चंदर धिरमलानी, गॅरेज हेल्पर (तत्कालीन अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मूलन विभागात मुकादम )पुढे नोकरी मिळणेस अपात्र होईल अशा प्रकारे महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करणेस मा.स्थायी समिती,उल्हासनगर महानगरपालिकेची मान्यता मिळणेस प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र.१६२ दिनांक :-३०.११.२०००

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती.लविना कुंदनानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार श्री.चंदर धिरमलानी, गॅरेज हेल्पर ,यांचे वर नमूद केलेल्या गैरवर्तणुकी बददलचे खातेनिहाय चौकशी अंती ते दोषी असल्याचे सिदध झाल्यामुळे त्यांना महापालिकेच्या सेवेतून बडतर्फ का करण्यांत



येवू नये याबाबत त्यांनी खुलासा न दिल्यामुळे या पुढे नोकरी मिळण्यास सामान्यपणे ते अपात्र ठरतील. अशा प्रकारे महापालिकेच्या सेवेतून त्यांना बडतर्फ करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५ . १८ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

प्रकाश पं. कुकरेजा.
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-१३.१२.२०००

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा बुधवार दिनांक १३.१२.२००० रोजी दुपारी १२.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योति कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | |
|---|---|
| १. श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| १. श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| २. श्री. चौधरी राजेंद्र | सदस्य |
| ३. श्री. चव्हाण रमेश | सदस्य |

५. श्री.पारवानी रामचंद सदस्य
६. श्री.पंजाबी नारायण सदस्य
७. श्री. बहरानी ठाकुरदास सदस्य
८. श्री. भांडे भगवान सदस्य
९. श्री.तलरेजा विनोद सदस्य
१० श्री. तेजी कैलास सदस्य
११ श्रीमती.राजानी भारती सदस्या
१२ श्री. किशोर वनवारी सदस्य
१३ श्री.पदमा वलेचा सदस्या

तर

१)श्री.कुमार आयलानी , २)श्री. टाले प्रमोद, हे मा.सदस्यां सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्या व श्री. कमलेश सोनाळे उपआयुक्त हे आयुक्तांच्या आसनावर आसनस्थ होते.

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. ३०.११.२००० रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- </u>दि.३०.११.२००० रोजीच्या सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र.२ वाचून दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :-</u>यापूर्वी परवानगी दिलेला प्रस्ताव आहे काय?

<u>श्री. सोनाळे (नगररचनाकार)</u> :- नविन एस.टी.डी. बुथ बांधण्यास परवाना देण्याबाबतचे प्रस्ताव आहेत. यापैकी एक श्री. भुल्लर महाराज यांच्या प्रभागातील आहे तर दुसरा कॅम्प-५ मधील आहे.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :-</u> संबधित प्रभागाचे नगरसेवकांचे समंती पत्र प्रस्तावा सोबत आहे काय?



<u>मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> वाहतुकीस अडथळा येईल. अशा प्रकारे रस्त्यावर एस.टी.डी. बुथ बांधण्यास परवानगी दिली जाऊ नये अशा प्रकारची कोर्टाच्या आदेशानुसारची एक बातमी एका वृतपत्रात आल्याची माझ्या ऐकण्यात आले आहे.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी </u> :- श्री. अनिल कुमार यांना एस.टी.डी. बुथ बांधण्यास आपण एक वर्षापूर्वीच परवानगी दिलेली असून अदयाप त्यांनी एस.टी. डी. बुथ चालु केलेला नाही. दुसरे असे की, एस.टी.डी बुथ रस्त्याच्यामध्ये येत आहे.

<u>श्री. सोनावणे (नगररचनाकार):-</u> तात्पुरत्या स्वरूपी लाकडी एस.टी.डी बुथ बांधण्यास परवानगी देत असल्याने तो केव्हाही हटविता येण्यासारखा आहे.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- </u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय</u> :- अपंग अर्जदार श्री. शंकर काशिद आणि श्री. तोलाराम कन्हैयालाल या व्यक्तीस सोबत जोडलेल्या दोन गोषवा-यात नमुद केलेल्या महापालिकेच्या जागेवर तात्पुरता एस.टी.डी. बुथ बांधणे, चालविणे कामी परवाना देणे <u>बाबत</u>.

<u>प्रस्तावना:-</u>

अर्जदार श्री. शंकर मा.काशिद हया अपंग व्यक्तीस टेलिफोन बुथ चालविणेसाठी शहाड फाटक नाका नंबर १० जवळ श्री.कटकेश्वर बाबा मंदिराच्या बाजुला हरमन मोहता कंपनीची भिंतीला लागुन नालीवर जे फुटपाथ वर उल्हासनगर-१ येथे जागा मागीतली आहे.

अर्जदार श्री. तोलाराम कन्हैयालाल या अपंग व्यक्तीने टेलीफोन बुथ चालविण्यासाठी बॅरेक नं. १९६९चे समोर पाण्याचे बुस्टर आणि विद्युत जनेत्रचे मध्ये उल्हासनगर ५ येथे जागा मागीतली आहे.

अर्जदार व्यक्तीस अपंग असल्यामुळे अत्यंत तात्पुरत्त्या स्वरूपात ४ x ४ची लाकडी कॅबीन मध्ये टेलिफोन बुथसाठी खालील अटींवर परवानगी बाबत स्थायी समितीची संमती घेणे आवश्यक आहे.

१) महानगरपालिका सांगेल त्यावेळी लाकडी कॅबीन (बुथ)हटवून जागा खाली करावी लागेल.
२) सदर जागेचा वापर केवळ तात्पुरत्त्या स्वरूपात असून जागेबाबत मालकी हक्क पुर्णतः महानगरपालिकेचा असेल.
३) जागेचा वापर केवळ अर्जदार यांनाच करता येईल. भाडेकरू ठेवता येणार नाही.
४) प्रशासक कार्यालयाचा नाहरकत दाखला या कार्यालयात सादर करावा लागेल.
५) कोर्टातून कोणत्त्याही प्रकारचा स्टे आणता येणार नाही.
६) वरील बाबी अर्जदारास मान्य असल्याबाबत <u>२०/-स्टॅम्प</u> पेपर वर ॲफिडेव्हीड करावे लागेल.

--३--

<u>स्थायी समिती ठराव क्र</u>. १६३ <u>दिनांक</u> :- १३.१२.२०००,

सुचकाचे नाव :-श्री. रमेश चव्हाण.

अनुमोदकाचे नाव :-श्री. ठाकुरदास बहरानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार अपंग अर्जदार श्री. शंकर काशिद व श्री.तोलाराम कन्हैयालाल यांना वर नमुद केलेल्या महापालिकेच्या जागेवर आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्ती वर तात्पुरत्त्या स्वरूपात एस.टी.डी. बुथ बांधणे व चालविणे कामी एक वर्षाच्या कालावधीसाठी परवाना देणेस मान्यता देत आहे.

तसेच आयुक्तांच्या समाधानकारकतेस अधिन राहून सदरचा परवाना वेळोवेळी एका वर्षापेक्षा अधिक नसेल ऐवढया कालावधीसाठी नुतनीकरण करण्यासाठी आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :-विषय क्र ३ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-दोन प्रस्ताव आहेत काय?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- नविन एस.टी.डी. बुथ बांधण्यास परवाना देण्याचा प्रस्ताव आहे काय?

श्री.सोनावणे (नगररचनाकार):- एक नविन एस.टी.डी. बुथ बांधण्यास परवाना दयायचा आहे तर एका एस.टी.डी बुथच्या परवान्यास एक वर्षे पूर्ण झाले असल्याने त्याचे एक वर्षासाठी नुतनीकरण करण्याचा प्रस्ताव आहे, श्री. भुल्लर महाराज यांचे शिफारस पत्र आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- परवाना फक्त एक वर्षासाठीच देवू शकतो काय?

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

--४--

विषय :- अपंग अर्जदार श्री. राजेश त्रिपाठी आणि श्री. संजय तिवारी या व्यक्तीस सोबत जोडलेल्या दोन गोषवा-यात नमुद केलेल्या महापालिकेच्या जागेवर तात्पुरता एस.टी.डी. बुथ बांधणे, चालविणे कामी परवाना देणे बाबत.

प्रस्तावना:-

अर्जदार श्री. राजेश त्रिपाठी हया अपंग व्यक्तीस टेलिफोन बुथ चालविणेसाठी साईबाबा मंदीर च्या पाठीमागे, रामायण अपार्टमेंटच्या गेट समोर, उल्हासनगर-१ येथे '४ x ४' जागा मागीतली आहे.

तसेच अर्जदार श्री.संजय तिवारी या अपंग व्यक्तीस पी.सी.ओ चालविण्यासाठी बॅरेक नं. १२०१/ १ उल्हासनगर ३ च्या मागे स्वत:च्या घराला लागुन मोकळया जागेत महानगरपालिकेने दिनांक १६.२.२००० रोजी एक

वर्षासाठी (११.११.९९ते १०.११.२०००पर्यंत)परवानगी दिली होत. दि.१०.११.२००० रोजी परवानगी संपत आल्याने अर्जदाराने नुतनीकरणासाठी अर्ज केलेला आहे. पुढील एक वर्षाचे नुतनीकरण देण्यापूर्वी स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

अर्जदार व्यक्तीस अपंग असल्यामुळे अत्त्यंत तात्पुरत्त्या स्वरूपात ४ x ४ची लाकडी कॅबीन मध्ये टेलिफोन बुथसाठी खालील अटींवर परवानगी बाबत स्थायी समितीची संमती घेणे आवश्यक आहे.

१) महानगरपालिका सांगेल त्यावेळी लाकडी कॅबीन (बुथ)हटवून जागा खाली करावी लागेल.
२) सदर जागेचा वापर केवळ तात्त्पुरत्त्या स्वरूपात असून जागेबाबत मालकी हक्क पुर्णत: महानगरपालिकेचा असेल.
३) जागेचा वापर केवळ अर्जदार यांनाच करता येईल. भाडेकरू ठेवता येणार नाही.
४) प्रशासक कार्यालयाचा नाहरकत दाखला या कार्यालयात सादर करावा लागेल.
५) कोर्टातून कोणत्त्याही प्रकारचा स्टे आणता येणार नाही.
६) वरील बाबी अर्जदारास मान्य असल्याबाबत २०/-स्टॅम्प पेपर वर ॲफिडेव्हीड करावे लागेल.

<u>स्थायी समिती ठराव क्र</u>. १६४ <u>दिनांक</u> :- १३.१२.२०००,

सुचकाचे नाव :-श्रीमती. कांता गजवानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद्र चौधरी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार अपंग अर्जदार श्री. राजेश त्रिपाठी या अपंग व्यक्तीस वर नमुद केलेल्या महापालिकेच्या जागेवर आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्ती वर तात्त्पुरत्त्या स्वरूपात एस.टी.डी. बुथ बांधणे व चालविणे कामी एक वर्षाच्या कालावधीसाठी परवाना देणेस मान्यता देत आहे. व अपंग अर्जदार श्री. संजय तिवारी यांना दिलेल्या परवान्याचे पुढील एका वर्षाच्या नुतनीकरणासाठी मान्यता देत आहे.



तसेच आयुक्तांच्या समाधानकारकतेस अधिन राहून सदरचे परवाने एका वर्षापेक्षा अधिक नसेल ऐवढया कालावधीसाठी वेळोवेळी नुतनीकरण करण्यासाठी आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर.</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र४ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:- या प्रस्तावाबाबत एक हरकत आहे ती अशी की, स्थायी समिती सभेपूर्वी मी श्री. काजले यांना याबाबत विचारणा केली की, या प्रस्तावामध्ये कोण कोणते आयटम आहेत व त्यांचे दर काय आहेत? त्यावर त्यांनी सांगितले की, हया बाबतची सर्व माहिती पूढील आठवडयात देऊ... सविस्तर माहिती उपलब्ध करून दिली नसल्याने हा प्रस्ताव पूढे ढकलला जावा.

मा.आयुक्त :- श्री. काजले आले आहेत का? काजले, यादी तयार आहे का?

श्री. काजले :- यादी तयार आहे.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पूढे ढकलण्यांत येत आहे.

विषय :- सन २०००-२००१ साठी स्टेशनरी पुरविणे कामी निविदेतील बाबवार न्युनत्तम दराच्या निविदाकारांशी संविदा करणेस मान्यता देणे बाबत.

मा.सचिव :- विषय क्र५ वाचुन दाखवितात.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :-मा.महापौर, उपमहापौर व नगरसेवक निधीतून प्र. क्र. ५१ , प्र.क्र.२२ ,व प्र.क्र.४३ , प्र.क्र. ५४ आणि प्र.क्र. ५९ , ६४ व ५४ मध्ये अनुक्रमाने सार्वजनिक बांधकामाअंतर्गत करावयाच्या ७ कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.



स्थायी समिती ठराव क्र. १६५ दिनांक :- १३.१२.२०००.

सुचकाचे नाव :-श्री. राजेंद्र चौधरी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामचंद पारवानी.

ही स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधीकृत करीत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव व नगरसेवकाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|

१. उल्हासनगर-४ येथील प्र.क्र ४३ मध्ये संतोष नगर येथे व्यायाम शाळा बांधणे.( उप-महापौर निधीतून) — ७५,०००/-

२. उल्हासनगर-४ येथील प्र.क्र.२२ मध्ये ब्लॉक ओ ६०५ ते ६०९ पर्यंतचा रस्ता एम -३५० ने बांधणे. ( मा. महापौर निधीतून) — ९९,८००/-

३. उल्हासनगर-४ येथील प्र.क्र ५४ मध्ये गणेशनगर येथे सहा बैठकीचे शौचालय बांधणे. ( मा. उप-महापौर निधीतून) — २,१०,३४०/-

४ उल्हासनगर-४ येथील प्र.क्र ५४ मध्ये बॅ. नं. १४७९, १४८०, बाकण १४९२, १४९३ यांचे मध्ये रस्ता एम-२५० ने बांधणे.(नगरसेवक निधीतून) — १,६०,०००/-

५. उल्हासनगर-३ येथील प्र.क्र ५९ मध्ये सी.सी.एम.२५० ने रस्ता बनविणे अनिल टॉवर व अपना घर समोर. (नगरसेवक निधीतून) — २,६७,०००/-

६ उल्हासनगर येथील प्र.क्र. ६४ मध्ये विविध ठिकाणी सी.सी. पाथवे आणि नाल्या बांधणे आणि शौचालय दुरुस्त करणे. (नगरसेवक निधीतून) — १,९९,९५०/-

७. उल्हासनगर-४ येथील प्र.क्र ५२ मध्ये जंगल हॉटेलच्या मागे मल्हार अपार्टमेंट जवळ सहा बैठकीची शौचालये बांधणे. (महापौर निधीतून) — २,१०,३४०/-

---

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--७--

मा.सचिव :- विषय क्र ६ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :- हा प्रस्ताव समंत केला जावा.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- मा.स्थायी समिती सभापती व नगरसेवक निधीतून प्र.क्र ६ आणि प्र.क्र ४६ व २७ मध्ये अनुक्रमांने प्रभागातील रस्त्यावरील दिवाबत्ती बसविणे कामीचे ३ प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. १६६ — दिनांक :- १३.१२.२०००.

सुचकाचे नाव :-श्रीमती.भारती राजानी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामचंद्र पारवानी.

ही स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्त्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधीकृत करीत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव व नगरसेवकाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | उल्हासनगर-३ येथील प्र.क्र २७ मध्ये रस्त्यावरील दिवाबत्ती बसविणे.( नगरसेवक निधीतून) | ७५,५००/- |
| २ | उल्हासनगर-२ येथील प्र.क्र ६ मध्ये रस्त्यावरील दिवाबत्ती बसविणे. (स्थायी समिती सभापती निधीतून) | ७०,५००/- |
| ३ | उल्हासनगर-४/५ येथील प्र.क्र ४६ मध्ये रस्त्यावरील दिवाबत्ती बसविणे. ( नगरसेवक निधीतून) | ७०,०००/- |

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका
--८--
मा.सचिव :-विषय क्र.७ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- कोण सांगेल?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-हे काम केले आहे की, करणार आहात?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-दशेरा मैदान येथे विश्व जागृती सतसंग समिती तर्फे दि. १८.१२.२००० ते १९.१२.२००० पर्यंत परमपूज्य श्री. सुधांशुजी महाराज यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित केलेला असून या मैदानाची दुरूस्ती, सपाटीकरण, मेदानाच्या कडेने तारेचे कुंपणाची दुरूस्ती भिंतीची दुरूस्ती, सार्वजनिक शौचालयाची दुरूस्ती इत्यादी कामे करावयाची आहेत.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :- यानंतर अशाच एखादया उद्यानात संत महात्त्म्याच्या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले तर तेथे करावयाचे अशा प्रकारचे काम हे तेव्हा सुध्दा सर्वसाधारण निधीतून केले गेले पाहिजे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- कुठेही अशाप्रकारचे काम करून घ्यायचे असेल तर संत महात्म्याच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जावे?

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर ५ येथील दशहरा मैदानात दुरूस्ती कामी आयुक्तांच्या थेट कार्यादेशान्वये मे. शिव मजदुर कामगार संस्था यांनी केलेल्या कामीचे संविदेस कार्योत्तर मंजुरी देणेबाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर ५ येथील दशहरा मैदानाची दुरूस्तीकरणे आवश्यक आहे. कारण हे मैदान विश्व जागृती मिशन सतसंग समिती, उल्हासनगर यांना दिनांक १५.१२.२००० ते २०.१२.२००० पर्यंत परमपुज्य श्री. सुधांशुजी महाराज यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. त्यासाठी मालमत्ता विभागाने सदर समितीस हे मैदान धार्मिक कार्य करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. असे मालमत्ता विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाला जा.क्र./उमपा/मालमत्ता/१२ दि.२८ नोव्हेंबर २००० नुसार कळविलेले आहे. त्यानुसार मैदानाची दुरूस्ती, सपाटीकरण, मैदानाच्या कडेने तारेचे कुंपणाची दुरूस्ती, भिंतीची दुरूस्ती इत्त्यादी कामे करण्यासाठी विनंती केलेली आहे. या कामांसाठी संबंधित कनिष्ठ अभियंता व उप-अभियंता यांनी सदर मैदानाची पहाणी करून त्या दुरूस्तीसाठी प्राकलन तयार केलेले असुन त्याची अंदाजित किंमत रूपये २,०५,१००/- इतके होते. सदर काम करणेसाठी अंदाजपत्रकातील भाग क्र. लेखा शिर्ष सी-४ (७)मधुन हे काम करावयाचे आहे. या लेखा शिर्षात यापूर्वी प्रस्तावित केलेल्या खर्चातुन वजावट जाता रूपये २३,००,०००/-इतकी तरतुद उपलब्ध आहे तरी रूपये २,०५,१००/- प्रस्तावित खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरीसह सदर कामाची निकड पहाता. मेसर्स शिव मजुर कामगार सोसायटी यांचेकडुन काम करून घेतलेल्या या रूपये २,०५,१००/- किंमतीच्या कामास कार्योत्तर मंजुरी मिळण्याकरिता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १६७ दिनांक :- १३.१२.२०००.

सुचकाचे नाव :-श्रीमती.लविना कुंदनानी.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती.कांता गजवानी.

--९--

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-५ येथील दशहरा मैदानात मेसर्स. शिव मजुर कामगार सोसायटी यांनी आयुक्तांच्या थेट कार्यादेशान्वये केलेल्या दुरूस्ती कामीचे रू.२,०५,१००/- चे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता व आयुक्तांनी त्यांच्याशी केलेल्या निविदाशिवाय थेट संविदेस कार्योत्तर मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र८ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- प्रत्येक नगरसेवकास किती शिलाई मशीन मिळतील? कारण काही दिवसापूर्वी पाचशे-पाचशे वहया देण्याचे ठरले असताना प्रत्यक्षात मात्र तीनशे-तीनशे वहया देण्यात आल्या

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-प्रत्येक नगरसेवकास पाच-पाच शिलाई मशीन मिळतील. तसेच त्या चांगल्या प्रतीच्या असतील, वहया कमी दिल्या परंतु त्या चांगल्या प्रतीच्या दिल्या गेल्या आहेत.

श्री. सोनाळे (उपायुक्त):- शिलाई मशीन चांगल्या प्रतीच्या 'आय.एस.आय मार्क' च्या पुरविल्या जातील.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- श्री. नारायण पंजाबी यांच्या प्रभागात शोधुन सुध्दा पाच विधवा महिला सापडणार नाहीत. त्यांना जास्त शिलाई मशीन हव्या असतील तर मागील वर्षीची भरपाई करून दिली जावी.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी :-श्री. किशोर वनवारी यांच्या शब्दाबददल हरकत आहे. त्यांनी अशा प्रकारचे शब्द वापरावयास नको होते...

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- सन २०००-२००१ करिता शिवणयंत्र पुरविणे कामी लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

महिला व बालकल्याण समिती तर्फे दरवर्षी प्रमाणे प्रत्येक प्रभागातील ५ महिला याप्रमाणे ६९ प्रभागाकरिता एकुण ३४५ शिवण यंत्रांचे वाटप विधवा व गरजु गरिब महिलांना करावयाचे असल्याने सदरचे शिवणयंत्र खरेदी करणे करिता वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन निविदा मागविल्या असत्या खालील पुरवठादारांनी विहित मुदतीत निविदा सादर केल्या.

१. मेसर्स जय इंटरप्राइजेस, मुरबाड.
२. मेसर्स सागर इंटरप्राइजेस, उल्हासनगर.



३. मेसर्स स्विटी इंटरप्राइजेस, उल्हासनगर.
४. मेसर्स उमा इंटरप्राइजेस, उल्हासनगर.

उपरोक्त निविदाधारकांपैकी मेसर्स उमा इंटरप्राइजेस उल्हासनगर यांनी ''खेतान शिवणयंत्राकरिता'' नमुद केलेले दर रूपये २५२०/- हे इतर निविदाधारकापेक्षा तुलनात्त्मकदृष्टया न्युनतम असुन एकुण ३४५ शिवणयंत्र खरेदी करण्याकरिता एकुण ८,६९,४००/- इतका खर्च येणार आहे.

तरी मेसर्स उमा इंटरप्रायझेस उल्हासनगर यांनी ''खेतान शिवणयंत्राकरिता'' नमुद केलेले दर मान्य असुन खरेदी करिता येणारा खर्च रू. ८,६९,४००/- या रकमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेस्तव स्थायी समिती समोर प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १६८ दिनांक :- १३.१२.२०००.

सुचकाचे नाव :-श्रीमती.पदमा वलेचा.

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार "खेतान शिवणयंत्र" पुरविणेकामी मेसर्स उमा इंटरप्रायजेस यांची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून आयुक्तांना संविदेस मान्यता व अंर्तभुत खर्चास रूपये ८,६९,४००/- यास (प्रशासकीय व वित्तिय )मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.९ वाचुन दाखवितात.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- लोखंडी गाडया पुरविणे कामी लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे बाबत.



प्रस्तावना :-

सन २०००-२००१ सालाकरिता लोखंडी गाडया खरेदी करण्याकरिता स्थायी समिती ठराव क्र.१०३ दि.२५.१०.२००० अन्वये जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. सदर जाहिराती प्रमाणे खालील पुरवठादारांनी / ठेकेदारांनी विहित मुदतीत निविदा कार्यालयाकडे सादर केल्या.

१. मेसर्स परेडा इंटरनॅशनल.
२. मेसर्स महिला आर्थिक विकास महामंडळ.
३. मेसर्स सागर इंटरप्रायजेस.
४. मेसर्स रूमेड सिस्टीम.
५. मेसर्स स्विटी इंटरप्रायजेस.
६. मेसर्स एम.एस.एस.आय.डी.सी.

स्विकारण्यात आलेल्या निविदांचा तुलनात्तमक तक्ता तयार केला असता मेसर्स एम.एस.एस.आय.डी.सी., ठाणे यांचे निविदेप्रमाणे ''लोखंडी गाड्यां'' चा दर तुलनात्तमक दृष्टया रूपये २,१४७/- हा सर्वात न्युनतम असल्यामुळे सदरची निविदा स्विकारण्यात येऊन खरेदी करीता येणारा खर्च रू. ४,२०,४२०/- यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेस्तव स्थायी समिती समोर ठेवणे करिता सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १६९ दिनांक :- १३.१२.२०००.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार लोखंडी गाड्या पुरविणेकामी मेसर्स एम.एस.एस.आय.डी.सी., ठाणे यांचे सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून आयुक्तांना संविदेस मान्यता व अंर्तभुत खर्चास रूपये ४,२०,४२०/- यास (प्रशासकीय व वित्तिय )मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.१० वाचुन दाखवितात.

--१२--

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- सन २०००-२००१ साठी दैनंदिनीच्या नमुन्याची निवड केली आहे. त्या दैनंदिनीमध्ये प्रत्येक प्रभागाच्या नकाशाचा अंर्तभाव केला तर खुप चांगले होईल.

मा.आयुक्त :-जनगणना पूर्ण झाल्यानंतर कदाचित प्रभागांच्या सिमांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- सन २००२ पर्यंत म्हणजे आमचा कालावधी पूर्ण होई पर्यंत तर तेच प्रभाग राहतील ना? ही दैनंदिनी आम्ही कुणाला दिली तर तो म्हणेल प्रभागाचा नकाशा सुध्दा आहे. एकंदरीत दैनंदिनी सर्वांना पसंत पडेल.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- किती दैनंदिन्या छापुन घेणार आहात?

श्री. सोनाळे (उपआयुक्त) :- प्रत्येक प्रभागाचा नकाशा, प्रभागाची माहिती, नगरसेवकांचा फोटो इत्त्यादी माहिती दयायची झाली तर प्रत्त्येक प्रभागासाठी एक पान या प्रमाणे ६९ पाने या दैनंदिनीत वाढतील, त्यामुळे दैनंदिनी खुप मोठी व जड होईलें

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :-होय, आणखी ६९ पाने वाढवली तर दैनंदिनी खुपच जड होईल.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- मागील वर्षी या प्रमाणेच दैनंदिनी तयार केली होती.

श्री. सोनाळे (उपआयुक्त):- आपण म्हणता त्याप्रमाणे दैनंदिनी तयार करायची झाली तर, ६९ पाने वाढतील त्यामुळे दैनंदिनीचे वजन ही वाढेल...

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- ठाणे महानगरपालिकेची दैनंदिनी पहा, ती कशी छोटीशी व आकर्षक बनविली आहे.

श्री.सोनाळे (उपआयुक्त):- श्री. काजले ठाणे महानगरपालिकेची दैनंदिनी घेऊन या, मला वाटते या दैनंदिनीत पूर्ण शहराचा एकच नकाशा छापला आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- प्रत्येक नगरसेवकास किती दैनंदिन्या दिल्या जातील?

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- मागच्या वेळी प्रत्येक नगरसेवकास १०-१० दैनंदिन्या दिल्या होत्या.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- आयुक्त साहेब, त्याप्रमाणे शिलाई मशिन सुध्दा १०-१० दिल्या जाव्यात.

श्री. सोनाळे (उपआयुक्त) :- ठाणे महानगरपालिकेच्या या दैनंदिनीमध्ये पूर्ण शहराचा एकच नकाशा छापला असुन एक पानामध्ये तारखांचे दोन-दोन भाग केले ओत, ही दैनंदिनी खुपच चांगली आहे.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी :- ठाणे महानगरपालिके सारखी दैनंदिनी छापली जावी.

--१३--

श्री. सोनाळे (उप.आयुक्त):- प्रत्येक प्रभागाचे एक स्वतंत्र पुस्तक आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- ठाणे महानगरपालिकेची दैनंदिनी पहा उल्हासनगर महानगरपालिकेची मागील वर्षाची दैनंदिनी ही पहा १५० रूपयांची जी दैनंदिनी दर्शविली आहे ती खुपच चांगली असुन तीच छापुन घेतली जावी. व या दैनंदिनीमध्ये प्रभागाच्या चतुःसिमा सुध्दा असल्या पाहिजेत, दैनंदिनीतील चर्तुःसिमांचा हरकतीच्या वेळी उपयोग होत असतो.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी / श्री. किशोर वनवारी :- १५० रूपयांवाली दैनंदिनी छापुन घेण्यास मंजुरी दिली जावी.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- सन २००१ करीता नागरी दैनंदिनी पुरविणे कामी

लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणेबाबत.

प्रस्तावना :-

दरवर्षी प्रमाणे सन.२००१ या वर्षाची नागरी दैनंदिनीची छपाई व पुरवठा करण्याकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात आल्यात. त्यानुसार खालील पुरवठा दारांनी विहित मुदतीत निविदा सादर केल्यात.

१) मे.गणेश प्रिंटींग प्रेस, कल्याण
२) मे.जॉली प्रिन्टर्स, उल्हासनगर
३) मे.पटेल स्टेशनरी ॲण्ड जनरल स्टोअर, मुंबई
४) मे.स्विटी एन्टरप्राईजेस, उल्हासनगर.

उपरोक्त निविदा धारकांपैकी मे. जॉली प्रिन्टर्स, उल्हासनगर यांनी दिलेले दर हे इतर पुरवठा दारांच्या तुलनेत न्युनतम आहेत.

सदर पुरवठादाराने १)प्रभागाचे नकाशासह असलेल्या दैनंदिनी करीता रू. १५०/- प्रति दैनंदिनी व २)गतवर्षी प्रमाणे असलेल्या दैनंदिनी अद्य दर नमुद केला आहे.

एकुण १५०० दैनंदिनी तयार करावयाचे असल्याने १)प्रभागाचे नकाशासह असलेल्या दैनंदिनी करीता १५०० x १५० = रू.२,२५,०००/- इतका खर्च व २) गत वर्षी प्रमाणे असलेल्या दैनंदिनी करिता १५०० x १०५ = रू. १,५७,५००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दैनंदिनी तयार करणे करिता लागणारा कालावधी लक्षात घेता आर्थिक बाबीचा विचार केला असता गत वर्षी प्रमाणे असलेली दैनंदिनी तयार करणे योग्य वाटते.

तरी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेस्तव स्थायी समिति समोर प्रस्तावित.

--१४--

स्थायी समिती ठराव क्र.१७०	दिनांक :-१३.१२.२०००.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन २००१ या वर्षाची १५०० छापीत नागरी दैनंदिनी पुरविणेकामी मे.जॉली प्रिंटर्स उल्हासनगर यांची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून आयुक्तांना संविदेस मान्यता व अंतर्भुत खर्चास २,२५,०००/- यास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.११ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- स्थायी समितीच्या मागच्या सभेत हा प्रस्ताव चर्चेस आला होता ना?

मा.सचिव :- पब्लीक अड्रेस सिस्टम मध्ये सुधारणा करणे व एक राखीव पब्लीक अड्रेस सिस्टम बसविण्या बाबतचा तो प्रस्ताव होता व आता चा जो प्रस्ताव आहे तो केबल टाकणे व नविन टेबल बनविण्या बाबतचा आहे.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर महापालिकेच्या हॉल मध्ये मायक्रोफोनसाठी केबल टाकणे साठी व अनुषंगिक इतर कामासाठीच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उपरोक्त संदर्भातील विषयानुसार मा.सचिव यांनी मा.कार्यकारी अभियंता, विद्युत यांचेशी दिनांक २३.११.२००० रोजी महासभेतील ध्वनीक्षेपकाच्या बिघाडाबाबत विचारणा केली असता त्यावेळी झालेल्या चर्चेच्या वेळी मा.कार्यकारी अभियंता यांनाही बोलविण्यात आलेले होते. सदर ध्वनीक्षेपकातील वारंवार होणार बिघाड टाळण्यासाठी मा.कार्यकारी अभियंता विद्युत यांनी या प्रणालीत काही सुधारणा सुचविल्या होत्या व त्यांची अंमलबजावणी करणेकरिता काही स्थापत्य



कामांची कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम)यांना याकामी काही स्थापत्य कामे जसे हॉलच्या फरसबंदीतून चर खोदुन पाईप लाईन टाकणे, ध्वनीक्षेपक यंत्रासाठी काचेची कॅबीन तयार करणे इत्त्यादी कामे आहेत. याकरिता कार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी त्यांच्याकडील दिनांक २७.११.२०००च्या टिप्पणी नुसार एक नकाशा तयार केलेला असून त्याप्रमाणे फरसबंदीतुन चर खोदुन पाईपलाईन टाकणे व कॅबीन बांधणे साठी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे कळविले आहे. याकामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाने प्राकलन तयार केले असुन त्याची किंमत रूपये ६९,६५०/- इतकी होत आहे. या कामावरील खर्च (सी-४(१)भाग-१)या लेखा शिर्षातुन भागविले आहे. या लेखा शिर्षात यापूर्वी प्रस्तावित केलेल्या खर्चातून वजावट जाता १२,९६,३२५/- इतकी तरतुद उपलब्ध आहे त्यामुळे उपरोक्त रू. ६९,६५०/- इतक्या खर्चाचे काम करणे शक्य आहे तरी रू.६९,६५०/- प्रस्तावित खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी सह सदर काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २(२) अंतर्गत स्टॅंडर्ड

मजुर कामगार सहकारी संस्थेकडुन करून घेण्याकरिता मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १७१ दिनांक :- १३.१२.२०००.

सुचकाचे नाव :-श्री. रामचंद पारवानी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये ध्वनीक्षेपण प्रणालित मायक्रोफोनसाठी केबल टाकणे व इतर अंर्तभाव कामी रू. ६९,६५०/- च्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे. तसेच आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदा करण्यास प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :-विषय क्र.१२ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- हा प्रस्ताव मंजुर केला जावा.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- कोण कोणत्त्या शाळांमध्ये संगणक बसविणार आहात ते तर सांगा?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- गोषवा-यामध्ये सविस्तर पणे लिहिले आहे.



मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय : महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी १० संगणक पुरविणे कामी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांना संगणकाचे प्राथमिक ज्ञान होणेसाठी शिक्षण समिती, उल्हासनगर महानगरपालिका तर्फे एकुण १० संगणक खरेदी करून पुरविणे बाबत मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ११०, दि.

८.९.२००० अन्वये अंदाजित खर्च रूपये ३,५०,०००/- प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात आलेली आहे.

शालेय विद्यार्थ्यांना प्राथमिक ज्ञान मिळण्यासाठी खरेदी करण्यात येणा-या संगणकामध्ये पुढील सुविधा असाव्यात, पेन्टीयम ३००, ३२ मेगाहर्टझ, ४.३ गिगाबाईट, १.४४ मेगा बाईट, फ्लॉपी डिस्क, ४० एक्स सी.डी.ड्राइव्ह, १४'' कलर मॉनीटर, की बोर्ड, माऊस आणि स्पिकर व प्रिन्टर (कलर)

सदरचे संगणक खरेदी करण्यासाठी खालील प्रमाणे दरपत्रक मागविण्यात आले होते.

| | मेसर्स | संगणकाचे दर | प्रिंटरचे दर |
|---|---|---|---|
| १) | मास्टर प्रो. कॅम्पुटर ॲन्ड कर्मशल सर्व्हीस, कल्याण | ३५,०००/- | ७,२००/-(कलर) |
| २) | अलेस कॅम्पुटर सर्व्हीस, कल्याण | ३७,०००/- | ८,२००/-(कलर) |
| ३) | पॉनर कॅम्पुटर कम्युनिकेशन, कल्याण, | ४६,५००/- | ४,७५०/-(ब्लॅक आणि व्हाईट) |
| ४) | स्टारनेट कॅम्पुटर | ३३,०००/- | ६,७००/-(एच.पी. .कलर) |

उपरोक्त दरपत्रक पहाता मे. स्टारनेट कॅम्पुटर हयांचे दर पत्रक बाजारभावा प्रमाणे वाजवी आहेत.

वरील सर्व बाबींचा विचार करता मे. स्टारनेट कॉम्पुटर यांच्याकडे असलेल्या संगणकामध्ये व विद्यार्थ्यांना प्राथमिक ज्ञान होणे करिता सर्व सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे स्टारनेट कॉम्पुटर्स यांच्याकडून संगणक खरेदी करणे संयुक्तीक वाटते, सोबत दरपत्रक जोडले आहे.

वरील खरेदीसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५२(१)प्रमाणे निविदा मागविणे जरूरी आहे. परंतु तातडीची गरज लक्षात घेता वरील खरेदी अधिनियमचे प्रकरण ५ (२)(२)खाली निविदा न मागवता मे.



स्टारनेट कॉम्पुटर यांच्याकडुन परस्पर खरेदी करण्यास मंजुरी देण्यास मा. स्थायी समिती सभेपुढे ठेवणेस प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u>१७२ <u>दिनांक</u> :-१३.१२.२०००.

सुचकाचे नाव :-श्री.राजेंद्र चौधरी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. ठाकुरदास बेहरानी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी तातडीने १० संगणक पुरविणे कामी आयुक्तांना मे. स्टारनेट कॉम्प्युटर यांच्याशी अधिकृत दराने निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

आयुक्तांच्या आसनावर आसनस्थ असलेले श्री. कमलेश सोनाळे(उपायुक्त) :- आपणा सर्वांची समंती असेल तर आयत्त्यावेळच्या विषयान्वये मी एक प्रस्ताव चर्चेस आणू इच्छितो. ५०० कचरा कन्टेनर्स (कुंड्या) पुरविणे बाबतचा तो प्रस्ताव आहे.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- उपआयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेला प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यांत येत असून तो सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

आयत्त्यावेळचा विषय :-

विषय :- ५०० कचरा कन्टेनर्स (कुंड्या)पुरविणे कामी मे.एस.डी.कुलकर्णी आणि कंपनी, संगमनेर यांची लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असुन आयुक्तांना संविदेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेने दि. २० डिसेंबर,१९९९ रोजी एक घन मीटर मापाच्या तीन चाकी ५०० कचरा कन्टेनर्स खरेदीबाबतची निविदा मागविली होती.



सदरच्या निविदा दि.२१ डिसेंबर, १९९९ रोजी उघडण्यात आल्या होत्त्या त्यातील खालील ५ निविदारांच्या निविदा प्राप्त झालेल्या होत्त्या.

| अ.क्र. | निविदारांचे नांव | निविदादर | दिलेला निविदादर |
|---|---|---|---|
| १) | मे. ॲन्थोनी गॅरेज, नवी मुंबई | --३५,००,०००/- | ४४,२०,०००/-रू. (२६. २८ टक्के जास्त) |
| २) | मे. कैलास ॲटो बिल्डर्स, पुणे | --''-- | ४५,४७,२००/-रू. (३९. ९२ टक्के जास्त) |
| ३) | मे.एस.डी.कुलकर्णी आणि कंपनी, संगमनेर. | --''--- | २४,८५,१५०/-रू. (२८. ९९ टक्के कमी) |

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | मे. इंडस्ट्रियल प्लॅन्ट आणि वेस्ट ट्रिटमेंन्ट कॉर्पोरेशन, मुंबई. | --"--- | ४५,००,०००/-रू. (२८. ५७ टक्के जास्त) |
| ५) | मे. मनियार आणि कंपनी, अहमदाबाद. | --"--- | ४४,४०,२००/-रू. (२६. ८६ टक्के जास्त) |

वरील प्राप्त झालेल्या निविदादाराचे दर पाहता मे.एस.डी. कुलकर्णी आणि कंपनी, संगमनेर याचा दर सर्वात कमी २४,८५,१५०/- रूप्राप्त झालेला आहे.

याबाबत दि.१० नोव्हेंबर,२००० रोजी त्यांचेशी कचरा कुंडया पुरविण्याबाबत महापालिकेने सुचविलेल्या सुचना नुसार चर्चा करण्यात आली होती व सुचना नुसार कचरा कुंडयाना डिझाईनमध्ये सुधार करून त्या दराने कचरा कुंडया पुरविण्यांचे त्यांनी मान्य केलेले आहे.

तरी सद्या उल्हासनगर महानगरपालिकेला कचरा कुंडयाची गरज पाहता तसेच शहरात माहे नोव्हेंबर, २००० मध्ये उद्भवलेली कॉलराग्रस्त परिस्थिती पाहता ५०० कचरा कुंडया खरेदी करणे अत्यावश्यक असल्याने मे.एस.डी. कुलकर्णी आणि कंपनी संगमनेर यांचेकडुन ५०० कचरा कुंडया रू.४९७०. ३०/- प्रतिदराने एकुण २४,८५,१५०/- रूपयाची खरेदी करण्यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेस्तव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १७३ दि:-१३.१२.२०००.

सुचकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार ५०० कचरा कन्टेनर्स (कुंडया) पुरविणे कामी मे. एस. डी. कुलकर्णी आणि कंपनी, संगमनेर यांची सर्वात



लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असुन आयुक्तांना संविदेस मान्यता व अंर्तभुत खर्च रू.२४,८५,१५०/-यास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

दुपारी १ . १२ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

प्रकाश पं. कुकरेजा.
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-२२.१२.२०००

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक २२.१२.२००० रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योति कालानी हया पिठसीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.कुमार आयलानी | सदस्य |
| २ | श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| ३ | श्री. चौधरी राजेंद | सदस्य |
| ४ | श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ५. | श्री.पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ६. | श्री.पंजाबी नारायण | सदस्य |
| ७. | श्री. बहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ८. | श्री. भांडे भगवान | सदस्य |
| ९. | श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| १० | श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ११ | श्री. तेजी कैलास | सदस्य |
| १२ | श्रीमती.राजानी भारती | सदस्या |
| १३ | श्री. किशोर वनवारी | सदस्य |
| १४ | श्री.पदमा वलेचा | सदस्या |

तर

मा. सदस्या श्रीमती. कुंदनानी लविना या अनुपस्थितीत होत्त्या.

मा.सचिव :- विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. १३.१२.२०००रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- मागच्यावेळी संगणकाचा गोषवारा न देताच ठराव पास केला होता काय?

मा.सचिव :-संगणकाच्या प्रस्तावाचा गोषवारा त्या पुर्वीचे सभेचे वेळीच देण्यात आलेला होता.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- दि.१३.१२.२००० रोजीच्या सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा.सचिव :- विषय क्र.२ वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-आम्ही या प्रस्तावाबाबत माहिती घेवू इच्छितो, या प्रकरणी काही तरी कोर्ट केस झाली आहे.

--२--

मा.सदस्या श्रीमती. भारती रजानी यांचे सायंकाळी ५.०० वाजता स्थायी समिती सभागृहात आगमन झाले.

मा.सचिव :- या कामासाठी मागविलेल्या निविदेत सर्वात लघुत्तम दर ज्यांनी भरले होते ते जयहिंद कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचीका दाखल केली होती. त्यांनी निविदेत भरलेले दर सर्वात कमी असूनही त्यांना हया निविदेतील काम देण्यांत आले नाही कारण की त्यांनी यापूर्वी केलेले काम समाधानकारक नव्हते. त्यांनी जॉईन वेंन्चर केलेले आहे.

परवा त्यांनी न्यायालयातून स्थगिती आदेश मिळविला होता. (स्टेटस को)मेन्टेन करायचा होता, काल तो आदेश उठविला गेला असुन स्थायी समितीला याकामी निर्णय घ्यायचा आहे. त्यानंतर उच्च न्यायालय याबाबत आपला निर्णय घेईल तोपर्यंत ठेकेदारास याकामी कार्य आदेश दयायाचा नाही.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- वतनसिंग यांना कामाचा अनुभव आहे का?

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- या प्रस्तावात काही बदल केला आहे काय?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):- काहीही बदल केलेला नाही.

मा.सचिव :- दर विश्लेषणा नंतर दहा बाबी त्यांत नमुद केलेल्या आहेत.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- कमीत कमी आमचा कार्यकाल संपेपर्यंत तरी ते काम पूर्ण करतील ना?

श्री. चिजवानी (शहर अभियता) :- लवकरात लवकर करण्याचा आम्ही प्रयत्न करू.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर स्टेशन येथील गेट क्र.३ येथे मुंबई पुणे सेक्शन रेल्वे पुलाच्या दोन्ही बाजुचे जोड रस्त्यांच्या कामी मे. वतनसिंग ॲण्ड कंपनी याची वाटाघाटी अंती लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असल्याने संविदेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उपरोक्त काम करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेने निविदा मागविल्या होत्त्या दिनांक ५/१२/२००० रोजी निविदा आयुक्त कार्यालयात उघडण्यात आल्या. त्यात खालील निविदाकारांनी खाली दर्शविल्याप्रमाणे दर दिलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | जयहिंद कंन्स्ट्रक्शन कं. | १९.८० टक्के जास्त |
| २. | वतनसिंग कं. | ३३ .०० टक्के जास्त |
| ३. | अशोक बिल्डकॉन | ३९ .५० टक्के जास्त |

वरील निविदाकारांपैकी मे. जयहिंद कन्स्ट्रक्शन कं. यांनी विनंतीप्रमाणे जॉइंट व्हेंचर रजिस्ट्रेशनची मुळ प्रत कार्यालयात सादर करण्याकरता



दि६.१२.२००० पर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतु दि६.१२.२००० पर्यंत जॉइंट रजिस्ट्रेशनची मुळ प्रत ते देऊ शकले आली होती. त्यामुळे त्यांची निविदा ग्राहय धरण्यात आली नाही. त्यामुळे दुसरे व तिसरे जास्त दर भरलेले निविदाकार मे. वतनसिंग कं. सर्वात कमी दराचे निविदाकार असल्याने शासकीय परिपत्रक क्र. पी-४५६-क्यु, दिनांक १९/१/७३ प्रमाणे मे. वतनसिंग कं. यांना वाटाघाटी करता बोलविण्यात आले त्यानुसार त्यांनी ३३ टक्के दराहून १९.७० टक्के जास्त दराने काम करण्यासाठी सहमती दर्शविली होती.

त्यानंतर दिनांक ११/१२/२००० रोजी उर्वरित दोन निविदाकार यांना त्याचे सुधारित दर सिलबंद लखोटयात देण्यासाठी बोलविले होते त्याप्रमाणे दिनांक ११/१२/२००० रोजी मे. वतनसिंग कं. यांनी त्यांच्या पूर्वीच्या १९.७० टक्के दरापेक्षा कमी म्हणजे १९.३५ टक्के दर (म्हणजे निविदा किंमतीपेक्षा १९.३५ टक्के जादा दराचे निविदा) सिलबंद लखोटयात भरून देकार महानगरपालिकेत सादर केले. क्रमांक तिसरे निविदाकार मे. अशोक बिल्डकॉन यांनी या निविदेत भरलेल्या दरापेक्षा कमी दर करण्यास ते सहमत नाही असे त्यानंतर कळविले आहे. सदर देकार फॅक्सने उशिरा प्राप्त झाल्यामुळे अस्विकार करण्यात आले. त्यानुसार मे. वतनसिंग यांचेकडुन त्यांनी दिलेल्या दराच्या बाबत दर पृथ्थकरण मागविले होते. ते त्यांनी पुरविलेले आहेत. मे. वतनसिंग यांनी अंतिम दिलेल्या १९.३५ टक्के जास्त दराबाबत मे. उत्तम इंजिनिअर्स यांनी दर विश्लेषन करता काही बाबी प्रामुख्याने नमुद केलेल्या आहेत. त्याप्रमाणे मे. वतनसिंग यांचे दर वाजवी वाटतात असे मे. उत्तम इंजिनिअर्स यांनी शिफारस केलेली असुन ती योग्य वाटते. सदर बाबतीत खालीलप्रमाणे बाबी नमुद केले आहे.
१.चालु दरसुची (२०००-२००१) नुसार व स्टार रेट नुसार या कामाची होणारी किंमत रू. २,८४,१९,३५०/- इतकी होते त्यामुळे मुळ प्राकलनापेक्षा चालु दर सुचीनुसार सुधारीत प्राकलन ५.३५ टक्के जास्त किंमतीचे होते.

२.१)सिमेंटचे दर शासकीय दर सुचीनुसार १३५/- प्रति गोणी असुन बाजार भावानुसार चालु दर दिनांक १२/१२/२००० नुसार रू.१७५/- आहे. त्यामुळे रू. ४०/- प्रति बाजार भावानुसार गोणी वाढ झाल्यामुळे कामाची १४,८०,०००/- होते ती ५.४८ टक्के मुळे प्राकलनापेक्षा जास्त आहे.
२)ठेकेदारास मोबिलाईझेशन ॲडव्हांस अथवा मटेरियल ॲडव्हांस देण्याची निविदाकाराची अट निविदा पुर्व बैठकिमध्ये मान्य केलेली नाही.
३)पुलाच्या कामात उल्हासनगर स्टेशनच्या पश्चिमेकडील भागात जोडरस्ता तयार करावा लागणार आहे व सदर रस्त्याची निगा काम पूर्ण होईपर्यंत देखभाल व दुरूस्ती करावी लागणार आहे. तसेच उक्त भागातील रस्ता तोडणे मंदिर हलविणे इत्त्यादि बाबी समाविष्ट आहे.
४)विम्याची रक्कम दरसुचीतील दरात अंतर्भुत नाही.
५)कलम १३ नुसार एक स्पॅन मध्ये लोड टेस्टींग करणे आवश्यक आहे. त्याची किंमत दरसुचीत अंतर्भुत नाही.

६)दर सुचीत टर्न ओव्हर टॅक्स नाही जो प्रत्येक साहित्त्यानुसार जरी वेगळा असला तरी देयकातून २ टक्के वजावट करावी लागणार आहे.
७)कामाची निगा राखण्याबाबत पूलाला ५ वर्षे पर्यंत देखभालीकरता ठेवण्यात येणार असून २ वर्षे काळ रस्त्यांसाठी ठेवलेला आहे. ज्याची तरतूद दरसुचीतील दरात नमूद नाही.
८)प्लास्टीसाईझर हे साहित्त्याची किंमत मुळ दरात नाही. त्यामुळे या साहित्त्यावर जास्तीचा खर्च होणार आहे.
९)शहरातील मंजुर दरसुचीतील दराच्या तुलनेत जास्त दर असतात.
१०)सध्याच्या रेल्वे फाटकावर प्रस्तावित पूल बांधावयाचे असल्याने ते बंद करून त्याचे बाजूस नविन फाटक बसविल्यावर वाहतुक दुतर्फा वळती करावी लागणार आहे. त्यामुळे सदर कामातील साहित्य लांबवर जमा करावे लागणार असून त्या बाबीवर जास्तीचा खर्च होऊ शकतो.

--४--

मे.वतन सिंग कं. त्यांनी अशा प्रकारे दिलेल्या प्राकलनिय किंमतीपेक्षा १९.३५ टक्के जास्त दराची निविदा महानगरपालिकेला फायदयाची असल्याने त्यास प्राधान्य देऊन मे. वतनसिंग कं. यांना काम देण्यास हरकत नसावी त्याकरिता स्थायी समिती कडुन मान्यता मिळणेकरिता व निविदा रक्कम रू. ३,२२,४२,०००/- या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र.१७४ दि:-२२.१२.२०००.

सुचकाचे नाव :-श्री. कुमार आयलानी.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती.कांता गजवानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-३ येथिल गेट क्र.३ सी. (एस.ई)५७/९-१० किमीटर मुंबई पुणे सेक्शन रेल्वे पुलाच्या दोन्ही बाजुचे जोड रस्त्याकामी मे. वतनसिंग कंपनी यांची वाटाघाटी अंती प्राकलनीय रक्कमेपेक्षा १९.३५ टक्के जास्त दराची महापालिकेला फायदेशीर निविदा स्विकृती योग्य असून आयुक्तांस संविदेस मान्यता व अंतर्भुत खर्च रू. ३,२२,४२,०००/- यांस मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.३ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- हा प्रस्ताव कशासाठी ठेवला आहे?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- ही कामे लवकरात लवकर करून घेण्यासाठी अधिनियमाचे कलम ५(२)(२)मधील तरतुदी नुसार आयुक्तांना प्राधिकृत केले जावे.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- ५ (२)(२)म्हणजे काय? पहिले आम्हाला त्याचा अर्थ सांगा.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):- आमदार निधीतून करावयाच्या या कामांना जिल्हाधिका-यांनी प्रशासकिय मान्यता दिलेली आहे. सदरची निविदा मागवून करावीत किंवा सोसायटी मार्फत करून घ्यावीत याबाबत लेखा विभागाचे अभिप्राय मागविले असता मुख्यलेखाधिकारी व मुख्यलेखा परिक्षक यांनी याबाबत आयुक्तांनी धोरणात्मक निर्णय घ्यावेत असे सुचविले असल्याने स्थायी समितीपूढे निर्णयासाठी हा प्रस्ताव ठेवला आहे.

--५--

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- मागच्यावेळी बी.एम.ए.सी.ए च्या कामासाठी आयुक्तांना प्राधिकृत केले होते त्यास दिड वर्षाचा कालावधी पूर्ण झाला तरीही अदयाप ते काम सुरू झाले नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- दिड वर्षे झाले अदयाप ५(२)(२)या अर्थ समजला नाही काय?

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- आम्हाला समजले आहे, त्यांना सांगु तर दया?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- खासदार निधीतून करावयाच्या कामातील ७ लाख रूपये खर्चाची ती कामे होती, रस्त्याचे डांबरीकरण करणे दिवाळी पूर्वी निर्णय झालेला होता. परंतु कुणाही नगरसेवकाचे प्रभागात ही कामे झालेली नाहीत, मला असे माहित पडले आहे की, संबंधित सर्व ठेकेदारांना कार्यालयाकडुन पत्र पाठविण्यांत आलेली आहेत की आपणास देण्यांत आलेले काम लवकरात लवकर पूर्ण केले जावे. अधिनियमाच्या कलम ५(२) (२)मधील तरतुदी नुसार आयुक्तांना या कामी अधिकार देण्याचा अर्थ काय होतो?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :- रस्त्यांचे डांबरीकरणा विषया संबंधित ठेकेदारांना पत्र पाठविली आहेत.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- कधी पत्र पाठविले आहे?

श्री. चिजवानी (शहर अभियंता) :-८-१० दिवस झाले, परवा दुसरे पत्र पाठविले आहे. स्मरणपत्र सुध्दा पाठविले आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- संबंधित ठेकेदार म्हणतात की आम्ही केलेल्या कामाचे आम्हाला पेमेंट मिळत नाही. कार्यालयाकडुन आपण आम्हाला पेमेंट काढून दिले तर आम्ही पूढे काम करू शकु.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- पेमेंटसाठी ठेकेदारांना आमच्याकडे पाठविले जाते. जे ठेकेदार ठरवुन दिलेल्या कालावधीत काम पुर्ण करत नसतील अशा ठेकेदारांना ब्लॅक लिस्ट मध्ये टाकले जावे.

श्री. चिजवानी (शहर अभियंता) :-आम्ही कुणालाही सांगीतले नाही की, पेमेंटसाठी तुम्ही नगरसेवकांकडे जा म्हणुन....

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :- ठेकेंदारांनी केलेल्या रस्त्यांचे डांबरीकरणाचे कामापैकी कित्येक रस्ते उखडले आहेत. कित्येक रस्त्याची कामे अपुर्ण आहेत. असे असताना पेमेंटसाठी ते तगादा लावत आहेत. श्री. केसुमल यांनी रस्त्याचे जे डांबरीकरण केले त्यातील बहुतांश रस्ते उखडले आहेत.

मा.सदस्य श्री. कैलास तेजी :- आकाश कॉलनी येथील रस्त्याचे काम अदयाप कसे पूर्ण झाले नाही?

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- अशा ठेकेदारांना ब्लॅक लिस्ट मध्ये टाकले जावे.

--६--

श्री. चिजवानी (शहर अभियंता) :- जे रस्ते उखडले आहेत त्या रस्त्यांची दुरूस्ती केली जात नाही तो पर्यंत देयके अदा केली जाणार नाहीत, जी कामे झाली आहेत त्यांची देयके अदा केली जावीत असे त्यांचे म्हणणे आहे.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- कधी पर्यंत काम चालु होईल?

श्री. चिजवानी (शहर अभियंता) :- एक आठवडयात.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- एक आठवडयात होईल?

श्री. चिजवानी (शहर अभियंता) :- आम्ही प्रयत्न करू....

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- ठेकेदारंनी केलेल्या कामाची त्यांना देयके अदा केली नाहीत. तरीही ते नविन कामासाठी निविदा भरतात, काम मिळाले नाही तर न्यायालयात दाद मागतात.....

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- हा प्रस्ताव समंत करू या?

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :- अधिनियमाचे कलम ५(२)(२)चा अर्थ सांगितला नाही?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- या कामासाठी आयुक्तांना अधिकार देवू या.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- मा.आमदार निधीतून सार्वजनिक बांधकामां अंतर्गत ३९ कामी आयुक्तांना निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृ करणे बाबत.

प्रस्तावना :-

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी उपरोक्त संदर्भाकिंत पत्रान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. उपरोक्त संदर्भाकिंन पत्रातील एकूण ४१ कामे अनुक्रमांक १ ते ३४ ,३६ ,३८ ते ४१ हे कामे सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधीत आहे व अनुक्रमांक ३५ ते ३७ हे कामे विद्युत विभागाशी संबंधीत आहे. सोबत जोडलेल्या यादीत नमुद केल्याप्रमाणे प्रत्येक कामाच्या प्राकलनाची किंमत २ लाखापेक्षा कमी आहे.

उपरोक्त यादीनुसार एकुण ३९ कामे सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधीत असून सदर कामे निविदा बोलावून किंवा लेबर को. ऑप.सोसायटी मार्फत करून घेणेसाठी मंजुरीसाठी लेखा विभागाकडे पाठविले असता मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी या कामांच्या मंजुरीसाठी मा. आयुक्तांनी

निर्णय घ्यावेत असे सुचविले आहे. सदर प्रकरण स्थायी समितीपूढे वरीलप्रमाणे धोरणात्त्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्तावित करीत आहे.

--७--

स्थायी समिती ठराव क्र. १७५ दि:-२२.१२.२०००.

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावावर सभेमधील चर्चेअंती मा. आमदार निधीतून सोबत जोडलेल्या यादीतील अनुक्रमांक १ ते ३४, ३६,३८ ते ४१ पर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गतची कामे अत्त्यंत तातडीची व आवश्यक असून आयुक्तांस मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--१४--

मा.सचिव :- विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- ठाणे येथील दरसुचीप्रमाणे दर लावणार आहात काय?

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :- जिल्हा दर सुची (डि.एस.आर) नुसारचे दर तेच असतात ना?

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर महापालिकेत विकास / दुरूस्ती देखभालीच्या

कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे यांनी सन २०००-२००१ करिता तयार केलेले दरसुची अंगीकार करणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेत तसेच सार्वजनिक बांधकाम खात्त्यात विविध विकासाची तसेच दुरूस्तीची व देखभालीची कामे प्राकलने बनवुन सदर प्राकलनिय किंमतीला मजुर सहकारी संस्था अथवा निविदा मागवुन करून घेतली जातात प्रस्तावित कामाची उपरोक्तपणे बनविलेली प्राकलने ही महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खाते सदरची दरसुची दरवर्षी नव्याने तयार करून प्रकाशित करीत असते. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र ठाणे जिल्हातर्गत असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या ठाणे विभागाने तयार केलेली दरसुची प्रकाशनानंतर उल्हासनगर महानगरपालिकेत तसेच जिल्हयातील इतर नगरपालिकेत व महानगरपालिकेत लागू केली जाते. सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या ठाणे विभागाने २०००-२००१ वर्षाकरिता दरसुची तयार केलेली असून दिनांक १/११/२००० पासुन लागू करण्यात आली आहे. सदर दरसुची उल्हासनगर महानगरपालिकेसह उपलब्ध झाली असून या दरसूचीतील दर पान क्र.(१) ते (४) या वरील टिपणीसह उल्हासनगर महानगरपालिकेस लागू करून त्याप्रमाणे होणा-या दरांनी प्राकलने, निविदा, देयके तयार करून कंत्राटदारांना केलेल्या पेमेंट करण्यासाठी मंजुरी मिळणे कामी स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यासाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र.१७६ दि:-२२.१२.२०००.

सुचकाचे नाव :-श्रीमती. पद्मा वलेचा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामचंद्र पारवानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महापालिकेत तसेच दुरूस्ती देखभालीच्या कामांसाठी हाती घ्यावयाच्या विविध विकास कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांनी तयार केलेली २०००-२००१ ची



दरसुची पान क्र. (१) ते (४) वरील टिपणीसह व दि१/११/२००० पासून लागू करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र५ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- कोण सांगेल? १० व्या वित्त आयोगाच्यावतीने किती निधी उपलब्ध होणार आहे?

श्री. चिजवानी (शहर अभियंता) :- आम्ही जी टिप्पणी सादर केली होती ती टिप्पणी वाचुन दाखवितो.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- १० व्या वित्त आयोगाकडुन किती निधी उपलब्ध होणार आहे?

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- १० वे वित्त आयोग म्हणजे काय?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- १०व्या वित्त आयोगाच्या निधीतून हे काम करणे कामी मंजुरी मिळण्यासाठी पाठविले आहे. या प्रस्तावास स्थायी समितीने यापूर्वीच मंजुरी दिलेली आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :- जेव्हा आम्ही उपस्थित नव्हतो त्यावेळी हा प्रस्ताव आयत्त्यावेळच्या विषयामध्ये आणला असेल.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- हया कामाचा प्रस्ताव स्थायी समितीच्या नियमित अजेंडयावर आणला होता या कामाबरोबर श्री. बी.बी.मोरे यांच्या प्रभागात सोनेसर यांच्या कार्यालया समोरील चौकापासून पुर्नविस्थापितासाठी असलेल्या भुखंडा पर्यंतचा रस्ता बी.एम.ए.सी ने बांधण्याचा दुसरा प्रस्ताव होता.

श्री. चिजवानी (शहर अभियंता) :- मी गोषवारा वाचुन दाखवितो, १०व्या वित्त आयोगाकडुन मिळणा-या अनुदानातून हे काम करून घ्यायचे आहे.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- मी गोषवा-यामधील काही वाक्ये वाचुन दाखवितो. निविदा प्रक्रिया मे. उत्तम इंजिनिअरिंग कन्सल्टंसी प्रा.लि. कल्याण यांचेमार्फत पूर्वी मंजुर केलेल्या अटी व शर्तीनुसार पूर्ण करण्यासाठी मंजुरीस्तव पाठविले होते. परंतु मुख्यलेखा अधिकारी व मुख्यलेखा परिक्षक यांनी आक्षेप घेतल्यानंतर मा.आयुक्तांनी मुख्यलेखा परिक्षक यांचेशी समक्ष चर्चा केली व वित्त आयोगाने सदर प्रस्तावास मान्यता देणे व जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता देणे ही पूर्व अट असली तर, तर काय वित्त आयोगाने मान्यता दिली आहे काय?



श्री. चिजवानी (शहर अभियंता) :- वित्त आयोगाने मान्यता दिलेली नाही.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- तर मग काम कसे करणार? या गोषवा-यात पूढे काय लिहिले आहे? वित्त आयोगाने मान्यता न दिल्यास सदरचे काम महापालिकेच्या फंडातुन घेण्याबाबत स्थायी समितीने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :-तर मग कोणत्त्या निधीतून हे काम करणार आहात? सर्वसाधारण निधीतून करणार असाल तर मग आमच्या प्रभागात सुध्दा कामे झाली पाहिजेत.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- स्थायी समितीने यापूर्वीच मंजुरी दिलेली असून जे अनुदान आपणास मिळणार आहे त्यातून हे काम करणार आहेत.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- ज्या निधीतून हे काम कराल त्या निधितून आमच्या प्रभागात सुध्दा कामे झाली पाहिजेत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- निविदा मागविण्यासाठी परवानगी मागत आहोत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- महापालिका निधी व दहाव्या वित्त आयोगाचा निधी असे दोन्ही निधी अर्धे-अर्धे या कामी वापरले जातील.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- महापालिका निधीतून काम केले जाईल असे स्पष्टपणे लिहिले आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- बसंत बहार मार्गच्या रस्त्याचे काम या निधीतून करण्याचे प्रस्तावित केले आहे, अनुदान प्राप्त झाल्यानंतर काम करता येईल.

श्री. चिजवानी (शहर अभियंता) :- वित्त आयोगाकडुन निधी प्राप्त झाला नाही तर महापालिकेच्या निधीतून हे काम केले जाईल.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- त्या विभागातील शिवसेना शाखा प्रमुख श्री. विजय पाटील हया रस्त्याचे कामासाठी मोर्चा घेऊन आले होते. महत्त्वाचा रस्ता असल्याने आयुक्तांनी त्यांना याकामी आश्वासन दिले होते.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- परंतु कोणत्त्या निधीतून हे काम करणार?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी / मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :- या कामासाठी निम्मी रक्कम महापालिका निधीतून तर निम्मी रक्कम दहाव्या वित्त आयोगाच्या निधीतून वापरली जाईल.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- महत्त्वाचा रस्ता आहे. मंजुरी दिली जावी.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- हया प्रस्तावास मंजुरी दया त्याचबरोबर इतर रस्ते सुध्दा घेतले जावेत.



मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण / मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- दुसरे कोणते रस्ते घेणार? दुसरे रस्ते घेतलेच जाणार नाहीत?

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :- कोणत्त्या निधीतून हे काम केले जाईल ते जाहिर करा....

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- निविदा मागवून ठेवू. वित्त आयोगाकडुन निधी उपलब्ध होणार आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- मुख्यलेखा अधिकारी आज येथे उपस्थित आहेत का?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- हा अतिशय महत्त्वाचा रस्ता आहे. त्यास मंजुरी दिली जावी.

श्री.भडकवाड (प्रभारी आयुक्त):- मुख्यलेखा अधिकारी व मुखलेखा परिक्षक यांना बोलावून घेतले जावे.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- हा रस्ता अतिशय महत्त्वाचा आहे, आम्ही कुठे नाही म्हणतो, आमचे पण महत्त्वाचे नाहीत काय?

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- श्री. नारायण पंजाबी यांच्या प्रभागात सार्वजनिक शौचालय तोडले गेले आहे. सार्वजनिक शौचालय बांधणे महत्त्वाचे नाही काय?

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी :-हा प्रस्ताव समंत केला जावा त्याच बरोबर माझ्या प्रभागात सार्वजनिक शौचालय बांधण्याच्या प्रस्तावास ही संमती दिली जावी.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- कोणत्त्या निधीतून हे काम करणार?

मा.सदस्य श्री. कैलास तेजी :- सर्व प्रभागांमध्ये पाण्याची समस्या आहे. या प्रस्तावाबरोबर जलवाहिनी चे प्रस्ताव सुध्दा मंजुरीस आणले जावेत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- रस्त्त्याचा हा जो प्रस्ताव आहे तो माझ्या प्रभागातील नाही, श्री. भगवान भांडे यांना माहिती आहे, श्री. सवेलदास ठाकुर यांच्या प्रभागाच्या बाजुला हे आहे. तसेच जलवाहीनीचा रस्त्त्याच्या कामाशी काय संबंध आहे? रस्त्त्याचे कामा बरोबर जलवाहिनी टाकण्याचे काम सुध्दा आणले जावे व मंजुर केले. अशा प्रकारे काही सदस्य काहीपण बोलतात.

मा.सचिव :- या प्रस्तावास कुणा कुणाचा विरोध आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- हे काम कोणत्त्या निधीतून करणार? हे स्पष्ट करत नाहीत तो पर्यंत आमचा विरोध आहे.

प्रस्तावाच्या विरोधात:- १) श्री. रमेश चव्हाण, २)श्री. राजेंद चौधरी, ३)श्री.तेजी कैलाश, ४)भांडे भगवान, ५)श्रीमती.भारती रजानी, ६)श्री. रामचंद्र पारवानी.



प्रस्तावाच्या बाजुने :-१)श्रीमती. ज्योती कालानी, २)श्री.कुमार आयलानी, ३)श्रीमती. कांता गजवानी, ४)श्री. पंजाबी नारायण, ५)श्री. ठाकुर बहरानी, ६)श्री. टाले प्रमोद, ७)श्री. तलरेजा विनोद, ८)श्री. किशोर वनवारी, ९)श्रीमती. पदमा वलेचा.

मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव बहुमताने समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर ५ येथील जुने बस टर्मिनस समोर शांतीप्रकाश आश्रम, वसंत बहार मार्गेचा रस्ता सिमेंट, क्रांक्रीटीकरण करणे कामी अतिरिक्त खर्चाची उपाययोजना करणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर-५ येथील जुने बस टर्मिनस ते स्वामी शांतीप्रकाश आश्रम बसंतबहार मार्गेच्या रस्त्याचे काम दहाव्या वित्त आयोगाच्या योजने अंतर्गत करणे साठी मंजुरी मिळणेकरीता सहसचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे या कार्यालयाचे पत्र क्र.उमपा/साबावि/शआ/४५२ , दिनांक १७.१०.२००० नुसार पाठविलेले आहे. या कामाचे सविस्तर प्राकलन मे. उत्तम इंजिनिअरींग

कन्सल्टन्सी प्रा.लि. यांनी तयार केलेले आहे. या कामाची प्राकलनीय किंमत रू. ७३,२९,१०४/- इतकी असून त्यास स्थायी समितीने ठराव क्र. ११६, दिनांक २१/९/२००० नुसार प्रशासकीय व वित्तिय मंजुरी दिलेली आहे. सदर कामाची कार्यवाही दहाव्या वित्त आयोगाच्या निधी उपलब्धतेनुसार करणे आहे. परंतु या कामासाठी दिनांक ११/१२/२००० रोजी किशोर वनवारी नगरसेवक प्रभाग क्र. १९ व त्या परिसरातील रहीवाशी यांनी मा. आयुक्त साहेबांची भेट घेऊन सदर काम त्वरीत चालू करण्याकरीता मागणी केलेली आहे. त्यावेळेस मा. आयुक्त यांनी या कामाच्या निविदा बोलविणे बाबीची प्रक्रिया वित्त आयोगाची मान्यता व अनुदान प्राप्त होईपर्यंत इत्त्यादी करणे करीता सुचना दिलेल्या आहेत. तरी उक्त कामाची निविदा काढण्याकरता मंजुरीसाठी सविनय सादर. तसेच निविदा प्रक्रिया मे. उत्तम इंतिनिअरिंग कंन्स्ल्टंन्सी प्रा.लि. कल्याण यांचे मार्फत पुर्वी मंजुर केलेल्या अटी व शर्ती नुसार पुर्ण करण्यासाठी मंजुरीस्तव पाठविले होते. परंतु मुख्य लेखा परिक्षक यांनी आक्षेप घेतल्यानंतर मा. आयुक्त यांनी मुख्य लेखा परिक्षक यांचेशी समक्ष चर्चा केली व वित्त आयोगाने सदर प्रस्तावास मान्यता देणे व जिल्हाधिका-यांनी प्रशासकीय मान्यता देणेही पुर्व अट असली तरी वित्त आयोगाने मान्यता न दिल्यास सदरचे काम महापालिकेच्या फंडातून घेण्याबाबत स्थायी समिती समोर धोरणात्त्मक निर्णयासाठी प्रस्तावित करण्यांत येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र.१७७ दि:-२२.१२.२०००.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. कुमार आयलानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावावर सभेच्या चर्चेअंती उल्हासनगर-५ येथील जुने बस टर्मिनस ते स्वामी शांतीप्रकाश आश्रम, बसंत बहार मार्गेचा रस्ता सिमेंट कॉक्रीटीकरण करणे कामी अतिरिक्त खर्चाची अर्थसंकल्पीय



अनुदानातील उपाययोजना किंवा उपलब्धी प्रलंबित निविदा काढणेस व पाठपुरावा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.६ वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- हे काम कोणत्त्या निधीतून करणार आहात?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- महापौर निधीतून.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- कुठे लिहिले आहे महापौर निधीतून म्हणुन?

श्री. चिजवानी (शहर अभियंता) :- हे काम महापौर निधीतून करण्यांत येणार नसुन ते महापालिकेच्या सर्व साधारण निधीतून करण्यांत येणार आहे.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- सर्व साधारण निधीतून...?

श्री. चिजवानी (शहर अभियंता) :-गोल मैदान येथील भगवंती नावानी स्टेज समोरील मोकळया जागेचा हॉलीबॉल खेळण्यासाठी मैदान म्हणुन वापर केला जात होता. हे मैदान प्रजापिता ब्रम्हकुमारी विश्व विद्यालयास देण्यांत आल्यानंतर प्रवेशव्दारा जवळील मोकळया मैदानात भिंत घालून हॉलीबॉल खेळण्यासाठी मैदान उपलब्ध करून दयायचे आहे. ही भिंत घालण्यासाठी रू.१ ,२० ,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- हॉलीबॉल खेळण्यासाठी रू.१ ,२० ,०००/-खर्चुन भिंत बांधायची?

श्री. चिजवानी (शहर अभियंता) :-भगवंती नावानी स्टेजच्या डाव्या बाजुचे मैदान प्रजापती ब्रम्हकुमारी या संस्थेस तर उजव्या बाजुचे मैदान हॉलीबॉल खेळण्यासाठी उपलब्ध करून दयायचे आहे.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :-कुणाचा प्रस्ताव आहे, कुणी सांगीतले?

मा.सदस्या श्रीमती. कांता गजवानी :- हे काम सर्वसाधारण निधीतून करत आहात तर सर्व सदस्यांच्या प्रभागामध्ये ५-५ लाख रूपये खर्चाचे काम केले जावे.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :-आयुक्त साहेब, आपण आश्वासन दया.

--२०--

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- आयुक्तांनी सांगावे की, २-२ लाखाचे आमच्यापण प्रभागातील काम केले जाईल म्हणुन.

मा.सदस्य श्री. ठाकुर बहरानी / श्री. किशोर वनवारी :-एक-एक लाखाचेच काय पण दोन-दोन लाखाची कामे केली जातील परंतु ज्यांनी प्रस्तावाच्या बाजुने मत दिले त्यांनाच...

श्री. दत्ता भडकवाड (प्रभारी आयुक्त) :- नाही,नाही देणार..

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- सर्व साधारण निधीतून काम करत असाल तर माझ्या प्रभागातील कामे सुध्दा मंजुर केली जावीत.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- प्रजापिता ब्रम्हकुमारी ही संस्था आपला स्वत:चा पैसा लावून हे मैदान विकसित करणार आहे.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- भाभीजी आपण आपल्या स्थायी समिती सभापती निधीतून किंवा महापौर निधीतून २-२ लाख रू. या खर्चासाठी उपलब्ध करून दयावेत.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- श्री.नारायण पंजाबी यांच्या प्रभागामधील शिवशक्ती कॉलनी येथे जे सार्वजनिक शौचालय तोडले गेले आहे. त्याबाबत आयुक्त साहेबांनी कबुल केले आहे की, आम्ही तेथे नविन शौचालय तयार करून देऊ म्हणुन. परंतु ते कोणत्त्या शिर्षातुन करायचे हा प्रश्न उद्‌भवला होता?

श्री. चिजवानी (शहर अभियंता) :-सर्व साधारण निधीतून ते काम केले जाईल.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- आपण हे काम कोणत्त्या निधीतून करत आहेत ते सांगीतले परंतु रस्त्याचे कामाचा जेव्हा प्रस्ताव आला होता तेव्हा हे काम कोणत्त्या शिर्षातुन केले जाईल ते आपण सांगितले नाही.

श्री. चिजवानी (शहर अभियंता) :-हे काम कोणत्त्या शिर्षातुन करायचे ते लेखाधिका-यांना विचारून सांगु.

मा.आयुक्त :- उद्यानांचा वेगळा शिर्ष आहे. वित्त आयोगाची जी शिफारस आहे त्यावर मुख्यलेखाधिकारी व मुख्यलेखापरिक्षक यांनी हरकत घेतल्यानंतर या प्रस्तावास जिल्हाधिका-यांनी संमती दिली नाही तर या प्रस्तावाच्या कामासाठी होणारा खर्च हा महानगरपालिकेकडुन करण्यांत येईल. अशा प्रकारचा हा प्रस्ताव स्थायी समितीपूढे मंजुरीसाठी ठेवला आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- स्थायी समितीने या पूर्वीच या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी दिलेली आहे.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर-१ येथील गोलमैदानातील भगवंती नावानी स्टेज समोरील जागेचा विकास करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

--११--

प्रस्तावना :-

उल्हासनगर -१ येथील गोलमैदान या बगीच्यातील भगवंती नावानी स्टेज समोरील भागातील मोकळया जागेत व्हॉली बॉल खेळण्यासाठी मैदान आहे. हे मैदान ब्रम्हकुमारीला देण्यात येत आहे. त्यामुळे या विभागातील व्हॉली बॉलचे खेळाडुंच्या मागणीप्रमाणे मा. आयुक्त यांनी शहर अभियंता यांचे समवेत या बगीच्यास भेट दिली असता मुख्य प्रवेश व्दाराजवळील सोबत नकाशात दर्शविलेल्या भागात सदर व्हॉली बॉल खेळण्यासाठी कुंपन भिंत घालुन जसे मैदान उपलब्ध करून देण्यात यावे. असे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार या कामी कुंपन भिंत यासाठी रू. १,२०,२५०/- इतका खर्च तयार केलेल्या प्राकलनानुसार येणार आहे. सदर काम महानगरपालिकेच्या लेखा शिर्ष सीपी-२ मधुन करता येऊ शकते. व त्यासाठी रू.२०,९५,०००/- इतकी तरतुद सद्या उपलब्ध आहे. तरी सदर रू.१,२०,२५०/- खर्चाच्या प्राकलनाला प्रशासकीय व वित्तिय मंजुरी व सदर काम निविदा मागवून अथवा मजुर कामगार सहकारी संस्थेकडून करून घेण्याकरिता मंजुरीकरता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र.१७८ दि:-२२.१२.२०००.

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर -१ येथील गोलमैदानातील भगवंती नावानी स्टेज समोरील जागा व्हॉली बॉलचे खेळण्यासाठी विकास करणे कामी रू.१,२०,२५०/- खर्चाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे व सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असून आयुक्तांस मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.७ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- पनवेलकरांना कचरा वाहतुकीचे कामास मुदत वाढ देण्याचा हा जो विषय येथे चर्चेस आला आहे. पनवेलकरांना माहे डिसेंबर९९ ते डिसेंबर २००० या कालावधीपर्यंत कचरा वाहतुक करण्यास मंजुरी देण्यात आलेला आहे. त्यानुसार ते आज पर्यंत कचरा वाहतुक करण्याचे काम करत आहेत. ३१ डिसेंबर २००० रोजी त्यांची मुदत संपत असून त्यांना



पुढील ३ महिन्यांसाठी मुदत वाढ देण्याचा प्रस्ताव आहे. परंतु या प्रस्तावाबाबत ज्या अटी शर्ती लिहिल्या आहेत त्या बरोबर नाहीत रविवारी कचरा वाहतूक करणा-या गाडया बंद असतात तरीही त्यांना ६४ हजार रूपये दयावे लागतात. रविवारी सुध्दा कचरा वाहतूक करणा-या गाडया चालु राहिल्या पाहिजेत, जेथुन कचरा उचलला जातो अशी ४००-५०० ठिकाणे आहेत त्याव्यतिरिक्त २००-३०० ठिकाणाची महापालिकेच्या दप्तरी नोंद नाही या ठिकाणांवरील सुध्दा कचरा उचलला गेला पाहिजे. तसेच जेथे सी.सी.पॅसेज तयार होतो, रस्त्यावर जे इमारत साहित्य पडते ते सुध्दा उचलले पाहिजे, गल्लीबोळामधील कचरा उचलला जात नाही ते लोक म्हणतात आमची गाडी गल्लीबोळात जात नाही, परंतु मजूर घमेल्यांनी तेथील तो कचरा गोळा करून आणु शकतो. याप्रमाणे गल्लीबोळातील सफाई झाली पाहिजे. याशिवाय नगरसेवकांनी दिलेली तक्रार अटेन्ड केली पाहिजे. शहरात सद्या कॉलराची साथ सुरू असल्याने नागरिक भयग्रस्त झाले आहेत. यासाठी शहर (क्लीन व ग्रीन) स्वच्छ व हरीत राहिले पाहिजे. याशिवाय कचरा वाहतुक करणारे जे जूने ठेकेदार होते त्यांच्याच गाडया पनवेलकर कचरा

वाहतुक करण्यासाठी वापरत आहेत. या गाड्या अतिशय जून्या असून या गाड्यामधुन अर्धा कचरा रस्त्यावर सांडत जात असतो.

मा.सदस्य श्री. कुमार आयलानी :-नगरसेवकांनी दिलेली तक्रार त्यांनी प्राधान्याने २४ तासात निकाली काढली पाहिजे.

मा.सदस्य श्री. ठाकुर बहरानी :- जून्या कालबाह्य झालेल्या गाड्या कचरा वाहतूक करण्याकामी वापरल्या जाऊ नयेत अशी यापूर्वी अट घातली होती. तरीही आता त्या गाड्या कश्या वापरात आणल्या जात आहेत?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- कच-याच्या या गाड्या अर्ध्या-अर्ध्या भरून जात आहेत.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- तक्रार करण्यासाठी दुरध्वनी सेवा उपलब्ध असली पहिजे तसेच ज्या जुन्या ठेकेदारांनी कचरा वाहतूकीचे काम केले आहे त्यांना त्यांचे पेमेंट मिळालेले नाही ते त्यांना मिळाले पाहिजे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- कचरा वाहतुक करणा-या जुन्या ठेकेदारांपेक्षा श्री. पनवेलकर यांचे काम चांगले आहे परंतु ते आणखी चांगले झाले पाहिजे.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- कचरा वाहतुकीचे कामी मेसर्स व्ही.आर.पनवेलकर यांना ३१ मार्च २००१ पर्यंत पूर्वीच्या संविदेतील अटी व शर्तींच्या अधिन राहून मुदत वाढ देणे बाबत.

प्रस्तावना :-

सन् १९९९-२००० सालात शहरातील कचरा वाहतुकीची निविदा माहे डिसेंबर,१९९९ मध्ये मागविण्यात आली होती. सदर प्राप्त झालेल्या निविदा स्थायी समितीने ठराव क्र.८१, दिनांक १० डिसेंबर,१९९९ अन्वये न स्विकारता मा.आयुक्त यांना स्थायी समिती ठराव क्र.६२ दिनांक.२२ ऑक्टोबर, १९९९ अन्वये दिलेल्या निर्णयानुसार त्यांनी माहे दि.२५ ऑक्टोबर ते १० डिसेंबर,१९९९ या कालावधीत मेसर्स व्ही.आर.पनवेलकर, अंबरनाथ, यांना शहरातील दैनंदिन



कचरा ६४,०००/- रूपये प्रति दिन दराने उचलण्याच्या केलेल्या कार्यवाहीस, दिनांक. ३१ डिसेंबर, २००० पर्यंत सदर दराने मे. व्ही.आर.पनवेलकर, वाहतुकीचे कामास मंजुरी दिलेली आहे.

मेसर्स व्ही. आर. पनवेलकर यांच्या कचरा वाहतुकीच्या कामाची मुदत दिनांक. ३१ डिसेंबर, २००० रोजी संपत आहे. मे.व्ही.आर पनवेलकर यांचे कचरा वाहतुकीचे काम व कचरा डंम्पींग ग्राउंड सपाटीकरण्याचे काम समाधानकारक आहे. सध्या कॉलरा रोगाची साथ सुरू असल्यामुळे कचरा नियमित उचलणे आवश्यक आहे. तरी याबाबत त्यांचे कामास दिनांक. ३१ मार्च, २००१ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी असे वाटते. तसेच कचरा उचलण्याच्या कामाचे मे.व्ही.आर.पनवेलकर, यांचे कंत्राटास पुढे मुदतवाढ द्यावी किंवा कचरा वाहतुकीची नविन निविदा मागविण्यात यावी. याकरिता मा.स्थायी समिती समोर चर्चे करिता व निर्णयाकरिता सादर.

स्थायी समिती ठराव क्र.१७९ दि:-२२.१२.२०००.

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कचरा वाहतुकीचे कामी मेसर्स व्ही. आर.पनवेलकर यांना ३१ मार्च,२००१ पर्यंत पुर्वीच्या संविदेतील अटी व शर्तींच्या अधिन राहून मुदत वाढ देणेस मान्यता देत आहे. तसेच अनुषंगिक अंर्तभुत खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :-विषय क्र.८ वाचुन दाखवितात.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- नगरसेवक निधीतून प्रभाग क्र.४७ व ५५ मध्ये जलवाहीनी टाकणे कामीचे दोन प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. १८० दिनांक :- २२.१२.२०००.

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी.



ही स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधीकृत करीत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | वार्ड क्र.४७ उल्हासनगर-५ मध्ये बॅरेक नं.१७२३ ते नगरपालिका निवासी क्षेत्र पर्यंत १०० मी.मी.व्यासाची जलवाहिनी | रू.९८,६००/- |

टाकणे बाबत.(नगरसेवक निधीतून)

२. वार्ड क्र.५५ उल्हासनगर-४ मध्ये ओ.टी.चौक ते इंदिरा नगर पर्यंत ५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत. रू.७१,९००/-
(नगरसेवक निधीतून)

---

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका
मा.सचिव :- विषय क्र.९ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- हा कसला प्रस्ताव आहे? जरा समजवा तर.....

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- आपले आमदार श्री. पप्पू कालानी यांनी त्याचे आमदार निधीतून प्रभाग क्र.२८ मधील दिवाबत्तीचे कामासाठी एक लाखाचा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. त्याबाबत त्यांना मी धन्यवाद देतो.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- हे काम मजुर कामगार सहकारी संस्थेकडून करून घेतले पाहिजे.



मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- प्रभाग क्र.२८ मध्ये आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांर्तगत दिवाबत्ती लावणे कामी आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

प्रस्तावना :-

महानगरपालिकेनी मा. जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र.५२० दि.१६.८.२००० अन्वये मा.आमदार श्री.सुरेश (पप्पु) कालानी यांनी त्यांचे दि.२१.७.२०००च्या पत्रात नमुद केलेल्या कामाच्या यादीप्रमाणे २०००-२००१ वर्षात आमदाराचा स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सुचविलेल्या प्रभाग क्र.२८ मध्ये विद्युत

कामाचे रू.९९,३००/- चे प्राकलन बनवून मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविले होते त्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी यांचे आदेश क्र.७४८ दि.५.१२.२००० अन्वये आमदाराचा स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत उपलब्ध निधीतून प्रभाग क्र. २८ मध्ये स्ट्रीट लाईटची सोय करण्या करिता रू.९९,०००/- यास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. मुख्य लेखा अधिकारी यांनी निविदा मागविण्याची सल्ला दिलेली आहे. सदर प्रस्ताव अल्प रक्कम फक्त रू.९९,०००/-चा असुन मुख्य लेखा परिक्षक यांनी विद्युत विभागाचा प्रस्तावानुसार हे कार्य मजूर सहकारी कामगार संस्थे मार्फत करण्याचे प्रस्तावास मान्यतेसाठी शिफारिश केलेली आहे. हे सर्व बाबी लक्षात घेऊन सदर कार्य निविदा मागवून किंवा मजुर सहकारी कामगार संस्थे मार्फत करून घेण्याकरिता निर्णय घेण्यासाठी स्थायी समिती पुढे प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १८१ दिः-२२.१२.२०००.

सुचकाचे नाव :- श्री.विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्र.क्र.२८ मध्ये आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत दिवाबत्ती लावणेचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असून आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदा करणेस प्राधिकृत करीत आहे. तसेच अंर्तभुत खर्च रू.९९,०००/- यास वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--२६--
मा.सचिव :- विषय क्र.१० वाचुन दाखवितात.

श्री. चिजवानी (शहर अभियंता) :- ही कामे नगरसेवक निधीतून करावयाची असून काही ठिकाणच्या कामांची स्थळे बदली करायची असून ती आपणास सांगतो. श्री.ठाकुर बहरानी यांच्या प्रभागातील कामाचे स्वरूप व लोकेशन बदली करायचे आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-हा प्रस्ताव समंत केला जात आहे, बदली केलेली स्थळे नंतर दया.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- नगरसेवक निधीतून सार्वजनिक बांधकामां अंर्तगत

करावयाच्या ६ कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणेबाबत.

स्थायी समिती ठराव क्र. १८२ दिनांक :- २२.१२.२०००.

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामचंद पारवानी.

ही स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधीकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र.५८ मध्ये बॅ.नं.८४१,८५४ जवळ आणि विविध ठिकाणी रस्ता एम.२५० ने बांधणे सी.सी.पायवाटा आणि नाल्या बांधणे.(नगरसेवक निधीतून) | रू.१,९९,९००/- |
| २. | उल्हासनगर ३ येथील प्रभाग क्र.५२ मध्ये सिंदवाडी बॅ.नं.८५४,५५ जवळ आणि विविध ठिकाणी रस्ता एम.२५० ने बांधणे आणि सी.सी.पायवाटा आणि नाल्या बांधणे. (नगरसेवक निधीतून) | रू.१,९९,९५०/- |
| ३. | उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र.४२ मध्ये गणेश नगर आणि विविध ठिकाणी सी.सी. पायवाटा व नाल्या बांधणे (नगरसेवक निधीतून) | रू.१,९९,९००/- |



| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| ४. | उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र.५७ मध्ये बॅ.क्र.८६६-८६७, ८९४-८९५ आणि ९४७-९४९ च्या मध्ये चेकर टाईल्स लावणे बाबत. (नगरसेवक निधीतून) | रू.१,९९,९००/- |
| ५. | उल्हासनगर येथील प्रभाग क्र.६४ मध्ये बॅ.नं.१६०जवळ सहा बैठकीचे शौचालय बांधणे. (नगरसेवक निधीतून) | रू.२,१६,०००/- |
| ६. | उल्हासनगर येथील प्रभाग क्र.६४ मध्ये | |

बॅ.नं.१७३ जवळ सहा बैठकीचे शौचालय बांधणे. रू.२ ,१६ ,०००/-
(नगरसेवक निधीतून)

---

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५. ४८ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

प्रकाश पं. कुकरेजा.
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.